# सातारा नगरपालिकेचा इतिहास
# (१८५३ ते २००३)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास
विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक
श्री. संजीव सुखलाल बोडखे

मार्गदर्शक
प्रा.डॉ.एस.पी. शिंदे

नोव्हेंबर २०१४

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. संजीव सुखलाल बोडखे यांनी **सातारा नगरपालिकेचा इतिहास (१८५३ ते २००३)** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा
दिनांक :

मार्गदर्शक

प्रा. डॉ.एस.पी. शिंदे

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, सातारा नगरपालिकेचा इतिहास (१८५३ ते २००३) submitted by Shri. Sanjiv Sukhlal Bodkhe to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph. D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Interview.

Place: Pune
Date -

Signature of Research Guide

Signature of Head of the Department

Office seal

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **सातारा नगरपालिकेचा इतिहास (१८५३ ते २००३)** हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : लोणंद — संशोधक

दिनांक :

(श्री. संजीव सुखलाल बोडखे )

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील पीएच. डी. प्रबंध सातारा नगरपालिकेचा इतिहास (१८५३ ते २००३) या विषयावर विद्यावाचस्पती(पीएच. डी.)पदवीसाठी सादर करीत आहे. सातारा ही मराठयांची राजधानी असल्यामुळे सातारा शहराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सातारा नगरपालिकेने या शहराच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे नगरपालिकेची माहिती प्रकाशात यावी. या हेतूने हा विषय पीएच.डी.साठी निवडलेला आहे.

माझे मार्गदर्शक आदरणीय प्रा.डॉ.एस.पी.शिंदे यांनी मला विषयाच्या निवडीपासून संपूर्ण प्रबंध पूर्ण होईपर्यंत बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांच्यामुळेच हा प्रबंध लिहिण्यास प्रेरणा मिळाली, त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. त्यांच्या स्नेहपूर्वक सहकार्यामुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले, याबद्दल त्यांचे आभार मानण्याऐवजी ऋणात राहण्यात आनंद वाटतो.

माझ्या संशोधन कार्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय डॉ. श्रीकांत कार्लेकर (अधिष्ठाता, सामाजिकशास्त्र विभाग) यांनी बहुमोल सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे. इतिहास विभाग प्रमुख डॉ. संध्या पंडित यांनी मार्गदर्शन केले व वेळोवेळी सूचना केल्या त्याबद्दल आभारी आहे. सर्व कार्यालयीन सेवक यांचाही आभारी आहे.

माझ्या संशोधनासाठी सातारा नगरपालिकेचे मुख्याधिकारी अभिजीत बापट व रेकॉर्ड विभागातील अधिकारी व सेवक वर्गाने नगपालिकेतील आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून दिली. तसेच नगरपालिकेतील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी आणि नगरपालिका शिक्षण मंडळातील अधिकारी, शिक्षक व सेवक वर्गाने माहिती दिल्याबद्दल या सर्वांचे आभार.

संशोधनासाठी मुंबई पुराभिलेखागार विभागातील संचालक अधिकारी व कार्यालयीन प्रमुख सौ. साळुंखे मॅडम यांनी मला परवानगी देऊन कागदपत्र मिळवून देण्यासाठी मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार. मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई येथील डॉ.खोबरेकर सर व इतर अधिकाऱ्यांनी मला सहकार्य केल्याबद्दल आभार मानतो. पुणे येथील पेशवे दप्तर व कोल्हापूर येथील पुराभिलेखा–गारामधील संचालक, कार्यालयीन कर्मचारी यांनी मला सहकार्य केल्याबद्दल आभार मानतो.

सातारा येथील नगरवाचनालय, पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ पुणे येथील जयकर ग्रंथालय, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा ग्रंथालय याठिकाणी मला जी माहिती उपलब्ध झाली, त्याबद्दल ग्रंथपाल व सेवकांचे आभार.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड.रावसाहेब शिंदे, व्हाईस चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर सहसचिव प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील, माजी सचिव प्राचार्य डॉ. अरविंद बुरूंगले, माजी सहसचिव प्राचार्य डॉ नानासाहेब गायकवाड व शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद येथील प्राचार्य डॉ. टी. एन. घोलप यांनी बहुमोल मार्गदर्शन करून सहकार्य केले त्याबद्दल आभार.

या विषयाच्या संशोधन कार्यासाठी मा.प्राचार्य डॉ. व्ही एन. नलावडे, प्राचार्य डॉ.मोहन राजमाने, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, प्रा. डॉ. विनायक जाधव, प्रा. भास्कर कदम, प्रा. डॉ. व्ही. पी. पवार, डॉ. डी. बी. मासाळ, डॉ. अवनिश पाटील, प्रा. डॉ. अभय पाटील, प्रा. व्ही. एस. यलमार यांनी सहकार्य केले त्याबद्दल आभार.

प्रा. आर. के. देशमुख, प्रा. डॉ. दिलीप जाधव, प्रा. डॉ. दत्तात्रय कोरडे, प्रा.डॉ.गणेश जाधव, प्रा.सुभाष वाघमारे, प्रा.बी.एच काकडे, प्रा.जयपाल सावंत, प्रा.किरण कुंभार, प्रा. मनोहर निकम, प्रा.संजय मेस्त्री, प्रा. डॉ. व्ही. डी. पाटील, प्रा. जे. ए. आफळे, प्रा. यु. व्ही. नलावडे, प्रा. संजय भोसले, प्रा. आर. बी. सातपुते, प्रा. डॉ. अजित जाधव, प्रा. डॉ. सुमित यादव, प्रा. विकास काळे, श्री.विजय मांडके चि. अजय शिंदे, यांनी मदत केली त्यांचेही आभार. या शोधप्रबंधाचे अतिशय सुक्ष्मपणे वाचन करून व्याकरणदृष्टया दुरूस्त्या सुचविल्याबद्दल प्रा.घनशाम गिरी यांचे मनःपूर्वक आभार.

माझे आदरणीय आई दादा यांचे आशीर्वाद, भाऊ प्रा. दिनकर, बहिण प्रा.संगिता, व भाऊजी गणेश रौंदळे, भाचा अंशुमन या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे व प्रेमामुळेच हे संशोधन पूर्ण होऊ शकले.

या प्रबंधाचे टंकलेखन अचूक व सुबक करून त्यास मोहक रूप देऊन या शोधप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल समृद्धी टाईपरायटरचे प्रोप्रा.वैशाली कोरडे यांचे आभार मानतो

अभ्यासक

श्री.संजीव सुखलाल बोडखे

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | प्रतिज्ञापत्र | II |
| ● | प्रमाणपत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | साताऱ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १ ते ३९ |
| | संशोधन विषयाचे नांव, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची | |
| | उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, | |
| | संशोधन तंत्र, संशोधन पद्धती, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, | |
| | संदर्भ साधने, सिद्धांत कल्पना, प्रस्तुत प्रबंधाचे प्रकरणानुसार | |
| | स्वरूप, संशोधन विषयाचे महत्त्व, साताऱ्याची भौगोलिक | |
| | परिस्थिती सातारा नावाची उत्पत्ती, साताऱ्याचा इतिहास, | |
| | प्राचीन सातारा, मध्ययुगीन कालखंड, आधुनिक कालखंड | |
| २. | नगरपालिकेची स्थापना, विकास व प्रशासन | ४० ते ११८ |
| ३. | नगरपालिकेच्या शाळा व शैक्षणिक सुविधा | ११९ ते १५६ |
| ४. | सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता | १५७ ते १८३ |
| ५. | नगरपालिका उत्पन्न व खर्च | १८४ ते २२८ |
| ६. | नगरपालिकेचे सातारा शहराच्या विकासातील योगदान | २२९ ते २५५ |
| ७. | उपसंहार | २५६ ते २७१ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | २७२ ते २८० |
| | परिशिष्टे | २८१ ते २८७ |
| | नकाशे | २८८ ते २९३ |
| | छायाचित्रे | २९४ ते ३२४ |

# प्रकरण पहिले
# साताऱ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## १.१ प्रस्तावना

भारताच्या इतिहासात स्थानिक स्वराज्य सस्थांचे महत्त्व प्राचीन काळापासून होते. प्राचीन भारतीय इतिहासात गणराज्य, मौर्यकालीन ग्राम व नगर व्यवस्थापन, चौलांचे ग्राम प्रशासन, गुप्तकालीन पंचायती व्यवस्था, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव इत्यादींचा उल्लेख सापडतो. मध्ययुगातील मोगल कालखंडात भारतात शहरांचा उदय मोठया प्रमाणात झाला. पुढे ब्रिटिश कालखंडात स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास मोठया प्रमाणात झाला. त्यांनी भारत जिंकून ताबा घेतल्यानंतर आपले प्रशासन मजबूत करण्यासाठी काही खास व्यवस्था येथे निर्माण केल्या. त्यामुळे आधुनिक स्थानिक स्वराज्य संस्थाचा उदय व विकास घडून आला.

सातारा शहराची स्थापना सन १७२०–२१ साली थोरल्या शाहू महाराजांनी केली. त्यांनी आपली राजधानी अजिंक्यतारा किल्ल्यावरून खाली पायथ्याला शाहूनगर उर्फ सातारा येथे आणली. त्यामुळे साताऱ्याचा विकास झाला. त्यांनी या शहरात सातवारांच्या नावाने पेठा वसविल्या, पिण्याचे पाणी शहरात आणले. त्यांच्यानंतर छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी या शहराचा विकास मोठया प्रमाणात केला. १८४८ मध्ये ब्रिटिशांनी सातारा राज्य बरखास्त करून नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी १ ऑगस्ट १८५३ साली सातारा येथे नगरपालिकेची स्थापना केली.

साताऱ्यास वैभवशाली इतिहासाची परंपरा लाभलेली आहे. पंडित जवाहरलाल नेहरूनी 'जय सातारा' म्हणून गौरवलेल्या या सातारा भूमीला अत्यंत प्राचीन काळापासूनचा इतिहास आहे. इतिहासाचा शोध घेतल्याशिवाय आपणास या प्रदेशामधील कोणत्याही ऐतिहासिक घटनेची चर्चा करता येणार नाही. इ. स. पूर्व ते आधुनिक काळ अशी सातारची वाटचाल आहे. या सर्व पार्श्वभूमीचे विवेचन या प्रकरणात करत आहे .

## १.२ संशोधनाचा विषय

सातारा नगरपालिकेचा इतिहास (१८५३ ते २००३) हा माझ्या संशोधनाचा विषय आहे.

## १.३ संशोधन विषयाची निवड

ब्रिटिशांनी भारतीय लोकांना राजकीय लोकशाहीचे प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास घडवून आणला. स्थानिक पातळीवरील प्रश्न तेथे राहणारे लोक चांगल्या प्रकारे सोडवू शकतील. या भूमिकेतून या संस्थाचा उदय झाला आहे, सातारा हे मध्ययुगीन काळात मराठयांच्या राजधानीचे शहर होते. या शहराचा विकास व विस्तार कशा पद्धतीने झाला व नगरपालिकेची त्यात कोणती भूमिका होती याचा अभ्यास करण्याच्या हेतूने या विषयाची निवड केली आहे. आधुनिक काळात प्रशासन व्यवस्थेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाना फार महत्त्व आहे. सातारा नगरपालिकेच्या प्रशासनाचा अद्यापपर्यंत या पद्धतीने कोणीही अभ्यास केलेला नाही. सातारा नगरपालिकेचे वैशिष्ट्य म्हणजे भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांचा प्रारंभ आणि विकास गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दीत (इ.स.१८८१ ते १८८४) झाला. मात्र त्यापूर्वी सातारा येथे इ.स.१८५३ मध्ये स्थापन झालेली ही नगरपालिका आहे. म्हणून तिच्या कार्याचा आधार व सर्वांगीण अभ्यास व्हावा, या अनुषंगाने हा विषय निवडला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही शिक्षणाच्या प्राथमिक शाळा मानल्या जातात. आधनिक काळात भारतासारख्या लोकशाही प्रधान राष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी घटक राज्य असून त्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा इतिहास अभ्यासणे निश्चित भावी काळात उपयुक्त ठरणार आहे. सातारा नगरपालिका ही भारतात ब्रिटीश सरकारने स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायदा करून त्यांची सरकारमार्फत स्थापना व विकास करण्याची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी सातारा शहरामध्ये लोकाभिमुख सातारा शहराचा सर्वांगीण विकास होण्याकरीता इ.स.१८५३ मध्ये सातारा नगरपालिकेची स्थापना केली. ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. अद्याप या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्याचा साकल्याने अभ्यास करण्याचा कोणत्याही अभ्यासकाने प्रयत्न केलेला नाही. म्हणून या संशोधन प्रकल्पातंर्गत सातारा नगरपालिकेचा इ.स.१८५३ ते २००३ या काळात केलेल्या कामगिरीचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे

१) सातारा नगरपालिकेच्या स्थापनेमागील उद्देश्यांचे विश्लेषण करणे.

२) सातारा नगरपालिकेचा स्थापनेपासून सर्व बाबींचा आढावा घेणे.

३) सातारा नगरपालिकेच्या विकासाचा अभ्यास करणे.

४) सातारा नगरपालिकेतील प्रशासकीय संरचनेचा अभ्यास करणे.

५) सातारा नगरपालिकेने शहरातील केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

६) सातारा नगरपालिकेने शहरातील लोकांच्या आरोग्यासाठी केलेल्या कामाचा आढावा घेणे.

७) सातारा नगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाचा आढावा घेणे.

८) सातारा नगरपालिकेमुळे सातारा शहराचा विकास कसा झाला हे पाहणे.

## १.५ संशोधनाची गृहितके

१) सातारा नगरपालिकेमुळे सातारा शहराचा विकास झाला.

२) सातारा नगरपालिकेने लोकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली होती.

३) सातारा नगरपालिकेने स्थापनेपासून शिक्षण व्यवस्थेत योगदान दिले आहे.

४) सातारा नगरपालिकेची प्रशासकीय संरचना विकसनशील होती.

५) सातारा शहराच्या विकासासाठी नगरपालिकेची स्थापना करण्यात आली.

६) सातारा नगरपालिकेचा विकास टप्प्या-टप्प्याने झाला.

७) सातारा नगरपालिकेने उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

इ.स.१८५३ मध्ये सातारा नगरपलिकेची स्थापना झाली. त्या स्थापनेपासून मी २००३ पर्यंत तेथील नगरपालिकेविषयी संशोधन विषय अभ्यासासाठी घेतला आहे. ही माझी व्याप्ती आहे. तर सातारा नगरपालिकेच्या स्थापनेपासून १५० वर्षाच्या कालखंडाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. ही या संशोधन विषयाची मर्यादा आहे.

## १.७ संशोधन तंत्र

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना संशोधनाच्या काही तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे. यासाठी मूळ विषयाच्या संदर्भातील साधनांचे प्राथमिक साधने व दुय्यम साधने असे विभाजन करून निवडलेल्या साधनांच्या आधारे प्रस्तुत विषयाचे विश्लेषण

केले आहे. निवडलेल्या साधनांच्या आधारे घटनांची सत्यता तपासण्यात आली आहे. प्रस्तुत साधनांच्या आधारे तळटीपा दिलेल्या आहेत. संदर्भ यादी, निवडक छायाचित्रे व योग्य परिशिष्टे दिलेली आहेत. योग्य त्या संशोधन तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

## १.८ संशोधन पद्धती

संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्त्वे परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पद्धती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. या शोधप्रबंधासाठी ऐतिहासिक पद्धती, सर्वेक्षणात्मक पद्धती, संदर्भ पद्धतीचा उपयोग केलेला आहे. कागदपत्रांच्या आधारे प्रचलित ज्ञानामध्ये भर घालून एखाद्या प्रश्नावर नवा प्रकाश टाकणे तसेच मूलभूत संशोधनामध्ये काहीतरी भर घालणे हा ऐतिहासिक संशोधनाचा हेतू असतो.

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीसाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेतलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या पाठीशी असलेल्या सैद्धांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वर्णनात्मक किंवा गुणात्मक पद्धती, सैद्धांतिक व विश्लेषणात्मक पद्धतीचाही वापर केलेला आहे. सदर संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक पद्धती, सर्वेक्षणात्मक पद्धती, सांख्यिकी पद्धती, मुलाखत पद्धती यांचाही वापर करण्यात आलेला आहे. विविध समस्यांचे अन्वयार्थ सांगण्यासाठी योग्य त्या ठिकाणी तळटिपा दिलेल्या आहेत. वृत्तपत्रे, शासकीय अहवाल, गॅझेटियर, नगरपालिकेचे इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे.

## १.९ संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन

डॉ. अरूण भोसले यांनी सन १९७८ मध्ये “सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास (१८८५–१९४७)” या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पीएच. डी. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये केवळ सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीची माहिती दिलेली आहे. प्रा. डॉ. विनायक जाधव यांनी सन १९८६ मध्ये “छत्रपती प्रतापसिंह महाराज आणि सातारा(१८०८–१८३९)” या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम.फिल. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी सातारा शहरांविषयी केलेल्या राजकीय,

सामाजिक, व सांस्कृतिक कार्याची माहिती दिलेली आहे.

डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी सन १९९५ मध्ये “हिस्ट्री ऑफ द सातारा स्टेट (१८१८–१८४८)” या विषयावर पुणे विद्यापीठ, पुणे येथे पीएच. डी. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केला आहे. यामध्ये केवळ सातारा राज्यातील छत्रपती शाहू महाराजांच्यापासून ते आप्पासाहेब महाराजांच्या पर्यंतची माहिती दिलेली आहे. डॉ. निवासराव वरेकर यांनी सन २००९ मध्ये “स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर : एक नागरी ऐतिहासिक अभ्यास” या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. येथे पीएच. डी. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहराची माहिती दिलेली आहे. डॉ. विनायक जाधव यांनी सन २०१३ मध्ये “सातारा राज्यातील जहागीरदार–एक चिकित्सक अभ्यास (१८१८ ते १८४८)” या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे पीएच. डी. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये सातारा राज्यातील सहा जहागीरदारांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

कु. नलिनी दिसले यांनी सन २००५ मध्ये “सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(१९००–१९४७)” या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम.फिल. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये सातारा शहरांविषयीचा राजकीय, सामाजिक, व सांस्कृतिक कार्याची माहिती दिलेली आहे. प्रा.रविंद्र गायकवाड यांनी सन १९९० मध्ये “सातारा तालुक्यातील पक्षीय राजकारण (१९७७–१९८७)” या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम.फिल. पदवीसाठी राज्यशास्त्र विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये सातारा तालुक्यातील पक्षीय राजकारणाची माहिती दिलेली आहे. प्रा.गायत्री चव्हाण यांनी सन २००८ मध्ये “सातारा नगरपालिकेचे वित्तीय प्रशासन–एक दृष्टिक्षेप (२००१–२००६)” या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम.फिल. पदवीसाठी राज्यशास्त्र विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये सातारा नगरपालिकेच्या वित्तीय प्रशासनाची माहिती दिलेली आहे.

प्रा.संजय भोसले यांनी सन २००८ मध्ये “सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा : एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)” या विषयावर टिळक महाराष्ट्र

विद्यापीठ पुणे येथे एम.फिल. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती दिलेली आहे. प्रा. ज्ञानेश्वर आवाळे यांनी सन २००९ मध्ये “सातारा जिल्हयातील नगरपालिकेचे राजकारण (१९९२–२००६)” या विषयावर य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक येथे एम.फिल. पदवीसाठी राज्यशास्त्र विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये सातारा जिल्हयातील आठ नगरपालिकांचे सन १९९२ ते २००६ काळातील राजकीय घटनांची माहिती दिलेली आहे.

प्रा. किरण कुंभार यांनी सन २००९ मध्ये “छत्रपती शाहू आणि सातारा (१७००–१७४९)” या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे एम.फिल. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची माहिती दिलेली आहे. प्रा.दत्तात्रय ओवाळे यांनी सन २०११ मध्ये “श्री.छत्रपती शिवाजी संग्रहालय, सातारा : एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)” या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे एम. फिल. पदवीसाठी इतिहास विषयातून शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी संग्रहालयाची माहिती दिलेली आहे.

अशा प्रकारे वरील सर्व अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये सातारा नगरपालिकेची सविस्तर माहिती कोठेही दिलेली नाही. त्यामुळे मी माझ्या शोधप्रबंधातून सातारा नगरपालिकेचा सविस्तर इतिहास दिलेला आहे.

### १.१३ संशोधनाचे महत्त्व

सातारा शहराच्या विकासात नगरपालिकेचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. त्यामुळे नगरपालिकेचा प्रशासकीय, शैक्षणिक, शहर स्वच्छता, पाणीपुरवठा, सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या, शिक्षण, भाजी मंडई, शॉपिंग सेंटर, मटण मार्केट, विविध योजना इ. द्वारे मानवाच्या संपूर्ण विकासाला मदत झाली आहे. सातारा शहराचा विकास कोणकोणत्या उपक्रमातून केलेला आहे. तसेच त्यांचे होणारे फायदे इ. अशाप्रकारे संशोधन म्हणजे एखाद्या समस्येचा शोध घेऊन त्यावर उपाय सुचविणे व त्याद्वारे शहराचा विकास साधता येतो. हे या संशोधनाचे महत्त्व आहे.

## १.१० संदर्भ साधने

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. संशोधन कालखंडातील वृत्तपत्रे, अहवाल यांचा वापर केला आहे. त्या काळातील फोटो यांचा वापर आवश्यकतेनुसार केलेला आहे.

**अ) प्राथमिक साधने**

१) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल (इ.स.१८६१ ते २००३)

२) सातारा नगरपालिका वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके (इ.स.१८६१ ते २००३)

३) सातारा नगरपालिका जनरल प्रोसिडींग बुक(इ.स.१८६१ ते २००३)

४) सातारा नगरपालिका ऑडिट रिपोर्ट(इ.स.१८७२ ते २००३)

५) सातारा नगरपालिका दवाखाना रेकाँर्ड (इ.स.१९३१ ते २००३)

६) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड (इ.स.१८८५ ते २००३)

७) सातारा नगरपालिका शाळा रेकॉर्ड (इ.स.१८८५ ते २००३)

८) सातारा नगरपालिका निवडणूक रिपोर्ट (इ.स.१८८५ ते २००३)

९) सातारा नगरपालिका मिटिंग वृतांत (इ.स.१८६१ ते २००३)

१०) सातारा नगरपालिका वेतन नोंद फाईल (इ.स.१८६१ ते २००३)

११) सातारा नगरपालिका डयुटी लिस्ट फाईल (इ.स.१८६१ ते २००३)

१२) शासकीय गॅझेट

**ब) दुय्यम साधने**

१) विविध संदर्भ ग्रंथ व पुस्तके

२) वर्तमानपत्रे, मासिके, त्रैमासिके

३) विश्वकोश व संस्कृतीकोश खंड

४) स्मरणिका

५) एम.फिल. व पीएच.डी प्रबंध

६) सातारा जिल्हा गॅझेटियर

७) मुलाखती

८) सर्वेक्षण

## १.११ सिद्धांत कल्पना

१) नगरपालिकेच्या स्थापनेमुळे सातारा शहराचा विकास झाला.

२) नगरपालिकेने आपले प्रशासन चांगल्या प्रकारे राबवून आदर्श निर्माण केला.

३) नगरपालिकेने सातारा शहरातील ऐतिहासिक स्थळांचे जतन केले.

४) स्थानिक स्वराज्य सस्थांच्या माध्यमातून जनतेस शिक्षण मिळते.

५) शासनाने योजलेल्या विविध कार्यक्रमाच्या नियोजनाप्रमाणेच नगरपालिकेने आपल्याही कामात सातत्याने बदल करून सातारा शहराचा विकास केला.

## १.१२ प्रकरण नियोजन

### प्रकरण पहिले– साताऱ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

या प्रकरणात संशोधनाच्या दृष्टिकोनातून काही मुद्दे मांडलेले आहेत. त्यामध्ये संशोधनाचा विषय, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन तंत्र, संशोधन पद्धती, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संदर्भ साधने, सिद्धांत कल्पना इत्यादी. याशिवाय प्रकरण नियोजन, साताऱ्याची भौगोलिक परिस्थिती यामध्ये क्षेत्रफळ, स्थान व हवामान इ. 'सातारा'. नावाची उत्पत्ती, साताऱ्याचा इतिहास यामध्ये अश्मयुगीन सातारा, मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व, प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंडातील सातारा, मराठा कालखंडातील सातारा, आधुनिक कालखंडातील सातारा इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

### प्रकरण दुसरे– नगरपालिकेची स्थापना, विकास व प्रशासन

या प्रकरणात स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास यामध्ये प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ, ब्रिटिश कालखंडातील प्रथम कालखंड(इ.स.१६८७ ते १८८१), द्वितीय कालखंड (इ.स.१८८२ ते १९१९), तृतीय कालखंड( इ.स.१९२० ते १९३६), चतुर्थ कालखंड (इ.स.१९३७ ते १९४७), पाचवा कालखंड (इ.स.१९४८ ते १९९२), सहावा कालखंड( १९९३ ते २००९) इत्यादी.

सातारा नगरपालिकेची स्थापना, सातारा नगरपालिका कामकाज यादी, इ.स. १८६८ मधील मॅनेजिंग कमेटी, सन १८७६–७७ मॅनेजिंग कमिटी, सन १८८३–८४ मधील सातारा

नगरपालिका सभासद यादी, सन १८८५ ते १९०९ अंशतः लोकप्रतिनिधी व सरकारकडून संचलित, वार्ड व सभासद संख्या, सन १८८५ ची पहिली निवडणूक, सन १८८५–८६ मधील सरकार नियुक्त कमिशनर, मॅनेजिंग कमिटी, स्कूल बोर्ड सन १८८९ ची दुसरी निवडणूक, सन १८९२ ची तिसरी निवडणूक, सन १८९५ ची चौथी निवडणूक, सन १८९८ ची पाचवी निवडणूक, सन १९०२ सहावी निवडणूक, सन १९०५ सातवी निवडणूक, सन १९०८ ची आठवी निवडणूक, सन १९०९ ते १९३८ अंशतः सरकार व लोकप्रतिनिधीकडून संचलित, पहिले लोकनियुक्त अध्यक्ष, सन १९११ ची नववी निवडणूक, सन १९१४ ची दहावी निवडणूक, पब्लिक वर्क्स कमिटी, सन १९१७ ची अकरावी निवडणूक, सन १९२० ची बारावी निवडणूक सन १९२३ ची तेरावी निवडणूक, वॉटर सप्लाय कमिटी, सन १९२६ ची चौदावी निवडणूक, सन १९२९ ची पंधरावी निवडणूक, स्कूल बोर्ड, स्टॅंडिंग कमिटी, लॉ ॲण्ड जनरल रेफरन्स कमिटी, १९३२ सोळावी निवडणूक, सन १९३५ ची सतरावी निवडणूक, हॉस्पिटल कमिटी, सन १९३८ ते १९४७ पूर्णतः लोकप्रतिनिधीकडून संचलित(स्वातंत्र्यपूर्व), सन १९३८ ची अठरावी निवडणूक, फायनान्स कमिटी, सन १९४२ ची एकोणिसावी निवडणूक, सन १९४५ ची विसावी निवडणूक, सन १९४७ ते १९८१ पूर्णतः लोकप्रतिनिधीकडून संचलित (स्वातंत्र्योत्तर), सन १९४९ ची एकविसावी निवडणूक, सन १९५२ ची बावीसावी निवडणूक, सन १९५७ ची तेविसावी निवडणूक ट्रान्सपोर्ट कमिटी, सन १९६३ ची चोवीसावी निवडणूक, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, विविध विषय समित्या, सार्वजनिक बांधकाम समिती, शिक्षण समिती, आरोग्य रक्षण, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती, पाणीपुरवठा व जलनिःसारण समिती, नियोजन आणि विकास समिती, सन १९६७ पंचविसावी निवडणूक, सन १९७४ सव्वीसावी निवडणूक, वृक्ष समिती, सन १९८१ ते १९८५ शासनाकडून संचलित (प्रशासकीय कारकिर्द), सन १९८५ ते २००३ पूर्णतः लोकप्रतिनिधीकडून संचलित, सन १९८५ ची सत्ताविसावी निवडणूक, मागासवर्गीय कल्याण विशेष समिती, सन १९९१ ची अठ्ठाविसावी निवडणूक, सन १९९६ एकोणतिसावी निवडणूक, सन २००१ ची तिसावी निवडणूक, नगरपालिकेचे प्रशासन, सातारा नगरपालिकेची प्रशासन व्यवस्था, नगरपालिकेतील नोकर वर्ग, नगरपालिकेचा मुख्याधिकारी, इतर प्रशासकीय कर्मचारी, नगरपालिकेची विविध खाती, १) आस्थापना विभाग, २) सार्वजनिक बांधकाम खाते, ३)

आरोग्य समिती, ४) पाणीपुरवठा व जलनि:स्सारण समिती, ५) जकात विभाग, ६) नगदी खाते, ७) विद्युत विभाग, ८) दप्तरखाना, ९) कर विभाग, १०)अन्न भेसळ प्रतिबंधक विभाग, ११) वृक्ष व संवर्धन विभाग, १२) आग प्रतिबंधक विभाग, १३) नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, १४) दुकान विभाग, १५) भांडार विभाग, १६) नियोजन व विकास समिती, १७) महिला व बालकल्याण समिती, १८) मागासवर्गीय व विशेष कल्याण समिती, नगरपालिकेद्वारे सातारा शहरास सन २००३–०४ मधील पाणीपुरवठा केल्याची माहिती, सातारा नगरपालिका, सातारा, कर्मचाऱ्यांची वेतन श्रेणी, नगरपालिका कर्मचाऱ्यांना पुरविल्या जाणाऱ्या सुविधा, रजा, प्रॉव्हिडंड फंड, राहण्यासाठी जागा व गणवेश इत्यादी. सातारा नगरपालिकेच्या नोकर लोकांची एक विचार को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, सातारा शहर नगरपरिषद आरोग्य विभाग कर्मचारी यांची उद्धार को–ऑप–क्रेडिट सोसायटी लि.सातारा इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण तिसरे– नगरपालिकेच्या शाळा व शैक्षणिक सुविधा**

या प्रकरणात महाराष्ट्रातील शिक्षणाची पार्श्वभूमी, प्राचीन काळातील शिक्षण पद्धती, मध्ययुगीन काळातील शिक्षणपद्धती, ब्रिटीश काळातील शिक्षणपद्धती, सातारा शहरातील शिक्षणाची पार्श्वभूमी, पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शाळा, प्राथमिक शिक्षण नगरपालिकेच्या ताब्यात, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, स्कूल बोर्डाची स्थापना, मराठी शाळा नं. १ ते मराठी शाळा नं. २४, यातील एक उर्दू शाळा नं. १० याची सविस्तर माहिती दिलेली आहे. शिक्षण मंडळाची रचना, नगरपरिषद शिक्षण मंडळ सातारा, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक यादी नगरपरिषद शिक्षण मंडळ सातारा. खाजगी अनुदानित मराठी माध्यम प्राथमिक शाळा सातारा, प्रशासन अधिकारी यादी (सन १९२५ ते २००४), सातारा सभापती यादी (सन १९०३ ते १९८५), सभापती व उपसभापती १७.१०.८५ पासून नेमण्यास सुरूवात झाली त्याची यादी, शालेय गुणवत्ता, शालेय विविध उपक्रम यामध्ये या चिमण्यांनो परत फिरा रे, शिक्षण मंडळ सदस्यांनी नगरपालिका शाळांचे पालकत्व स्वीकारले, हरित सातारा अभियानात नगरपालिका शाळांचे योगदान, मोफत गणवेश वाटप, आरोग्य शिबीर, विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन, श्री.छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती, क्रीडास्पर्धाचे आयोजन, शिक्षक मार्गदर्शिका डायरी, शिक्षक ग्रंथालय, सांस्कृतिक उपक्रम, नगरपालिका

शाळांचे शैक्षणिक कामकाजासाठी विविध समित्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती निधी प्रदान व इतर उपक्रम राबविले जातात. सातारा नगरपरिषद शिक्षण मंडळ जमाखर्चाचे अंदाजपत्रक, सातारा नगरपरिषद शिक्षण मंडळ, सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित सातारा, पतसंस्थेची वैशिष्टये, सातारा नगरपरिषद शिक्षण मंडळ सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित सातारा, प्रगतीचा आढावा दर्शविणारा तक्ता परिस्थिती (सन १९८५ ते २००३), पतसंस्थेच्या सभापतींची यादी इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण चौथे– सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता**

या प्रकरणात आरोग्य सुविधा, साथीचे रोग, प्लेगची साथ, एन्फ्लुएंझाची साथ, हिवतापाची साथ, देवीची साथ, क्षयरोग नियंत्रण, कॉलरा नियंत्रण, इतर रोग, साथीचे रोग टाळण्यासाठी व त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी केलेल्या उपाययोजना, रोगवार मृत्युचे आकडे (सन १९४३–४४ ते १९५२–५३) सातारा शहराचा जनन व मृत्यूदर (सन १९०१–०२ ते २००२–०३) वयवार मृत्युचे आकडे(सन १९४३–४४ ते १९५२–५३ या दरम्यान), दवाखाने, प्रसुतिगृह, देवी काढणे, सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण तक्ता(सन २००३–०४ पर्यत), सार्वजनिक आरोग्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी नवजात बालकासाठी व्यवस्था, एड्स नियंत्रणासाठी केलेले प्रयत्न, डिसेंबर जागतिक एड्स दिन/महिना, सातारा नगरपालिकेचा राष्ट्रीय कार्यक्रमातील सहभाग, पल्स पोलिओ, क्षयरोग निर्मूलन, कुष्ठरोग, कुटुंब नियोजन, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, शहर स्वच्छता, शौचकुपाची व्यवस्था, शौचालय व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन यामध्ये गटारांचा अभाव, उघडी गटारे, घनकचरा व्यवस्थापन, सातारा शहरात कचरा व्यवस्थापन पुढील चार टप्प्यांत केले जाते. कचरा वर्गीकरण, कचऱ्याचे संकलन, गोळा केलेल्या कचऱ्याची प्रक्रिया करण्याच्या खाजगी सहभागाने कचरा व्यवस्थापन, सातारा शहरात घनकचरा व्यवस्थापनाची प्रक्रिया इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण पाचवे– नगरपालिका उत्पन्न व खर्च**

या प्रकरणात सातारा नगरपालिकेचे सन १८५३ ते २००३ पर्यतचे एकूण उत्पन्न, सातारा नगरपालिकेच्या उत्पन्नातील सन १९५२–५३ ते २००२–०३ या वर्षातील कर व दर, जकात, घरपट्टी सन १९६७ ते २००३ या काळातील विशेष अधिनियमाखालील (ॲक्टस) वसुली, सन १९५२–५३ ते सन २००२–०३ या काळातील कराव्यतिरिक्त नगरपालिकेच्या

मालमत्ता व उपयोगितापासूनचे उत्पन्न, नगरपालिकेची अनुदाने व अंशदाने, सन १९५२–५३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचे इतर उत्पन्न, सन १९६७–६८ ते सन १९८७–८८ या काळातील नगरपालिकेची असाधारण जमा, सन १९७६ मधील वाहनावरील वार्षिक कर, सन १९७७–७८ ते सन १९८८–८९ या काळातील नगरपालिकेचा पथकर(गाडीकर) सन १९७२–७३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेला एकत्रित कर, सन १९७२–७३ ते सन १९८९–९० या काळातील नगरपालिकेत जमा झालेला हॉटेल कर, सन १९७२–७३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेला जाहिरात कर, सन १९७२–७३ ते सन १९९२–९३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेला कुत्र्यांवरील कर, सन १९७६–७७ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेला वृक्षकर, सन १९७२–७३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेला करमणूक कर, पाणीपट्टी, खाजगी पाणीपट्टी, सार्वजनिक पाणीपट्टी, सन १९७२–७३ तेसन २००२–०३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेली पाणीपट्टी कर, सन १९७२–७३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेली भंगीपट्टी कर, प्राथमिक शिक्षण अनुदान, सन १९७२–७३ ते सन १९९२–९३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेले अनुदान, सन १९७२–७३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेत जमा झालेला शिक्षण कर अशा प्रकारच्या सर्व उत्पन्नाची सविस्तर माहिती दिलेली आहे.

सातारा नगरपालिकेच्या खर्चामध्ये सन १९५२–५३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा सामान्य प्रशासन व वसुली खर्च, सन १९५२–५३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा सार्वजनिक आरोग्य व सोयीवरील खर्च, सन १९५२–५३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा अंशदाने खर्च, सन १९५२–५३ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा इतर खर्च, सन १९७२–७३ ते सन १९८७–८८ या काळातील नगरपालिकेचा असाधारण खर्च, सन १८८५–८६ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा शिक्षण खर्च, सन १९७७–७८ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा अग्निशमन खर्च, सन १९७७–७८ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा दिवाबत्ती खर्च, सन १९७७–७८ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा पाणीपुरवठा खर्च,

सन १९७७–७८ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा सार्वजनिक तारतखाने व मुताऱ्यावरील खर्च, सन १९७७–७८ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा साफसफाई व सोयीवरील खर्च, सन १९७७–७८ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा जलनिःसारण खर्च, सन १९७७–७८ ते सन २००२–०३ या काळातील नगरपालिकेचा बांधकामावरील खर्च, सातारा नगरपालिकेचे सन १८५३ ते २००३ पर्यंतचा एकूण खर्च इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण सहा– नगरपालिकेचे सातारा शहराच्या विकासातील योगदान**

या प्रकरणात नगरपालिकेने बांधलेल्या इमारतीमध्ये प्रशासकीय इमारती, शॉपिंग सेंटर, समाज मंदिरे, मंडई, घरकुल योजना, झोपडपट्टी पुनर्वसन, रस्ते, पूल, फुटपाथ, स्ट्रीट लाईट, दवाखाने, आरोग्य सोयी, भुयारी गटार योजना, शिक्षण, पाणीपुरवठा योजनेमध्ये १) अंजिक्यतारा योजना २) वेण्णा व महारदरे योजना ३) गोडोली योजना ४) कास तलाव ५) कृष्णा माहुली पाणीपुरवठा योजना (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) ६)शहापूर–उरमोडी पाणीपुरवठा योजना(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना ७) महादरे तलाव पाणीपुरवठा योजना इत्यादी. शाहू स्टेडियम, शाहू कला मंदिर, स्मृती स्थळे, १) चारभिंती २) फाशीचा वड ३)छत्रीचा हौद ४) हुतात्मा स्मारक, उद्याने यामध्ये १) श्रीमंत छत्रपती शाहू उद्यान, २) श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह उद्यान ३) यशवंत उद्यान ४) जवाहर उद्यान ५) हुतात्मा उद्यान ६) श्री शिवसमर्थ उद्यान ७) राजमाता सुमित्राराजे उद्यान इत्यादी. शहरातील तळयांची स्वच्छता यामध्ये १) महादरे तलाव, मंगळवार तळे व हत्ती तलाव २) मोती तळे इत्यादी. वाचनालयाची सोय, जनावरांच्या दवाखान्याची सोय, अंत्यसंस्कार, झाडे लावणे, आग विझवणे व रस्त्यावर पाणी शिंपडणे, महिला व बालकल्याण समितीमार्फत नियोजित कामे, मागासवर्गीय व विशेष कल्याण समितीमार्फत नियोजित कामे, नगरपालिकेची विविध खात्यांमार्फत शहर सुधारणेसाठी दिलेले योगदान इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण सात– उपसंहार**

या प्रकरणात निष्कर्ष काढलेला आहे. सातारा नगरपालिकेमुळे सातारा शहराचा विकास झाला. सातारा नगरपालिकेने लोकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली होती. स्थानिक स्वराज्य सस्थांच्या माध्यमातून जनतेस शिक्षण मिळते. सातारा नगरपालिकेने स्थापनेपासून

शिक्षण व्यवस्थेत योगदान दिले आहे. सातारा नगरपालिकेची प्रशासकीय संरचना विकसनशील होती. नगरपालिकेने आपले प्रशासन चांगल्या प्रकारे राबवून आदर्श निर्माण केला. सातारा शहराच्या विकासासाठी नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. नगरपालिकेने सातारा शहरातील ऐतिहासिक स्थळांचे जतन केले. सातारा नगरपालिकेचा विकास टप्प्या–टप्प्याने झाला. सातारा नगरपालिकेने उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला. शासनाने योजलेल्या विविध कार्यक्रमाच्या नियोजनाप्रमाणेच नगरपालिकेने आपल्याही कामात सातत्याने बदल करून सातारा शहराचा विकास केला.

## १.१३ साताऱ्याची भौगोलिक परिस्थिती

सातारा जिल्हयास पूर्वी 'सातारा राज्य'(इ.स.१८१८–१८४८) म्हणून संबोधले जात होते .इ.स. १८४८ मध्ये सातारा जिल्हयाचे अकरा शासकीय विभाग पडले. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर मांडलिक संस्थानाचे विलिनीकरण झाले त्यापुढे सातारा जिल्हयाचे दोन विभाग होते. यामध्ये खानापूर, तासगाव, वाळवा व शिराळापेठ या तालुक्याचा समावेश असलेला यास 'दक्षिण सातारा' व जावली, कराड, खटाव, कोरेगाव, सातारा व वाई या विभागास 'उत्तर सातारा' म्हणून संबोधण्यात आले. इ.स. १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्हयाचे 'सातारा' व दक्षिण सातारा जिल्हयाचे नाव 'सांगली' ठेवण्यात आले सातारा जिल्हयाचे सातारा, महाबळेश्वर, पाटण, फलटण, हे चार उपविभाग असून त्यात सातारा, कोरेगाव, जावली, वाई, महाबळेश्वर, पाटण, कराड, फलटण, खटाव, खंडाळा व माण असे अकरा तालुके आहेत.

### १.१३.१ लोकसंख्या

**सातारा शहराची लोकसंख्या (१८७२ ते २००१)**

| अ.नं | वर्ष | लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | १८७२ | २४,४८४ |
| २. | १८८१ | २८,६०१ |
| ३. | १८९१ | २४,६०१ |
| ४. | १९०१ | २६,०२२ |
| ५. | १९११ | १९,१४५ |
| ६. | १९२१ | २२,४५४ |
| ७. | १९३१ | २६,३१९ |
| ८. | १९४१ | ३६,४०५ |
| ९. | १९५१ | ४१,०७० |
| १०. | १९६१ | ४८,७०९ |
| ११. | १९७१ | ६६,४३३ |
| १२. | १९८१ | ८३,३३६ |
| १३. | १९९१ | ९५,१८० |
| १४. | २००१ | १,०८,०४८[१] |

भारतात इ.स.१८७१ पासून जनगणना सुरू झाली. सातारा शहराची जनगणना इ.स.१८७२ साली करण्यात आली. त्यावेळी ती २४,४८४ होती. ही लोकसंख्या दहा वर्षांनी म्हणजे सन १८८१ मध्ये जवळजवळ ४ हजारापेक्षा जास्त वाढलेली आहे. परंतु सन १८९१ मध्ये ही लोकसंख्या इ.स.१८७२ एवढी पुर्ववत झाली. मात्र सन १९११ मध्ये ही लोकसंख्या बरीचशी घटली होती. ती १९,१४५ झाली होती. इ.स.१९२१ पासून ही लोकसंख्या दरदहा वर्षांनी सातत्याने वाढत गेलेली दिसून येते. इ.स.२००१ मध्ये ही लोकसंख्या १,०८,०४८ एवढी झालेली दिसून येते.

### १.१३.२ स्थान

सातारा शहर हे महाराष्ट्राच्या दक्षिणेच्या मध्यभागी आहे. ते दक्षिण पठाराच्या पश्चिम मध्यवर्ती भागात उत्तर अक्षांश १७$^{\circ}$ ४० ते ७३$^{\circ}$ ५० पूर्व रेखांशावर आहे.

### १.१३.३ हवामान

सातारा शहराचे हवामान चार ऋतुत विभागले जाते. भौगोलिकदृष्टया साताऱ्याचे हवामान उष्ण व कोरडे असून प्राकृतिक रचनेनुसार उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तीन ऋतू आहेत. सहयाद्री रांगाच्या सुमारे २५ ते ३५ कि.मी. रूंदीच्या अरूंद पट्टयात सर्वात जास्त पाऊस पडतो.

सातारा जिल्हयात हवामानविषयक वेदशाळा महाबळेश्वर येथे असून या हवामान शाळेतील आकडेवारी पश्चिम घाट प्रदेशासाठी प्रमाण मानली जाते. डिसेंबर महिना सर्वाधिक थंडीचा असतो.

## १.१४ 'सातारा'. नावाची उत्पत्ती

१) साताऱ्याच्या दक्षिणेस 'साते' नावाचे गाव आहे त्याच्या जवळील दऱ्यास 'सात दरा' असे म्हणतात. हा सात दरा सातारा किल्ल्याच्या दक्षिणेस उरमोडी नदीच्या पलिकडे जो डोंगर आहे त्याच्या कुशीत आहे जुना सातारा म्हणजे हा दरा. त्यानंतरच्या काळात महादऱ्याच्या जवळ लोकांनी जी वस्ती केली त्या वस्तीला सातारा असे नाव पडले.[२]

२) सातारा किल्ल्याच्या पायथ्याशी दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहणारे सात ओढे आहेत प्रत्येक ओढयाच्या दोन्ही बाजूंना डोंगराच्या रांगा प्रमाणे उंचवटयाच्या रांगा आहेत या सात दऱ्यांच्या नावावरून सात दरा व सातारा असे नामकरण झाले असावे.[३]

३) सातारा हे नाव 'सप्ततारा' वरून आले आहे अजिंक्यतारा किल्ला ११९० साली कोल्हापूरच्या शिलाहार वंशातील दुसरा भोज राजाने बांधला. या किल्ल्यावर सप्तर्षीचे देवालय असल्याने त्याला 'सप्तर्षीचा किल्ला' असे नाव पडले. या सप्तर्षीचे सप्ततारा व पुढे त्याचे सात तारा सातारा असे नाव झाले.[४]

४) कोल्हापूरच्या शिलाहारवंशीय दुसऱ्या भोज राजाने ११९० मध्ये सातारचा किल्ला बांधला. त्याची राजधानी 'पन्हाळगड' येथे होती व पन्हाळगडाच्या ईशान्य दिशेला असणारे गाव म्हणजे सातारा होय, कारण 'सातर' म्हणजे ईशान्य होय व पन्हाळयाच्या ईशान्येस असणारे गाव म्हणजे पूर्वीचे सातर त्यावरून सातारा शब्द बनला.[५]

५) सात म्हणजे विपुल या अर्थाच्या शब्दापासून 'सातारा' या संकल्पनेची व्युत्पत्ती काही इतिहासकार मांडतात. सात सातर म्हणजे विस्तार असा अर्थ निघतो. विस्तार करणारा तो

'सातारा' हे विशेषनाम भाषा शास्त्रीय दृष्टीने योग्य ठरते अशी व्युत्पत्ती अधिक सार्थ ठरते .[६]

६) औरंगजेबाचा मुलगा आझमशहा याने सातारच्या किल्ल्याला वेढा दिला होता. तेव्हा किल्ल्याला सतरा दरवाजे व बुरूज होते, यावरूनही सातारा नाव पडले असावे, असे म्हटले जाते.[७]

अशा या सातारा शहराच्या नावाच्या व्युत्पत्ती संदर्भात मांडल्या जाणाऱ्या विविध व्युत्पत्ती असल्याचे जाणवते.

## १.१५ साताऱ्याचा इतिहास

साताऱ्याला प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास आहे. पुराश्मयुग, प्राचीन इतिहास, मध्ययुगीन इतिहास व आधुनिक इतिहास हे भारतीय इतिहासाचे विभाग पडतात त्याचप्रमाणे साताऱ्याच्या इतिहासाचे विभाग पडतात व प्रत्येक कालखंडातील साताऱ्याच्या इतिहासाचे वेगळेपण जाणवते.

### १.१५.१ अश्मयुगीन सातारा

महाराष्ट्राच्या विविध प्रदेशामध्ये प्राचीन अश्मयुगीन मानवाचे अस्तित्व दर्शवणारी हत्यारे या संदर्भात सापडल्याने या हत्यारांची संभाव्य उत्क्रांती आणि तत्कालीन हवामान याबाबतचे ढोबळ निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. सातारा जिल्हयात आसगांव, मर्ढे, माहुली, लिंब आणि सोनगांव इत्यादी ठिकाणी या कालखंडातील हत्यारे उपलब्ध झाली आहेत.[८]

### १.१५.२ मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व

सातारा जिल्हयात उंब्रज, कराड, कोपर्डे, गोवरे, चिंचणेर, टेंभू, तारगांव, धामणेर, माहुली, लिंब व वेणेगांव इ. ठिकाणी सापडलेल्या अवशेषावरुन मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व आढळते.[९] कृष्णा व वेण्णानदीच्या संगमावर संगम माहुली येथे मध्याश्मयुगीन सुक्ष्मास्त्रे सापडली आहेत.[१०] ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे ठोस पुरावे सातारा जिल्हयात फक्त कराडमध्येच आढळलेले आहेत. मौर्य सातवाहन काळातील काही अवशेष उत्खननातून उपलब्ध झाल्यामुळे महाराष्ट्राचा प्राचीन ऐतिहासिक कालखंड समजण्यास मदत होते.

### १.१५.३ प्राचीन कालखंड

प्राचीन कालखंडाचा प्रारंभ इ. स. पु. चौथ्या शतकापासूनचा मानता येतो.[११] इ. स. पूर्वीच्या दुसऱ्या शतकात सातारा जिल्हयातील कराड या गावच्या यात्रेकरूनी मध्यप्रदेशातील सुप्रसिद्ध भारहूत येथील स्तुपाच्या वेदीकेच्या बांधणीसाठी काही अनुदाने दिल्याचा तेथील अभिलेखात उल्लेख आहे.[१२] सम्राट अशोकाने तिसऱ्या धर्म परिषदेतील निर्णयानुसार धर्मप्रसारासाठी महाराष्ट्रात पाठवलेल्या महारक्षित याने चांगले कार्य केले होते. कराड येथील इ. स. च्या पहिल्या शतकातील बौद्धलेणी (आगाशिवाची लेणी) तसेच शिरवळ, वाई, भोसे, माळेवाडी व कुंडल इत्यादी ठिकाणच्या गुंफा सातवाहन कालखंडातच खोदल्या गेल्या होत्या.[१३]

सातारा परिसरात स्थापन झालेले पहिले राष्ट्रकुटांचे राज्य म्हणजे मानपूरचे राष्ट्रकुट होय. यांच्या संदर्भात असे म्हटले आहे की, गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा (विक्रमादित्य) याचे सहाय्य मानपूरचे राष्ट्रकुटांना, विदर्भाच्या वाकाटकांना होते असे पुढील काळात चंद्रगुप्ताचा पणतू नरेंद्रसेन आणि राष्ट्रकुट राजकन्या यांचा विवाह झाला. या कालखंडात राष्ट्रकुट गुप्तांच्या वर्चस्वात होते. हे दर्शवणारी घटना कालिदासाने कुंतलेश्वरदौत्य या काव्यात दिलेली आहे. येथील परिस्थितीचे अवलोकन करण्यासाठी चंद्रगुप्ताने जेव्हा राजदूत पाठवला, तेव्हा त्याची मानपूरच्या राजसभेत अवहेलना झाली तेथील व राज्यामधील परिस्थितीचे अवलोकन करून त्या दूताने कुंतलेश तुमच्यावर राज्यकारभाराचा भार टाकून स्वतः विलासात मग्न असतो[१४] असा अहवाल पाठवला. हा कुंतलेश म्हणजे मानक पुत्र देवराज असावा व राजदूत म्हणून कविकुलगुरू कालीदास या राजसभेस गेला होता. सातारा जिल्हयातील हा पहिला नामवंत विद्वान होय.[१५] पुढे लवकर द्वितीय पुलकेशीने दक्षिण महाराष्ट्र ताब्यात घेतल्याचे त्याचा भाऊ विष्णुवर्धन यांच्या सातारा ताम्रपटावरून समजते.[१६]

सातवाहन काळानंतर इसवी सनाच्या चौथ्या शतकांपासून सहाव्या शतकापर्यंत मानपूरच्या राष्ट्रकुटांनी दक्षिण महाराष्ट्रावर राज्य केले. डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या संग्रहातील ताम्रपट.[१७] व पांडरंगपल्ली ताम्रपटांच्या आधारे प्रथमतः डॉ. मिराशी वा.वि. यांनी मानपूर हे मध्यप्रदेशातील नसून महाराष्ट्राच्या सातारा जिल्हयातील माण आहे हे प्रथम स्पष्ट केले.[१८] पुढे डॉ. हरिहर ठोसर यांनी याबाबत आणखी संशोधन करून माण नदी काठावरील मानपूर हे राष्ट्रकुटांशी संबधित असल्याचे दर्शविले.[१९] यानंतर उपलब्ध झालेल्या वळई ताम्रपटांमुळे व

त्यातील दान दिलेल्या प्रदेशाच्या स्थान निश्चितीमुळे असे म्हणता येईल की, सातारा जिल्हयातील मानपूर येथील माण नदीच्या काठावरील या राष्ट्रकुट वंशजांनी महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि बेळगांव जिल्हयांच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली [२०] यानंतर काही काळ साताऱ्यावर वाकाटकांची सत्ता होती [२१]

वाकाटकांच्या नंतर साताऱ्यावर दिर्घकाळ (२७०वर्षे) राज्य करणारे घराणे हे बदामीचे चालुक्य होय [२२] साताऱ्याच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पहिला चालुक्य राजा ठरतो, तो म्हणजे जयसिंहचा नातू प्रथम पुलकेशी [२३] हा या घराण्यातील पहिला महाराज. याने अश्वमेध यज्ञ केला होता. चालुक्य घराण्याचे 'सत्याश्रम' हे एक बिरूद होते आणि पुलकेशी (पोलकेशी) हा ते बिरूद लावणारा पहिला राजा होता. प्रथम विष्णूवर्धनच्या सातारा ताम्रपटात याने आपल्या असामान्य कर्तृत्वाने 'सत्याश्रम भवितैश्चरितै' ही उपाधी मिळवल्याचे म्हटले आहे.[२४] या घराण्यातील राजा विजयादित्य हा कराडच्या सेंद्रक विष्णुराजाचा जावई होता.[२५]

चालुक्य राजाचे पारिपत्य करून राष्ट्रकुट घराण्याने या संपूर्ण प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले. राष्ट्रकुट घराण्यातील तृतीय गोंविद याचा इ.स. ९५९ सालचा ताम्रपट महत्वाचा आहे. या 'गगन शिवनामक' व्यक्तीला मिरज जवळ व कराड (प्राचीन करहार) विषयातील कंकी हे गाव दान दिले होते. हे दान विशेष म्हणजे करहार, कराड येथे राहणाऱ्या भिक्षुंचा चरितार्थ चालवण्यासाठी दिले होते तसेच, इसवी सनाच्या प्रारंभिक काळात कोरलेल्या कराड येथील बौद्ध लेणीत राहणाऱ्या बौद्ध भिक्षुंच्या योगक्षेमाची काळजी इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत तरी येथील राजे लोक घेत होते यावरून साताऱ्याच्या परिसरात बौद्ध धर्म तोपर्यंत चांगलाच टिकून होता, असे दिसते.[२६]

शिलाहारांच्या तीन घराण्यापैकी १०व्या शतकात पुढे आलेले दक्षिण महाराष्ट्रातील शिलाहार घराणे हेच कोल्हापुरचे शिलाहार घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. या घराण्याची आरंभीची राजधानी करहार(कराड) ही होती. नंतर ती कोल्हापुरला हलविली गेली. या घराण्यातील द्वितीय भोज याच्या कारकिर्दीपासून हा स्वतंत्र राजा झाला, याने सिंदवंशीय राजाचा पराभव करून कराड येथे आपली राजधानी स्थापली होती.[२७] या शिलाहार वंशीय राजा भोज द्वितीयने सातारा जिल्हयात १०-१२ किल्ल्यांचे बांधकाम केल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. यास सिंधण यादव काळात मुद्दाम नोंदवावी, अशी एखादी घटना घडली नाही, हे खरे आहे. परंतु

सातारा हा एका मोठया साम्राज्याच्या अधिपत्याखाली असणारा भाग होता. हे सत्य नाकारता येत नाही, कारण यादव नृपांचे किंवा त्यांच्या मांडलिकांचे काही अभिलेख या परिसरात मिळतात. त्यांच्या काळात उभारलेली मंदिरे ही अनेक गावी आढळतात. या त्यांच्या अधि–पत्याच्या खुणा आहेत. देवगिरीच्या यादव घराण्यातील रामचंद्रदेव हा शेवटचा हिंदू राजा होय. अल्लाउद्दीन खिलजीने त्याचा पाडाव करून त्यास बंदिवान म्हणून दिल्लीला नेले. पुढे त्याचा मुलगा शंकरदेवने बंड केले असता, मलिक कफूरने त्याचा पराभव करून त्यास ठार केले. पुढे रामचंद्रचा जावई हरपालदेवने देवगिरी परत मिळवली, परंतु कुतबुद्दीन मुबारकाने यादवांचा पाडाव करून त्यास ठार केले.[२८]

सातारा परिसरात प्राचीन काळात दोन प्रकारच्या वास्तू स्थापत्याची निर्मिती झाली. १)लेणी २)मंदिरे. सातवाहन काळात कराड, वाई, भोसे, शिरवळ व कुंडल येथे हिनयान पंथीय बौद्धलेणी खोदण्यात आली.[२९] या प्राचीन काळात सातारा जिल्हयात अनेक ठिकाणी हेमाडपंथी मंदिराची उभारणी झाली. परळी, विटा, फलटण, शिगंणापूर, चिमणगाव, बहुले, बावधन व देवराष्ट्र इ. गावी अशी मंदिरे आहेत.[३०]

एकूण सातारा व सातारा परिसराच्या इतिहासाचा आढावा घेतल्यास या परिसरात झालेल्या राजकीय घडामोडी सत्तास्पर्धा, लढाया, धार्मिक श्रद्धा, देवालये व तलावासारखी लोकोपयोगी कामे विद्यार्जनासाठी केलेल्या सोयी विद्वान महर्षी आणि कुशल प्रशासन करणाऱ्या राण्या यांची माहिती मिळते.

### १.१५.४ मध्ययुगीन कालखंड

यादव सत्तेच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतातील लहान मोठी हिंदू राज्ये मुस्लिम आक्रमणास बळी पडली. परंतु कोणत्याही मुस्लिम सत्तेस संपूर्ण दक्षिण भारतावर एकछत्री अंमल स्थापन करता आला नाही. मुस्लिमांत देखील स्थानिक व परकीय असे दोन गट प्रभावी होते व या दोन गटात कायम संघर्ष चालू असे. बहामनी सत्तेचा साधारणपणे १५० वर्षाचा कालखंड सोडला तर मुस्लिम सत्ता सतत भांडत असल्याचे दिसून येते. विजयनगर विरोधात तालीकोटचा अपवाद वगळल्यास परस्परांमधील संघर्ष हे त्यांच्या विनाशाचे कारण होते. या सततच्या संघर्षामुळे सर्व हिंदूच्या विरोधात त्यांना समान धोरण अवलंबता आले नाही. शिवाय नेहमी त्यांना मातब्बर हिंदू सरदारांच्या मदतीवर विसंबून राहवे लागत असे. बहामनी

साम्राज्याची शकले पडल्यानंतर स्थानिक हिंदू गटाचे त्यांच्या दरबारात महत्त्व वाढले. यातून त्यांना आपल्या पदरी सतत सैन्य बाळगावे लागे व पुढे यामुळे हिंदुच्यांत आपण राज्यकर्ते असल्याची भावना निर्माण झाली व तिची जोपासना करण्यात आली. थोडक्यात दक्षिणेत इस्लामी सत्तांमध्ये असणारा परस्पर संघर्षच त्यांना क्षीण करत गेला व देशमुख, देशपांडे या स्थानिकांनी त्याचा लाभ घेऊन स्वतःची प्रभाव क्षेत्रे निर्माण केली. जोपर्यंत बहामनी सत्ता महमूद गवान सांभाळत होता. तोपर्यंत ही मुस्लिम बहामनी राजवट टिकून होती. मात्र काही कट कारस्थानी सरदारानी त्याच्या विरोधात बादशहाचे कान फुंकले व त्याच्या खुनाची आज्ञा बादशहाने दिली. महमूद गवानच्या मृत्यूनंतर विजापूर, अहमदनगर, वऱ्हाड, बिदर व गोवळकोंडा येथील सरदार स्वतंत्र झाले, आणि त्यांनी आपले सवते सुभे निर्माण केले. अशा रीतीने साताऱ्यावरील बहामनी राजवट समाप्त झाली.

महमूद गवानच्या मृत्यूनंतर त्याची विजापूर सुभ्यातील जहागिरी युसूफ आदिलखान या सरदारास देण्यात आली. यामध्ये सातारा जिल्हयाचा समावेश होतो. यानेच विजापूरमध्ये इ. स. १४८९ साली आदिलशाही सत्ता स्थापन केली. ही राजवट छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयापर्यत अत्यंत विकसित झाल्याचे दिसते परंतु सातारा परिसरावर ताबा मिळवल्यास आपण मोगल विजापूर व कोकणातील सिद्दी या सर्वांशी चांगली लढत देऊ शकतो, असा आत्मविश्वास बाळगून महाराजांनी आपल्या सर्व डावपेचांची सुरूवात साताऱ्यापासून केली. म्हणजे जोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजानी साताऱ्यात राजकीय हालचालीना प्रारंभ केलेला नाही तोपर्यंत साताऱ्यावर आदिलशाही वर्चस्व अतिशय मजबूत असल्याचे दिसते.

आदिलशाहीच्या वारसा हक्कांच्या युद्धातही साताऱ्याचा संबध येतो. इब्राहिमशहा नंतर अली आदिलशहा(पहिला) विजापूरचा सुलतान झाला. अहमदनगरची राजकन्या चांदबीबी ही त्याची राणी होती. अली आदिलशहाच्या मृत्यूनंतर गादीवर आलेल्या इब्राहिमशहा(दुसरा) हा अल्पवयीन असल्याने पालकत्वाची जबाबदारी चांदबीबीकडे होती. कामीलखान या कराडच्या जहागिरदाराशी तिचे जमत नव्हते तिने किश्वरखान या सरदाराला हाताशी धरून त्याचा काटा काढला. परंतु पुढे किश्वरखानाचे दरबारात फार महत्त्व वाढले व त्याच्या मार्गातील अडचण चाँदबीबी होत असल्याने तिच्यावर फंदफितुरीचा आरोप करून तिला कैद केले व साताऱ्याच्या किल्ल्यावर बंदिस्त केले. परंतु लवकर किश्वरखानाची कर्मे जाहीर झाली व साताऱ्याच्या

बंदिवासातून चांदबीबीची सुटका झाली. पुढे या ठिकाणी हमीदखान, दिलावरखान अशा मातब्बर विजापूर सरदारांना कैदेत ठेवण्यात आले. यावरून एक शाही तुरूंग म्हणून विजापूरच्या आदिलशाही कालखंडात साताऱ्याच्या किल्ल्याचे महत्त्व होते.

आदिलशाही कालखंडात साताऱ्याच्या प्रशासनात हिंदू व मुस्लिम असा संबंध होता . या डोंगराळ प्रदेशात हिंदुचे वर्चस्व होते तर शहरी व मैदानी भागावर मुस्लिमांचे वर्चस्व होते.[३१] साताऱ्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भाग ज्याला खोरे मुऱ्हे (मुरे) अथवा मावळ म्हणून ओळखत तो हिंदू प्रशासकांकडे (देशमुखांकडे) होता. या कालखंडात साताऱ्याच्या वायव्येकडे ५६ कि.मी.वर असणाऱ्या सह्याद्रीच्या दुर्गम प्रदेशात जावळी प्रदेश वसलेला होता. या ठिकाणी मोरे घ़राणे राज्यकारभार पाहत होते. साताऱ्याच्या ईशान्येस ५६ कि.मी. अंतरावर निंबाळकर घराणे फलटणचा कारभार पाहत होते. साताऱ्याच्या पूर्वेस व ९६ कि.मी. अंतरावर म्हसवडला माने घराण्याची सत्ता होती. साताऱ्याच्या आग्नेय दिशेला १४४ कि.मी. अंतरावर जत येथे डफळे घराण्याकडे देशमुखी होती. कराडच्या दक्षिणेस वारणा नदीच्या काठी ४८ कि.मी. वर कापशी येथे घोरपडे हे वतनदार होते.[३२]

या कालखंडात साताऱ्याच्या परिसरात कडेकपाऱ्यात मराठा सरदांराचे, देशमुखांचे आणि पाटलांचे वजन होते. त्यांच्या बळावरच विजापूरकरांनी कोकण प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि नंतरच्या कालखंडात छ. शिवाजी महाराजांनाही विरोध करण्याचा प्रयत्न केला परंतु या सर्व सरदारांनी पुढे स्वराज्य कार्यात राजांनाच मदत केल्याने विजापूरकरांचे सातारा परिसरावरील वर्चस्व नष्ट होत गेले होते.

**१.१५.५ मराठा कालखंड**

१७व्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय झाला होता. शहाजीपुत्र छ.शिवाजी महारांजानी विजापूरची आदिलशाही, उत्तरेतील अतिशय बलाढय असणारी मुगल सत्ता पश्चिमेकडे समुद्रावर वर्चस्व ठेवणारा कोकण विभागातील सिद्दी, गोव्यामधील पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी अविश्रांत लढत देऊन मराठ्यांचे सार्वभौम असणारे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात यश मिळविले. सहिष्णुता आणि लोकोपयोगी, लोककल्याणाची कामे हा या स्वराज्याचा पाया होता. सातारा व साताऱ्याचा परिसर हा शिवाजीराजे व त्यांच्या वंशजांच्या कर्तबगारीशी अत्यंत जवळून निगडीत होता.

मालोजीराजे पुत्र शहाजी राजे हे निजामशाहीतील एक मातब्बर सरदार होते. मुघलांच्या विरोधात संघर्ष करून त्यांनी निजामशाही वाचवण्याचा खूप प्रयत्न केला परंतू त्यात त्यांना यश आले नाही. यानंतर शहाजीराजे आदिलशाहीचे सरदार बनले. आदिलशहाने पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या भागांची जहागिरी शहाजी राजांना दिली त्याच बरोबर कऱ्हाड तालुक्यातील मसूर या गावासह बावीस खेडयांची देशमुखीही दिली.[३३] शहाजी राजांना कर्नाटकात कामगिरीसाठी आदिलशहाने पाठवले असता बाल शिवाजी व राजमाता जिजाऊस त्यांनी हा कारभार पाहण्यासाठी पाठवून दिले व ते कर्नाटकात गेले. या जहागिरीच्या प्रदेशातच छत्रपती शिवाजीराजांनी स्वराज्याचा प्रारंभ केला.

साताऱ्याच्या वायव्येस असणारा जावळीचा प्रदेश राजकीय दृष्टया अत्यंत महत्वाचा होता. कोकण प्रदेशात उतरण्याचे घाटमार्ग त्यामधूनच जात येत त्यामुळे या भागास कोकणाचे द्वार असे म्हटले जात असे. 'ज्याच्या ताब्यात जावळी त्याच्या ताब्यात वाई प्रांत, सहयाद्री घाटमाथा व त्यासमोरचे सबंध कोकण ' असे म्हणत असत. अशा या प्रदेशावर आपली मजबूत पकड असावी या उद्देशाने छ. शिवाजी महाराजांनी इ.स. १६५६ साली जावळी जिंकली.[३४] साताऱ्याच्या पश्चिमेस असलेला मोऱ्यांच्या ताब्यातील वासोटा किल्ला उर्फ व्याघ्रगड आणि शिवथरघळ शिवाजी महाराजांनी काबीज करून जावळी मोहिम पूर्ण केली.[३५] नवीन जिंकून घेतलेल्या प्रदेशाला अधिक संरक्षण मिळावे व पारघाटचे नाके ताब्यात रहावे, या हेतुंनी महाराजांनी जावळीमध्ये भोरप्या डोंगरावर इ.स.१६५७ मध्ये किल्ला बांधला हा प्रसिद्ध प्रतापगड होय.[३६]

या कालखंडात औरंगजेब हा मुघलांचा दक्षिणेकडील सुभेदार म्हणून काम पहात होता कुतुबशाहीनंतर त्याने आपला मोहरा आदिलशाहीकडे वळवला होता त्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा संभाव्य धोका ओळखला होता. परंतु उत्तरेत मुघल बादशहा शहाजहान आजारी पडल्याचे कळताच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सोबत मैत्री करून तो घाईने उत्तरेस परत गेला.

जावळी विजयाने आनंदीत होऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाहीचा उत्तर कोकणाचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. या काळात आदिलशाहीत अंतर्गत कलह माजलेला होता परंतु जेव्हा यातून त्यांना मोकळीक मिळाली. तेव्हा आदिलशहाने छत्रपती शिवाजी

महाराजांच्या विरोधात मोहीम काढली व आपला सरदार अफजलखानास छ.शिवाजी राजांवर पाठवले. खानाचा उघडया मैदानावर सामना करण्याऐवजी महाराजांना जावळीचा बिकट प्रदेश निवडला व महाराजांनी आपला मुक्काम जावळीला हलवला. खान पंढरपूर, भोसे, शंभूमहादेव, मलवडी मार्गे रहिमतपूर वरून वाईस पोहोचला. अफजलखान महाराजांच्या भेटीस प्रतापगडाखाली जाण्यास तयार झाला, व छत्रपती शिवाजी महाराज व खान यांची भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी झाली. याप्रसंगी झालेल्या भेटीत खानाने महाराजांना दगा फटका करण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी राजनितीचा अवलंब करून १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखानास ठार केले. मराठयांचे स्वराज्य अफजलखान प्रसंगानंतर खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले. आदिलशाही मुलुख लगेच काबीज करावा. या हेतूने महाराज वाईला पोहोचले पुढे त्यांनी वाई जिंकून घेतली व माणकोराम यास तेथील ठाणेदार नेमले.[३७]

तुळजापूरची भवानीदेवी ही भोसल्यांची कुलदेवता होय. तुळजापुरास देवीचे दर्शन घ्यावयास जाणे दूर पडत असे, म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी या अष्टभुजा देवीची स्थापना प्रतापगडावर एप्रिल १६६२ मध्ये केली.[३८] छत्रपती शिवाजी महाराज पन्हाळयावर वेढयात अडकलेले असताना शाहिस्तेखान पुण्यात ठाण मांडून बसला होता. त्याने त्याच्या फौजेच्या दोन तुकडया करून एक उत्तर कोकणात चौलजवळ व दुसरी घाटावर साताऱ्याजवळील रहिमतपूर येथे ठेवली होती.[३९] महाराजांनी शाहिस्तेखानावर ५ एप्रिल १६६३ रोजी लाल महालात जावून हल्ला केला व त्याला पळवून लावला. या नंतर महाराजांनी इ. स. १६६४ मुघलांचे सुरत बंदर लुटले. राजांचा पूर्ण बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेब बादशहाने जयसिंगास स्वारीवर पाठवले. या मुघल सत्तेसमोर आपला निभाव लागणार नाही, हे ओळखले व पुरंदरचा तह केला. या तहानंतर जयसिंगाने आदिलशहाच्या विरोधात मोहीम काढली. तहात ठरल्याप्रमाणे महाराजांनी मुघलांना सहाय्य केले. मुघल व मराठयांच्या संयुक्त फौजांनी फलटण, ताथवडा व खटाव ही ठिकाणे जिंकली.[४०] पुढे महाराजांनी आग्ऱ्याहून परतल्यावर दुसऱ्यांदा इ.स.१६७० मध्ये सुरतेवर स्वारी केली. याबरोबर आदिलशाही मुलखावरही त्यांनी आक्रमणे केली. त्यांनी इ.स. १६७३ मध्ये पन्हाळा जिंकून घेतला. साताऱ्यापासून ७ कि.मी.अंतरावरील परळीचा किल्ला जिंकून घेतला. २७ जुलै १६७३ रोजी सातारा किल्लाही काबीज केला.[४१] तसेच चंदनवंदन, पांडवगड, नांदगिरी, केळंजा आणि ताथवडा हे किल्ले

महाराजांच्या ताब्यात आले. सन १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. तसेच सन १६७५ मध्ये वाई छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात आली. इ.स.१६७६ च्या सुमारास शिवाजी महाराज साताऱ्यास आजारी पडले. या वेळी दोन महिने त्यांचे वास्तव्य साताऱ्यात होते. या आजारातून बरे होऊन महाराज पुढे काही काळ पन्हाळयास जाऊन राहिले, तरी साताऱ्याकडील खटाव इत्यादी आदिलशाही प्रदेशावर त्यांचे आक्रमण चालूच होते.[४२] सन १६७७ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिणेत कर्नाटक मोहिम केली, व परतल्यावर संभाजी महाराजांच्या वागणुकीत सुधारणा व्हावी, म्हणून त्यांना समर्थ रामदासांच्या सहवासात सज्जनगड (परळी) येथे ठेवले. परंतु संभाजी सन १६७८ मध्ये मुघलांना जावून मिळाला. परंतु पुढे दिलेरखानासोबत मतभेद झाल्याने सन १६७९ मध्ये ते माघारी आले. पन्हाळा येथे छत्रपती शिवाजी व संभाजी यांची भेट झाली. यानंतर ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. [४३]

छत्रपती शिवाजी महाराजांना सत्पुरूषांबद्दल नितांत आदर व पुज्यभाव होता. त्यापैकी बाबा याकूत केळशीकर, संत तुकाराम, मौनीबाबा पाडगावकर, निश्चलपुरी गोसावी, जयराम स्वामी वडगावकर, नारायणदेव चिंचवडकर, रंगनाथस्वामी व आनंदमुर्ती ब्रम्हणाळकर इत्यादींचा उल्लेख करता येईल. समर्थ रामदास स्वामी १६४४ साली कृष्णातीरी आले, कराडजवळ मसूर येथे राहू लागले . अंगापूरच्या डोहात सापडलेल्या श्रीरामांच्या मुर्तीची त्यांनी चाफळ येथे इ. स. १६४८ मध्ये स्थापना केली. तेंव्हापासून चाफळ येथे दरवर्षी रामजन्माचा उत्सव सुरू झाला. समर्थ रामदासही तेथेच वास्तव्यास राहीले. चाफळ देवस्थानास छत्रपती शिवाजी राजांनी २०२ वार्षिक इनाम दिले होते. त्याचप्रमाणे विजापूरच्या मुसलमानी राज्याकडून इनामे मिळाली होती. समर्थ रामदासांनी ज्या अकरा मारूतींची स्थापना केली, त्यात मसूर, माजगाव व उंब्रज इ. ठिकाणे सातारा जिल्हयात येतात. याशिवाय त्यांचे काही मठही सातारा जिल्हयात आहेत.[४४] समर्थ रामदास स्वामी ज्या परळीच्या गडावर राहत त्या गडास नंतर सज्ञनगड असे म्हटले जावू लागले. एकूण शिवकालाशी संबधीत सातारा परिसरातील घटना अत्यंत स्फुर्तीदायक अशा असल्याचे दिसून येतात.

छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर राज्यपदासाठी सत्तासंघर्ष झाला. शेवटी त्यात संभाजी सरस ठरले, याच सुमारास औरंगजेबपुत्र अकबराने पित्या–विरोधात बंड पुकारले परंतु

त्यात तो अयशस्वी झाला व आश्रयास छत्रपती संभाजीकडे आला. इकडे स्वराज्यात छत्रपती संभाजी विरूद्ध कटकारस्थाने चालू होती. अशाच एका कटात अकबरास समाविष्ट करण्याचा हेतुने अण्णाजी दत्तो यांनी प्रयत्न केला. परंतु अकबराने छत्रपती संभाजीराजांना सावध केले. परिणामी जुनीजाणती मंडळी या कटात असल्याने त्यांना ठार करण्यात आले. औरंगजेब बादशहादेखील इ. स. १६८२ मध्ये दक्षिण विजयासाठी दक्षिणेत उतरला. छत्रपती संभाजी राजांना एकाच वेळी मुघल, पोर्तुगीज व सिद्दी या सर्व शत्रुंशी लढा द्यावा लागला. मराठयांच्या विरोधात यश मिळत नसल्याने औरंगजेबाने प्रथमतः आदिलशाही संपवली. तेथील सरदार सर्जाखान यास वाई प्रांतावर पाठवले. वाई येथे सर्जाखान व हंबीरराव मोहिते यांच्या लढाईत मराठयांचा विजय झाला. परंतु हंबीरराव मोहिते ठार झाले. कोल्हापूर प्रांतावर नेमणुकीस असणाऱ्या मुकर्रबखानास संभाजी राजांना संगमेश्वर येथे पकडण्यात यश मिळाले. सन १६८९ मध्ये छ.संभाजी राजांना हालहाल करून ठार करण्यात आले. सन १६८९ च्या सप्टेंबर पर्यंत सातारा परिसरातील सातारा, परळी, निंब, चंदनवंदन, माजगाव, मसूर इत्यादी प्रदेश मराठयांच्या ताब्यात होता. छत्रपती संभाजीच्या हत्येनंतर राजाराम महाराजांना गादीवर बसविण्यात आले व त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी जिंजीस पाठविण्यात आले. इकडे सातारा परिसरातील विविध किल्ले सन १६९० पर्यत मुघलांनी जिंकून घेतले. रायगडाचा पाडाव झाला. येसूबाई आणि बाल शाहू मुघल कैदेत गेले. पुढे मात्र चित्र बदलत गेले व स्वराज्यातील एकएक किल्ला मराठी फौजा जिंकू लागल्या.

सातारा परिसराची चांगली माहिती असणाऱ्या सर्जाखानास सातारा जिंकण्याकरिता पाठवण्यात आले. परंतु त्याचाही पराभव सेनापती संताजी व धनाजी जाधवने केला. खुद्द सर्जाखानास व त्याचा मुलास संताजीने सातारा किल्ल्यावर अडकवून ठेवले.[४५] सर्जाखानाच्या पाडावानंतर मराठयांनी प्रतापगड व वाई इत्यादी प्रदेश घेतले.[४६]

प्रतिनिधी घराण्याची स्थापना करणारा संस्थापक ‘परशूराम त्रिंबक’ हा या काळात प्रसिद्धीस आला. हा नांदगिरी जवळील किन्हई गावचा होता. राजाराम महाराज जिंजींत असल्याने जिंजी जिंकण्यासाठी झुल्फीकारखानास पाठवण्यात आले. मराठयांनी आठ वर्षे जिंजी लढवली. पण १६९८ साली जिंजी मुघलांनी जिंकली. परंतु त्यापूर्वी राजाराम महाराज जिंजीहून विशाळगडावर आले. काही महिन्यांच्या नंतर त्याने विशाळगडावरून गादी साताऱ्यास

आणली. सातारा किल्ला हा बादशहावर लक्ष ठेवण्यास योग्य होता, म्हणून त्याने असा निर्णय घेतल्याचे दिसते.

मराठयांची खरी शक्ती किल्ल्यांमध्ये असल्याने औरंगजेबाने स्वतः किल्ले घेण्यास प्रारंभ केला. सन १६९९ मध्ये वसंतगड जिंकून त्याने स्वतः साताऱ्याच्या किल्ल्यास वेढा दिला. तो स्वतः साताऱ्याजवळच्या करंजे गावात येऊन राहीला. सातारा किल्ल्यास मुघलांचा वेढा पडला तेंव्हा राजारामाने सिंहगडावर निवासस्थान केले. तेथे छत्रपती राजाराम महाराजांचा सन १७०० साली मृत्यू झाला.[४७] परंतु त्याची पत्नी ताराबाई हिने मराठा राज्याची सुत्रे हाती घेतली. मराठा राज्यास खंबीर नेतृत्त्व दिले.

महाराणी ताराबाईने राज्याची सुत्रे हाती घेतली, तेव्हा औरंगजेब बादशहाचा सातारच्या किल्ल्याचा वेढा चालू होता. यावेळी बादशहा सोबत शहजादा मुअज्ञम, तर्बियतखान, रहूल्लाखान, मन्सूरखान व मुनिमखान इत्यादी सेनानी होते. मराठयांनी मुघलांना मिळणारी रसद तोडण्याचे काम सतत चालू ठेवले होते. तर सज्ञनगड (परळी) किल्ल्यावरून परशूराम त्रिंबक मराठयांना धान्य पुरवठा करत होता. यावेळी मुघलांनी तटाला सुरूंग लावून पाडण्याचा प्रयत्न केला व तटबंदीची बरीच हानी झाली शेवटी २१ एप्रिल १७०० रोजी वाटाघाटी करून मराठयांनी मुघलांना हा किल्ला दिला. शहजादा आझम याने केलेल्या वाटाघाटींमुळे किल्ला मुघलांना मिळाला. म्हणून औरंगजेबाने या किल्ल्याचे नाव 'आझमतारा' असे ठेवले.[४८] २२ एप्रिल १७०० रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला. आणि छत्रसाल राठोड याची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली.[४९] परळीचा किल्ला म्हणजेच सज्ञनगड १० जून १७०० रोजी मुघलांच्या ताब्यात आला. औरंगजेब बादशहाने त्याचे नाव 'नवरसतारा' असे ठेवले.[५०] इकडे बादशहा मराठयांचे किल्ले घेत होता तर तिकडे मराठयांच्या फौजा मुघलांच्या मुलखात मोहिमा काढत होत्या. पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ लढयानंतरही औरंगजेब मराठयांच्या राज्यावर ताबा मिळवू शकला नाही. व विमनस्क अवस्थेत २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी तो मरण पावला. त्याच्या मृत्यूने मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध संपले व एका नव्या अध्यायास प्रारंभ झाला.

औरंगजेबाच्या मृत्यूची बातमी त्याचा मुलगा आझमशहास समजताच त्याने स्वतःला बादशहा घोषीत केले आणि आपला भाऊ शहाआलम याचा विरोध मोडून काढण्यासाठी तो

उत्तरेकडे निघाला. यावेळी छत्रपती संभाजी पुत्र शाहू व राणी येसूबाई मुघलांच्या कैदेतच होती. दिल्लीच्या रोखाने जात असताना भोपाळजवळ दोराहा येथे आपला सरदार झुल्फीकारखान व आणखी काही मुत्सद्दयांच्या सल्ल्याने आझमशहाने शाहूची ८ मे १७०७ रोजी कैदेतून मुक्तता केली. यामागे शाहू व ताराबाई यांच्यात यादवी होऊन मराठयांची शक्ती कमी व्हावी, हा अंतस्थ हेतू होता.

शाहूची सुटका झाल्यानंतर तो दक्षिणेकडे निघाला असता बिजागड येथे अमृतराव कदमबांडे, लाबंकानी येथे परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, चिमणाजी मोघे असे अनेक सरदार येऊन मिळाले. यावेळी मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र सातारा हे होते. साताऱ्यातून राणी ताराबाई कारभार पहात होती. अहमदनगरला पोहचण्यापुर्वीच शाहूने राणी ताराबाईस कळवले की आम्ही निघून स्वदेशी परत येत आहोत, आता राज्य आम्ही करू.[५१] इकडे मात्र ताराबाईने शाहूच्या वारसा हक्काच्या दाव्याला तीव्र विरोध केला. युद्धाचे सावट वाढले पण यावेळी खेड जवळ धनाजी जाधव छत्रपती शाहूच्या पक्षात गेला. खेडच्या युद्धात ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला. धनाजी जाधवांसोबत खंडो बल्लाळ चिटणीस, बाळाजी विश्वनाथ, बहिरोपंत पिंगळे या सारखी माणसे शाहूस येऊन मिळाली.[५२] यानंतर छत्रपती शाहूने मावळ परिसरावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि साताऱ्याच्या रोखाने निघाला. वाटेतील चंदनवंदन किल्ल्यावरील किल्लेदारांनी शाहूचे वर्चस्व मान्य केले.शाहू साताऱ्यास येत आहे हे समजताच ताराबाईने परशुरामपंत प्रतिनिधीवर साताऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवून तिने स्वतः पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला. सातारा किल्ल्याचा किल्लेदार शेखमिरा वाईचा राहणारा होता. शाहूने त्यास शरण आणले आणि सातारा किल्ला इ. स. १७०७ मध्ये शाहूच्या ताब्यात आला. जानेवारी १७०८ मधील शनिवारी शाहूने समारंभपूर्वक सातारा शहरात प्रवेश केला.[५३] तेव्हापासून या सुखद घटनेची आठवण म्हणून साताऱ्याच्या किल्ल्यावर दर शनिवारी चौघडा वाजवण्याची प्रथा सुरू झाली. १२ जानेवारी १७०८ रोजी शाहूने स्वतःस राज्याभिषेक करवला व सातारा ही राजधानी त्यांनी निश्चित केली.

मुघल बादशहा बहादूरशहा १७०९ साली दक्षिणेत आला असता छत्रपती शाहू व ताराबाई या दोघांनीही दक्षिणेतील सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मागितल्या.

बादशहाने दोघांमध्ये विजयी होणाऱ्या पक्षास सनदा मिळतील असे सांगितले परिणामी हा तंटा वाढतच राहिला.

ताराबाईने १७१० मध्ये पन्हाळा येथे आपला पुत्र दुसरा शिवाजी यास समारंभपूर्वक गादीवर बसवले. अशा प्रकारे करवीर गादीची स्थापना झाली. याच कालखंडात साताऱ्यात काही सरदारांनी शाहू विरोधी बंड केले परंतु बाळाजी विश्वनाथाने ही बंडे मोडून शाहूचे आसन स्थिरावण्याकरिता मोलाची मदत केली. उत्तरेत मराठी सैन्याने स्वारी करून चौथाई व सरदेशमुखाच्या सनदा मिळवल्या. बादशाही कैदेत असणारे शाहूचे बंधू मदनसिंग आणि मातोश्री येसूबाई यांची सुटका केली. छत्रपती शाहूच्या या नव्या राज्य रचनेत अनेक नामवंत घराणी उदयास आली व त्यांना आपल्या पराक्रमासाठी नवीन कार्यक्षेत्र मिळाले म्हणून वेगवेगळया प्रदेशावर त्यांची नियुक्ती करण्यात आली.

१७२० साली बाळाजी विश्वनाथ मरण पावला त्याच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहूने त्याचा पुत्र बाजीराव यास १७ एप्रिल १७२० रोजी कराड जवळील मसूर मुक्कामी पेशवाईची वस्त्रे दिली. इकडे दक्षिणेतील निजामाने कोल्हापूर राज्यक्रांतीनंतर गादीवर आलेल्या संभाजीस फूस लावून आपल्या सोबत केले व शाहू विरोधी कारवाया करू लागला. परंतु पालखेडच्या युद्धात त्याचा बाजीरावाने पराभव केला. यानंतर मराठयांनी पुन्हा उत्तरेस लक्ष घातले परंतु कोल्हापूरच्या संभाजीच्या चिथावणीने काही सरदार शाहूच्या मुलखात लुटालुट करू लागले तेंव्हा शाहूने स्वतः मोहिम काढली व भिलवडी पर्यंत कोल्हापूर राज्याच्या हद्दीपर्यंत गेले. दोन्ही फौजा वारणा नदीवर भिडल्या. यात कोल्हापूरकर संभाजीचा पराभव झाला राणी राजसबाई व संभाजीची पत्नी यांना पन्हाळयावर आदरपूर्वक पोहोच करण्यात आले ताराबाईने शाहूजवळ राहण्याचे ठरविल्याने ती सातारच्या किल्ल्यावर बंदिवासात ठेवण्यात आले. शाहू व संभाजी यांच्यात वारणेचा करार झाला त्यानुसार वारणा नदी दोन्ही राज्यांची सरहद्द झाली आणि कोल्हापूरकर गादी व सातारची गादी यांच्यात चाललेला तंटा मिटला.

इ. स. १७३७ मध्ये चिमाजी आप्पाने पोर्तुगिजाविरूद्ध मोहिम काढली. या मोहिमेमुळे वर्सोवापासून दमणपर्यंतचा प्रदेश मराठयांना मिळाला. या घटनेने सावध होऊन इंग्रजानी मराठयांशी तह केला. तसेच मुंबईच्या कौन्सीलने कॅप्टन विल्यम गॉर्डन नावाचा वकिल शाहूस भेटण्यास पाठवला. ८ जून १७३९ मध्ये शाहूची व त्याची सातारा येथे भेट झाली.[५४]

१७३९ मध्ये इराणचा बादशहा नादिरशहाने केलेल्या आक्रमणास उत्तर देण्यासाठी बाजीराव उत्तरेस निघाला असता नर्मदा काठी रावेरला २८ एप्रिल १७४० रोजी त्याचा मृत्यू झाला. बाजीरावाच्या मृत्यूनंतर पेशवाईची वस्त्रे त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यास २५ जून १७४० रोजी सातारा येथे दिली.

इ. स. १७४३ पासून छत्रपती शाहूची प्रकृती ढासळू लागली. शाहूच्या राण्या आपापसात भांडत असत. छत्रपती शाहू निपुत्रिक असल्याने वारसाचा प्रश्न होता त्यामुळे शाहूस कायम त्रास होत असे. १७४८ मध्ये छत्रपती शाहूची धाकटी पत्नी सगुणाबाई वारली. हळूहळू छत्रपती शाहूने संसारातून आपले लक्ष काढले त्याचे मन साताऱ्यात रमेना म्हणून त्याने वनवासवाडी येथे निवास केला. परंतु प्रकृती खालावल्याने त्यास पुन्हा साताऱ्यात आणण्यात आले. वारसाचा प्रश्न अजूनही तसाच होता. कोल्हापूरच्या छत्रपती संभाजीस इकडे गादीवर बसवावे असा काहीचा होरा होता. परंतु छत्रपती शाहूस ते मान्य नव्हते. यावेळी सातारा किल्ल्यात कैदेत असलेल्या ताराबाईने आपला नातू रामराजा(दुसऱ्या शिवाजीचा पुत्र) हा अजून जिवंत व सुरक्षित आहे. असे जाहीर केले. शाहूने हा वारस स्वीकारला परंतु त्याच्या पत्नीने त्यास प्रखर विरोध केल्याने त्याने पेशव्यांना बोलावून आपल्या मरणानंतर रामराजास दत्तक म्हणून आपल्या गादीवर बसवावे असे सांगितले. छत्रपती शाहू १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा(शाहूनगर) येथे मरण पावला.[५५] शाहूने साताऱ्यात अनेक लोकोपयोगी कार्ये केली. तो अतिशय धार्मिक होता. ब्रम्हेंद्रस्वामी यांना धावडशी व कचरेश्वरबाबा यांना चाकणहून साताऱ्यात वास्तव्य करण्याचे आवाहान करून त्याना साताऱ्यात आणले.

छत्रपती शाहूची राजधानी प्रथम किल्ल्यावर होती. पुढे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर शाहूनगर नावाचे शहर त्याने इ. स. १७२०–२१ मध्ये वसविले. हेच आजचे सातारा होय.[५६] या शाहूनगरची स्थापना सन १७२१ च्या सुमारास झाली व तिचा सर्वाधिक विस्तार छत्रपती शाहूच्या कारकिर्दीतच झाला. या शहराची रचना व त्यातील भागांची नावे शाहूच्या आमदानीची आठवण करून देतात. शाहूनगर येथे शाहूने रंगमहाल, अदालतवाडा, यासारख्या वास्तू बांधल्या. यवतेश्वराहून खापरी नळाने पाणी आणून साताऱ्यात पाण्याची व्यवस्था लावली. हौद बांधले. उत्तर हिंदुस्थानातून व दक्षिणेकडून सावकारी, वकिली, देवतार्चन इत्यादी कामे करणारी अनेक कुंटुबे शाहूनगरात आणून वसवली. त्याचबरोबर आशानंद, सुखानंद, मनसापुरी,

बनसीपुरी, सुमेरगिरी, गोसावी यासारखे नामांकित व्यापारी साताऱ्यात येऊन राहिल्यामुळे शहराची भरभराट झाली. सातारा ही मराठयांची राजधानी असल्यामुळे प्रधानांचे, सरदारांचे वाडेही येथे बांधले गेले. नविन पेठा वसविल्या गेल्या. सातारा शहराच्या सौंदर्यात शाहूने भर घातली. छत्रपती शाहूने करंजे येथे बागा लावल्या. विविध प्रकारची फळझाडे व फुल–झाडे येथे होती. छत्रपती शाहूस शिकारीचा शौक होता. प्राणी पाळण्याची त्यास हौस होती.[५७]

छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १७५० रोजी रामराजास समारंभपूर्वक राज्यारोहण करण्यात आले. ताराबाईने त्याच्यावर वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने ताराबाईऐवजी पेशव्यांना जवळ केल्याने तिने विरोध करण्यास प्रारंभ केला. यातूनच पुढे सांगोला करार झाला. त्यान्वये छत्रपती नामधारी होऊन खरी सत्ता पेशव्यांच्या हाती गेली. पेशव्यांची सरशी झाल्याने ताराबाईचे प्रस्थ कमी झाले. ताराबाईची शेवटची नऊ–दहा वर्षे निष्क्रियतेत गेली होती. ताराबाईचा मृत्यू १० डिसेंबर १७६१ रोजी साताऱ्यात झाला.

पानिपतच्या युद्धात मराठयांचा पराभव झाल्याने नानासाहेबांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्याचा पुत्र माधवराव पेशवेपदी आला. नानासाहेबाचा भाऊ रघुनाथरावासही पेशवेपद हवे असल्याने रामराजावर ताबा मिळविण्यासाठी त्याने सातारा किल्ला आपल्या ताब्यात असावा असा आग्रह धरला परंतु त्याचा बिमोड झाल्यावर माधवरावाने रामराजाची सढळ हाताने व्यवस्था लावून दिली. सातारा किल्ल्यावरील घरे व वाडे यांची दुरूस्ती माधवरावाने सन १७६७ मध्ये केल्याची माहिती मिळते.[५८] कर्नाटक स्वारीस जातायेता माधवराव साताऱ्यात जाऊन रामराजाची भेट घेत असे.[५९] रामराजा ९ डिसेंबर १७७७ रोजी निपुत्रिक मरण पावला. मात्र मृत्यूपुर्वी त्याने बावी येथील भोसल्यांच्या वंशातील विठोजी यास दत्तक घेतले व त्याचे नाव धाकटे शाहूराजे असे ठेवले.

दुसऱ्या शाहूचा राज्याभिषेक ११ डिसेंबर १७७८ रोजी साताऱ्यात मोठया दिमाखात पार पडला. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी करत आणून पेशव्यांनी अखेरच्या छत्रपतींना तर बंदिवासाची वागणूक दिली. सर्व महसूल पुण्यात जमा होऊ लागला दुसऱ्या शाहूस कोणी भेटू नये म्हणून चौकी पहारे ठेवले. चाकर मंडळींची संख्या मर्यादित केली. या विरोधात छत्रपतींचा बंधू चतूरसिंगने बंड करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी ठरला. या दुसऱ्या शाहूंना तीन पुत्र झाले. पहिला प्रतापसिंह उर्फ बुवासाहेब, दुसरा रामचंद्र उर्फ

भाऊसाहेब, तिसरा शहाजी उर्फ आप्पासाहेब हे होत. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह गादीवर आले.

### १.१५.६ आधुनिक कालखंड

इ.स.१८०८ साली छत्रपती प्रतापसिंह सातारच्या गादीवर बसले. सातारच्या आधुनिक इतिहासाच्या नव्या पर्वास प्रारंभ झाला. १९व्या शतकात दोन बाणेदार मराठी राज्यकर्ते झाले. पहिले छ.प्रतापसिंह व दुसरे बडोद्याचे सयाजीराव गायकवाड या दोन्ही राजांनी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी इंग्रजाशी जोरदार लढा दिला. या लढयात शस्त्रास्त्रे नव्हती परंतु आत्मनिष्ठा, मुत्सद्देगिरी आणि कर्तव्यनिष्ठा होती.

२५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह राजांना मराठा गादी प्राप्त झाली. त्यानुसार १८४८ मध्ये अस्तित्त्वात आलेल्या सातारा जिल्हयातील प्रदेश तासगाव वगळता समाविष्ट होता. याचप्रमाणे सोलापूर जिल्हयातील सांगोला, माळशिरास व पंढरपूर उपविभाग विजापूर जिल्हयाचा विजापूर शहरासह काही भागसुद्धा या संस्थानात होता. मात्र ब्रिटिशांनी प्रतापसिंहाना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज रेसिडेंट नियुक्त केला होता. व त्याच्या सहमतीनेच या राजांना या राज्यांचा राज्यकारभार पाहणे गरजेचे ठरवले होते. या योजनेनुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ साताऱ्याचा पहिला रेसिडेंट म्हणून कार्यरत झाला. व त्याला सहाय्यक म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली.

छत्रपती प्रतापसिंहास ग्रँट डफने राज्यकारभारविषयक मार्गदर्शन केले. त्यांना राज्यकारभारविषयक नवनव्या योजना सांगितल्या आणि उत्तेजन देऊन साताऱ्याचे राज्य अतिशय उत्तम कसे होईल याची शिकवण दिली. ग्रँट डफच्या सल्ल्यानुसार राजांनी आपल्या राज्यात प्रजाहिताच्या अनेक सुधारणा केल्या. राज्यकारभार व न्यायनिवाडा करण्यासाठी ते स्वतः कचेरीत जाऊ लागले. रयतेशी जनसंपर्क ठेऊन पिकांच्या प्रत्यक्ष पाहणीसाठी ते प्रसंगी ग्रँट डफ बरोबर जात असत. ग्रँट डफ व प्रतापसिंह यांच्या परस्पर सहकार्याने सातारा संस्थान खूपच चांगले झाले. असा अभिप्राय एका सुप्रसिद्ध लेखकाने दिला आहे.[६०]

छत्रपती प्रतापसिंहाच्या पुर्वी शाहू सोडून सातारच्या कोणत्याही छत्रपतींना सातारा शहरात सुधारणा करण्यात यश आलेले दिसत नाही. किंबहुना सततच्या अस्थैर्यी राजकीय

परिस्थितीने त्यांना ते करण्याकरिता आवश्यक वेळ मिळाला नसेल. परंतु छत्रपती प्रतापसिंहाना आपली राजवट स्थिर करण्यासाठी इंग्रजांची मदत मिळाली व त्यांचे बस्तान लवकर बसले. परिणामी त्यांना लोककल्याणाची कामे करण्यास वेळ मिळाला. राजधानी असलेल्या सातारा शहरातही या काळात पाण्याचे दुर्भिक्ष असे. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी यवतेश्वर देवालयाच्या मागे एक मोठा तलाव बांधून खापरी नळाने त्याचे पाणी शहराला पुरविले. महादरा येथेही तलाव बांधून खापरी नळाने त्याचे पाणी सातारा शहरात आणले. (१८२९). या सोईसाठी एक लाख रूपये खर्च झाला.[६१] सातारा शहरात सरळ व आखीव हमरस्ते तयार केले. साडेपाच लाख रूपये खर्च करून १८२६ साली छत्रपती प्रतापसिंह यांनी मोठा राजवाडा बांधला. तोच जुना राजवाडा म्हणून ओळखला जातो. त्यांनी आणखी वाडे बांधले व इतरांना बांधण्यासाठी वित्तसहाय्य केले. रस्त्याच्या दोन्ही बाजूस वृक्षारोपन केले. दुकाने बांधण्यासाठी होतकरू लोकांना तगाइची कर्जे दिली. मुलामुलींच्या संस्कृत शिक्षणास्तव एक मोठी पाठशाळेची इमारत बांधली. तेथे १२,००० रूपये खर्च करून एक छापखाना काढून अनेक उपयुक्त ग्रंथ छापून घेतले. दरबारी मानकऱ्यासाठी अनेक वाडे बांधले. साताऱ्याच्या किल्ल्यावरील मंगळाईच्या देवळाच्या जिर्णोद्धारासाठी पाच हजार रूपये, प्रतापगडावरील भवानीदेवीच्या देवळाचा जिर्णोद्धार चाळीस हजार रूपये, सज्जनगडावरील रामदास स्वामींच्या देवळाचा जिर्णोद्धार वीस हजार रूपये, यवतेश्वराचे देऊळ व तलाव याकरिता दहा हजार रूपये छत्रपती प्रतापसिंह राजांनी खर्च केल्याची नोंद आहे.[६२] लोककल्याणासाठी शहरात पंचपाळी हौद, छत्रीहौद इ. पाणीपुरवठा केंद्रे बांधली.

थोडयाच कालावधीत छत्रपती प्रतापसिंहानी सातारा राजधानीची चांगली सुधारणा घडवून आणली. कारागीर, उद्योगधंदे व व्यापारास राजाश्रय प्राप्त झाला. छत्रपती .प्रतापसिंहानी साताऱ्यात शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. बहुजन समाजामधील मुलामुलींच्या शिक्षणासाठी पाठशाला बांधली. मुंबई येथील डॉ. मिलन यांच्या मदतीने राजांनी दोन तीन विद्वान मिशनऱ्यांना आणून पाठशाळेचा उपक्रम निर्धार पूर्वक राबविला. पाश्चात्य शिक्षणाचे सामर्थ्य लोकांना पटवून देण्यासाठी उपयुक्त इंग्रजी ग्रंथाचे मराठीत भाषातंर करण्याचे तत्त्व त्यांनी प्रत्यक्षात उतरविले नामवंत लेखकांना उत्तेजन देऊन काही पुस्तके लिहून घेतली.[६३]

मराठा मुलांमुलींनी लष्करी शिक्षण घ्यावे यासाठी राजांनी ग्रँट डफच्या सल्ल्यानुसार रेसिडेन्टीतील एक इंग्रज अधिकारी नियुक्त केला. आपली कन्या गोजराबाई आणि इतर सरदारांच्या मुली यांना लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था केली.[६४]

छत्रपती प्रतापसिंहराजे लोककल्याणाची कार्ये उत्तमरित्या पार पाडत असूनही ब्रिटिशांनी सातारचे राज्य खालसा करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. एलफिन्स्टन व ग्रँड डफ साताऱ्यात असताना त्यांनी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सहकार्य केले, परंतु पुढे आलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी सातारचे संस्थान खालसा करण्याकरिता प्रयत्न चालू केले. या कटात छत्रपतीचे कनिष्ठ बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना सहभागी करून घेण्यात आले. त्यांनी मला गादीवर बसवले तर मी छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या विरोधात सरकारला सर्वतोपरी मदत करीन असे वचन दिले.[६५] हा कट यशस्वी झाला व छत्रपती प्रतापसिंहाना पदच्युत करण्यात आले. त्यांच्या जागी त्यांचे बंधू श्रींमत आप्पासाहेब यांना १८३९ मध्ये करार करून गादीवर बसविले.[६६] छ. प्रतापसिंहाना पदच्यूत करून साताऱ्याहून १६ कि.मी. वरील लिंब येथे गोठयात ठेवण्यात आले. व पुढे काशीस त्यांची रवानगी करण्यात आली. काशी येथे १८४७ साली त्यांचे निधन झाले.[६७]

रंगो बापूजी यांनी छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्यावरील झालेल्या अन्यायाला इंग्लडमध्ये जाऊन दाद मागितली परंतु त्याचा उपयोग झाला नाही. छत्रपती प्रतापसिंहाच्या मृत्यूनंतर सातारा संस्थान जास्त दिवस टिकले नाही श्रीमंत आप्पासाहेब यांना औरस संतती नसल्यामुळे दत्तक वारस नामंजूर करून १६ मे १८४९ रोजी सातारा येथे जाहिरनामा काढून त्यानुसार सातारा संस्थान खालसा केले.

आपली राजवट स्थिर करण्याच्या धोरणानुसार इंग्रजांनी १८५० साली नगरपालिका अधिनियम (क्रमांक २६) अमलात आणला त्यानुसार १ ऑगस्ट १८५३ रोजी सातारा येथे टाऊन म्युनिसीपालीटी स्थापन झाली.

## १.१६ समारोप

साताऱ्याला प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास आहे. सातारा जिल्हयात विविध ठिकाणी सापडलेल्या अवशेषावरुन प्रागैतिहासिक मानवाचे अस्तित्व आढळते. सातारा परिसरावर प्राचीन काळात राष्ट्रकुट, बदामीचे चालुक्य व सातवाहन घराण्याची सत्ता होती. पुढे

शिलाहार वंशीय राजा भोज द्वितीयने सातारा जिल्हयात १०–१२ किल्ल्यांचे बांधकाम केल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. यादव सत्तेच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतातील लहान–मोठी हिंदू राज्ये मुस्लिम आक्रमणास बळी पडली. तेव्हापासून साताऱ्यावर बहामनीची सत्ता सुरु झाली. बहामनी राजवटीनंतर आदिलशाही सत्ता स्थापन झाली होती.

१७ व्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय झाला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी सहिष्णुता आणि लोकोपयोगी, लोककल्याणाची कामे करुन स्वराज्याचा पाया रचला. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६५६ साली जावळी जिंकली. छत्रपती शिवाजी महाराज व खान यांची भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी झाली. याप्रसंगी १ नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखानास ठार केले.

छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजीराजे झाले. त्यांनीही औरंगजेब बादशहाच्या विरूद्ध लढा दिला. शेवटी कोल्हापूर प्रांतावर नेमणुकीस असणाऱ्या मुकर्रबखानास संभाजी राजांना संगमेश्वर येथे पकडण्यात यश मिळाले. सन १६८९ मध्ये छत्रपती संभाजी राजांना हालहाल करून ठार करण्यात आले. छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजास गादीवर बसविण्यात आले व त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी जिंजीस पाठविण्यात आले. छत्रपती राजाराम महाराजांचा सन १७०० साली मृत्यू झाला. त्यानंतर त्यांची पत्नी ताराबाई हिने मराठा राज्याची सुत्रे हाती घेतली. तेव्हा औरंगजेब बादशहाचा सातारच्या किल्ल्याचा वेढा चालू होता. २२ एप्रिल १७०० रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला आणि छत्रसाल राठोड याची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली. पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ लढयानंतरही औरंगजेब मराठयांच्या राज्यावर ताबा मिळवू शकला नाही. शेवटी २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी तो मरण पावला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूची सुटका झाली. त्यावेळी मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र सातारा हे होते. साताऱ्यातून राणी ताराबाई कारभार पहात होती. शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात यादवी युद्ध झाले. त्यात शाहूचा विजय झाला. छत्रपती शाहूने साताऱ्यात अनेक लोकोपयोगी कार्ये केली. छत्रपती शाहूची राजधानी प्रथम किल्ल्यावर होती. पुढे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर शाहूनगर नावाचे शहर त्याने इ. स. १७२०–२१ मध्ये वसविले. हेच आजचे सातारा होय. शाहूनगर येथे छत्रपती शाहू महाराजांनी राजधानीस शोभेल अशा वास्तूंचे

बांधकाम केले. तसेच अनेक लोकोपयेगी कामे केली. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १७५० रोजी रामराजास समारंभपूर्वक राज्यारोहण करण्यात आले.

दुसऱ्या शाहूचा राज्याभिषेक ११ डिसेंबर १७७८ रोजी झाला. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी केले. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. २५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह राजांना मराठा गादी प्राप्त झाली. ब्रिटिशांनी प्रतापसिंहाना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज रेसिडेंट नियुक्त केला होता. व त्याच्या सहमतीनेच या राजांना या राज्यांचा राज्यकारभार पाहणे गरजेचे ठरवले होते. या योजनेनुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ साताऱ्याचा पहिला रेसिंडेंट म्हणून कार्यरत झाला. त्याला सहाय्यक म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. छत्रपती प्रतापसिंहाना ब्रिटिशांनी पदच्युत केले. त्यांच्या जागी त्यांचे बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना १८३९ मध्ये करार करून गादीवर बसविले.

श्रीमंत आप्पासाहेब यांना औरस संतती नसल्यामुळे दत्तक वारस नामंजूर करून १६ मे १८४९ रोजी सातारा येथे जाहीरनामा काढून त्यानुसार सातारा संस्थान खालसा केले. आपली राजवट स्थिर करण्याच्या धोरणानुसार इंग्रजांनी १८५० साली नगरपालिका अधिनियम (क्रमांक २६) अमलात आणला त्यानुसार १ ऑगस्ट १८५३ रोजी सातारा येथे टाऊन म्युनिसीपालीटी स्थापन झाली.

## संदर्भ


१) Imperial Sensus and Sensus of India 1872 to 2001

२) पाटणे संभाजीराव , लेख, 'किर्तीवंत' सातारा, नगर वाचनालय स्मरणिका , पृ.४४

३) माटे गो.रा., असा घडला सातारा जिल्हा, पृ.३

४) मंत्री रमेश, सुंदर सातारा, पृ.५

५) पाटणे संभाजीराव, उपरोक्त, पृ.४४

६) चव्हाण शिवाजी, सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आकृतीबंध, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा रौप्यमहोत्सवी अंक, सातारा, १९८७, पृ.२५

७) पाटणे संभाजीराव, उपरोक्त, पृ. ४४

८) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटिअर, १९९९,पृ. ७९

९) कित्ता, पृ. ८०

१०) Malik A.C., Stone of the Bombay and Satara District Badoda , 1959, P.3342

११) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. ८२

१२) Canigham, Stup Of Bharhut Lekh No. 135, 138, 139, P.11

१३) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८३

१४) कित्ता, पृ. ८६

१५) Mirashi V.V., Studies In Indology, Vol. 1, P., 5

१६) Indian Antiquery, Vol- 9, P.303

१७) Journal of the Bombay branch of the Royal Asiyatik Society Vol. 8, Bombay, P.164

१८) Mirashi V.V., Apigraphiya India, Delhi, Vol. 29, P.178

१९) ठोसर हरीहर, राष्ट्रकुटांचा प्रारंभिक इतिहासावर नविन प्रकाश, भारतीय इतिहास आणि संस्कृती मुंबई, पुस्तक १०३, (त्रैमासिक–ऑक्टो ते डिसेंबर १९८९), पृ.८,९

२०) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, (१६८९–१७०७), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, जुलै २००८ पृ.३

२१) कित्ता, पृ.३

२२) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.९०.

२३) Ramesh K.V., Chalukya of Vatapi, Dehli, 1984, P.84

२४) कित्ता, पृ.८४

२५) कित्ता, पृ.१४७

२६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.९३

२७) काळे व्ही.सी., उपरोक्त, पृ. ४

२८) कित्ता, पृ.४

२९) Archeological Survey of Western India, Vol. 4, P.60

३०) Deglurkar J.B., Temple Architecture And Sculpture of Maharashtra, P.109

३१) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१२०

३२) कित्ता पृ.१२५,१२६

३३) शिवकालीन पत्रसारसंग्रह पुणे, १९३०, पत्र क्रं.८८५

३४) आपटे द.वि., स.म.दिवेकर(संपा.), शिवचरित्र प्रदिप शिवापूर दप्तर यादी, पुणे,१९२५, पृ.५०

३५) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. १३०

३६) मेंहदळे ग.भा., श्री राजा छत्रपती खंड २, भाग २, पुणे, १९९६, पृ.७७१

३७) काळे व्ही.सी., उपरोक्त, पृ.८

३८) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड१, मुंबई १९८८, पृ.१६६.

३९) कित्ता, पृ. २११

४०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१३४

४१) आपटे द.वि., दिवेकर स.म.(संपा.), शिवचरित्र जेधे शकावली, पुणे, १९२५ पृ.२७

४२) Sardesai G.S.(Ed.), Selection from the Peshwa Duftar Vol.42, Bombay, 1934, P.20

४३) Sardesai G.S., New History of the Marathas, Vol. 2, Bombay 1971, P.274, 276.

४४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१३६

४५) सरदेसाइ गो.स., रियासत खंड २, मुंबई १९८८, पृ.१८६

४६) कित्ता, पृ.१८६

४७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१४३

४८) Kulkarni G.T., The Maratha Mughal relations Twenty five fateful Years (1682 to 1707 A.D.) Poona, 1983, P.148

४९) कित्ता, पृ.१९१

५०) कित्ता, पृ.१९३

५१) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, मुंबई, १९१४ लेख क्रं.४६

५२) कित्ता, पृ.१४७

५३) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१४७

५४) कित्ता, पृ.१५४

५५) कित्ता, पृ.१५६

५६) कित्ता, पृ.१५७

५७) कित्ता, पृ. १५७

५८) कित्ता, पृ.१५९

५९) कित्ता, पृ.१५९

६०) ठाकरे के.सी., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, १९४८, पृ.८०

६१) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१६३

६२) कित्ता, पृ.१६३

६३) कित्ता, पृ.१६३

६४) कित्ता, पृ.१६४

६५) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड,८, १९९२, पृ.६४३,६४८

६६) कित्ता, पृ.६४३

६७) कित्ता, पृ.६४४

# प्रकरण दुसरे

# नगरपालिकेची स्थापना, विकास व प्रशासन

## २.१ प्रस्तावना

सातारा नगरपालिकेची स्थापना ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. कारण महाराष्ट्रातील सर्वात पहिली व जुनी नगरपालिका म्हणून सातारा नगरपालिकेस ओळखले जाते. या नगरपालिकेच्या स्थापनेमुळे सातारा शहराचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. या नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर तिचा विकास होण्यासाठी निवडून आलेल्या लोकांनी चांगल्या पद्धतीने कार्य केले. त्यामुळे अल्पकाळात सातारा नगरपालिकेचा विकास होण्यास मदत झाली. सातारा नगरपालिकेतील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कार्यामुळे नगरपालिकेचा विकास होण्यास मदत झाली.

सातारा शहराच्या विकासासाठी सातारा नगरपालिकेचे प्रशासन कार्यक्षम होते. हे त्या नगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यावरून दिसून येते. सातारा शहराचा विकास हा नगरपालिकेच्या कार्यक्षम व निर्दोष प्रशासन यंत्रणेमुळे झालेला दिसून येतो. नगरपालिकेने सातारा शहरात सार्वजनिक आरोग्य, शहर स्वच्छता, रस्ते, बांधकाम, पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा व दिवाबत्ती सोय इत्यादी प्रशासन यंत्रणेकडून चांगल्या पद्धतीने लोकोपयोगी कामे केली आहेत. तसेच दुय्यम दर्जाची कामे ही प्रामुख्याने लोक प्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतात. सातारा नगरपालिकेने केलेल्या प्रशासकीय कार्यातून लोकांचा शारीरिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास झालेला आहे. या प्रकरणात सातारा नगरपालिकेची स्थापना व तिच्या विकासात जे महत्त्वाचे टप्पे आहेत. नगरपालिकेचे प्रशासनाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

## २.२ भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास

सातारा नगरपालिकेची स्थापना व विकासाचा आढावा घेण्यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास पहाणे गरजेचे आहे. टोक्वेव्हिल यांच्या या मते, ‘स्थानिक स्वराज्य संस्थाकडे स्वतंत्र राष्ट्राचा एक घटक म्हणून पहावे. राष्ट्र स्वतंत्र सरकारची स्थापना करीत असले तरी

स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नगरपालिका यातून वगळता येणार नाहीत.' तर एन.पी.शर्मा म्हणतात की, 'लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.'[१]

**अ) प्राचीन काळ**

प्राचीन भारतात स्थानिक स्वशासनाचे ग्राम व पुर किंवा नगर अशी दोन स्वतंत्र प्रशासकीय विभागणी केलेली होती. प्राचीन काळात राजधानीचे शहर व उपकेंद्र असलेली छोटी शहरे अस्तित्त्वात होती. मोहोंजदारो व हडप्पा येथील उत्खननात प्राप्त झालेल्या पुरातत्त्व अवशेषावरून स्पष्ट होते की, प्राचीन काळात देखील उत्तम नगररचना, नगर प्रशासन अस्तित्त्वात होते. शहराचा कारभार करण्यासाठी अधिकारी व लोकनियुक्त मंडळ निर्माण केली जात होती. तसेच ही मंडळे स्वायत्त होती. म्हणजेच त्यांच्या क्षेत्रातंर्गत त्यांचे कारभार स्वातंत्र्य होते. वैदिक वाङ्मय, स्मृतीश्रुती यावरून दिसून येते की, प्रत्येक नगरात संरक्षण, न्यायदान, शांतता व सुव्यवस्था, कर वसुली विहीर व पाटबंधारे योजनांची निर्मिती, रस्ते, पूल यांची देखभाल व नैसर्गिक आपत्तीत सहाय्य करणारी सक्षम नगर यंत्रणा होती.[२]

मॅगेस्थेनिस याने लिहीलेल्या इंडिका ग्रंथातील पाटलीपुत्र शहराच्या वर्णनामध्ये तेथील नगर प्रशासनाची कल्पना येते. पाटलीपुत्र शहराच्या प्रशासनासाठी तीस सदस्यांचे मंडळ होते. या मंडळातंर्गत प्रत्येक पाच सदस्यांच्या सहा समित्या होत्या. या समित्या म्हणजे औद्योगिक कला पर्यवेक्षण समिती, वाणिज्य व व्यवसाय समिती, परराष्ट्रीय व्यवहार समिती, वस्ती समिती, कर समिती व देखभाल समिती इत्यादी समितीद्वारे नगराचे कामकाज चालविले जात होते. महत्त्वाच्या निर्णया संदर्भात सल्लामसलत करण्यासाठी राजा नगरसमिती किंवा मंडळ यास पाचारण करीत असे. जनमत आकलनाचे नगर समिती एक राजकीय दृष्टया महत्त्वाचे साधन होते.[३]

**ब)मध्ययुगीन काळ**

मध्ययुगीन काळात सुलतानशाहीत एवढया मोठया साम्राज्यावर एकाच ठिकाणावरून नियंत्रण करणे अशक्य आहे. म्हणून त्यांनी साम्राज्याचे विभाजन प्रांतात केले होते. शासनाच्या कार्यासाठी हे विभाजन केले असले तरी स्थानिक स्वशासन संस्थाच्या विकासासाठी विकेंद्रीकरणाचे तत्त्व पूर्णतः रद्द केले परिणामतः या संस्थासंबंधी त्यांनी विकेंदीकरणाचे तत्त्व

स्वीकारले. त्यामुळे या काळात संस्थाच्या विकासाची दुर्मिळ उदाहरणे सापडतात. या संस्थांना लोकशाही मार्गाचा अवलंब करता येत नसे. त्यामुळे त्यांचे महत्त्व कमी झाले होते. प्रांताचा प्रमुख 'अमीर' म्हणून ओळखला जात असे. प्रांताचे विभाजन 'शिक' मध्ये केले होते. त्याचा प्रमुख शिकदार असे. शिकचे विभाजन परगण्यात होत असे त्याचा प्रमुख चौधरी असे. तसेच परगण्याचे विभाजन ग्रामात होत असे. त्याचा प्रमुख मुकादम असे.[४]

भारतीय प्रशासन व्यवस्थेत महत्त्वाचे बदल मोगल सम्राट अकबराच्या(सन १५५६ ते १६०६) काळात घडून आले. सम्राट अकबराच्या काळात शासनाचे सर्व अधिकार राजाकडे केंद्रित झाले असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाला फार कमी वाव मिळाला. त्याने आपल्या प्रशासकीय व्यवस्थेद्वारे जनतेची सद्‌भावना मिळविण्याचा प्रयत्न केला. अकबराने साम्राज्य १५ विभागात विभागले होते. प्रत्येक विभागावर प्रमुख म्हणून सुभेदारास नेमले. त्याचबरोबर निझाम, काझी व बक्सी ही पदे नेमली. व त्यांच्याकडे त्याप्रमाणे कामाची विभागणी केली. प्रांताचे विभाजन सरकार मध्ये केले. त्याचे प्रमुख फौजदार यास नेमले. याशिवाय अमलगुजार, काझी, कोतवाल, खजिनदार वगैरे अधिकारी नेमले गेले. सरकारचे विभाजन परगणा यात केले. शिकदार हा तेथील प्रमुख असून कानुंगो व पोतदार यांचीही नेमणूक केली.[५]

यावरून हे स्पष्ट होते की, मध्ययुगीन काळ हा स्थानिक स्वराज्य संस्थांना पोषक नव्हता. राज्याचा कारभार सुरळीत चालावा, म्हणून नियुक्त केलेले अधिकारी हे राजसत्ता बलिष्ठ व्हावी म्हणून आपले सर्वस्व पणाला लावत असत.

**क) ब्रिटिश कालखंड**

ब्रिटिश राजवटीत घडून आलेला स्थानिक शासनाचा विकास हा त्या त्या काळातील परिस्थिती, राजकीय गरज आणि अधिकारस्थित व्यक्तीची वैयक्तिक श्रद्धा व विश्वास यांचा एकत्रित परिणाम आहे. त्यामुळे हा विकास सलग व सतत एका विशिष्ट दिशेने झाल्याचे दिसून येत नाही. स्थानिक प्रशासन व्यवस्थेबाबत ब्रिटिशांनी वेगवेगळे प्रयोग करून पाहिले होते व त्यानुसार त्यांनी स्थानिक स्वराज्याकडे सोपविण्यात येणारी कार्ये, त्यामागील हेतू, स्थानिक प्रशासनाच्या समित्यांची रचना, शासकीय, अशासकीय सदस्य आणि त्यांची निवड किंवा नेमणूक, निवडणूक धोरण, निवडणूक धोरणाची अमंलबजावणी आणि नागरी व ग्रामीण

प्रशासनाचे वेगळेपण या संदर्भात स्थानिक प्रशासनात काळानुरूप वेगवेगळे बदल करून पाहिले. या बदलाचे वा सुधारणांचे पुढील सहा कालखंड पाडता येतील.[६]

### १) प्रथम कालखंड(इ.स.१६८७ ते १८८१)

ब्रिटिशांनी भारतातील स्थानिक स्वशासनासंबंधी घेतलेला पहिला महत्त्वपूर्ण निर्णय म्हणजे सन १६८७ मधील मद्रास येथील महानगरपालिकेची स्थापना होय. पुढे सन १७९३ मध्ये मुंबई व कलकत्ता नगरपालिकेचे रूपांतरही महानगरपालिकेत करण्यात आले. इ.स.१८४२ च्या स्थानिक शासन कायद्याला या कालखंडातील महत्त्वाचा पाया समजला जातो. पुढे इ.स.१८७० मध्ये लॉर्ड मेयो यांनी स्थानिक शासनासंबंधी आर्थिक विकेंद्रीकरणाचा ठराव मांडून स्थानिक संस्थावरील वित्तीय जबाबदारीत वाढ करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश कालखंडातील या पहिल्या टप्प्यात जनहितापेक्षा साम्राज्यवादी दृष्टिकोनातून भारतातील आपली पकड मजबूत करण्याच्या उद्देशालाच प्राथमिकता दिली जाते.

### लॉर्ड मेयोचा ठराव(१८७०)

१) प्रांताचे अधिकारक्षेत्र वाढवून त्यांची वित्तीय बाजूही सक्षम करण्यात यावी.

२) प्रांतातील खात्यांच्या अधिकारक्षेत्रात व खर्च मर्यादेत वाढ कारावी.

३) शिक्षण खाते, सार्वजनिक आरोग्य खाते व वाहतूक खाते प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात यावे.

४) प्रांताकडे सोपविलेल्या खात्यांचा खर्च केंद्र सरकाने करावा व खर्चातील तूट कराच्या रूपाने भरावी.

५) शिक्षण, वैद्यकीय व सार्वजनिक बांधकाम ही जबाबदारी स्थानिक संस्थाकडे सोपवावी.

६) भारत सरकारच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे स्थानिक योजनांवरील खर्चासाठी कर लावून पैसा उभा केला जावा.

७) स्थानिक गरजा लक्षात घेऊन स्थानिक प्रश्न त्या पातळीवरच सोडविण्यात यावेत.

### २) द्वितीय कालखंड (इ.स.१८८२ ते १९१९)

ब्रिटिश भारतातील तत्कालीन उदारमतवादी व्हॉईसरॉय लॉर्ड रिपन यांनी सन १८८२ मध्ये आपला प्रसिद्ध 'स्थानिक स्वशासनाचा' ठराव मांडला. ज्यामध्ये अधिकार व वित्तीय उपलब्धतेच्या दृष्टीने स्थानिक स्वशासन संस्थासाठी विशेष सुविधांची तरतूद करण्यात आली

होती. रिपनच्या या ठरावामुळे त्याला आधुनिक भारतीय स्थानिक स्वशासनाचा जनक म्हणून ओळखले जाते. इ.स.१८८४ मध्ये मुंबईसाठी लोकल बोर्ड कायदाही पारित करण्यात आला. २०व्या शतकाच्या प्रारंभी इ.स.१९०८ मध्ये ब्रिटिशांनी एका विकेंद्रीकरण आयोगाची स्थापना केली. मात्र या आयोगाने मांडलेल्या शिफारसीस १५ एप्रिल १९१५ रोजी मान्यता देऊनही अमंलबजावणी होऊ शकली नाही. इ.स.१९१६ चा चेम्सफोर्ड प्रस्ताव स्थानिक स्वशासनाच्या अधिकार वृद्धीसाठी महत्त्वाचा भाग मानला जातो.[७]

### ३) तिसरा कालखंड( इ.स.१९२० ते १९३६)

इ.स.१९१९ च्या माँटेग्यू–चेम्सफोर्ड अधिनियमाचा प्रभाव यापुढे आल्याने स्थानिक स्वशासनावर बऱ्याच मर्यादा आल्या होत्या. या काळातील विशेष महत्त्वाची घटना म्हणजे सन १९२० चा ग्रामपंचायत अधिनियम होय. या कायद्याने मुंबई प्रातांतील ग्रामपंचायतीना वैधानिक दर्जा दिला होता. इ.स.१९२७ मध्ये ग्रामपंचायत कायदा निवड समितीकडे मंजुरीसाठी गेला. यात निवडणूक, मतदान हक्क इत्यादी लोकशाही पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. सन १९३४ मध्ये महिलांसाठी स्थानिक स्वशासनातील सहभागाचा मार्ग मोकळा करण्यात आला. मात्र त्यासंबंधीची जबाबदारी प्रांतावर सोपविण्यात आली.

### ४) चौथा कालखंड (इ.स.१९३७ ते १९४७)

सन १९३५ च्या कायद्याची अमंलबजावणी सन १९३७ पासून सुरू झाली. या अधिनियमानुसार भारतात सुधारित राज्य पद्धतीचा अवलंब करण्यात आला. स्थानिक स्वशासनाची जबाबदारी प्रांतावरच सोपविण्यात आली. इ.स.१९३८ मध्ये स्थानिक स्वशासन व्यवस्थेची पुनर्रचना यासंबंधी श्री.डी.पी.मिश्रा यांनी एक योजना तयार केली होती. पुढे इ.स.१९३९ मध्ये प्रा.काळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक स्वशासन संदर्भात एक समिती गठीत केली होती. वास्तविकता हा कालखंड भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रभावाचा असल्याने या शिफारशी व सुधारणा विशेष प्रभावी ठरल्या नाहीत.[८]

### ४) पाचवा कालखंड (इ.स.१९४८ ते १९९२)

नियोजनामधून विकास आणि लोकांचा शासनात सहभाग या कल्पनेमधून स्थानिक शासनाची आवश्यकता भासू लागली. ग्रामपंचायतीचा विकास घडवून आणून त्यांना प्रशासनाचे प्रभावी घटक बनविण्याची जबाबदारी घटना कलम ४० मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शन

तत्त्वानुसार राज्यशासनावर सोपविण्यात आलेली होती. देशातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहात असल्याने या काळात घटनेची अमंलबजावणी सुरू झाल्यावर महत्त्वाचे बदल घडले. त्यामध्ये सन १९५२ ची सामूहिक विकास योजना, सन १९५७ मधील राष्ट्रीय विस्तार योजना आणि बलवंतराय मेहता समितीच्या अहवालानुसार त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था हे बदल महत्त्वाचे आहेत. सर्व राज्यांनी मेहता समितीच्या अहवालानुसार आपल्या राज्यातील परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या अनुभवाप्रमाणे पंचायतराज व्यवस्था अमंलात आणली. राजकीय पक्षांनी ग्राम प्रशासनासंबंधी तज्ज्ञ समिती स्थापन करून शासनाला सूचना केलेल्या आढळून येतात. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये शहरीकरणाच्या प्रक्रियेमधून निर्माण होणाऱ्या प्रश्नाचे गांभीर्य स्पष्ट होते. या काळात स्थानिक वित्त चौकशी समिती १९५१, नागरी सेवक प्रशिक्षण १९६६, नागरी संस्थाच्या वित्त स्त्रोताचा विकास १९६३, ग्रामीण नागरी संबंध १९६६ इत्यादी समित्यांचे अहवाल प्रसिद्ध केले.[९]

## ६) सहावा कालखंड( १९९३ ते २००९)

स्थानिक शासन व्यवस्था अधिक प्रभावी करण्याच्या हेतुने सन १९९३ मध्ये महत्त्वपूर्ण अशा ७३ व ७४ या घटना दुरूस्त झाल्या, आणि स्थानिक प्रशासनामध्ये नवे पर्व निर्माण झाले. मार्गदर्शन तत्त्वामध्ये ग्रामपंचायतींचा विकास करून तिला देशाच्या शासन व्यवस्थेचे अविभाज्य अंग बनविण्याची शिफारस केली असली तरी राज्यावर त्या बाबतीत सक्ती नव्हती. ७३ व्या घटना दुरूस्ती अन्वये ग्रामीण प्रशासन व्यवस्थेत ७४ व्या घटनादुरूस्ती अन्वये नागरी प्रशासन व्यवस्थेस घटनात्मक दर्जा दिला गेला. घटनेमधील अकराव्या परिशिष्टामध्ये पंचायतीची कार्ये व बाराव्या परिशिष्टामध्ये नगर परिषदांची कार्ये नमूद केलेली आहेत. आरक्षणाची व्यवस्था, निश्चित कार्यकाल, निवडणूक लेखापरिक्षण या संबधी व्यवस्था राज्य वित्त आयोगाची स्थापना इत्यादी महत्त्वाच्या तरतूदी वरील घटना दुरूस्तीमध्ये आहेत.[१०]

थोडक्यात, ब्रिटिश कालखंडात भारतातील पारंपारिक स्थानिक शासन व्यवस्थेचा ऱ्हास होऊन ब्रिटिशांना अनुकूल अशा व्यवस्थेचा अंगीकार करण्यात आला. विशेषतः ब्रिटिशकालीन प्रयत्न हे प्रशासकीय सुविधेच्या दृष्टिकोनातून असले, तरी आधुनिक भारतीय स्थानिक स्वशासनाची मुहूर्तमेढ या कालखंडात रोवली गेली.

## २.३ सातारा नगरपालिकेची स्थापना

सातारा शहरातील लोकांच्या निविदा अर्जाच्या छाननीनुसार चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, साताऱ्यातील रहिवासी सन १८५० च्या कायदा कलम २६ नुसार नागरी सुविधांच्या हेतुने नागरी कर लादू इच्छितात. या निविदेस अनुसरून माननीय महोदय राज्यपाल यांनी अतिशय आनंदाने सन १८५० च्या कायदा कलम २६ नुसार ६ व्या सेक्शन खालील असणाऱ्या १५ व्या नियमानुसार उपाययोजना करून या कामी पुढीलप्रमाणे आयुक्त नेमण्यात आले. साताऱ्यातील मा. आयुक्त, अध्यक्ष, सदस्य पुढीलप्रमाणे

१) कृष्णसिंह रतनसिंह मोहिते ठाकूर हंबीरराव

२) केशवराव कृष्णा जोशी

३) पद्माकर रघुनाथ पराडकर

४) निळो आबाजी भडकमकर

५) हरी नरसिंहदास पोतदार

याप्रमाणे

हुकूमावरून<br>जे.जी.लम्सडेन<br>सचिव, शासन<br>मुंबई, ८ जुलै १८५३[११]

**सातारा येथील कमेटीच्या कायद्याचा सारांश**

१) म्युनिसिपल कमेटीचे सभासदांची दरमहा सभा भरण्यास एक जागा असावी.

२) पंधरा रूपयांचा चिटणीस, बारा रूपयांचा मेस्त्री, तीन रूपयापासून चार रूपयापर्यंतचे बारा शिपाई आणि तीन–तीन रूपये प्रमाणे बारा लोक झाडणारे असे असामी ठेवणे. दरएक मेंबराजवळ सदरहू शिपायांपैकी एक शिपाई असावा आणि झाडणाऱ्याने शहरातील निरनिराळया ठिकाणचे रस्ते साफ करून तेथील कचरा नेमलेल्या ठिकाणी टाकावा.

३) कमेटीच्या चिटणीसाने हिशेब वगैरे कसे ठेवणे याचे नमुने तयार करणेविषयी मेहरबान कमिशनर साहेब बहाद्दुर यांचे दप्तरदार यास सांगावे आणि दर महिन्याचे हिशेब दप्तरदार यांनी किंवा ते नसल्यास डेप्युटी दप्तरदार यांनी पाहत जावे.

४) म्युनिसिपल कमेटीबद्दल जो वसूल होईल तो एका पेटीत घालून ती पेटी मामलेदार कचेरीत ठेवून तिच्या किल्ल्या म्युनिसिपालिटीच्या सभासदाजवळ ठेवाव्या. ती पेटी

उघडणे झाल्यास कमेटीची आज्ञा घेऊन मामलेदार किंवा त्याचे शिरस्तेदार यांच्या समक्ष उघडावी. चालू खर्च करण्याकरिता पन्नासापासून शंभर रूपयेपर्यंत एक दुसरे पेटीत ठेऊन व ती पेटी म्युनिसिपल ऑफिसात चिटणिसाचे स्वाधीन करून ठेवावी आणि चिटणीस आपले काम प्रामाणिकपणे करील या विषयीच जामीन त्याजकडून घ्यावा.

५) सर्व लोकांनी आपापल्या घरासमोरची चार हात जागा दररोज साफ ठेवावी. नााहीतर जितके दिवस साफ केली नसेल तितके दिवस दर दिवसास एक आणाप्रमाणे म्युनिसिपालिटी दंड घेईल.

६) एखादया घराजवळ कचरा किंवा दुसरी घाण असली तरी ती काढण्यास घरात राहणाऱ्यास नोटीस किंवा सूचना दिली असता त्याने काढली नाही. त्यास दर दिवसास दोन आण्यापासून पाच रूपयेपर्यत याप्रमाणे म्युनिसिपालिटी दंड घेईल.

७) कोणत्याही मनुष्याने आपल्या घराची डागडुजी म्युनिसिपालिटीची परवानगी घेतल्याशिवाय करू नये. जर तो आपल्या घरच्या पायापासून आठ फूट जागा सोडून घराची दुरूस्ती करीत असेल तर परवानगी न घेतली तर चालेल. परंतु परवानगीवाचून डागडुजी न करू देण्याचा इतकाच हेतु आहे की जे रस्ते अरूंद आहेत ते रूंद करावेत आणि रूंद रस्त्याच्या बाजू एकसारख्या कराव्या. सबब कोणी मनुष्याने परवानगी मागितली असता देण्यास निरर्थक विलंब लावू नये.

८) जी लागतील ती हत्यारे विकत घ्यावी आणि लोकोपयोगी किंवा सुधारणुकी करिता जी कामे करावयाची असतील त्याचे दोन बाग ऑर्डनरी व एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी म्हणजे ऑर्डिनरी भागांत झालेली कामाची डागडुजी करणे आणि कमेटीचा हुकूम अमंलात आणने. कमेटीचे कोणतेही दोन सभासदांच्या आज्ञेने चालू करावे. व एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी भागांत नवीन व्हावयची कामे असतील ती समजावी. आणि ती सर्व सभासदांच्या संमतीवाचून चालू नयेत.

९) शहराचे पाच भाग करून एकेक भागावर कमिशनर नेमावा. म्हणजे काय काय सुधारणूक केली पाहिजे व तेथील लोकांचे काय म्हणणे आहे त्याची चौकशी करून त्या कमिशनरने कमेटीस कळवावे.

१०) कोणते एखादे नवे काम, त्याचा नकाशा व इस्टिमेंट तयार करून इंजिनिअरचे सल्ल्यावाचून किंवा मंजूर झाल्यावाचून आरंभू नये.

११) कमेटीच्याने खर्च भागेल तर उन्हाळयात रस्त्यावर पाणी सिंपावे आणि रात्री दिवे लावावे.[१२]

## २.४ सातारा नगरपालिका कामकाज यादी

### २.४.१ इ.स. १८६८ मधील मॅनेजिंग कमेटी

१ जुलै १८६८ पासून एक वर्षासाठी खालीलप्रमाणे मॅनेजिंग कमेटीवर सदस्य नेमण्यात आले होते.

| अ.नं. | पद | नांव |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष | जे .आर.ऑर्थर मॅजिस्ट्रेट |
| २. | उपाध्यक्ष | काईटसाहेब हुजूर डेप्युटी मॅजिस्ट्रेट |
| ३. | सदस्य | मेजर गे.हार्पर सुप्रिटंडन ऑफ पुलीस |
| ४. | सदस्य | कृष्णराव बाळाजी मामलतदार |
| ५. | सदस्य | गणेश पांडुरंग आगटे |
| ६. | सदस्य | निळकंठ गणेश कान्हेरे |
| ७. | सदस्य | बाळाजी गणेश माटे |
| ८. | सदस्य | माधवराव विठ्ठल महाजनी |
| ९. | सदस्य | रामदास तुकाराम गुजर |
| १०. | सदस्य | रोशन सुभेदार[१३] |

### २.४.२ सन १८७६-७७ मॅनेजिंग कमिटी

| अ.नं. | पद | नांव |
|---|---|---|
| १. | चेअरमन | रावबहाद्दूर केळकरसाहेब हुजूर डेप्युटी कलेक्टर |
| २. | सदस्य | बाळाजी गणेश माटे |
| ३. | सदस्य | सदाशिव यशवंत गोडबोले |
| ४. | सदस्य | नारायण सखाराम फडणीस |
| ५. | सदस्य | गणेश पांडुरंग आगटे[१४] |

### २.४.३ सन १८८३–८४ मधील सातारा नगरपालिका सभासद यादी

| अ.नं. | पद | नांव |
|---|---|---|
| १. | कलेक्टर व अध्यक्ष | डब्ल्यू.आर.प्राट |
| २. | असिस्टंट कलेक्टर | एच.आर.कुक |
| ३. | सुपरिटंडन ऑफ पोलिस | जे. होलंड |
| ४. | सिव्हील सर्जन सातारा | डॉ. जी. ब्रिज |
| ५. | हुजूर डेप्युटी कलेक्टर | रिचर्डसन |
| ६. | मामलतदार ऑफ सातारा | रावसाहेब हरी सखाराम |
| ७. | चिफ कॉन्टेबल | रावसाहेब गणेश सखाराम |
| ८. | सदस्य | रावसाहेब भवानराव आनंदराव राजेशिर्के |
| ९. | सदस्य | रावसाहेब गोविंद भिकाजी शिंदे |
| १०. | सदस्य | रावसाहेब लक्ष्मणदास बालमुकुंददास |
| ११. | सदस्य | रावसाहेब रामचंद्र आसाराम |
| १२. | सदस्य | रावसाहेब सावळाराम बारटक्के |
| १३. | सदस्य | खानसाहेब अब्दुल रहिमानखान |
| १४. | सदस्य | खानसाहेब वल्लिसाहेब वालीद दादामियाँ |
| १५. | सदस्य | खानसाहेब मंचरजी वकील |
| १६. | सदस्य | रावसाहेब गणेश पांडुरंग आगटे |
| १७. | सदस्य | रावसाहेब विष्णू लक्ष्मण रांगोळे |
| १८. | सदस्य | रावसाहेब लक्ष्मण बळवंत मुतालिक |
| १९. | सदस्य | रावसाहेब बळवंत पिलाजी कुबेर वकील |
| २०. | सदस्य | रावसाहेब नरोत्तमदास तुळजाराम |
| २१. | सदस्य | रावसाहेब बळवंत महादेव गोळे |
| २२. | सदस्य | रावसाहेब कृष्णराव सखाराम महाजनी |
| २३. | सदस्य | रावसाहेब पांडुरंग रामचंद्र देसाई वकिल |
| २४. | सदस्य | रावसाहेब गोविंद विष्णू रानडे वकिल |
| २५. | सदस्य | रावसाहेब पांडुरंग निळकंठ वकिल[१५] |

### २.४.४ सन १८८५ ते १९०९ अंशतः लोकप्रतिनिधी व सरकार कडून संचलित वार्ड व कमिशनर संख्या

२७ ऑक्टोबर १८८४ रोजी जनरल बोर्डाची मिटींग झाली. त्यात सातारा शहरात एकूण ९ वार्ड पाडण्यात आले आणि त्यातून १२ सभासद निवडण्यास मान्यता देण्यात आली.

| वार्ड नं. | पेठा | निवडायचे कमिशनर संख्या |
|---|---|---|
| १. | गुरूवार पेठ, मल्हार पेठ, रविवार पेठ, पंताचा गोट, बसप्पा पेठ, राजसपूरा | १ |
| २. | सदाशिव पेठ, प्रतापगंज पेठ, बुधवार पेठ, | १ |
| ३. | शनिवार पेठ, माची पेठ, | २ |
| ४. | भवानी पेठ, शुक्रवार पेठ | २ |
| ५. | सोमवार पेठ, यादोगोपाळ पेठ | १ |
| ६. | मंगळवार पेठ | २ |
| ७. | चिमणपुरा पेठ, रामाचा गोट | १ |
| ८. | व्यंकटपुरा | १ |
| ९. | सदरबाजार, करंजे, गोडोली, रघुनाथपुरा | १[१६] |

## २.५ सातारा नगरपालिका निवडणूका

### २.५.१ सन १८८५ ची पहिली निवडणूक

सन १८८४ च्या म्युनिसिपालीटीच्या कायद्यानुसार एकूण सभासदांच्या निम्मे सभासद नागरिकांमधून निवडून देण्याचा अधिकार जनतेस मिळाला. त्यानुसार २४.०९.१८८५ रोजी सातारा नगरपालिकेची पहिली निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने झाली. तिची मतमोजणी दुसऱ्या दिवशी दि.२५.०९.१८८५ रोजीच्या जनरल कमिटीच्या समोर करण्यात आली. यावेळी शहराचे ९ वार्ड होते. त्यात खालील १२ उमेदवारांना जास्त मते पडल्यामुळे ते निवडून आले.

| वार्ड नं. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १. | रावसाहेब पांडुरंग रामचंद्र देसाई | २१ |
| २. | रावसाहेब लक्ष्मण बळवंत मुतालिक | २६ |
| ३. | रावसाहेब वासुदेव रामचंद्र थत्ते<br>रावसाहेब विष्णु लक्ष्मण रांगोळे | ३३<br>५७ |
| ४. | रावसाहेब गोविंद भिकाजी शिंदे<br>रावसाहेब गोविंद विष्णु रानडे | ३१<br>३८ |
| ५. | रावसाहेब बळवंत श्रीधर सहस्त्रबुद्धे | १९ |
| ६. | रावसाहेब गणेश पांडुरंग आगटे<br>रावसाहेब लक्ष्मणदास बाळमुकुंददास सावकार | २९<br>२६ |
| ७. | रावसाहेब नरोत्तमदास तुळजाराम सावकार | ११ |
| ८. | रावसाहेब वामन अनंत भिडे | १८ |
| ९. | खानसाहेब फ्रेमजी मंचरजी | १८[१७] |

### वार्ड नुसार मतदान

| वार्ड नं. | पात्र मतदान | प्रत्यक्ष मतदान |
|---|---|---|
| १. | ५६ | ३० |
| २. | ५२ | ३५ |
| ३. | ११० | ६७ |
| ४. | १३१ | ७२ |
| ५. | २७९ | ४६ |
| ६. | ७८ | ५१ |
| ७. | ४७ | २७ |
| ८. | ३७ | २३ |
| ९. | ३१ | १८[१८] |

### सन १८८५–८६ मधील सरकार नियुक्त कमिशनर

सातारा जिल्हयाचा कलेक्टर जे किंग हा नगरपालिकेचा पदसिद्ध अध्यक्ष होता तर सरकारने खालील १२ लोकांची नेमणूक केली त्यात ६ सरकारी नोकर व ६ प्रतिष्ठित नागरिक होते.

| अ.नं. | कमिशनरचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री.एच.आर. लुके | फस्ट असिस्टंट कलेक्टर |
| २. | श्री. इ.टी. रिचर्डसन | डेप्युटी कलेक्टर |
| ३. | श्री.रंगो रामचंद्र | मामलेदार |
| ४. | श्री.कॉल्डींगसन | पेलिस सुपरिटेंडन्ट |
| ५. | वल्लीसाहेब दादामियॉ | क्लार्क पी.डब्ल्यू.डिपार्टमेंट |
| ६. | डॉ.ब्रिज | सिव्हील सर्जन |
| ७. | नारायण सखाराम फडणीस | प्रतिष्ठित नागरिक |
| ८. | पांडुरंग निळकंठ भडकमकर | प्रतिष्ठित नागरिक |
| ९. | आत्माराम सखाराम शिरंबेकर | प्रतिष्ठित नागरिक |
| १0. | रामचंद्र गुणाजी राजेशिर्के | प्रतिष्ठित नागरिक |
| ११. | भगवानदास राधाकृष्ण मारवाडी | प्रतिष्ठित नागरिक |
| १२. | जे.एम.भोरी | प्रतिष्ठित नागरिक[१९] |

नगरपालिकेचा उपाध्यक्ष म्हणून इ.टी.रिचर्डसन डेप्युटी कलेक्टर सातारा यांची निवड करण्यात आली. सन १८८५ मध्ये नगरपालिकेच्या सभासदांची संख्या १२ जनतेमधून निवडलेले व १२ सरकारने नेमलेले होते. कलेक्टर हा पदसिद्ध अध्यक्ष होता. पहिले बोर्ड २५ सभासदांचे होते.[२०]

## मॅनेजिंग कमिटी

४ डिसेंबर १८८५ रोजी मॅनेजिंग कमिटीची निवडणूक झाली. त्यात खालील सभासद निवडून आले.

| अ.नं. | कमिशनरचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १. | इ.टी. रिचर्डसन | १२ |
| २. | गणेश पांडुरंग आगटे | १४ |
| ३. | विष्णू लक्ष्मण रांगोळे | १३ |
| ४. | वासुदेव रामचंद्र थत्ते | १० |
| ५. | वल्लीसाहेब दादामियाँ | ०९ |

एकूण १६ कमिशनर निवडणूकीत उभे होते. त्यात वरील ५ जास्त मते पडल्यामुळे निवडून आले. श्री. इ.टी. रिचर्डसन यांना सेक्शन २७(१०) १८८४ च्या म्युनिसिपल ॲक्ट २ नुसार मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन करण्यात आले.[२१]

## स्कूल बोर्ड

आजपर्यंत मॅनिजिंग कमिटी ही एकच कमिटी होती. मात्र १ एप्रिल१८८५ पासून सातारा शहरातील शिक्षण नगरपालिकेने आपल्या ताब्यात घेतले.तेव्हा शैक्षणिक कार्य व्यवस्थित चालविण्यासाठी नवीन स्कूल बोर्डाची स्थापना करण्यात आली. त्याची निवडणूक ४ डिसेंबर १८८५ रोजी झाली. त्यात खालील सभासद निवडून आले.

| अ.नं. | कमिशनरचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १. | गणेश पांडुरंग आगटे | १३ |
| २. | बळवंत श्रीधर सहस्त्रबुद्धे | १४ |
| ३. | पांडुरंग निळकंठ भडकमकर | १३ |
| ४. | पांडुरंग रामचंद्र देसाई | ११ |
| ५. | गोविंद विष्णू रानडे | ११ |

स्कूल बोर्डाच्या निवडणूकीत ९ कमिशनर उभे होते. त्यापैकी वरील ५ कमिशनर जास्त मतांनी निवडून आले व गणेश पांडुरंग आगटे यांना स्कूल बोर्डाचे चेअरमन करण्यात आले.[२२]

४ जून १८८६ रोजी झालेल्या जनरल बोर्डाच्या सभेत प्रथमच भारतीय लोकांतून उपाध्यक्ष म्हणून गणेश पांडुरंग आगटे व मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन म्हणून काशिनाथ महादेव थत्ते यांची निवड करण्यात आली.[२३]

### २.५.२ सन १८८९ ची दुसरी निवडणूक

दुसरी त्रैवार्षिक निवडणूक १३ मार्च १८८९ रोजी झाली. त्यात १२ सभासद थेट जनतेतून निवडले गेले व १२ सभासद सरकारने नियुक्त केले. ए.केसर साहेब कलेक्टर यांची अध्यक्ष म्हणून सरकारने नेमणूक केली. तर उपाध्यक्ष या पदावर गणेश पांडुरंग आगटे यांची निवड झाली.[२४]

यावेळी शहरातील वार्डाची संख्या ९ होती. व नगरपालिकेचा कारभार पाहण्यासाठी मॅनेजिंग कमेटी व स्कूल बोर्डाची निवड करण्यात आली.

### २.५.३ सन १८९२ ची तिसरी निवडणूक

सातारा नगरपालिकेची तिसरी त्रैवार्षिक निवडणूक १७ फेब्रवारी १८९२ रोजी झाली. यावेळी सभासद संख्या २५ होती. वार्डाची संख्या ८ करण्यात आली. अध्यक्ष म्हणून आर.ई.कॅनडी कलेक्टर यांची नेमणूक करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून पुन्हा गणेश पांडुरंग आगटे यांची निवड झाली. स्कूल बोर्ड व मॅनिजिंग कमिटीची नव्याने निवड करण्यात आली.[२५]

### २.५.४ सन १८९५ ची चौथी निवडणूक

नगरपालिकेची चौथी निवडणूक २५ फेब्रवारी १८९५ रोजी होऊन मतमोजनी दुसऱ्या दिवशी २६ फेब्रवारी १८९५ रोजी झाली. वार्डाची संख्या ८ असून निवडून येणारे सभासद १२ होते. कलेक्टर सी.बी. विंचेस्टर हे अध्यक्ष होते तर उपाध्यक्ष व स्कूल बोर्डाचे चेअरमन म्हणून गणेश पांडुरंग आगटे यांची निवड करण्यात आली.[२६]

### २.५.५ सन १८९८ ची पाचवी निवडणूक

पाचवी निवडणूक १९ सप्टेंबर १८९८ रोजी झाली. वार्डच्या संख्येत व सभासद संख्येत कोणताही बदल झाला नाही. अध्यक्ष साताऱ्याचे कलेक्टर सी.जी. डॉगसन होते. उपाध्यक्ष म्हणून पांडुरंग निळकंठ भडकमकर यांची निवड झाली. स्कूल बोर्डाचे चेअरमन म्हणून आर.आर. काळे यांची निवड करण्यात आली.[२७]

**३१.१०.१९०० रोजी झालेल्या जनरल बोर्डाच्या सभेमध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात आले.**

| वार्ड नं. | पेठ | लोकसंख्या | कमिशनर संख्या |
|---|---|---|---|
| १. | शनिवार | ४०१३ | २ |
| | माची | २९९ | |
| २. | रामाचा गोट | १२१८ | |
| | चिमणपुरा | ५२४ | १ |
| ३. | मंगळवार | २४२१ | |
| | यादोगोपाळ | १२९२ | २ |
| | व्यंकटपूरा | ८३९ | |
| ४. | भवानी | ८७९ | |
| | सोमवार | १९३९ | |
| | प्रतापगंज | ८९५ | २ |
| | सदाशिव | ७७१ | |
| ५. | बुधवार | ११४० | |
| | शुक्रवार | ९२८ | १ |
| ६. | करंजे | १६०२ | |
| | रघुनाथपूरा | ४२६ | १ |
| | बसाप्पा | १८७ | |
| ७. | गुरूवार | ३३९४ | |
| | केसरकर | ६०४ | २ |
| ८. | दुर्गा | ४०२ | |
| | मल्हार | ७४५ | |
| | रविवार | ४३४ | |
| | पंताचा गोट | ३२९ | १[२८] |
| | राजसपुरा | १६९ | |

### २.५.६ सन १९०२ ची सहावी निवडणूक

सहावी त्रैवार्षिक निवडणूक १६ मार्च १९०२ रोजी झाली. ही निवडणूक सन १९०० मध्ये झालेल्या वार्डच्या नवीन रचनेनुसार झाली. निवडणुकीची मोजणी १७ मार्च १९०२ रोजी झाली. त्यानुसार खालील सभासदांना जास्त मते पडल्यामुळे ते निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले.

| वार्ड नं. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १. | दत्तात्रय नारायण बाबर | ५५ |
| २. | लक्ष्मणदास नरोत्तमदास गुजर | २१ |
| ३. | पांडुरंग निळकंठ भडकमकर | ७९ |
| ४. | कृष्णाजी गणेश देशपांडे<br>नारायण वामन महाजनी | १२६<br>८० |
| ५. | नजमुद्दीन कमरूद्दीन भोरी | ०८ |
| ६. | बाळकृष्ण सावळाराम पावसरे | ०६ |
| ७. | नारायण अनंत चिटणीस<br>महादेव विठोजी शिंदे | ४६<br>३६ |
| ८. | शंकर अप्पाजी गुप्ते | १२ |

वार्ड नं.१ व वार्ड नं.३ मधील प्रत्येकी एका सभासदांच्या निवडीवर आक्षेप घेण्यात आल्यामुळे त्या जाहीर केल्या नाहीत.[२९] सन १९०१ पासून सभासदाच्या संख्येत बदल करण्यात आला. पूर्वीची संख्या २५ होती. ती २४ करण्यात आली. १२ निवडणूकीद्वारे व १२ सरकारने नियुक्त केले.[३०] यावेळी अध्यक्ष जे.डी.ॲटकिंग कलेक्टर सातारा व उपाध्यक्ष विठ्ठल नारायण पाठक यांची निवड झाली.

५ एप्रिल १९०२ रोजी भरलेल्या जनरल बोर्डाच्या सभेत मॅनेजिंग कमिटी व स्कूल बोर्डाची निवड करण्यात आली. अनुक्रमे व्ही.एन.पाठक व आर.आर.काळे यांची चेअरमन म्हणून निवड करण्यात आली. या नव्यानेच सॅनेटरी कमिटीची स्थापना करण्यात आली. या कमिटीवर निवड झालेल्या सभासदांची नावे खालीलप्रमाणे

| अ.नं. | सभासदाचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | मेजर हर्डीन सिव्हील सर्जन | चेअरमन |
| २. | नारायण अनंत चिटणीस | सदस्य |
| ३. | पांडुरंग निळकंठ भडकमकर | सदस्य |
| ४. | नजमुद्दीन कमरूद्दीन भोरी | सदस्य[३१] |

### २.५.७ सन १९०५ ची सातवी निवडणूक

सातवी त्रैवार्षिक निवडणूक १२ मार्च १८०५ रोजी झाली. सभासद संख्या २४ होती. पदसिद्ध अध्यक्ष कलेक्टर एस.आर.ऑर्थर यांची नेमणूक झाली. म्हणून तर उपाध्यक्ष व मॅनिजिंग कमेटीचे चेअरमन म्हणून व्ही.एन.पाठक निवडून आले.[३२]

### २.५.८ सन १९०८ ची आठवी निवडणूक

१५ मार्च १९०८ रोजी आठवी त्रैवार्षिक निवडणूक होऊन २४ सभासदांचे बोर्ड १ एप्रिल १९०८ रोजी ३ वर्षासाठी अधिकार पदावर आले. नेहमीप्रमाणे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून जे.आर.ऑर्थर कायम होते. उपाध्यक्ष म्हणून व्ही.एन.पाठक यांची पुन्हा निवड करण्यात आली. मॅनिजिंग कमेटी व स्कूल बोर्डाची निवड २० एप्रिल १९०८ रोजी जनरल बोर्डाच्या सभेत करण्यात आली.[३३]

### सन १९०९ ते १९३८ अंशतः सरकार व लोकप्रतिनिधी कडून संचलित

### पहिले लोकनियुक्त अध्यक्ष

सन १९०९ पर्यत नगरपालिकेचे अध्यक्षपद कलेक्टर यांच्याकडेच होते. ते नगरपालिकेचे सरकारनियुक्त पदसिद्ध अध्यक्ष होते. सन १९०९ मध्ये प्रथमच नगरपालिकेस आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार देण्यात आला. स्थानिक नागरिकांमधून पहिला अध्यक्ष होण्याचा मान रावबहाद्दूर विठ्ठल नारायण पाठक यांना मिळाला जनरल बोर्डाचा ठराव नं १, १० एप्रिल १९०९ रोजी पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली.[३४]

### २.५.९ सन १९११ ची नववी निवडणूक

२६ मार्च १९११ रोजी सातारा नगरपालिकेची नववी निवडणूक झाली. यावेळी वार्डाची संख्या ८ होती. व सभासद संख्या २४ होती. अध्यक्ष व उपाध्यक्ष दोन्ही नागरिकामधून निवडण्यात आले. मॅनिजिंग कमिटीचे चेअरमन म्हणून डब्ल्यू. जी. चिरमुले व स्कूल कमिटीचे चेअरमन म्हणुन टी. बी. आढाव यांची निवड करण्यात आली.[३५]

### २.५.१० सन १९१४ ची दहावी निवडणूक

सन १९१४ मध्ये २४ सभासदांपैकी १६ सभासद लोकनियुक्त व ८ सभासद सरकार नियुक्त सभासद होते. सरकारनियुक्त ८ सभासदापैकी ४ व सरकारी नोकर व ४ नागरिक अशी नेमणूक करण्यात आली.[३६]

यावर्षी शहरातील वार्ड संख्या वाढवून ८ ऐवजी ९ करण्यात आली. लोकनियुक्त १६ सभासदांसाठी २२ मार्च १९१४ रोजी निवडणूक घेण्यात आली. निवडून आलेल्या सभासदांची माहिती खालीलप्रमाणे

| वार्ड नं. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १. | नारायण कृष्णा दांडेकर<br>डॉ.हरी गाविंद फाटक | ७०<br>७२ |
| २. | लक्ष्मण गोपाळ मेहंदळे<br>लक्ष्मण कृष्णा जोशी | ६३<br>६३ |
| ३. | रामचंद्र विनायक देऊस्कर | ३५ |
| ४. | मोतीलाल बाळमुकुंद मारवाडी<br>चतुरभुज राङुऊतमल मारवाडी | ९५<br>८४ |
| ५. | अबेदिन असफअली | १८ |
| ६. | वासुदेव दिनकर कुबेर<br>बळवंत रामचंद्र जोगळेकर | ४१<br>४१ |
| ७. | सरदार व्ही.एन.मुतालिक<br>रावबहाद्दूर व्ही.एन.पाठक<br>श्रीधर विष्णू जोशी | ११३<br>९६<br>७८ |
| ८. | परशुराम गंगाराम | ३० |
| ९. | दोसाभाई माणेकजी<br>कृष्णाजी निळकंठ कुडुस्कर | ६६<br>६५[३७] |

सन १९१४ साली सरकारने नेमलेल्या ८ सभासदांची नावे खालीलप्रमाणे

१) सिव्हील सर्जन

२) हुजूए डेप्युटी कलेक्टर

३) खानसाहेब शेख मुस्तफा शेख शेलार

४) महमंद रोशन मुन्शी

५) टी.बी.आढाव

६) जी.एच.देवी

७) रावबहाद्दूर जी.एच.अजंनगावकर

८) रावासाहेब पी.जी.डोंगरे[३८]

सन १९१४ पर्यंत रावबहाद्दूर विठ्ठल नारायण पाठक हे सरकार नियुक्त सभासदांपैकी अध्यक्ष म्हणून निवडून आले होते.मात्र सन १९१४ मध्ये ते लोकनियुक्त सभासदासाठी निवडणुकीत वार्ड नं.७ मधून ९६ मते मिळवून निवडून आले. त्यांची पुन्हा अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. उपाध्यक्ष डोसाभाई माणेकजी यांची निवड झाली. यावेळी मॅनिजिंग कमिटी, स्कूल बोर्ड व नव्याने पब्लिक वर्क्स कमिटीची निवड करण्यात आली.

**पब्लिक वर्क्स कमिटी**

सन १९१४–१५ साठी खालीलप्रमाणे पब्लिक वर्क्स कमिटी नेमण्यात आलेली होती.

| अ. नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, सातारा नगरपालिका सातारा | चेअरमन |
| २. | रावसाहेब, पी.जी.डोंगरे | सदस्य |
| ३. | जी.एच.देवी | सदस्य |
| ४. | बी.आर.जोगळेकर | सदस्य |
| ५. | एस.व्ही.जोशी | सदस्य[३९] |

### २.५.११ सन १९१७ ची अकरावी निवडणूक

नगरपालिकेची अकरावी निवडणूक २५ फेब्रुवारी १९१७ रोजी झाली. यावेळी १६ वार्ड करण्यात आले होते. प्रत्येक वार्डात एक याप्रमाणे १६ उमेदवारांची निवड झाली. अध्यक्ष म्हणून डोसाभाई माणेकजी यांची ३ वर्षासाठी निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी गणपतदास हिराचंद देवी यांची निवड झाली.[४०]

### २.५.१२ सन १९२० ची बारावी निवडणूक

२२ फेब्रुवारी १९२० रोजी बारावी निवडणूक झाली. यावेळी १६ सभासद १६ वार्डातून निवडून आले.अध्यक्ष म्हणून पुन्हा डोसाभाई माणेकजी यांची व उपाध्यक्ष पदी खानबहाद्दर बी.डी.कुपर यांची३ वर्षासाठी निवड झाली. सन १९२० पासून २४ सभासदांपैकी ८ सभासद सरकार नियुक्त करत असे. त्यात २ सरकारी नोकर व ६ इतर लोकांची नेमणूक केली जाई.[४१]

### २.५.१३ सन १९२३ ची तेरावी निवडणूक

तेरावी निवडणूक २५.०२.१९२३ रोजी पार पडली. वार्डाची संख्या ७ करण्यात आली तर सभासदांची संख्या ३० होती. त्यात सरकारनियुक्त ६ सभासद व लोकनियुक्त २४ सभासद होते. या निवडणूकीत वार्डवाईज खालील सभासद निवडून आले होते.

| वार्ड नं. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १. | महादेव पुरूषोत्तम किराणे<br>डिंगबर हरी पंडीत<br>बळवंतराव गणपतराव पोवार | १३३<br>१८३<br>१६५ |
| २. | गोवर्धनदास व्यंकटदास गुजर<br>विष्णू बळवंत भिडे<br>मुरली विष्णू जोशी | ३५८<br>१०३<br>१०८ |
| ३. | श्रीधर विष्णू जोशी | २८९ |

| | | |
|---|---|---|
| | बाळकृष्ण सरदार भद्रे<br>नरहर भिकाजी जोशी | १९१<br>१४८ |
| ४. | मतदान अवैध ठरविण्यात आले | ---- |
| ५. | वसंतराव कृष्ण पोरे<br>गणपत शाळीग्राम लकेरी<br>शरिफबेग इमाम बेग | २११<br>१५२<br>१०१ |
| ६. | मारूती मन्याबा तांबोळी<br>पांडुरंग गोपाळ पंडित<br>केशवराव गुलाबराव डाळवाले | १९३<br>१२९<br>१२४ |
| ७. | सावळाराम सिताराम बाजारे<br>ज्ञानोबा रामचंद्र पानसरे<br>शेख हाशम चाँद | १६७<br>१३०<br>१११[४२] |

अध्यक्ष डी. बी. कूपर व उपाध्यक्ष एस.एस.परूळकर निवडून आले. यावेळी स्कूल कमिटी, मॅनिजिंग कमिटी व नव्यानेच वॉटर सप्लाय कमिटीची निवड करण्यात आली.

**वॉटर सप्लाय कमिटी**

| अ. नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, सातारा नगरपालिका सातारा | चेअरमन |
| २. | उपाध्यक्ष, सातारा नगरपालिका सातारा | सदस्य |
| ३. | चेअरमन, मॅनिजिंग कमिटी | सदस्य |
| ४. | एस.व्ही.जोशी | सदस्य |
| ५. | डॉ.भिडे | सदस्य |
| ६. | पी.एन.आढाव | सदस्य |
| ७. | बी.ए.भद्रे | सदस्य[४३] |

### २.५.१४ सन १९२६ ची चौदावी निवडणूक

चौदाव्या निवडणूकीसाठी २८ फेब्रुवारी १९२६ रोजी मतदान झाले. यावेळी वार्डाची संख्या ८ करण्यात आली. अध्यक्ष कूपर बी.डी. व उपाध्यक्ष एस.एस.परूळकर यांची फेरनिवड झाली. सभासद संख्येत कोणताही बदल करण्यात आला नाही. मॅनेजिंग चेअरमन म्हणून जी.एस.लकेरी यांची निवड करण्यात आली.[४४]

### २.५.१५ सन १९२९ ची पंधरावी निवडणूक

पंधरावी निवडणूक २४ फेब्रुवारी १९२९ रोजी झाली. त्यात खालील उमेदवार निवडून आले.

| वार्ड नं. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
| --- | --- | --- |
| १. | गणपती विठ्ठल कपडेकर<br>विठ्ठल वामन हडप<br>शिवरामत्रिंबक तळवळकर | २७९<br>१८०<br>१७७ |
| २. | गंगागिरी गुरू रामगिरी<br>पंढरीनाथ वामन घाणेकर<br>विठ्ठलदास व्यंकटदास | ३२३<br>२७६<br>१६७ |
| ३. | शिवराम विष्णू मोडक<br>लक्ष्मण रामचंद्र पिसाळ<br>अनंत गोविंद गवळी | ४७७<br>३०५<br>२४६ |
| ४. | मोतीलाल बाळमुकुंद मुथा<br>विठ्ठल गोविंद महाजनी<br>गणपती शाळीग्राम लकेरी | ५४३<br>४१६<br>३२४ |
| ५. | श्रीधर विष्णू जोशी<br>पांडुरंग गोपाळ पंडीत<br>मारूती मन्याबा तांबोळी | ३४०<br>२३२<br>२०३ |
| ६. | सावळाराम सिताराम बाजारे<br>दाराशा फिरोजशहा सातारावाला<br>शंकर रामभाऊ शेटे | ३२४<br>३१७<br>२४१ |
| ७. | खानबहाद्दूर धनजीशा बमनजी कूपर<br>बहिरू ग्यानू धादमे | २१५<br>१९४ |
| ८. | शरीफबेग इमामबेग<br>उस्मान आबुभाई<br>महिबूबखान हयातखान | ३९६<br>३२७<br>२९४ |
| ९. | शंकर लिंबाजी तपासे<br>रामचंद्र मल्हारी शिंदे | १२८<br>१२१[४५] |

यावेळी सरकारने खालील ६ सभासद नेमले.

१) हुजूर डेप्युटी कलेक्टर साहेब

२) सिव्हिल सर्जन साहेब

३) रिसालदार शेख हैदरशेख जंगी

४) एस.एस.परूळकर

५) सुभेदार बहादूर मारूतीराव फरांदे

६) व्ही.व्ही.गुजर[४६]

अध्यक्षपदासाठी खानबहाद्दूर कूपर व श्रीधर जोशी ही दोन नावे पुढे आली. त्यात कूपर यांची बहुमताने अध्यक्षपदी निवड झाली. व उपाध्यक्षपदी एस.एस.परूळकर यांची निवड करण्यात आली. सन १९२९ च्या निवडणूकीपासून वार्डाचीसंख्या ९ करण्यात आली. वार्ड नं.८ मुसलमानांसाठी व वार्ड नं.९ मागासवर्गीयासाठी(अस्पृश्य) राखीव ठेवण्यात आले.

**स्कूल बोर्ड**

प्रायमरी एज्युकेशन रूल्समधील शेडयुल्ड 'क' खालील कलम १२ अन्वये स्कूल बोर्डाची निवडणूक ११ जून १९२९ रोजी झाली. त्यात खालील सभासद निवडून आले.

| अ.नं. | वर्ग | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १. | शिक्षणानुभवी वर्गातर्फे | दत्तो वामन आफळे | २२ |
| २. | स्त्रियातर्फे | सिताबाई अनंतराव कुलकर्णी | बिनविरोध |
| ३. | अल्पसंख्याक(मुसलमान वर्गातर्फे) | शरिफबेग इमामबेग | बिनविरोध |
| ४. | मागासलेल्या वर्गातर्फे | मारूती मन्याबा तांबोळी | १७ |
| ५. | अस्पृश्य वर्गातर्फे | रामचंद्र मल्हारी शिंदे | बिनविरोध |
| ६. | जनरल सभासदातर्फे | शांताराम सखाराम परूळकर | २७ |
| ७. | जनरल सभासदातर्फे | मोतिलाल बालमुकुंद मुथा | २८ |
| ८. | जनरल सभासदातर्फे | सावळाराम सिताराम बाजारे | २२ |
| ९. | जनरल सभासदातर्फे | किसनलाल शिवनाथ | २०[४७] |

**स्टँडिंग कमिटी**

म्युनिसिपल ॲक्टचे कलम ५८(अ) खालील नियम नं.६४ अन्वये स्टँडिंग कमिटी नव्याने निर्माण करण्यात आली.

| अ. नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | व्ही.व्ही.गुजर | चेअरमन |
| २. | एस.एस.बाजारे | सदस्य |
| ३. | जी.व्ही.कपडेकर | सदस्य |
| ४. | लक्ष्मणदास सवोत्तमदास | सदस्य |
| ५. | जी.एस.लकेरी | सदस्य |
| ६. | शरीफबेग इमामबेग | सदस्य |
| ७. | डी.पी.सातारावाला | सदस्य |
| ८. | उस्मान अबूभाई | सदस्य |
| ९. | सुभेदार बी.एम.फरांदे | सदस्य |
| १०. | आर.एम.शिंदे | सदस्य |
| ११. | अनंतराव गोविंदराव | सदस्य |

**लॉ अॅण्ड जनरल रेफरन्स कमिटी**

| अ. नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | व्हाइस प्रेसिडेंट | चेअरमन |
| २. | चेअरमन स्टॅडिंग कमिटी | सदस्य |
| ३. | चेअरमन स्कूल बोर्ड | सदस्य |
| ४. | लक्ष्मणदास सवोत्तमदास | सदस्य |
| ५. | एस.एस.बाजारे | सदस्य |
| ६. | जी.एस.लकेरी | सदस्य |
| ७. | एल.एस.गुजर | सदस्य |
| ८. | सुभेदार बी.एम.फरांदे | सदस्य[४८] |

## २.५.१६ १९३२ ची सोळावी निवडणूक

नगरपालिकेची सोळावी निवडणूक १२ फेब्रुवारी १९३२ रोजी झाली. निवडून येणाऱ्या सभासदांची संख्या २५ होती. तर सरकारनियुक्त सभासद ६ होते. १ एप्रिल १९३२ पासून नवीन बोर्ड ३ वर्षासाठी अस्तित्त्वात आले. अध्यक्षपदी रावबहाद्दर आर.आर.काळे व उपाध्यक्षपदी गोवर्धनदास व्यंकटदास गुजर यांची निवड झाली. यावेळी स्टॅडिंग कमिटी, लॉ अॅन्ड रेफरन्स कमिटी, सॅनेटरी कमिटी व वॉटर वर्क्स कमिटीची निवड करण्यात आली.[४९]

## २.५.१७ सन १९३५ ची सतरावी निवडणूक

१७ फेब्रुवारी १९३५ रोजी सतराव्या निवडणूकीचे मतदान झाले. सभासद संख्येत व वार्ड संख्येत कोणताही बदल झाला नाही. अध्यक्ष आर.आर.काळे व उपाध्यक्ष जी.व्ही.गुजर यांची निवड झाली. यावेळी स्टॅडिंग कमिटी, लॉ अॅन्ड रेफरन्स कमिटी, सॅनेटरी कमिटी व वॉटर वर्क्स कमिटीची निवड करण्यात आली.

**हॉस्पिटल कमिटी**

सन १९३१ मध्ये 'दि किंग एडवर्ड मेमोरिअल मॅटर्निटी हॉस्पिटल' नगरपालिकेच्या ताब्यात आल्यामुळे सन १९३५ मध्ये नव्याने हॉस्पिटल कमिटीची स्थापना करण्यात आली.

| अ. नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, सातारा नगरपालिका सातारा | चेअरमन |
| २. | जी.आर.पंचपोर | सदस्य |
| ३. | मिसेस व्ही. बखले | सदस्य |
| ४. | एस.व्ही.भिडे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५. | आर.के.पेंढारकर | सदस्य |
| ६. | डॉ.व्ही.व्ही. आठल्ये | सदस्य |
| ७. | डॉ.ए.के.दबडगे | सदस्य[१०] |

**सन १९३८ ते १९४७ पुर्णतः लोकप्रतिनिधीकडून संचलित(स्वातंत्र्यपूर्व)**

सन १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्याने प्रातांना स्वायत्तता देण्यात आली. त्यामुळे नगरपालिकेच्या घटनेत आमुलाग्र बदल झाला. सरकार नियुक्त सभासद नेमण्याची पद्धत बंद झाली. वार्डाची फेररचना १० वार्डात करण्यात आली. सभासदांची संख्या ३३ करण्यात आली. सन १९३१ च्या लोकसंख्येच्या आधारावर नवीन पद्धतीने पूर्णतः लोकप्रतिनिधींची निवड करण्यासाठी नारपालिकेला ६ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली.

**२.५.१८ सन १९३८ ची अठरावी निवडणूक**

अठरावी निवडणूक १६.१०.१९३८ रोजी झाली. यावेळच्या निवडणुकींचे वैशिष्टय म्हणजे सर्वच्या सर्व उमेदवार लोकनियुक्त पद्धतीने निवडून आलेले होते. निवडून आलेले उमेदवार खालीलप्रमाणे

| वार्ड नं. | उमेदवाराचे नाव | राखीव जागा | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १. | सौ.यमुनाबाई पांडुरंग कोल्हटकर | स्त्री राखीव | २५२ |
| | गणपती विठ्ठल कपडेकर | जनरल | ३३६ |
| | वासुदेव कृष्ण तांबे | जनरल | ३२३ |
| २. | गोपाळ वासुदेव जोशी | जनरल | २७९ |
| | गोपाळ रघुनाथ पंचपोर | जनरल | २६३ |
| ३. | शिवराम विष्णू मोडक | जनरल | ३९९ |
| | बंकटलाल रामलाल मिनियार | जनरल | ३७२ |
| | बन्सिलाल रामगोपाळ भट्टड | जनरल | ३६८ |
| ४. | रामचंद्र शंकर गवळी | जनरल | ३९९ |
| | रामकृष्ण कोंडो पेंढारकर | जनरल | ३१० |
| | कृष्णाजी दामोदर लिमये | जनरल | २९९ |
| ५. | पांडुरंग चिंतामण भोपरकर | जनरल | ६०१ |
| | शंकर मारुती चव्हाण | जनरल | ५०१ |
| | कृष्णाजी बाबुराव खुटाळे | जनरल | ४२७ |
| | गणपती शाळीग्राम लकेरी | जनरल | ३७४ |
| | बहुलेकर श्रीधर दत्तात्रय | जनरल | ३७३ |
| ६. | विश्वनाथ सावळाराम तांबोळी | जनरल | ६४४ |
| | रामचंद्र गणेश सोमण | जनरल | ५८१ |

| | | | |
|---|---|---|---|
| | गौरीशंकर वासुदेव मुतालिक<br>बाळकृष्ण नारायण लाटकर | जनरल<br>जनरल | ५१९<br>४२७ |
| ७. | महादू रंगाजी कांबळे<br>सावळाराम सिताराम बाजारे<br>रामकृष्ण सितारामसा पवार<br>शंकर रामभाऊ शेटे | हरिजन राखीव<br>जनरल<br>जनरल<br>जनरल | १२९<br>६७२<br>४४७<br>४३८ |
| ८. | गणपती देवाजी तपासे<br>रामकृष्ण नामदेव बगाडे | हरिजन राखीव<br>जनरल | ८२<br>१५७ |
| ९. | पांडुरंग कृष्णाजी शिवदास<br>बहिरू ग्यानू धादमे<br>मारूती बयाजी इंदलकर | हरिजन राखीव<br>जनरल<br>जनरल | ६९<br>२४१<br>२०४ |
| १०. | रसूल महमंद बागवान<br>महमंदखान गौसखान<br>शरीफबेग इमामबेग<br>हाजी शेख उस्मान नथू | मुसलमान मतदार संघ<br>मुसलमान मतदार संघ<br>मुसलमान मतदार संघ<br>मुसलमान मतदार संघ | ६२९<br>३३५<br>२६५<br>२४७[५१] |

या निवडणूकीचे वैशिष्टय म्हणजे प्रथमच स्त्रियासाठी १ व हरिजनासाठी ३ जागा राखीव ठेवण्यात आल्या. यमुनाबाई कोल्हटकर पहिली महिला सभासद म्हणून सातारा नगरपालिकेत निवडून आली. अध्यक्षपदी रामचंद्र गणेश सोमण व उपाध्यक्षपदी महमंदखान गवासखान यांची निवड झाली. दोन्ही पदांचा कार्यकाळ ३ वर्षाचा ठेवण्यात आला. १ नाव्हेंबर १९३८ पासून नवीन बोर्ड ३ वर्षासाठी सुरू झाले. यावेळी नगरपालिकेचा कारभार चालविण्यासाठी खालील कमिटया निवडण्यात आल्या. स्टँडिंग कमिटी, सॅनेटरी अँड ड्रेनेज कमिटी, वॉटर वर्क्स कमिटी, मॅटर्निटी हॉस्पिटल कमिटी आणि नव्यानेच फायनान्स कमिटीची निवड करण्यात आली.

**फायनान्स कमिटी**

| अ. नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | जी.आर.पंचपोर | चेअरमन |
| २. | के.बी खुटाळे | सदस्य |
| ३. | जी.व्ही जोशी | सदस्य |
| ४. | जी.डी. तपासे | सदस्य |
| ५. | आर.के.पेंढारकर | सदस्य[५२] |

### २.५.१९ सन १९४२ ची एकोणिसावी निवडणूक

अठराव्या बोर्डाची मुदत १ नाव्हेंबर १९४१ पासून ३१ मार्च १९४२ पर्यत वाढविण्यात आली. एकोणिसावी निवडणूक २२ फेब्रुवारी १९४२ रोजी झाली. ३३ सभासद निवडून आले. नवीन बोर्ड १ एप्रिल १९४२ पासून ३ वर्षासाठी अस्तित्त्वात आले. अध्यक्षपदी शंकर हरी साठे व उपाध्यक्षपदी कृष्णाजी बाबूराव खुटाळे यांची निवड झाली. विविध सात कमिटयांची व कमिटी चेअरमनची निवड करण्यात आली.[५३]

### २.५.२० सन १९४५ ची विसावी निवडणूक

१८ फेब्रुवारी १९४५ रोजी नगरपालिकेची विसावी निवडणूक पार पडली. अध्यक्ष व उपाध्यक्षाची मुदत ३ वर्षाची ठेवण्यात आली. अध्यक्षपदी शंकर हरी साठे यांची फेर निवड करण्यात आली व उपाध्यक्षपदी व्ही.एस.तांबोळी यांची निवड झाली. नवीन बोर्ड १ एप्रिल १९४५ पासून अस्तित्त्वात आले.[५४]

## सन १९४७ ते १९८१ पुर्णता लोकप्रतिनिधीकडून संचलित (स्वातंत्र्योत्तर)

सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे खऱ्या अर्थाने भारतात लोकशाहीला सुरूवात झाली. एक उमेदवार एक मत या पद्धतीचा स्वीकार करण्यात आला.

### २.५.२१ सन १९४९ ची एकविसावी निवडणूक

सन १९४८ साली निवडणूक होणार होती. मात्र सरकारने निवडणूकीची मुदत ३० सप्टेबर १९४८ पर्यत वाढविली. पुन्हा मुदतवाढ देऊन ३१ मे १९४९ पर्यत वाढविण्यात आली. १ जून १९४९ पासून सुरू होणाऱ्या बोर्डाची त्रैवार्षिक निवडणूक २४ एप्रिल१९४९ रोजी झाली. वार्डाची संख्या ९ करण्यात आली. व उमेदवारांची संख्या ३३ कायम ठेवण्यात आली. नवीन निवडून आलेल्या उमेदवारामधून अध्यक्षपदी पवार रामकृष्णसा सितारामसा यांची निवड सर्वानुमते झाली तर उपाध्यक्षपदी श्रीमती काकडे गिताबाई तुकाराम यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. सातारा नगरपलिकेत प्रथमच महिला उपाध्यक्ष झाली. सन १९४९ च्या या निवडणूकीपासून मुसलमानांचा स्वतंत्र वार्ड रद्द करून त्यांना ४ राखीव जागा देण्यात आल्या.[५५]

### २.५.२२ सन १९५२ ची बावीसावी निवडणूक

नगरपालिकेची बाविसावी निवडणूक १८ मे १९५२ रोजी झाली. वार्ड व सभासद संख्येत कोणताही बदल करण्यात आला नाही. अध्यक्षपदी राजाराम केशव पालकर व

उपाध्यक्षपदी गणपती विठ्ठल कपडेकर यांची निवड करण्यात आली. या निवडणूकीपासून वयात आलेल्या प्रत्येक स्त्रीपुरूषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. मुसलमानांसाठी मागील निवडणूकीपासून ठेवलेल्या राखीव जागा रद्द करण्यात आल्या. स्त्रीयांसाठी ३ राखीव जागा व हरिजनांसाठी ३ राखीव जागा अशा फक्त ६ राखीव जागा ठेवण्यात आल्या.[५६]

सन १९५२ च्या बोर्ड सभासदांची निवड ३ वर्षासाठी झाली होती. सन १९५४ मध्ये म्युनिसपल बरोज ॲक्टमध्ये दुरूस्ती होऊन सभासदांचा कार्यकाळ ४ वर्षाचा करण्यात आला. त्यामुळे हे बोर्ड सन १९५६ पर्यंत कायम ठेवण्यात आले. परंतु दरम्यानच्या काळात मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी महाराष्ट्रात जे आंदोलन सुरू होते. त्यासाठी सातारा नगरपालिकेच्या सर्व सभासदांनी जानेवारी १९५६ मध्ये सामूहिक राजीनामे दिले. त्यामुळे मुंबई सरकारने एक वटहुकूम काढून नगरपालिकेचा कारभार ताब्यात घेतला. व प्रशासकाची नेमणूक केली. त्यानंतर पुढे ऑक्टोबर १९५७ मध्ये आपला वटहुकूम सरकारने मागे घेऊन नगरपालिकेच्या निवडणूका घेण्याचे जाहीर केले.

### २.५.२३ सन १९५७ ची तेविसावी निवडणूक

सन १९५७ मध्ये नगरपालिकेची निवडणूक झाली. सभासद संख्या ३३ व वार्ड संख्या ९ कायम ठेवण्यात आली. नवीन बोर्ड ४ डिसेंबर १९५७ पासून सुरू झाले. अध्यक्ष व उपाध्यक्षाची मुदत ४ वर्षाची ठेवली गेली. अध्यक्षपदासाठी काशिनाथ महादेव देशपांडे व गोविंददास दामोदरदास गुजर या दोघांनी आपले अर्ज भरले. देशपांडे यांना १७ मते व गुजर यांना १६ मते पडली. देशपांडे यांची बहुमताने अध्यक्ष म्हणून निवड झाली. उपाध्यक्ष म्हणून गणपती विठ्ठल कपडेकर व रघुनाथ दिनकर माजगावकर या दोघांनी अर्ज भरले. कपडेकर यांना १७ मते व माजगावकर यांना १६ मते पडली. कपडेकर यांची बहुमताने उपाध्यक्षपदी निवड झाली.[५७]

सातारा सबर्बन नगरपालिका सातारा शहर नगरपालिकेत विलीन करणे व शहरासाठी आद्योगिक वसाहत स्थापन करणेसाठी व हल्लीची नगरपालिकेच्या बोर्डाची मुदत ३ डिसेंबर १९६१ रोजी संपत आहे. ती आणखी एक वर्ष वाढवून मिळण्यासाठी जनरल बोर्डाने ठराव नं.८० ने २८ जुलै १९६१ रोजी सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला.

सातारा कँप हद्दीत पुर्वी इंग्रजांनी मिलिटरी कँटोनमेन्ट स्थापन केले होते. ते बरखास्त झाल्यानंतर तेथील लोकांना नागरी सुविधा उपालब्ध करून देण्यासाठी इंग्रजांनी सन १८९० मध्ये सातारा सबर्बन म्युनिसिपालिटीची स्थापना केली होती. त्यात १२ सभासद होते. पुढे १ नोव्हेंबर १९६२ रोजी सातारा सबर्बन नगरपालिकेचे सातारा नगरपालिकेत विलीनीकरण करण्यात आले. त्यामुळे सातारा नगरपालिकेच्या सभासद संख्येत वाढ होऊन ती ४५ झाली.[५८]

**ट्रान्सपोर्ट कमिटी**

२५ नोव्हेंबर १९६२ रोजी नव्याने स्थापन झालेल्या ट्रान्सपोर्ट कमिटीची स्थापना करण्यात. त्यात खालील सभासदांची नेमणूक करण्यात आली.

| अ. नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | द.कृ.चव्हाण | चेअरमन |
| २. | आबासाहेब कवारे | सदस्य |
| ३. | हनिफ बाळा लाड | सदस्य |
| ४. | एकनाथ गणपती सांळुखे | सदस्य |
| ५. | बी.एस.मलकापुरे | सदस्य |
| ६. | के.आर.गवळी | सदस्य |
| ७. | रघुनाथ दशरथ पवार | सदस्य[५९] |

सातारा नगरपालिकेत १ नोव्हेंबर १९६२ रोजी सबर्बन नगरपालिका विलीन झाल्यामुळे वार्डाची पुनर्रचना करण्यात आली. वार्डाची संख्या ९ ऐवजी १० करून सभासद संख्या ३५ केली गेली.स्त्रीयांसाठी ४ राखीव जागा ठेवण्यात आल्या व ४ जागा शेडयुल्ड कास्टसाठी राखीव ठेवल्या

### २.५.२४ सन १९६३ ची चोवीसावी निवडणूक

सातारा नगरपालिकेची चोविसावी निवडणूक १ डिसेंबर १९६३ रोजी झाली. नवीन बोर्ड १५ जानेवारी १९६४ पासुन सुरू झाले. निवडून आलेल्या ३५ सभासदांची यादी पुढीलप्रमाणे.

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | सौ.पंडित नलिनी दामोदर |
| २. | बहुलेकर महादेव चिंतामण |
| ३. | टोपे शंकर बजरंग |
| ४. | आवटे विठ्ठल कोंडिबा |
| ५. | एकबोटे हणमंत लक्ष्मण |

| | |
|---|---|
| ६. | गाडेकर मुरलीधर ज्ञानोबा |
| ७. | कोकजे नारायण सिताराम |
| ८. | जाजू रामविलास आत्माराम |
| ९. | वाळिंबे वामन भिकाजी |
| १०. | इंदलकर मारूती नारायण |
| ११. | रणखांबे यशवंतराव सुभाषराव |
| १२. | आहेरराव आप्पासाो भाऊसाो |
| १३. | सौ.दोशी राधाबाई गोविंदराव |
| १४. | लोखंडे गणपत राऊ |
| १५. | बागवान गुलाब रसूल |
| १६. | जाधव परबतराव गेनुजीराव |
| १७. | सौ.क्षिरसागर लिलाबाई बाळकृष्ण |
| १८. | मलकापुरे भिकू शंकर |
| १९. | माजगावकर बाबूराव माधवराव |
| २०. | साठे श्रीधर शंकर |
| २१. | मुतालिक यशवंत शंकर |
| २२. | चव्हाण बाजीराव दादू |
| २३. | गवळी कोंडिराम रामभाऊ |
| २४ | शेटे शामराव शंकरराव |
| २५ | जेजुरीकर अनंत रामचंद्र |
| २६. | सौ. दळवी सुशिला बाबूराव |
| २७. | खंदारे यल्लाप्पा शंकर |
| २८. | मोहिते शंकरराव आनंदराव |
| २९. | वाळके दत्तात्रय विष्णू |
| ३० | जाधव रामचंद्र बाबाजी |
| ३१. | किर्दत हणमंत कृष्णाजी |
| ३२. | भोसले ग्यानबा पांडुरंग |
| ३३. | मस्के बापू मसू |
| ३४. | मोहंती आ.गो. |
| ३५. | कारंडे शंकर जानू[६०] |

अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची मुदत एक वर्षाची ठेवण्यात आली. अध्यक्ष पदासाठी गवळी कोंडिराम रामभाऊ व रणखांबे यशवंतराव सुभानराव या दोघांनी अर्ज भरले. त्यात गवळी यांना २४ तर रणखांबे यांना ११ मते मिळाली. गवळी हे बहुमताने निवडून आले. तर उपाध्यक्षपदी आहेरराव आप्पासाहेब भाऊसाहेब यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.[६१]

**महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५**

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ अन्वये नगरपालिकेच्या कारभारात आमुलाग्र बदल करण्यात आला. विषय समित्यांची संख्या ८ ऐवजी ११ सभासद निवडण्यास सुरूवात

झाली. उपाध्यक्ष हा शिक्षण समितीचा पदसिद्ध सभापती करण्यात आला. स्विकृत सदस्य घेण्याची पद्धत सुरू करण्यात आली.

**विविध विषय समित्या**

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५चे कलम ६३(२)(ब) कलम ६३(४) अन्वये सातारा नगरपालिकेत पुढील समित्या, समिती सभासद व समितीचे चेअरमन निवडण्यात आले.

**सार्वजनिक बांधकाम समिती**

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | सौ.लिलाबाई क्षिरसागर |
| २. | शामराव शेटे |
| ३. | बाबूराव माजगावकर |
| ४. | महादेव बहुलेकर |
| ५. | मुरलीधर गाडेकर |
| ६. | हणमंत किर्दत |
| ७. | शंकर कारंडे |
| ८. | हणमंत एकबोटे |
| ९. | शंकरराव मोहिते |
| १०. | बाजीराव चव्हाण |
| ११. | बापू मस्के |

चेअरमनपदी हणमंत एकबोटे यांची निवड करण्यात आली.

**शिक्षण समिती**

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | सौ.लिलाबाई क्षिरसागर |
| २. | श्रीधर साठे |
| ३. | वामन वाळिंबे |
| ४. | यशवंत मुतालिक |
| ५. | महादेव बहुलेकर |
| ६. | राधाबाई दोशी |
| ७. | सुशिला दळवी |
| ८. | मुरलिधर गाडेकर |
| ९. | अरिवयाचंद्र मोहंती |
| १०. | यल्लाप्पा खंदारे |

नगरपालिकेचे उपाध्यक्ष गुलाब बागवान हे शिक्षण समितीचे पदसिद्ध चेअरमन होते.

**आरोग्य रक्षण वैद्याकिय व सार्वजनिक आरोग्य समिती**

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | शामराव शेटे |
| २. | वामन वाळिंबे |
| ३. | नलिनी पंडित |
| ४. | शिला दळवी |
| ५. | रामविलास जाजू |
| ६. | हणमंत किर्दत |
| ७. | शंकर कारंडे |
| ८. | मारूती इंदलकर |
| ९. | विठ्ठल आवटे |
| १०. | अनंत जेजूरीकर |
| ११. | दत्तात्रय वाळके |

मारूती इंदलकर यांची चेअरमनपदी निवड झाली.

**पाणीपुरवठा व जलनिःसारण समिती**

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | गणपत लोखंडे |
| २. | बाबूराव माजगावकर |
| ३. | ग्यानबा भोसले |
| ४. | नलिनी पंडित |
| ५. | शंकर टोपे |
| ६. | परबतराव जाधव |
| ७. | नारायण कोकजे |
| ८. | विठ्ठल आवटे |
| ९. | बाजीराव चव्हाण |
| १०. | बापू मस्के |
| ११. | अनंत जेजुरीकर |

चेअरमनपदी गणपत लोखंडे यांची निवड झाली.

**नियोजन आणि विकास समिती**

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | हणमंत किर्दत |
| २. | कोंडिराम गवळी |
| ३. | रामविलास जाजु |
| ४. | रामचंद्र जाधव |

| | |
|---|---|
| ५. | शंकर टोपे |
| ६. | राधाबाई दोशी |
| ७. | ग्यानबा भोसले |
| ८. | महादेव बहुलेकर |
| ९. | यशवंतराव रणखांबे |
| १०. | शंकरराव मोहिते |
| ११. | अरवियाचंद्र मोहंती |

चेअरमनपदी यशवंतराव रणखांबे यांची निवड झाली.[६२]

मनपा अधिनियम १९६५ चे कलम ६४(ब) अन्वये स्थायी समितीवर खालील तीन सभासदांची निवड करण्यात आली.

१) यशवंत मुतालिक

२) नारायण कोकजे

३) आप्पासाो आहेरराव

स्थायी समितीवर अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व विषय समित्यांचे चेअरमन सभासद असतात.

### २.५.२५ सन १९६७ ची पंचविसावी निवडणूक

पंचविसावी निवडणूक सन १९६७ मध्ये झाली. यावेळी सभासद संख्या ३१ करण्यात आली. निवडणूकीद्वारे २९ सभासद निवडले जाईल व २ सभासद स्वीकृत पद्धतीने नगरपालिका बोर्डावर घेण्यात येईल. स्वीकृत सदस्य घेण्याची पद्धत प्रथमच सन १९६५ च्या कायद्याद्वारे या निवडणूकीपासून स्विकारण्यात आली. नवीन बोर्ड २ जुलै १९६७ पासून अस्तित्त्वात आले. निवडून आलेले सभासद खालीलप्रमाणे होते.

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | सौ.शिंदे ताराबाई शिवाजी |
| २. | कुलकर्णी हणमंत रामकृष्ण |
| ३. | ढोणे निवृत्ती गणपत |
| ४. | गाडेकर मुरलीधर ज्ञानोबा |
| ५. | महाबळेश्वरकर भास्कर शंकर |
| ६. | दाबके मुकुंदराव प्रभाकर |
| ७. | जाधव परबतराव गेणूजीराव |
| ८. | लोखंडे गणपत राऊ |
| ९. | शहा कांतिलाल मन्सुखलाल |

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १०. | माजगावकर दामोदर कृष्णाजी |
| ११. | जाजू रामविलास आत्माराम |
| १२. | आहेरराव आप्पासाहेब भाऊसाहेब |
| १३. | सौ.बेगमपुरे सुशिला वसंत |
| १४. | कुलकर्णी हरिभाऊ रंगनाथ |
| १५. | घोरपडे रामचंद्र राजाराम |
| १६. | झाड लक्ष्मणसा गणपतसा |
| १७. | पहिलवान रहिमबक्ष उमर |
| १८. | गवळी कोंडिराम रामभाऊ |
| १९. | मलकापुरे भिकू शंकर |
| २०. | कुमार हिरासिंग शंकरसिंग |
| २१. | पाटील साहेबराव अनंतराव |
| २२. | भोसले माधव ग्यानबा |
| २३. | तपासे गोकुळदास शंकर |
| २४ | इंगळे जगन्नाथ परबती |
| २५ | मोहिते शंकरराव आनंदराव |
| २६. | दळवी बाबुराव रामचंद्र |
| २७. | जाधव रामचंद्र बाबाजी |
| २८. | कारंडे शंकर जानू |
| २९. | श्रीमती बकरे बबई शंकर[६३] |

मनपा अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक सन १९६७ च्या तरतुदीनुसार अध्यक्ष पदासाठी आहेरराव आप्पासाहेब भाऊसाहेब यांचा एकच नॉमिनेशन फॉर्म आल्याने त्यांची अध्यक्ष हणून निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले व उपाध्यक्ष पदासाठी कारंडे शंकर जानू यांचा एकच अर्ज आल्यामुळे ते निवडून आल्याचे घोाषित करण्यात आले. यावेळी स्पेशल जनरल सभेचे अध्यक्ष रेसिडेंट डेप्युटी कलेक्टर आणि प्रिसायंडिंग ॲथॉरिटी सातारा यांनी काम पाहिले.

मनपा अधिनियम सन १९६५ चे कलम ९(१)(III) प्रमाणे अध्यक्षांनी स्विकृत सभासद संख्या २ ठेवण्यात आल्याचे जाहीर केले. त्यानुसार नामनिर्देशन अर्ज भरण्यास सांगण्यात आले. तेव्हा ५ अर्ज आले. त्यांच्यात एकल संक्रमणीय मतदानाद्वारे गुप्त मतदान घेण्यात आले. त्यात

१) एकबोटे हणमंत लक्ष्मण

२) तळेकर दिनकर शिवराम

हे दोघे जास्त मते पडल्यामुळे निवडून आल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.[६४]

नगरपालिकेच्या ५ विषय समितीच्या सदस्यांची संख्या प्रत्येकी ९ ठेवण्यात आली. व त्यांचे सदस्य व चेअरमनची निवड करण्यात आली. त्याचबरोबर ३ सदस्य स्थायी समितीवर निवडण्यात आले.

७ जुलै १९७२ रोजी अध्यक्षपदासाठी मनपा अधिनियम १९६५ व महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक) नियम १९६७ च्या तरतुदीनुसार निवडणूक घेण्यात आली. अध्यक्षपदासाठी ३ नामनिर्देशन पत्रे भरण्यात आली.

१) पाटील साहेबराव अनंतराव

२) कुलकर्णी हरिभाऊ रंगनाथ

३) बेगमपुरे सुशिला वसंत

वरीलपैकी उमेदवारी मागे घेण्याच्या वेळेत दोघांनी उमेदवारी मागे घेतली व बेगमपुरे सुशिला वसंत यांची बिनविरोध निवड झाल्याचे अध्यक्ष व सहाय्यक जिल्हाधिकारी सातारा विभाग सातारा व मतदान प्राधिकारी सातारा यांनी जाहीर केले.[६५] बेगमपुरे सुशिला वसंत यांची पहिल्या नगराध्यक्षा म्हणून सातारा नगरपालिकेत निवड झाली.

### २.५.२६ सन १९७४ ची सव्वीसावी निवडणूक

सातारा नगरपलिकेची सव्विसावी निवडणूक सन १९७४ मध्ये झाली. यावेळी निवडून येणारे उमेदवारांची संख्या ४१ व स्वीकृत सभासद ४ अशी ४५ संख्या होती. सन १९७४ च्या निवडणूकीत अध्यक्ष हा जनतेद्वारे थेट निवडला जाऊ लागला. नवीन बोर्ड १७ डिसेंबर १९७४ रोजी अस्तित्त्वात आले. निवडून येणारे सभासद खालीलप्रमाणे होते.

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | मे.राजेभोसले प्रतापसिंह शाहूमहाराज |
| २. | जाधव नारायण लक्ष्मण |
| ३. | सौ.दामले सुलोचना दत्तात्रय |
| ४. | शिंदे किसन परशुराम |
| ५. | जोशी मधुकर गोविंद |
| ६. | पवार कृष्णा बबरू |
| ७. | ढोणे निवृत्ती गणपती |
| ८. | कारंजेकर सुरेश गजानन |
| ९. | चव्हाण शरद शंकरराव |
| १०. | बागवान गुलाब रसुल |
| ११. | वायदंडे हिरा भाऊ |

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १२. | मलकापुरे भिकू शंकर |
| १३. | पहिलवान रहिमबक्ष उमर |
| १४. | कासट माणिकलाल श्रीकृष्ण |
| १५. | नावंधर नंदकिशोर हिरालाल |
| १६. | माजगावकर दामोदर कृष्णाजी |
| १७. | दामले सदाशिव श्रीधर |
| १८. | बागल शिवाजीराव लक्ष्मण |
| १९. | सौ.गोडबोले माधुरी मधुकर |
| २०. | गोडबोले मधुकर गोपाळ |
| २१. | उथळे विजयसिंह राजचंद्र |
| २२. | पाटील शंकर केशवराव |
| २३. | पवार मधुकर गणपतराव |
| २४ | तपासे गोकुळदास शंकर |
| २५ | पाटील साहेबराव अनंतराव |
| २६. | किर्दत पांडुरंग महादेव |
| २७. | शिवदास विजयकुमार गणपत |
| २८. | गवळी कोंडीराम रामभाऊ |
| २९. | मोहिते शंकरराव आनंदराव |
| ३० | सौ.दळवी रेखा महादेव |
| ३१. | दळवी बाबूराव रामचंद्र |
| ३२. | जाधव धनंजय रामचंद्र |
| ३३. | घोरपडे रामचंद्र राजाराम |
| ३४. | मोहिते प्रकाश रामचंद्र |
| ३५. | जानकर निवृत्ती विठ्ठलराव |
| ३६. | आंबेकर बाळकृष्ण वसंत |
| ३७. | आमणे लक्ष्मणराव केशव |
| ३८. | तळेकर विठ्ठलराव शिवराम |
| ३९. | कारंडे शंकर ज्ञानू |
| ४०. | सौ.फरांदे विमल पुंडलिक |
| ४१. | पाटील अनिल आप्पासाहेब[६६] |

सन १९७४ या निवडणूकीत अध्यक्ष छ.प्रतापसिंह शाहूमहाराज राजेभोसले यांची थेट जनतेतून निवड झाली. त्यांनी उपाध्यक्ष वार्ड नं.९ मधून निवडून आलेले गोडबोले मधुकर गोपाळ यांची निवड केली.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम सन १९६५ चे कलम ९ प्रमाणे ४ स्विकृत सदस्यांची निवड करणेसाठी सन १९६७ मधील नियम नं.३ प्रमाणे विहित नमुन्यात नामनिर्देशन पत्रे भरली गेली. एकूण ७ नामनिर्देशन पत्रे भरण्यात आली. त्यात एकाच्या नामनिर्देशन पत्रावर सूचकाची सही नव्हती. एकाने आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले. शेवटी ५ नार्मनिर्देशन पत्रे शिल्लक राहिली. त्यांच्यात गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक झाली. त्यात खालील ४ उमेदवारांची स्वीकृत सभासद म्हणून निवड झाली.

१) आहेरराव आप्पासाहेब भाऊसाहेब

२) मुतालिक यशवंत विष्णू

३) चव्हाण बाळकृष्ण डिंगबर

४) भस्मे उद्धव महादेव

निवडणूक अधिकारी म्हणुन नगरपालिका अध्यक्ष प्रतापसिंह राजेभोसले यांनी काम पाहिले.[६७]

**वृक्ष समिती**

शासनाने वृक्ष निगा अधिनियम सन १९७५ ची अमंलबजावणी करण्यासाठी वृक्ष समितीचे गठण करण्यास सांगितले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे समितीची नेमणूक करण्यात आली.

| अ.नं. | सभासदाचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, सातारा नगरपालिका सातारा | चेअरमन |
| २. | उपाध्यक्ष, सातारा नगरपालिका सातारा | व्हा.चेअरमन |
| ३. | डी.आर.जाधव | सदस्य |
| ४. | एस.एस.चव्हाण | सदस्य |
| ५. | बी.व्ही.आंबेकर | सदस्य |
| ६. | एस.एस.दामले | सदस्य |
| ७. | के.आर गवळी | सदस्य |
| ८. | एस.एल.बागल | सदस्य |
| ९. | वाय.व्ही.मुतालिक | सदस्य |
| १०. | एम.जी.पवार | सदस्य |
| ११. | एस.ए.पाटील | सदस्य |
| १२. | एस.जी कारंडे | सदस्य |
| १३. | एल.के.आमणे | सदस्य |
| १४. | बी.आर.दळवी | सदस्य |
| १५. | बी.एस.मलकापुरे | सदस्य |

वृक्ष अधिकारी म्हणून मुख्याधिकारी व २ सहाय्यक मुख्याधिकारी काम करतील. नगरपालिकेच्या हद्दीतील वृक्षांची निगा राखणे, त्यांचे रक्षण करणे, नवीन वृक्ष लावणे, वृक्षांची खानेसुपारी करणे, इ.कामासाठी दोन इन्स्पेक्टर व दोन शिपाई यांची नेमणूक करण्यात यावी.

सदर समितीच्या अमंलबजावणीसाठी फंड खालीलप्रमाणे जमा करण्यात यावा.

१) एकत्रित कराच्या उत्पन्नाच्या अर्धा टक्का येणारे उत्पन्न

२) ट्री सेस पासून मिळणारे उत्पन्न

३) शासकीय अनुदाने व इतर मदती याप्रमाणे सातारा शहरातील वृक्ष संवर्धनासाठी सदर समिती कामकाज पाहिले.[६८]

## सन १९८१ ते १९८५ शासनाकडून संचलित (प्रशासकीय कारकिर्द)

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास व आरोग्य विभाग क्रमांक एम.यु.जी./१०८१/१८०/ सीआर/२६/८१ युडी १, ५ फेब्रुवारी १९८१ अन्वये महाराष्ट्र नगरपालिका(दुरूस्ती अध्यादेश १९८१) प्रमाणे नगरपरिषदेच्या सभासद, अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची मुदत ६ फेब्रुवारी १९८१ या तारखेपासून संपल्याचे जाहीर करण्यात आले. व वरील अध्यादेशातील क्रमांक ६ मध्ये महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मध्ये नवीन कलम ४८(१) समाविष्ट करणेत आले व त्यानुसार नगरपालिकेसाठी चिफ ऑफिसर यांची नियुक्ती प्रशासक(अॅडमिनीस्ट्रेटर) म्हणून ६.२.१९८१ पासून होऊन मनपा अधिनियम १९६५ चे कलम ७ मध्ये अधिनियमाच्या अमंलबजावणीचे सर्वाधिकर नगरपालिका क्षेत्रासाठी 'प्रशासक' म्हणून नेमणूक झालेल्या मुख्याधिकारी यांजकडे सुपुर्त झाले आहे.

महाराष्ट्र शासनाचे आदेश क्रमांक एम.यु.जी १०८१/१८०/सी.आर./२६/युडी ९, ५ फेब्रुवारी १९८१ अन्वये सातारा नगरपालिकेचा प्रशासक श्री.जी.पी.भोकरे यांची ६ फेब्रुवारी १९८१ रोजी नेमणूक करण्यात आली.[६९]

सन १९८१ पर्यत सातारा नगरपालिकेचा कारभार व्यवस्थितपणे चालू होता. सन १९८१ मध्ये सरकारने काही तांत्रिक अडचणीमुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व आद्योगिक नागरी अधिनियम १९६५ नुसार ही नगरपालिका बरखास्त करून त्यावर प्रशासक नेमला. सन १९८१ ते १९८५ या पाच वर्षाच्या काळात खालील सहा प्रशासक यांनी सातारा नगरपालिकेचा कारभार पाहिला.

| अ.नं. | प्रशासकाचे नांव | कारकिर्द |
|---|---|---|
| १. | जी.पी.भोकरे | ६.२.१९८१ ते २५.५.१९८१ |
| २. | डी.एन.वैद्य | २६.५.१९८१ ते २३.५.१९८२ |
| ३. | बी.बी.बोराडे | २४.५.१९८२ ते १०.४.१९८३ |
| ४. | श्री.डी.एम. खामतकर | ११.४.१९८३ ते १७.४.१९८३ |
| ५. | डी.एन. वैद्य | १८.४.१९८३ ते १३.६.१९८४ |
| ६. | माधव सांगळे | १४.६.१९८४ ते १५.५.१९८५[७०] |

**सन १९८५ ते २००३ पुर्णत: लोकप्रतिनिधीकडून संचलित**

**२.५.२७ सन १९८५ ची सत्ताविसावी निवडणूक**

सन १९८१ पासून सुरू झालेली प्रशासकीय कारकिर्द सन १९८५ साली संपली. आणि पुन्हा नगरपालिका लोकप्रतिनिधीच्या ताब्यात देण्यात आली. नगरपालिकेची सत्ताविसावी निवडणूक २५ एप्रिल १९८५ रोजी झाली. सभासद संख्येत कोणताही बदल न करता ती ४५ ठेवण्यात आली. लोकनियुक्त ४१ व स्विकृत ४ सभासद निवडले गेले. जनतेतून अध्यक्ष निवडण्याची पद्धत रद्द करण्यात आली. पुन्हा नगरसेवकांनी आपला अध्यक्ष निवडायची पुर्वीची पद्धत सुरू करण्यात आली. अध्यक्ष पदासाठी राजेभोसले श्रीमंत छ. शिवाजीराजे, शाहू महाराज व पाटील साहेबराव अनंतराव या दोघांनी अर्ज भरले. त्यात राजेभोसले यांना ३१ व पाटील यांना १० मते पडली. बहुमताने राजेभोसले यांची अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे डी.जे.शिंदे पिठासन अधिकारी तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी यांनी घोषित केले.[७१]

नगरपालिका अध्यक्षांनी वार्ड नं.१६ मधून निवडून आलेल्या घोरपडे रामचंद्र राजाराम यांची एक वर्षासाठी उपाध्यक्ष म्हणून निवड केली. नवीन बोर्ड १५ मे १९८५ पासून सुरू झाले.

**मागासवर्गीय कल्याण विशेष समिती**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील परिपत्रक नं.बीसीसी १०८४/२९११/सीआर. २१९/८४ युडी १० दि.२२.११.१९८४ अन्वये महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम सन १९६५ चे कलम ६७ मधील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे मागासवर्गीय कल्याण विशेष समितीची स्थापना करण्यात आली.

| अ.नं. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | इंगळे जगन्नाथ परबती | सभापती |
| २. | तपासे अशोक देविदास | सदस्य |
| ३. | भिंगारदेवे अंकुश शिवा | सदस्य |
| ४. | कांबळे रविंद्र श्रीरंग | सदस्य |
| ५. | चौगुले जगन्नाथ तुकाराम | सदस्य[७२] |

## २.५.२८ सन १९९१ ची अठ्ठाविसावी निवडणूक

अठ्ठाविसावी पंचवार्षिक निवडणूक सन १९९१ मध्ये झाली. नवीन बोर्ड १७ डिसेंबर १९९१ रोजी अस्तित्त्वात आले. यावेळी निवडून येणाऱ्या सभासदांची संख्या ५२ करण्यात आली व निवडून येणाऱ्या सभासदांच्या १० टक्के सभासद स्विकृत घेतले गेले. म्हणजे ५ सभासद स्वीकृत घेतले गेले. त्यामुळे एकूण सभासद संख्या ५७ झाली. निवडून येणारे ५२ सभासद खालीलप्रमाणे

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | सौ.निंबाळकर लिला अरूण |
| २. | जाधव चंद्रकांत गणपत |
| ३. | बाबर सिताराम साहेबराव |
| ४. | पाटील मधुकर बाबूराव |
| ५. | भोसले संगिता राजू |
| ६. | चव्हाण महेंद्र बाबूराम उर्फ बाबूराव |
| ७. | संकपाळ सुनिल शंकरराव |
| ८. | मोरे संभाजी शामराव |
| ९. | लोखंडे अलका दत्तात्रय |
| १०. | वायफळकर निर्मला प्रकाश |
| ११. | मोरे अशोक व्यंकटराव |
| १२. | अंबेकर विलास वसंतराव |
| १३. | घोरपडे रामचंद्र राजाराम |
| १४. | भोसले श्रीमंत छ. उदयनमहाराज प्रतापसिंह महाराज |
| १५. | चौगुले अलका नारायण |
| १६. | लेवे शरद बबनराव |
| १७. | पवार हणमंत काशिनाथ |
| १८. | मोहिते पोपट मारूतराव |
| १९. | मोंडकर गिरीष सदानंद |
| २०. | बाचल कमल दत्तात्रय |
| २१. | तपासे अशोक देवीदास |

| | |
|---|---|
| २२. | तपासे यमुना माधवराव |
| २३. | बागवान शमिम इस्माईल |
| २४ | भोसले मुरलीधर रामचंद्र |
| २५ | संकपाळ अंकुश श्रीरंग |
| २६. | जाधव सतिश केशवराव |
| २७. | बागवान  नजमा अकबर |
| २८. | दळवी शंकर महादेव |
| २९. | गायकवाड अमरनाथ रघुनाथ |
| ३० | मोने अशोक राजाराम |
| ३१. | गुजर अजित दामोदर |
| ३२. | कदम रजनी रामचंद्र |
| ३३. | भोसले दिगंबर भिकोबा |
| ३४. | महाबळेश्वरकर अंजली भास्कर |
| ३५. | ढोणे दिगंबर निवृत्ती |
| ३६. | नाफेड विद्याधर उर्फ विजय त्रिंबक |
| ३७. | जोशी संजय सुरेशचंद्र |
| ३८. | पवार जयवंत बळवंत |
| ३९. | कासट शकुंतला माणिक |
| ४०. | बडेकर प्रकाश ज्ञानू |
| ४१. | बागवान आदम इस्माईल |
| ४२. | धबधबे दत्तू संगाप्पा |
| ४३. | चिटणिस शिरिष शरद |
| ४४. | पवार रविंद्र वसंतराव |
| ४५. | कदम सुभद्रा महादेव |
| ४६. | झाड शोभा लक्ष्मणसा |
| ४७. | राक्षे शामला दत्तात्रय |
| ४८. | औताडे गोपाळ रामचंद्र |
| ४९. | सारडा मुकुंद संपतराव |
| ५०. | देशमुख आशा विलास |
| ५१. | गवळी नंदकुमार बळीराम |
| ५२. | गवळी प्रकाश कोंडीराम[७३] |

अध्यक्षपदाची निवडणूक १७ डिसेंबर १९९१ रोजी भरलेल्या विशेष सभेत घेण्यात आली. सभेचे अध्यक्षपद एच.आर.पवार, निवासी उपजिल्हाधिकारी सातारा यांनी भुषविले. नगरपालिकेच्या अध्यक्षपदासाठी घोरपडे रामचंद्र राजाराम व बाबर सिताराम साहेबराव या

दोघांनी अर्ज भरले. घोरपडे यांना ३२ मते व बाबर यांना १९ मते पडली. घोरपडे हे बहुमताने निवडून आल्याचे अध्यक्षांनी घोषित केले.

यानंतर स्वीकृत सदस्य निवडण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यात खालील ५ सदस्य निवडून आले.

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | चिकणे चंद्रकांत शंकर |
| २. | जाधव धनंजय रामचंद्र |
| ३. | तांबोळी हाशमभाई इब्राहिम |
| ४. | शानभाग रमेश शामराव |
| ५. | गायकवाड शंकर काळू[७४] |

उपाध्यक्ष म्हणून ढोणे दिंगबर निवृत्ती यांची अध्यक्षांनी निवड केली. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम ६२, ६३,६५ सुधारून प्रत्येक नगरपालिकेने महिला व बालकल्याण समिती प्रस्थापित करावी. अशी तरतूद महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२/१९९२ २८ डिसेंबर १९९२ अन्वये केली त्यानुसार सातारा नगरपालिकेने २९.१२.१९९२ रोजी महिला व बालकल्याण समितीची स्थापना केली. समितीच्या सदस्यांची संख्या १४ ठरविण्यात आली. व सभापतीपदी कदम रजनी रामचंद्र यांची निवड केली.[७५]

### २.५.२९ सन १९९६ ची एकोणतीसावी निवडणूक

सन १९९६ मध्ये एकोणतीसावी निवडणक झाली. यावेळी सभासद संख्या ३४ ठेवण्यात आली. स्विकृत सभासद ३ घेण्याचे निश्चित झाले. त्यामुळे नगरपालिका सभासद संख्या ३७ झाली. निवडून येणारे ३४ सभासद खालीलप्रमाणे होते.

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | महामुने प्रताप सदाशिव |
| २. | यादव बबनराव गणपत |
| ३. | सौ.किर्दत शैलेजा जगन्नाथ |
| ४. | श्रीमती भोसले आशा जयप्रकाश |
| ५. | श्रीमती ससे चारूशिला प्रदिप |
| ६. | .बेपारी आदम खाजा |
| ७. | कु.चिंचणे उर्मिला बाबूराव |
| ८. | सौ.बनकर ताराबाई बाळासाहेब |

| अ. नं. | नाव |
|---|---|
| ९. | शिंगटे बलभिम धोंडिराम |
| १०. | घोरपडे अरूण राजाराम |
| ११. | सौ.जेधे रजनी राजू |
| १२. | लेवे शरदराव बबनराव |
| १३. | जोशी संजय सुरेशचंद्र |
| १४. | मोहिते पोपटराव मारूतराव |
| १५. | सौ.बागवान शमीन इस्माइल |
| १६. | भोसले अशोक ग्यानबा |
| १७. | नाईक बाळकृष्ण जनार्दन |
| १८. | माळवदे शंखर रामचंद्र |
| १९. | चव्हाण महेंद्र बाबूराव |
| २०. | दबाके युवराज चंदर |
| २१. | मोने अशोक राजाराम |
| २२. | सौ.मोहिते धनश्री धनंजय |
| २३. | पवार रविंद्र वसंतराव |
| २४ | चौगुले जगन्नाथ तुकाराम |
| २५ | सौ.ढोणे रजनी ज्ञानेश्वर |
| २६. | शहा र विंद्र व्यंकटराव |
| २७. | सौ.धबधबे संगिता दत्तू |
| २८. | बडेकर प्रकाश ज्ञानू |
| २९. | तपासे अशोक देवीदास |
| ३० | बागवान आदम इस्माईल |
| ३१. | पुणेकर अरूण पांडुरंग |
| ३२. | बागल चारूदत्त सुभाषराव |
| ३३. | सौ.पानसरे शैला संजय |
| ३४. | गवळी नंदकुमार बळीराम[७८] |

या निवडणूकीच्या वेळी अध्यक्षपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव होते. भोसले आशा जयप्रकाश यांचा एक अर्ज आल्यामुळे त्या बिनविरोध निवडून आल्याचे सभा अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी सातारा उपविभाग सातारा यांनी जाहीर केले. विविध विषय समितीच्या सभासदांची संख्या १० ठेवण्यात आली.

स्वीकृत सदस्यांची निवड विशेष सभेद्वारे करण्यात आली. त्यात ३ जागा व ३ अर्ज आल्यामुळे खालील ३ ची निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात आले.

१) आंबेकर विलास वसंतराव

२) सय्यद अब्दुल रशिद चाँद

३) सारडा मुकुंद संपतलाल

नगराध्यक्षांनी बडेकर प्रकाश ज्ञानू यांची उपनगराध्यक्ष म्हणून निवड केली.[७७]

## २.५.३० सन २००१ ची तिसावी निवडणूक

सातारा नगरपालिकेची तिसावी निवडणूक २००१ मध्ये झाली. वार्ड संख्या ३९ होती. तर सभासद संख्या ४४ होती. त्यात ४ सभासद स्वीकृत होते व नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्यात आली होती. निवडून येणाऱ्या सभासदांची यादी खालीलप्रमाणे होती.

| अ. नं. | नाव |
|---|---|
| १. | सौ.रावत रंजना हणमंत |
| २. | सौ.कडू चित्रा अनिल |
| ३. | शिंदे संजय दत्तात्रय |
| ४. | बाबर सिताराम साहेबराव |
| ५. | शेंडे मंदाकिनी विष्णू |
| ६. | पवार सतिश सर्जेराव |
| ७. | इंदलकर बबन किसन |
| ८. | दळवी शंकर महादेव |
| ९. | सौ.किर्दत सीमा शंकरराव |
| १०. | संकपाळ जयकुमार श्रीरंग |
| ११. | सौ.काकडे मंदाकिनी मोहन |
| १२. | माळवदे शंकर रामचंद |
| १३. | पाटील निशांत धैर्यशील |
| १४. | आंबेकर विलास वसंतराव |
| १५. | सौ.फरांदे सुनिता प्रकाश |
| १६. | मोरे अशोक व्यंकटराव |
| १७. | भोसले मुरलीधर रामचंद्र |
| १८. | पवार माया बाळासाहेब |
| १९. | आंबेकर श्रीकांत शंकरराव |
| २०. | गायकवाड अमर रघुनाथ |
| २१. | कांबळे विमल गजानन |
| २२. | मोने अशोक राजाराम |
| २३. | चौगुले विजय आण्णा |
| २४ | राजेशिर्के स्नेहल सुहासराव |
| २५ | पवार रविंद्र वसंतराव |
| २६. | शेडगे अशोक बाबुराव |
| २७. | चतुर कल्पना राजेंद्र |
| २८. | लेवे वसंत बबनराव |

| अ. नं. | नाव |
|---|---|
| २९. | सौ.नारकर उर्मिला शांताराम |
| ३० | कुलकर्णी अमित अशोक |
| ३१. | जोशी संजय सुरेशचंद्र |
| ३२. | बडेकर विजय दिनकर |
| ३३. | धबधबे दत्तु संगाप्पा |
| ३४. | सौ.तपासे चंपाताई राजाराम |
| ३५. | सौ.घोडके स्मिता चंद्रशेखर |
| ३६. | भोसले जयवंत हणमंत |
| ३७. | बागवान इंतेखाब अब्दुल रहेमान |
| ३८. | झुटिंग शैलेंद्र दत्तात्रय |
| ३९. | राजेशिर्के सुजाता दिनकरराव |
| ४०. | बागल चारूदत्त सुभाषराव[७८] |

सन २००१ च्या निवडणुकीच्या वेळी अध्यक्षाची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय सरकारने घेतला. सातारा नगरपालिकेच्या अध्यक्षपदी रावत रंजना हणमंत यांची निवड थेट जनतेतून झाली. स्वीकृत सदस्य निवडणुकीत ४ जागा व ४ अर्ज आल्यामुळे खालील चौघांची बिनविरोध निवड झाली.

१) खानविलकर जितेंद्र विजयसिंह

२) बागवान शौकत रसूल

३) भोसले राजू तुकाराम

४) शेख अल्लाउद्दीन मोईद्दीन

यानंतर उपाध्यक्ष पदासाठी नगरविकास विभागाकडील १५ डिसेंबर २००१ च्या आदेशान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मधील कलम ५१ च्या सुधारित नियमानुसार माळवदे शंकर रामचंद्र यांचा एक अर्ज आल्यामुळे त्यांची सातारा नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी सातारा उपविभाग यांनी घोषीत केले.[७९]

## २.६ नगरपालिकेचे प्रशासन

सातारा नगरपालिकेने प्रशासन यंत्रणा सुरळीत व सुनियंत्रित चालविण्यासाठी वेगवेगळया विभागांची निर्मिती केली. या विभागामार्फत प्रशासकीय कामे चोखपणे पार पाडली

जातात. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आरोग्यावर परिणाम करणाऱ्या गोष्टींचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न केले जातात. साथीच्या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी प्रयत्न केले जातात. एवढे नव्हे तर साथीचे आजार होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते. शहरातील केरकचरा गोळा करून शहर स्वच्छतेविषयी दक्षता घेतली जाते. बांधकाम विभागामार्फत इमारतीचे बांधकाम केले जाते. रस्त्यावर दिवाबत्तीची सोय केली जाते. सांडपाण्याची व्यवस्था व स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जातो. सांस्कृतिक विकासामध्ये शहर रचना, लोकांच्या मनोरंजनासाठी बागा, प्राणी संग्रहालय, पोहण्यासाठी तलाव, वस्तु संग्रहालय व ग्रंथालय इत्यादी गोष्टीचा समावेश केला आहे. ही सर्व कामे प्रशासकीय विभागामार्फत केली जातात.

नगरपालिकेची प्रशासकीय कामे ही कोणत्या पद्धतीने केली जातात त्यावर त्याची परिणामकारकाता अवलंबून असते. नगरपालिकेकडील लोकनियुक्त प्रतिनिधींनी एखादा ठराव पास केला, एखादे धोरण ठरविले, त्या ठरावाची किंवा धोरणाची अंमलबजावणी करणेचा महत्त्वाचा प्रश्न नगरपालिका प्रशासनावर येऊन पडतो.

### २.६.१ सातारा नगरपालिकेची प्रशासन व्यवस्था

सातारा नगरपालिकेची स्थापना १ ऑगस्ट १८५३ रोजी झाली. त्यावेळी नगरपालिकेचा कारभार कमिशनर अध्यक्ष व शासन नियुक्त इतर पाच सदस्य अशा नेमणूका होऊन पहिले स्थानिक स्वराज्य बोर्ड अस्तित्त्वात आले. म्युनिसिपल कायद्याची अंमलबजावणी १ ऑगस्ट १८५३ पासून सुरू झाली. प्रथमतः कमिशनर व त्यानंतर कलेक्टर हे तिचे अध्यक्ष असत. त्याशिवाय डेप्युटी कलेक्टर, एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, सिव्हिल सर्जन, मामलेदार व फौजदार असे अधिकारी नगरपालिकेवर शासननियुक्त सभासद असत. ही नगरपालिका सन १८७३ च्या म्युनिसिपल ॲक्ट ६ नुसार १८७५ मध्ये टाऊन मुनिसिपालिटी व मार्च १८८४ मध्ये सिटी म्युनिसिपालिटी झाली. तसेच स्थानिक स्वराज्य कायद्यात बदल झाल्यामुळे सन १८८५ पासून निवडणूका घेण्यात येऊ लागल्या. तथापि कलेक्टर अध्यक्ष व त्यांचे मदतीस बारा शासननियुक्त व बारा लोकनियुक्त असे २५ सभासदांचे बोर्ड अस्तित्त्वात आले. सन १८९० पासून लोकांना नागरी सुविधा देण्यासाठी सातारा सबर्बन नगरपालिकेची स्थापना सदरबजार

भागासाठी करण्यात आली. त्यामध्ये १२ सदस्य होते. १ नोव्हेंबर १९६१ रोजी सातारा सबर्बन नगरपालिकेचे सातारा नगरपालिकेत विलिनीकरण होऊन सभासदांची संख्या ४५ झाली.[८०]

सातारा नगरपालिकेची पहिली निवडणूक सन १८८५ साली झाली. त्या निवडणूकीत पदवीधर, उच्च दर्जाचे शासकीय अधिकारी व चार रूपयापेक्षा जास्त कर भरणारे नागरिक यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. सन १९०९ सालापासून नगरपालिकेस अध्यक्ष निवडण्याचा हक्क मिळाला होता. दुरूस्ती अधिनियम, सन १९९४ नुसार सातारा नगरपरिषदेत निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या ३४ असून लोकसंख्येच्या वाढीव निर्बंधामुळे सातारा नगरपालिका 'ब' वर्गात गणली जाते.[८१]

**सातारा नगरपालिका प्रशासन व त्यांनी केलेल्या कामगिरीचा आढावा पुढीलप्रमाणे**

**२.६.२ नगरपालिकेतील नोकर वर्ग**

नगरपालिकेचा कारभार चालविण्यासाठी विविध खात्यातील जो नोकरवर्ग होता. याचे दोन प्रकार आहेत. एक विनामूल्य काम करणारा सभासद वर्ग व दुसरा नगरपालिकेतील कामे करणारा पगारी कर्मचारी वर्ग हे होत. हे दोन्हीही वर्ग एकमेकास पोषक असे लाभले असल्याने सातारा नगरपालिकेतील प्रशासकीय कामे चांगल्या प्रकारे पार पडण्यास मदत झाली आहे. या दोन्ही वर्गाने एकमेकास सहकार्य करून कामे केल्याने नगरपालिकेचा विकास होण्यास मदत झाली आहे. सातारा नगरपालिकेचा नोकर वर्ग हा कमी शिकलेला व कमी वेतनाचा असला तरी त्याने सरकारी कामाशी तुलनात्मकदृष्टया कधीही कमीपणा पडू दिला नाही. नगरपालिकेकडून दिले जाणारे वेतन सरकारी अगर इतर मोठया खाजगी संस्थापेक्षा कमी असले तरी हा नोकर वर्ग नेहमी समाधानी राहिलेला आहे. इतर कोणत्याही नोकर वर्गापेक्षा नगरपालिकेच्या नोकर वर्गाला काम करताना अनेक अडचणी असतात. एका बाजूला वरिष्ठ अधिकारी, दुसऱ्या बाजूस सभासद व त्यांची वेगवेगळी मते, वेगवेगळे विचार तरीही या नोकरवर्गाने सामंजस्याची भूमिका घेवून आपल्याला नेमून दिलेली कामे वेळेत पार पाडली आहेत. अशाप्रकारे वेगवेगळया विभागातील नोकरवर्गाने आपल्या विभागाशी प्रामाणिक राहून आपले कार्य पार पाडले आहे. त्यातून त्या विभागाचा कारभार कार्यक्षम होण्यास मदत झाली आहे.[८२]

**२.६.३ नगरपालिकेचा मुख्याधिकारी**

नगरपालिकेचा मुख्याधिकारी कारभार करीत असताना अध्यक्षाच्या अधिकारास पात्र राहून प्रशासकीय अमंलबजावणी करतो. त्याचा दर्जा हा साधारणतः मामलेदार दर्जाचा असून योग्य पगारावर त्याची नियुक्ति केली जाते. शासनाचे प्रशासकीय प्रमुख म्हणून नगरपालिकेत तो काम पाहतो. नगरपालिका ठरावांची अमंलबजावणी करण्याचे प्रमुख कार्य त्याला करावे लागते. मुख्याधिकारी यांना दोन उपमुख्याधिकारी सहाय्यक म्हणून असत.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम ॲक्ट, १९६५ कलम ७५ मध्ये मुख्याधिकारी पात्रतेचे नियम शासनाने केले आहेत. नगरपालिकेच्या आर्थिक, दैनंदिन प्रशासकीय कामावर देखरेख ठेवणे, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे, ते स्थायी समितीस सादर करणे, नगरपालिका पैसा, मालमत्ता, संबंधात लबाडी, अपहार, चोरी व भ्रष्टाचार सर्व प्रकरणे अध्यक्ष व संबंधित समितीस कळविणे. नगरपालिका कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा व दुर्लक्ष, गैरवर्तन इत्यादी केल्यास त्यांना शिक्षा करणेचा अधिकार त्यास आहे.

मुख्याधिकाऱ्यांची बदली एका नगरपालिकेतून दुसऱ्या नगरपालिकेत केली जाते. त्या वर्गाच्या नगरपालिका नुसार पगाराची श्रेणी ठरविण्याची या कायद्यानुसार तरतूद आहे. हा कायदा अंमलात येण्यापूर्वी प. महाराष्ट्र कायद्याच्या तरतुदीनुसार मुख्याधिकारी नगरपालिकेचा नोकर म्हणून राहात असे.[८३]

सातारा नगरपालिकेत सन १९१३–१४ पर्यत मुख्याधिकारी यांचा हुद्दा सेक्रेटरी म्हणून असे. सन १९१३–१४ पासून नगरपालिकेकडून सन १९२० पर्यत सरकारी अंमलदार याची नियुक्ती नगरपालिकेचे एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर म्हणून केली जाऊ लागली. पुढे सन १९२०–२१ पासून नगरपालिकेकडून चीफ आफिसरची नेमणूक केली जाऊ लागली.

**२.६.४ सातारा नगरपालिका सेक्रेटरी यादी**

१) आनंदराव भाऊराव पिंगळे

२) बाळाजी गोपाळ पिंगळे

३) बळवंत आप्पाजी सहस्त्रबुद्धे

४) वासुदेव विष्णु करंदीकर

५) आर.डी. परांजपे

६) एम.आर. जोशी

७)एस.व्ही.अभ्यंकर

८) आर.व्ही.खरे

९) जि.के.देशपांडे

१०)जी.एम.दीक्षित

### २.६.५ सातारा नगरपालिकेचे एक्झिक्युटिव्ह ऑफीसर

१) टी.आर खर्शीकर– सन १९१३ ते १९१५

२) एम.एन.वर्तक– सन १९१५ ते १९२०

### २.६.६ सातारा नगरपालिकेचे चीफ ऑफीसर

१) एन.जी.कुलकर्णी

२) एच.एस.मुर्ती

३) बी.पी.ओक

४) एन.आर. फडके[८४]

### २.६.७ सातारा नगरपालिकेचे मुख्याधिकारी

| अ.नं. | मुख्याधिकारी नाव | कालखंड |
|---|---|---|
| १. | एन.व्ही.राजोपाध्ये | २.१.१९५९ ते २०.१.१९६० |
| २. | व्ही.के.माने | २१.१.१९६० ते १२.५.१९७५ |
| ३. | डी.जी.ढेकणे | १३.५.१९७५ ते १०.१०.१९७६ |
| ४. | ई.बी.शिंगटे | ११.१०.१९७६ ते २०.८.७७ |
| ५. | एस.ए.पाटील | २२.८.१९७७ ते ९.८.१९७९ |
| ६. | एम.पी.माळवदे | १०.८.१९७९ ते २३.९.१९७९ |
| ७. | आर.के.सांळुखे | २४.९.१९७९ ते १३.४.१९८० |
| ८. | एम.पी.शिंदे | १४.४.१९८० ते ८.९.१९८० |
| ९. | जी.पी.भोकरे | ९.९.१९८० ते १४.७.१९८३ |
| १०. | व्ही.एन.भालेकर | १५.७.१९८३ ते २९.२.१९८४ |
| ११. | जी.पी.भोकरे | १.३.१९८४ ते  १०.०२.१९८५ |
| १२. | एच.ए. महाडीक | ११.२.१९८५ ते १४.५.१९८५ |
| १३. | बी.ए.गोडसे | १५.५.१९८५ ते ५.५.१९८७ |
| १४. | बी.ए.पाटील | ६.५.१९८७ ते ३१.५.१९८७ |
| १५. | आर.ए.मंडलिक | १.६.१९८७ ते २३.६.१९८७ |
| १६. | सी.टी.गिते | २४.६.१९८७ ते २५.९.१९८७ |

| अ.नं. | मुख्याधिकारी नाव | कालखंड |
|---|---|---|
| १७. | आर.आर.चव्हाण | २६.९.१९८७ ते २७.९.१९८७ |
| १८. | ए.व्ही.कांबळे | २८.९.१९८७ ते ३.१२.१९८७ |
| १९. | आर.आर.माने | ४.१२.१९८७ ते ३१.३.१९८८ |
| २०. | प्र.भा.कडूसकर | १८.९.१९८८ ते २५.९.१९८८ |
| २१. | आर.आर.चव्हाण | २६.९.१९८८ ते १.१०.१९८८ |
| २२. | प्र.भा.कडूसकर | २.१०.१९८८ ते ६.१०.१९८९ |
| २३. | आर.आर.माने | ७.१०.१९८९ ते ७.११.१९८९ |
| २४. | प्र.भा.कडूसकर | ८.११.१९८९ ते १.५.१९९० |
| २५. | एस.आर.शिंदे | २.५.१९९० ते १६.१२.१९९० |
| २६. | बी.एल.कांबळे | १७.१२.१९९० ते ७.१.१९९१ |
| २७. | एम.डी.सावलीकर | ८.१.१९९१ ते १.२.१९९२ |
| २८. | कृ.ग.घायताडे | ३.२.१९९२ ते १८.२.१९९२ |
| २९. | एल.बी.सावंत | १९.२.१९९२ ते २०.४.१९९२ |
| ३०. | दि.म.पायगुडे | २१.४.१९९२ ते २९.४.१९९२ |
| ३१. | कृ.ग.घायताडे | ३०.४.१९९२ ते ५.८.१९९२ |
| ३२. | एल.बी.सावंत | ६.८.१९९२ ते २.१२.१९९२ |
| ३३. | एस.के.प्रभुणे | ३.१२.१९९२ ते ३१.८.१९९३ |
| ३४. | व्ही.एन.देवकुळे | १.९.१९९३ ते २०.९.१९९३ |
| ३५. | एस.के.प्रभुणे | २१.९.१९९३ ते २.९.१९९४ |
| ३६. | व्ही.एन.देवकुळे | ३.९.१९९४ ते ३१.३.१९९४ |
| ३७. | जी.एल.घोणे | १.४.१९९४ ते ५.६.१९९४ |
| ३८. | एन.टी.पाटील | ६.६.१९९४ ते ३.१.१९९५ |
| ३९. | जी.एल.घोणे | १८.१.१९९५ ते २४.४.१९९५ |
| ४० | ए. आर.पवार | २५.४.१९९५ ते २.७.१९९५ |
| ४१. | व्ही.व्ही.अवताडे | ३.७.१९९५ ते ३१.८.१९९६ |
| ४२. | समीर उन्हाळे | २.९.१९९६ ते १०.९.१९९६ |
| ४३. | टी.आर.लवंगारे | ११.९.१९९७ ते ३१.३.१९९८ |
| ४४. | एच.के.राजोपाध्ये | १.४.१९९८ ते ३१.१२.१९९९ |
| ४५. | टी.आर.लवंगारे | १.१.२००० ते ३१.१२.२००० |
| ४६. | एच.के.राजोपाध्ये | १.१.२००१ ते ७.४.२००२ |
| ४७. | एन.बी.काटकर | ८.४.२००२ ते २९.४.२००२ |
| ४८. | एम.एन.दरेकर | ३०.७.२००२ ते २०.११.२००५[८५] |

मुख्याधिकारी हा नगरपालिकेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असल्याने त्याच्या कार्यक्षमतेवर नगरपालिकेचा विकास अवलंबून असतो. लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांच्यातील संबंध सलोख्याचे असतील तर नगरपालिकेचा विकास चांगल्या प्रकारे होतो. एखादा

मुख्याधिकारी भ्रष्ट निघाला किंवा लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांच्यात बेबनाव निर्माण झाला तर त्याचा परिणाम जनतेवर होतो. जनतेला त्याची सेवा मिळत नाही. म्हणून नगरपालिकेचे मुख्याधिकारी कार्यक्षम व दक्ष असला पाहिजे. तर नगरपालिका प्रशासन सुनियंत्रित चालते.

### २.६.८ इतर प्रशासकीय कर्मचारी

मुख्याधिकारी यांना नगरपालिका प्रशासन कामकाजात मदत करण्यासाठी व सहकार्य करण्यासाठी इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केलेल्या असतात.

### २.६.९ नगरपालिकेची विविध खाती

नगरपालिकेत अध्यक्ष, उपाध्यक्ष व समित्या आणि त्यांचे सभापती यांची निवड केली जाते. या समित्यामध्ये खालील विभागांचा समावेश होतो.

१) आस्थापना विभाग

२) सार्वजनिक बांधकाम खाते

३) आरोग्य समिती

४) पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती

५) जकात विभाग

६) नगदी खाते

७) विद्युत विभाग

८) दप्तरखाना

९) कर विभाग

१०)अन्न भेसळ प्रतिबंधक विभाग

११) वृक्ष व संवर्धन विभाग

१२) आग प्रतिबंधक विभाग

१३) नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ

१४) दुकान विभाग

१५) भांडार विभाग

१६) नियोजन व विकास समिती,

१७) महिला व बालकल्याण समिती,

१८) मागासवर्गीय व विशेष कल्याण समिती

वरील सर्व विभागामार्फत नगरपालिकेचा प्रशासकीय कारभार चालविला जातो. शहरातील विविध कामाची वर्गवारी करून खातेवार मंजुरीसाठी ती–ती कामे त्या–त्या विभागाकडे जातात.[८६]

**२.६.९.१ आस्थापना विभाग**

या विभागाकडे प्रशासकीय अधिकारी–१, लिपीक–टंकलेखक–३, विधी व कामगार पर्यवेक्षक–१, लिपीक–टंकलेखक १)कार्यालयीन कामकाज–४, २) आस्थापना–३, ३)आवक जावक–१, लघुटंकलेखक–१, वाहनचालक–१ व शिपाई– १२ असे कर्मचारी असतात.[८७]

**कामे**

आस्थापना कामे यामध्ये रोस्टर बिंदू नामावली प्रमाणे नोंदवही ठेवणे, पगार काढणे, हजेरी पत्रकाद्वारे सेवापुस्तके अद्ययावत ठेवणे. वेतनवाढ व कर्मचाऱ्यांच्या रजा मंजूर करणे. वर्षाला ३० रजा मंजूर केल्या जातात. शासकीय नियमानुसार निवृत्तीनंतर सेवा अभिलेख पुर्ण करून पेन्शनसाठी निवृत्तीच्या तारखेस पुर्तता केली जाते.

संबंधित कर्मचारी दोषी आढळल्यास कामात हलगर्जीपणा केल्यास दंडात्मक कारवाई केली जाते. बदली आदेश काढणे, कारणे दाखवा नोटीस बजावणे, सेवकांची सेवा ज्येष्ठता प्रसिद्ध करणे इत्यादी कामे करावी लागतात.[८८]

**२.६.९.२ सार्वजनिक बांधकाम खाते**

या विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणे होती. नगर अभियंता–१, उपअभियंता–१, नगरपरिषद अभियंता निवडश्रेणी–१, नगरपरिषद अभियंता श्रेणी–अ–१, कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक–३, लिपिक टंकलेखक–४, मुकादम–१०, शिपाई–२, मजूर(बिगारी)–१३, आरेखक–(ट्रेसर)–१, रखवालदार–१६, कामाठी–१० इत्यादी.

**कामे**

**१. नगर अभियंता**

सार्वजनिक बांधकाम विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याना आपल्या विभागासंबंधित असणारी सर्व कामे करावी लागतात. यामध्ये नगर अभियंत्यास टाऊन प्लॅनिंग स्कीम व गावठाणमधील इमारतीची परवानगीची कामे पाहणे. इंजिनियरला रस्त्यांची पाहणी करणे, रस्ते

बांधकाम, गटार बांधकाम, इमारतीचे बांधकाम, संडास व मुताऱ्याचे बांधकाम व शासकीय योजना बांधकाम, नदी व ओढयावरील पुलाचे बांधकाम इत्यादी स्वरूपाच्या बांधकामाची पाहणी व आखणी करावी लागते.

२. उपअभियंता

सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत चालू असणारी बांधकामे नियमाप्रमाणे होतात की नाही, हे पाहणे. जर ती कामे नियमानुसार होत नसतील तर त्यांना नोटीसा देणे. एखादे काम बिगर परवाना चालू असल्यास त्यास त्या बांधकामाचे पंचनामे करून मा.स्थायी समितीकडे पाठविणे, रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे, बिल्डिंग परमिशन रजिस्टर अद्ययावत ठेवणे, इंजिनियर, चीफ ऑफिसरने सांगितलेली कामे करणे.[८९]

**२)गटारे बांधणी**

नगरपालिकेने सातारा शहरात पक्की गटारे १०७ कि.मी. लांबीची बांधली आहेत. कच्ची गटारे २२ कि.मी.लांबीची बांधली आहेत. सन १९१८–१९ मध्ये सातारा नगरपालिकेने सदाशिव पेठ, प्रतापगंज पेठ व बुधवार पेठेत पक्की गटारे बांधण्यासाठी १० हजार रूपये खर्च केले आहे.

**३) सार्वजनिक संडास**

सातारा शहरात जी खाजगी शौचालये आहेत त्याची संख्या अपुरी असल्याने नग्रपालिकेने सार्वजनिक शौचालयाची निर्मिती केली आहे. त्याची संख्या ८५६ एवढी आहे. सन १९२१–२२ मध्ये सातारा शहरात नऊ ठिकाणी शौचकूप बांधून त्यासाठी पाच हजार रूपये खर्च केले होते.

**४) सार्वजनिक मुताऱ्या**

सातारा नगरपालिकेने आरोग्याचे महत्त्व ओळखून सातारा शहरात एकूण ८७ सार्वजनिक मुताऱ्यांचे बांधकाम केले आहे.

**५) समाज मंदिरे व धर्मशाळा**

सातारा शहरात नगरपालिकेने एकूण वीस समाज मंदिराचे बांधकाम केले आहे. ही समाज मंदिरे वेगवेगळया समाजासाठी बांधलेली आहेत. या शिवाय सातारा शहरात नगरपालिकेच्या एकूण चार धर्मशाळा आहेत. त्या मंगळवार पेठेतील विठोबा धर्मशाळा, मंगळवार पेठेतील बोगदा धर्मशाळा, बुधवार पेठेतील नाक्याजवळील धर्मशाळा व मल्हार पेठेतील

पंचमुखी मारूती धर्मशाळा इत्यादी आहेत.[९०]

**२.६.९.३ मार्केट(मंडई)**

**अ) भाजीपाला मार्केट**

नगरपालिकेचे भाजीपाल्याचे व फळफळाचे मार्केट सदाशिव पेठेत आहे. त्यामध्ये पक्क्या इमारतीचे बंदिस्त असे ७२ गाळे आहेत. तसेच वर छप्पर असलेले पण बाजूने खुले असलेले गाळे एकूण २० आहेत. सहा बांधिव ओटे असून त्यावर ११४ बसावयाच्या जागा आहेत. मार्केटमधील मोकळया जागा लोकांनी भाडयाने घेऊन त्यावर आपल्या खर्चाने शेडस घातलेल्या आहेत. याखेरीज बाहेरून येणारे लोकांना बसण्यासाठी खाली वेगळी जागा आहे.

याशिवाय सातारा शहरात रविवार पेठ भाजी मंडई, युनियन क्लब भाजी मंडई व सदर बझार भाजी मंडई अशा तीन मंडई आहेत.तसेच सातारा शहरात दोन आठवडी बाजार भरत असतात.[९१]

**ब) मटण मार्केट**

सातारा शहरात नगरपालिकेने मटण मार्केटची स्वतंत्र इमारत बांधलेली आहे. या इमारतीमध्ये २५ गाळे आहेत.

**क) मासे मार्केट**

या मार्केटसाठी नगरपालिकेने ५ गाळे बांधलेले आहेत.

**ड) फळफळावळ मार्केट**

हे मार्केट भवानी पेठेत बांधले असून त्याचे प्रत्येकी १२ गाळे आहेत. याशिवाय पत्र्याचे ९ गाळे स्वतंत्र आहेत. येथे एक ओटा बांधलेला असून त्यावर १५ फळविक्रेते बसू शकतात एवढया रूंदीचे आहेत.

**इ) शॉपिंग सेंटर**

सातारा नगरपालिकेने सातारा शहरात २० शॉपिंग सेंटरची निर्मिती केली आहे.

**७) शाळा इमारती**

सातारा नगरपालिकेने सातारा शहरातील प्राथमिक शाळासाठी १२ इमारती बांधल्या आहेत.

### २.६.९.४ नगरपालिकेच्या इमारती

सातारा नगरपालिकेने सातारा शहरात ज्या इमारती बांधलेल्या आहेत त्यामध्ये नगरपालिका स्थापनेच्या वेळी बांधलेली इमारत ही सदर बाजारात असून तेथे वसुली विभागाचे ऑफिस आहे. याशिवाय व्ही.एन. पाटील यांच्या बंगल्या पाठीमागे नगरपालिकेची जुनी इमारत आहे. ही इमारत सन १९१५ मधील असून ६८९६.३ चौरस मिटर आहे. सदर बाजार शॉपिंग सेंटर येथे ८० गाळे आहेत. जुना मोटर स्टँड याठिकाणी ३२ पत्रा शेड आहेत. गुरूवार परज शॉपिंग सेंटर येथे २४ गाळे आहेत. मटण मार्केटमध्ये २५ गाळे आहेत. भवानी पेठेतील फ्रुट स्टॉल येथे १२ गाळे आहेत. सुमित्राराजे भोसले शॉपिंग सेंटरमध्ये ३१ गाळे आहेत. सदाशिव पेठेत मच्छी मार्केटमध्ये २४ गाळे नगरपालिकेच्या मालकीचे आहेत. प्रतापसिंह महाराज व्यापारी संकुलात नगरपालिकेच्या मालकीचे २५ गाळे आहेत. भवानी पेठेत म्युनिसिपल ऑफिस, दप्तरखाना इमारत, जलछत्री इमारत. शुक्रवार पेठेत फरासखाना, जकात नाके व गाडीखाना. सोमवार पेठेत पूज्य कस्तुरबा प्रसूतिगृह, म्युनिसिपल धर्मशाळा व बंबखाना. बुधवार पेठेत बुधवार जकात नाके व धर्मशाळा इमारत बांधली आहे. मंगळवार पेठेत कात्रेवाडा, बंबखाना, धर्मशाळा मंगळवार नाके, धर्मशाळा. सदाशिव पेठेत मंडई पूल इमारत, शनिवार पेठेत चार सार्वजनिक संडास, मटण मार्केट इमारत, सार्वजनिक हौद इमारत, खाटीकखाना. मल्हारपेठेत धर्मशाळा, पंताचा गोट येथे तारतखाना, जकात नाके इमारत, करंजे येथे जकात नाके इमारत, सती नाके इमारत. रविवार पेठेत सार्वजनिक तारतखाना, धर्मशाळा. गुरूवार पेठेत गुरूवार बंब, शिरंबेकर चौक इमारत, शिर्केवाडा अर्धा भाग, म्युनिसिपल शाळा इमारत, केसरकर पेठेत सिग्रीगेशन कँप इमारत, शाहू कला मंदिर यामध्ये एक नाटयगृह आहे. सार्वजनिक संडास, भवानी पेठेत म्युनिसिपल ऑफिस इमारत व युनियन क्लब केसरकर पेठेत नवीन नगरपालिका इमारत व मंगल कार्यालय इत्यादी इमारती आहेत.

### सातारा शहरातील नगरपालिकेच्या जागा

प्रतापगंज पेठेत मंडई चाळ, सदाशिव पेठेत मंडई दुकानांची जागा, शनिवार पेठेत रोडरोलर ठेवण्यासाठीची जागा व भवानी पेठेत मोकळी जागा, प्रतापसिंह उद्यानाची जागा, जवाहरबागेची जागा, युनियन क्लबची खुली जागा व म्युनिसिपल ऑफिसमागील जागा इत्यादी मोकळया जागा सातारा नगरपालिकेच्या स्वतःच्या मालकीच्या आहेत.[१२]

### २.६.९.५ पाणीपुरवठा व जलनिःसारण समिती

मानवी जीवनास पाणी हा घटक अत्यंत गरजेचा असल्याने शहरास चांगल्या प्रकारे पाणीपुरवठा व्हावा या हेतूने सातारा नगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलल्याचे दिसते. लोकांना चांगल्या पद्धतीचे पिण्याचे पाणी मिळावे या हेतूने पाणीपुरवठयाची पहिली सोय छत्रपती शाहू महाराजांनी सन १७३९ मध्ये केली. त्यांनी यवतेश्वर डोंगरवरच्या उतरणीवरील झऱ्याचे पाणी खापरी नळाद्वारे सातारा शहरात आणले. शहरात ठिकठिकाणी हौद बांधून लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय केली. तसेच शहरात ठिकठिकाणी हौद बांधण्यास उत्तेजन दिले. श्रीमंत प्रतापसिंह महाराजांनी नवीन झरे पहिल्या झऱ्यात सामील करून या योजनेत सुधारणा केल्या. तसेच महादरे तलाव बांधला. त्यांचे अर्धवट राहिलेले काम श्रीमंत आप्पासाहेब महाराजांनी पुर्ण केले. त्यांच्या काळात घरोघरी पाण्याची सोय नव्हती तसेच सार्वजनिक हौद १६ होते तेंव्हा त्यामध्ये सुधारणा करून घरोघरी नळाद्वारे पाणीपुरवठा केला गेला. पुढे हे पाणी सातारा शहरास कमी पडू लागले, सन १८८१ मध्ये कासच्या तलावाचे बांधकाम नगरपालिकेने करून तेथून पाणीपुरवठा शहरास सुरू झाला.[९३] या तलावाचे बांधकाम सन १८८६ साली पुर्ण झाले. या तलावाचा खर्च त्यावेळी रूपये ३,६९,१६४ इतका झाला होता. या तलावात ७,३७,३७,०६० घनफूट पाणी साठवण क्षमता होती. या तलावातून पाणी पाटाद्वारे शहरास आणण्यात आले.[९४]

सन १९५३–५४ मध्ये नगरपालिका हद्दीत १६०१ खाजगी नळ, १७३ सार्वजनिक नळ, ५७ सार्वजनिक हौद व ५ गुरांना पाणी पिण्याचे हौद होते. या काळात सातारा शहरास ८ लाख ग्यालन पाणी पुरविले जात होते. व कॅम्पमधील लोकांना सुद्धा याच पाणीपुरवठयांमधून पाणी पुरविले जात होते.[९५]

नगरपालिकेत पाणीपुरवठा समिती आहे या समितीत प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. पाणीपुरवठा, जलनिःसारण व स्वच्छता अभियंता(श्रेणी–अ)–१, उपअभियंता–१, कनिष्ठ पाणीपुरवठा, जलनिःसारण व स्वच्छता पर्यवेक्षक– २, पंपचालक–५, पंप ऑपरेटर/वीजतंत्री/प्रयोगशाळा सहाय्यक–३, गाळणी चालक/ प्रयोग शाळा सहाय्यक–५, लिपिक–टंकलेखक–२, व्हॉलमन– ३, रखवालदार–३, शिपाई–१, पाणीपुरवठा पर्यवेक्षक–१, प्लंबर–८, पाटकरी–४ इ. आहेत.

**पाणीपुरवठा व जलनिःसारण समितीची कामे**

पाईपचे लिकीज काढणे, खाजगी नळ कनेक्शन देणे, गटार घाणपाणी काढणे, बोअर दुरूस्ती करणे, नवीन कनेक्शन देणे, जुने बंद करणे, पाणी साठवण टाक्याची साफसफाई महिन्यातून दोन वेळा करणे.[९६]

**२.६.९.८ पाणीपुरवठा योजना**

सातारा शहराची २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १,०८,०४८ इतकी आहे. या लोकसंख्येस खालील ठिकाणाहून पाणीपुरवठा केला जातो. सातारा नगरपालिकेच्या स्थापनेनंतर शहराच्या पाणीपुरवठयासाठी विशेष प्रयत्न केले. सांबरवाडीपासून नवीन झरे तयार करून पाणी आणणेसाठी सन १८६० ते १८६२ पर्यंत ९०३३/– रूपये खर्च केले. सन १८७० मध्ये मंगळवार तळयाच्या आग्नेय कोपऱ्यात विहीरवजा बांधकाम करण्यासाठी २०६९/– रूपये खर्च केले. सन १८८० मध्ये महादरे तलावाची वाढ केली. तरीही पाणीपुरवठा अपूर्ण पडू लागला. म्हणून नगरपालिकेने कास तलावाची योजना हाती घेतली. या तलावाचे बांधकाम सन १८८१ साली सुरू होऊन सन १८८६ मध्ये काम पूर्ण झाले. यासाठी ३,६९,१६४/– रूपये एवढा खर्च आला होता. याच पाण्यावर पुढे सन १९३५ मध्ये विजनिर्मिती होऊ लागली. त्याला १,८४,०००/– रूपये खर्च झाला. सन १९७७ मध्ये कास पाणीपुरवठा सुधारित योजना १७५ लाख मंजूर करण्यात आले. तर कृष्णा माहूली पाणीपुरवठा योजनेतून सरकारतर्फे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा केला जातो. तसेच अलीकडेच शासनाने शहापूरउरमोडी पाणीपुरवठयाची योजना मंजूर केली आहे. त्याचा शुभारंभ २००० मध्ये झाला.[९७]

**नगरपालिकेद्वारे सातारा शहरास सन २००३–०४ मधील पाणीपुरवठा केल्याची माहिती**

१) शहरातील एकूण लोकसंख्या (२००१ च्या जनगणनेनुसार) १,०८,०४८

२) एकूण दररोज होणारा पाणीपुरवठा १३.०० (MLD)

३) नगरपालिकेच्या स्त्रोतापासून दररोज होणारा पाणीपुरवठा ५.५० (MLD)

४) पाणी पुरवठयाचे एकूण तास कमाल तास–१.३० किमान तास– १ तास[९८]

सातारा शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या जुन्या झाल्याने मुबलक पाणीपुरवठा होत नाही म्हणून नगरपालिकेने या जलवाहिन्या नवीन टाकण्याचे नियोजन करून त्यासाठी आराखडा तयार केलेला आहे. तसेच कास तलावाच्या पाटाची पाईप लाईन बंदिस्त

करणे, सांबरवाडी फिल्ट्रेशन प्लॅटचे आधुनिकीकरण करणे, वितरण टाक्या व वितरण व्यवस्थेचे कामे करणे या योजना हाती घेतल्या आहेत. यासाठी निधी जमविण्याचे कार्य नगरपालिकेने हाती घेतले आहे. हा निधी उपलब्ध करण्यासाठी नगरपालिका केंद्र व राज्य सरकार यांच्याकडे मागणी करत आहे.

**पाणीपुरवठा योजनेवरील वार्षिक खर्च(२००३–०४)**

१) पाणी खरेदीवरील खर्च–६३,६३,४०५/–

२) पाणी शुद्धीकरणावरील खर्च–१,११,९३०/–

३) विजेवरील खर्च–१,०२,३२०/–

४) कर्मचारी व आस्थापनावरील खर्च–३५,२७,३४७/–

५) देखभाल व दुरूस्ती खर्च–१,२९,३०,०११/–

६) व्याज व घसारा खर्च २,३०,६६,३९३/–

७) इतर खर्च–३१,३८०/–[९९]

**२.६.९.९ आरोग्य समिती**

शहरातील रस्ते, गटारे याची साफसफाई करणे, साथीचे रोग पसरू नयेत म्हणून प्रतिबंधक उपाय योजणे. सातारा नागरी रूग्णालयाची स्थापना सन १८४० मध्ये छत्रपती अप्पासाहेब महाराज यांनी केली. प्रारंभी साताऱ्याच्या नागरी रूग्णालयात सातारा शहरातील जनतेच्या मोफत औषधोपचारासाठी स्वतंत्र विभाग, तसेच जिल्हा पोलीस कर्मचारी, स्त्री रूग्ण व बाहय रूग्ण यासाठी स्वतंत्र विभाग होते. सन १८७४ मध्ये सातारा नगरपालिकेने लस टोचणीचे काम सुरू केले.[१००]

सातारा नगरपालिकेच्या हद्दीत आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयास व सिव्हील हॉस्पिटल आहे. तेव्हा नगरपालिकेकडून दरसाल या हॉस्पिटलला व आर्यांग्ल महाविद्याल्यास अनुक्रमे ३५० रू. व एक हजार रूपये ग्रँट दिली जाते. याप्रमाणे गावांतील जनतेच्या औषधोपचाराची सोय असल्यामुळे नगरपालिकेने आपला स्वतःचा दवाखाना ठेवलेला नाही. संसर्गजन्य रोगासाठी नगरपालिकेने स्वतंत्र दवाखान्याची सोय केली आहे. हा दवाखाना सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस आहे. त्या दवाखान्यात ६ बेडसची सोय करण्यात आलेली आहे. येथे येणाऱ्या रूग्णांना सिव्हिल हॉस्पिटलमधील डॉक्टर उपचार करतात. या त्यांच्या मेहनतीबद्दल

त्यांना मानधन नगरपालिकेकडून दिले जाते. या दवाखान्यासाठी जो खर्च सातारा सबर्बन म्युनिसिपालिटी देते. या दवाखान्यात लोकल बोर्डाचे हद्दीतील जे रोगी येतात त्यांच्याबद्दल सरासरी खर्च नगरपालिकेस द्यावा लागतो.[१०१]

सातारा नगरपालिकेने सन १९४७–४८ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागावर मोठया प्रमाणावर खर्च केला आहे. नगरपालिकेने सन १९४८–४९ या वर्षी साथीच्या रोगांना परावृत्त केले होते. औषधांची मोफत सोय केली होती. सातारा शहरात प्लेगची साथ येऊ नये म्हणून उंदीर निर्मूलनाची योजना सर्वत्र राबविली होती. सन १९६६–६७ पासून शहरात एकही देवीचा रोगी सापडला नाही. देवी काढण्यासाठी एक स्वतंत्र व्हॅक्सिनेटर व त्याच्या हाताखाली एक शिपाई आहे. गावात निरनिराळया दिवशी देवी काढण्यासाठी सात ठिकाणे ठरविलेली होती. देवी डॉक्टरच्या पगारासाठी नगरपालिकेकडून सरकारकडे सालिना रू.४०८ भरण्यात येतात. यावरून असे स्पष्ट होते की सातारा शहरातून देवी रोगाचा नायनाट झालेला आहे.[१०२]

सातारा नगरपालिकेने देवी रोगाच्या निर्मूलना नंतर कॉलरा रोगाचे निर्मूलन करण्यास प्रारंभ सन १९४७ साली केला. सातारा शहरात सन १९४७ ते सन १९६५ या दरम्यानच्या काळात एकूण ९ लोक मरण पावले होते. तेव्हा कॉलरा रोग सातारा शहरात पसरू नये यासाठी नगरपालिकेने काळजी घेतल्याचे दिसून येते. साथीच्या रोगास नियंत्रित ठेवण्यासाठी नगरपालिकेने प्रत्येक वार्डात औषध फवारणीचे काम हाती घेतले होते. कॉलरा रोग शहरात स्वच्छता राखल्याने दूर होण्यास मदत झाली आहे.

फ्ल्यू व मलेरिया यांचा प्रादुर्भाव शहरात होऊ नये यासाठी नगरपालिकेने शहरातील पाणथळ डबकी, पाणथळ जागा, दररोज कुडाईलने स्प्रे करण्याची मोहिम तसेच डी.डी.टी.ने व मॅलिथियॉनने संपूर्ण शहरातील घरे फवारण्यात आली आहेत.[१०३]

सातारा शहरात स्वच्छता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक व खाजगी शौचकूप मेहत्तर लोकाकडून साफ करून घेतली जातात. खाजगी शौचकूपातील मैला ठिकठिकाणी केलेल्या डेपोमध्ये जमा केला जातो. तेथून तो मोटारने गेंडामाळावरील खड्डयात टाकला जातो. मैला व मुत्र वाहतुकीसाठी दोन मोटारी नगरपालिकेने ठेवलेल्या आहेत. सातारा शहरात एकूण अकरा सार्वजनिक मुताऱ्या आहेत. या मुताऱ्या स्वच्छ ठेवण्यासाठी एक भिस्ती कामावर असून तो त्यामध्ये पाणी टाकून त्या साफ ठेवितो.

शहरातील रस्ते झाडण्यासाठी स्त्री कामगार आहेत. रोज गोळा केलेला कचरा ठिकठिकाणी ठेवलेल्या एकूण १८० केराच्या कोंदाळयात साठविला जातो. तेथून तो रोजच्या रोज मोटारीने गेंडामाळावर नेऊन टाकण्यात येतो. शहरातील गटारे स्वच्छ करण्यासाठी, ही नगरपालिकेने काही पुरूष कामगार ठेवले आहेत.[१०४]

सातारा नगरपालिका जे कस्तुरबा प्रसुतीगृह सन १९३१ पासून चालवित आहे. या प्रसूतिगृहाची सुमारे रू.१५,५२५ ची रोकड रक्कम व सामान सुमान सेवाभावी संस्थेकडून नगरपालिकेच्या ताब्यात देणेत आले. त्यावेळी सदर प्रसूतिगृहासाठी नवीन इमारतीची गरज भासू लागली तेव्हा नगरपालिकेने रू.८००० खर्च करून नवीन इमारत बांधली.[१०५]

आरोग्य विभागाकडे दवाखान्यातील मेडिकल ऑफिसर, सॅनि.इन्स्पेक्टर, सिनियर क्लार्क, लेडी डॉक्टर–१, लिपिक–टंकलेखक–१, परिचारिका–३, ड्रेसर–२, ट्रेंड दाई– ६, आया–३ , ड्रायव्हर, मुकादम, शिपाई, वॉचमन, क्लिनर, सफाई कामगार, ड्रेनेज कामगार इत्यादी कर्मचारी वर्ग आहे. सॅनिटरी इन्स्पेक्टरला शहराची रोज पाहाणी करणे, रोग उद्‌भवण्याची शक्यता असल्यास रिपोर्ट देणे, आरोग्य खात्यावर देखरेख ठेवणे, नियमांची अंमलबजावणी करणे, साथीचे रोग उद्‌भवल्यास तातडीने चौकशी करणे, जन्म–मृत्यू रजिस्टर अद्ययावत करणे, मार्केट, खाटीकखाने, यांची पाहणी करून तेथे नेहमी स्वच्छता राहील अशी व्यवस्था करणे, शहरातील स्वच्छतागृहाची व्यवस्था पहाणे इ. कामे पहावी लागतात.[१०६]

### २.६.९.१० जकात विभाग

या विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या व कर्मचारी पुढीलप्रमाणे एक जकात अधिक्षक, तपासदार ११, लिपीक ३० व शिपाई २५ एवढी आहे. या विभागाची कामे कापड, धान्य, कडधान्य, तेल, कॉस्मेटिक, सिगारेट, गुटखा, सोने, औषधे, स्टील, पत्रा, लाकूड, सिमेंट, फरशी, साबण, साखर, गुळ, ऊस, कपाट, काचा, टेबल, खुर्ची इत्यादी मालावर १ ते ४ टक्केपर्यंत जकात घेतली जात होती. जकात चुकविणाऱ्यास नियमानुसार होणारी जकात व १० पट दंड वसूल केला जात असे. मुक्कामी थांबल्यास अनामत रक्कम भरावी लागत होती. ती रक्कम जाताना परत मिळत असे.

**सातारा शहरातील जकात नाके**

सातारा शहरात एकूण ९ जकात नाकी होती. या सर्व नाक्याचे मुख्य ऑफिस राजवाडा या ठिकाणी होते. ही जकात नाकी पुढील ठिकाणी होती.

१) बोगदा नाका – मंगळवार पेठ

२) गेंडामाळ नाका – करंजे तर्फ सातारा

३) बुधवार नाका – बुधवार पेठ

४) करंजे नाका – करंजे पेठ

५) जरंडेश्वर नाका – सदर बाजार

६) खेड नाका – सदर बाजार

७) लोकमान्यनगर नाका – विसावा कँप

८) शिवाजीनगर नाका – गोडोली

९) एस.टी.नाका – एस.टी.स्टँड

या प्रत्येक नाक्यावर ३ शिपाई, ३ क्लार्क एवढी संख्या होती. तर फिरते पथक यामध्ये ६५ अधिकारी व सेवक संख्या यामध्ये अधिक्षक, तपासदार, क्लार्क व शिपाई इत्यादीचा समावेश होता.[१०७]

**२.६.९.११ नगदी खाते (लेखे)व अंदाजपत्रक विभाग**

या विभागात नगरपरिषद लेखाधिकारी श्रेणी–अ–१, लेखापाल(अकौंटंट)–१, सहायक लेखापाल–१, लिपिक–टंकलेखक(रोखपाल)–१, लिपिक–टंकलेखक(लेखा)–७, शिपाई–२ एवढे कर्मचारी असतात. नगरपालिकेकडून दरवर्षी होणारा खर्च व पुढील वर्षातील आखलेले कामासंबंधीचे बजेट ठरवून त्याप्रमाणे पैसा पुरविणे व जमाखर्च ठेवण्याचे काम या खात्यावर असते. या विभागावर देखरेख ठेवण्याचे काम अकौटंट करीत असतो.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ व बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट कोड मधील तरतूदीस अनुसरून अकौन्टन्ट याने नगरपालिकेच्या हिशेबाची सर्व ती जबाबदारी स्वीकारावयाची आहे. त्यासाठी लागणारे रजिस्टर फॉर्मस व इतर साहित्य घेऊन ती पूर्ण करावयाची आहे. तसेच वार्षिक बजेट व दुरूस्त अंदाजपत्रक, वार्षिक रिपोर्ट तिमाही, सहामाही, नऊमाही व बारमाही हिशेब तयार करून देणे व ते प्रसिद्ध करणे, हाताखालील नोकर वर्गाकडे

कामाची वाटणी करून देणे व त्याप्रमाणे काम पूर्ण करून घेणे.

या विभागातील कॅशियरला पुढील प्रकारची कामे करावी लागतात. यामध्ये रोजची जमा करणे, मंजूर बिलाप्रमाणे रक्कमा अदा करणे, जमा खतावणी लिहीणे, जमेचा भरणा बँकेत रोजचे रोज भरणे, डिपॉझिट-ॲडव्हान्स वगैरे सर्व रजिस्टर्स अद्ययावत लिहिणे इत्यादी कामे त्यास पार पाडावी लागतात.[१०८]

### २.६.९.१२ विद्युत विभाग

सन १९३५ मध्ये सातारा नगरपालिकेने १,८४,००० रूपये खर्च करून पाणीपुरवठयाबरोबर वीज उत्पादन सुरू केले. त्यामुळे शहरात विजेचा पुरवठा होऊ लागला. रस्त्यावरील दिव्यांची सोय तीन प्रकारे केली आहे. इलेक्ट्रीकचे दिवे, गॅसच्या बत्त्या व रॉकेलचे कंदील इत्यादी आहेत. रस्त्यावरील मुख्य चौकात ९७ विजेचे मोठे मर्क्युरी व्हेपर लॅम्पस लावले आहेत. शिवाय ठिकठिकाणी १५ वॅटचे ३३, २५ वॅटसचे १५७, ४० वॅटसचे ९४, ६० वॅटसचे १९ व १०० वॅटसचे १ असे एकूण ३१४ इलेक्ट्रिक दिवे लावण्यात आलेले आहेत. एकूण या दिव्यांचा वर्षाचा खर्च रू.१७ हजार येतो. या विभागात नगरपरिषद अभियंता-१, विद्युत अभियंता-१, कनिष्ठ विद्युत पर्यवेक्षक-१, तारतंत्री (वायरमन)४, लिपिक-टंकलेखक-२, शिपाई-१ एवढे कर्मचारी असतात.[१०९]

### २.६.९.१३ दप्तरखाना

या विभागात लिपिक-टंकलेखक-१, शिपाई-१ एवढे कर्मचारी असतात. सर्व विभागातील कोरी बुक्स, रजिस्टरे, फॉर्म्स यांची छपाई करणे, पावती बुके, रजिस्टर्स सर्व खात्यास पुरविणे, सर्व कर्मचाऱ्यांना लागणारे साहित्य आणणे व पुरविणे, सरकारने ठरविलेल्या पद्धतीप्रमाणे रेकॉर्ड लावणे व नाशवंत रेकॉर्ड नियमाप्रमाणे नष्ट करणे.[११०]

### २.६.९.१४ कर विभाग

या विभागात कर अधिकारी-१, सहा.कर निरिक्षक/कर अधिक्षक-२, जप्ती निरिक्षक-१, कर निरिक्षक-४, लिपिक-टंकलेखक-२७, शिपाई-२४ कर्मचारी असतात. यामध्ये कर वसुली प्रमुखास बिले, नोटीसा व पेठ क्लार्क नियमाने काढतात की नाही यावर देखरेख करणे, म्युनिसिपल मिळकती लिलावाने देणेची व्यवस्था करणे. वर्ष अखेरची डिमांड रजिस्टर्स जमविण्यास पेठ क्लार्कना सहाय्य करणे, कोंडवाडा अटेंडचे कामावर देखरेख ठेवणे, जनरल

कीर्द स्वतः रोजचे रोज लिहिणे, खात्याचा पत्रव्यवहार पाहणे इत्यादी कामे पहावी लागतात.[१११]

### २.६.९.१५ अन्न भेसळ प्रतिबंधक विभाग

या विभागात एकूण कर्मचारी अन्न निरीक्षक–१, शिपाई–१, लिपिक–टंकलेखक–२ एवढे आहेत. अन्न निरीक्षकाचे काम अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा व त्याखालील नियमानुसार सदर कायद्याची शहरात अमंलबजावणी होते का ते पहाणे, गुन्हेगारांना शोधून काढून त्याच्यावर मुदतीत खटले भरणे, भेसळ प्रतिबंधक खाद्यपेय, जिन्नस यात होणारी भेसळ शोधून काढणे व अशा प्रवृत्तीस आळा घालणे, हॉटेल लायसेन्स, हातगाडी लायसेन्स व तपकीर लायसेन्सबाबत योग्य ती अमंलबजावणी करणे, भाजी मार्केट, मटण मार्केट तपासणी करणे. शहरातील हॉटेल, दुकाने यांना भेटी देणे, त्यांनी बनविलेल्या खाद्यपदार्थाची सॅम्पल घेणे, ती आरोग्य लायब्रीटी पुणे यांचेकडे पाठविणे. दुधाचे नमुने घेणे. खाद्य पदार्थाचे नमूने घेणे, भेसळ प्रतिबंधक परवाना देणे, नुतनीकरण करणे इत्यादी कामे या विभागास करावी लागतात.[११२]

### २.६.९.१६ वृक्ष व संवर्धन विभाग

या विभागात उद्यान पर्यवेक्षक–१, मुख्य माळी–१, सहाय्यक माळी–९, लिपिक–टंकलेखक–३, शिपाई–४ असे कर्मचारी काम करीत. या विभागास वृक्षारोपन, बाग देखभाल, आपत्कालीन कामे, झाडे कटींग करणे वगैरे कामे करावी लागत. सातारा शहरातील उदयानाची नावे पुढीलप्रमाणे–

१) छत्रपती शाहू महाराज उद्यान–गुरूवार पेठ
२) छत्रपती प्रतापसिंह महाराज उद्यान–भवानी पेठ
३) छत्रपती सुमित्राराजे उद्यान–सदरबझार
४) फाशिचा वड स्मारक उद्यान–शाहूपुरी
५) जवाहर बाग–भवानी पेठ
६) शिवसमर्थ उद्यान–मंगळवार पेठ
७) स्मृति उद्यान–अंजिक्यतारा
८) कामटे उद्यान–सदरबझार
९) हुतात्मा स्मारक–नेताजी सुभाषचंद्र बोस चौक
१०) राजमाता जिजाऊ उद्यान–गोडोली

११) पाटील उद्यान– सदरबझार

१२) कर्मवीर उद्यान– गोडोली [११३]

### २.६.९.१७ आग प्रतिबंधक विभाग

या विभागाकडे अग्निशमन अधिकारी श्रेणी–अ–१, सहा.अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक–१, वाहनचालक कम ऑपरेटर–१५, लिडींग फायरमन–२, फायरमन–६, वाहन व्यवहार परिक्षक–१, रोड रोलर ड्रायव्हर–१, लिपिक–टंकलेखक–१, क्लीनर–१५, शिपाई कम ड्रायव्हर–४ इत्यादी कर्मचारी काम करीत असतात. शहरात लागलेली आग विझविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. यासाठी नगरपालिकेने पाच बंब ठेवले आहेत. सन १९४० मध्ये नगरपालिकेने एक मोटार विकत घेतली आहे. यावर ५०० गॅलन पाण्याची टाकी सदैव भरून ठेवलेली आहे. ही मोटार पाहिजे त्यावेळी मिळावी म्हणून तिचेवर ड्रायव्हरला राहणेसाठी नगरपालिकेने जागा दिलेली आहे. निव्वळ आग विझविण्याचे काम सदैव नसल्याने या विभागास मोटारीने रस्त्यावर पाणी शिंपडण्याचे काम दिलेले आहे. सकाळ–संध्याकाळ दररोज मुख्य रस्त्यावरून पाणी शिंपडावे लागते.[११४]

### २.६.९.१८ नगरपालिका शिक्षण मंडळ

सातारा नगरपालिकेने ही सन १९२५ पासून प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी घेतलेली आहे. कायद्यातील तरतूदीप्रमाणे सातारा शहरात नगरपालिका शिक्षण मंडळ आहे. या शिक्षण मंडळाकडून प्राथमिक शिक्षणाचा कारभार चालविला जातो. हे मंडळ १५ मे १९८५ पासून अस्तित्त्वात आले. यामध्ये १० सदस्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये सरकार नियुक्त दोन सदस्य असतात. असे एकूण १२ सदस्य आहेत. या विभागाकडे प्रशासन अधिकारी–१, अकौटंट–१, वरिष्ठ लिपिक–१, कनिष्ठ लिपिक–२, शिपाई–२ इत्यादी कर्मचारी काम करतात.

**सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ कामे**

सातारा शहरात नागरी संस्थेकडून चालविण्यात येणाऱ्या शाळांची संख्या २१ असून त्यातील विद्यार्थी संख्या ४४८१ एवढी आहे. या शाळेतील शिक्षक संख्या १२३ आहे. नागरी संस्थेच्या वर्ग खोल्या १२५ आहेत. या शाळांना संगणक उपलब्ध करून देण्याचे काम शिक्षण मंडळाचे आहे. तसेच शाळेत दुपारच्या जेवणाची व्यवस्था करणे, शाळेत मुलांना मोफत पुस्तके पुरविणे, शालेय गणवेश, नागरी संस्थेचा शिक्षणावरील खर्च, शाळेत शौचालयाची

व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, फर्निचर उपलब्धता, वीज व पंखे व्यवस्था, क्रीडांगण उपलब्ध करून देणे इत्यादी कामे या शिक्षण मंडळास करावी लागतात.[११५]

### २.६.९.१९ दुकाने विभाग

सातारा शहरात कायद्यानुसार सन १९४७ पासून दुकानासंबंधीचा कायदा केलेला आहे. त्यानुसार शहरातील सर्व दुकानांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक स्वतंत्र इन्स्पेक्टर नियुक्त करण्यात आलेला आहे. तो शहरातील सर्व दुकानदारांना असणाऱ्या अडचणीचे निवारण करण्यासाठी मदत करीत असतो.[११६]

### २.६.९.२० भांडार विभाग

नगरपरिषदेच्या या विभागाकडे साहित्य छपाईचे काम असते. याशिवाय नगरपरिषेदच्या कर्मचाऱ्यांचा गणवेश, नगरपरिषदेसाठी लागणारी स्टेशनरी, शहरातील बागबगीचा व रस्ते सफाईसाठी लागणारी हत्यारे पुरविणे तसेच प्रत्येक विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार पुरवठा करणे इ. कामे या विभागाकडे असतात.

या विभागातील नोकरसंख्या पुढीलप्रमाणे असते. सहायक खरेदी पर्यवेक्षक(भांडार) अधिक्षक–१, लिपिक–टंकलेखक–२, शिपाई–२ इत्यादी आहेत.

### २.६.९.२१ नियोजन आणि विकास समिती

या विभागाचे मुख्य काम म्हणजे इमारत बांधकामासाठी परवाना देणे. अनधिकृत विनापरवाना बांधकामावर कारवाई करणे. मंजूर विकास योजने प्रमाणे विकसनाची कामे करणे. शहर नियोजनाची कामे करणे. इत्यादी महत्त्वाची कामे या विभागामार्फत पार पाडली जातात. या विभागातील नोकरसंख्या शासन नियुक्त नगर रचनाकार–१, वरिष्ठ लिपीक–२, कनिष्ठ लिपीक–३, शिपाई–२ इत्यादी आहेत.[११७]

# सातारा नगर परिषद, सातारा, कर्मचाऱ्यांची वेतन श्रेणी

| अ. न. | पदांचे नांव | पद संख्या | चौथ्या वेतन आयोगानुसार दिलेले वेतन(१.१.१९८६) | पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन (१.१.१९९६) |
|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक मुख्याधिकारी | २ | २०००–६०–२३००–दरो–७५–३२००–१००–३५०० | ६५००–२००–१०५०० |
| २. | कामगार अधिकारी | १ | २०००–६०–२३००–दरो–७५–३२०० | ६५००–२००–१०५०० |
| ३. | लेखापाल | १ | १६४०–६०–२६००–दरो–७५–२९०० | ५५००–१७५–९००० |
| ४. | जकात अधिक्षक | १ | १४००–४०–१६००–५०–२३००–दरो–६०–२६०० | ५०००–१५०–८००० |
| ५. | भांडार अधिक्षक | १ | १४००–४०–१६००–५०–२३००–दरो–६०–२६०० | ५०००–१५०–८००० |
| ६. | वसुली अधिक्षक | १ | १४००–४०–१६००–५०–२३००–दरो–६०–२६०० | ५०००–१५०–८००० |
| ७. | आरोग्य निरिक्षक | ३ | १२००–३०–१५६०–दरो–४० २०४० | ४०००–१००–६००० |
| ८. | अन्न निरिक्षक | १ | १२००–३०–१५६०–दरो–४० २०४० | ४०००–१००–६००० |
| ९. | वाहन पर्यवेक्षक | १ | १३५०–३०–१४४०–४०–१८००–दरो–५०–२२०० | ४५००–१२५–७००० |
| १०. | उप लेखापाल | १ | १२००–३०–१५६०–दरो–४० २०४० | ४०००–१००–६००० |
| ११. | वरिष्ठ लिपीक | ३२ | १२००–३०–१५६०–दरो–४० २०४० | ४०००–१००–६००० |
| १२. | लिपीक | ८४ | ९५०–२०–११५०–दरो–२५–१५०० | ३०५०–७५–३९५०–८०–४५९० |
| १३. | मोटार मेकॅनिक | १ | ९७५–२५–११५०–दरो–३०–१६६० | ३२००–८५–४९२० |
| १४. | सहाय्यक मोटार मेकॅनिक | १ | ९५०–२०–११५०–दरो–२५–१४०० | ३०५०–७५–३९५०–८०–४५९० |
| १५. | वाहन चालक, रोड रोलर चालक, प्युन, कम ड्रायव्हर | २६ | ९५०–२०–११५०–दरो–२५–१४०० | ३०५०–७५–३९५०–८०–४५९० |
| १६. | मिडवाईफ नर्स | ४ | १२००–३०–१४४०–दरो–३०–१८०० | ४०००–१००–६००० |
| १७. | ट्रेण्ड दाई | ८ | ७७५–१२–९९५–दरो–१५–१०३०–२०–११५० | २६१०–६०–२९९०–६५–३३००–७०–४००० |
| १८. | गवंडी | १ | ९५०–२०–११५०–दरो–२५–१४०० | ३०५०–७५–३९५०–८०–४५९० |
| १९. | सुतार | १ | ९५०–२०–११५०–दरो–२५–१४०० | ३०५०–७५–३९५०–८०–४५९० |
| २०. | नळकरी | १० | ९५०–२०–११५०–दरो–२५–१४०० | ३०५०–७५–३९५०–८०–४५९० |
| २१ | वायरमन | ४ | ९५०–२०–११५०–दरो–२५–१४०० | ३०५०–७५–३९५०–८०–४५९० |
| २२ | नाईक | २ | ७७५–१२–९९५–दरो–१५–१०३०–२०–११५० | २६१०–६०–२९९०–६५–३३००–७०–४००० |
| २३ | मुकादम | २१ | ७७५–१२–९९५–दरो–१५–१०३०–२०–११५० | २६१०–६०–२९९०–६५–३३००–७०–४००० |

| अ. न. | पदांचे नांव | पद संख्या | चौथ्या वेतन आयोगानुसार दिलेले वेतन(१.१.१९८६) | पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन (१.१.१९९६) |
|---|---|---|---|---|
| २४ | हेडमाळी | १ | ७७५-१२-९९५-दरो-१५-१०३०-२०-११५० | २६१०-६०-२९९०-६५-३३००-७०-४००० |
| २५ | ड्रेसर | २ | ८२५-१५-९००-दरो-२०-१२०० | २७५०-७०-३८००-७५-४४०० |
| २६ | मेड सर्व्हंटस | ६ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| २७ | सहाय्यक माळी | १० | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| २८ | भिस्ती | ३ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| २९ | शिपाई | ७० | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३० | चौकीदार | २० | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३१ | वॉचमन | | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३२ | कामाठी | ११ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३३ | फिल्टर पंप अटेण्डट | ६ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३४ | क्लिनर | १७ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३५ | सार्वजनिक बांधकाम बिगारी | १२५ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३६ | आरोग्य बिगारी | १८० | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३७ | झाडू कामगार | १०० | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३८ | पाटकरी | ६ | ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ३९ | नगर अभियंता | १ | २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | ६५००-२००-१०५०० |
| ४० | अंतर्गत लेखापरिक्षक | १ | २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | ६५००-२००-१०५०० |
| ४१ | वैद्यकीय अधिकारी | १ | २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | ६५००-२००-१०५०० |
| ४२ | आयुर्वेदिक वैद्य | १ | २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | ६५००-२००-१०५०० |
| ४३ | लेडी डॉक्टर | १ | २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | ६५००-२००-१०५०० |
| ४४ | कनिष्ठ विद्युत अभियंता | १ | १६४०-६०-२६००-दरो-७५-२९०० | ५५००-१७५-९००० |
| ४५ | उपअभियंता | २ | १६४०-६०-२६००-दरो-७५- | ५५००-१७५-९००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | २९०० २०००–६०–२३००– दरो–७५–३२०० | ६५००–२००–१०५०० |
| ४६ | वरिष्ठ आरोग्य निरीक्षक | १ | १४००–४०–१६००–५०–२३००–दरो–६०–२६०० | ५०००–१५०–८००० |
| ४७ | अनुरेखक | १ | १२००–३०–१५६०–दरो–४०–२०४० | ४०००–१००–६००० |
| ४८ | विद्युत निरीक्षक | १ | १३५०–३०–१४४०–४०–१८००–दरो–५०–२२०० | ४५००–१२५–७००० |
| ४९ | नाटयगृह व्यवस्थापक | १ | १३५०–३०–१४४०–४०–१८००–दरो–५०–२२०० | ४५००–१२५–७००० |
| ५० | पाणीपुरवठा पर्यवेक्षक | २ | १३५०–३०–१४४०–४०–१८००–दरो–५०–२२०० | ४५००–१२५–७००० |
| ५१ | वारंट इन्स्पेक्टर | १ | १२००–३०–१५६०–दरो–४०–२०४० | ४५००–१२५–७००० |
| ५२ | मार्केट इन्स्पेक्टर | १ | १२००–३०–१५६०–दरो–४०–२०४० | ४५००–१२५–७००० |
| ५३ | साउंड ऑपरेटर | २ | १२००–३०–१५६०–दरो–४०–२०४० | ३०५०–७५–३९५०–८० ४५९० |
| ५४ | फिल्टर ऑपरेटर | ५ | १२००–३०–१५६०–दरो–४०–२०४० | ३०५०–७५–३९५०–८० ४५९० |
| ५५ | क्रीडाधिकारी | १ | १३५०–३०–१४४०–४०–१८००–दरो–५०–२२०० | ४५००–१२५–७०००[११८] |

**नगरपालिका कर्मचाऱ्यांना पुरविल्या जाणाऱ्या सुविधा**

**१) रजा–**

नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना वर्षाला असणाऱ्या रजा कॅज्युअली लिव्ह–८, मेडिकल वर्षाला–३०, हक्काची–३० अशाप्रकारच्या रजा दिल्या जातात. नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्याबाबत विशेष बाब म्हणजे मेडिकल ऑपरेशन ७५ टक्के कर्ज मंजूर केले जाते. हे कर्ज वर्षातून एकदाच मिळते. हे कर्ज ३ वर्षातून परतफेड करावे लागते.

**२) प्रॉव्हिडंड फंड–**

नगरपालिकेतील ५९२ कर्मचारी या सुविधेचा फायदा घेत होते. यासाठी नगरपालिकेमार्फत बेसीक पगाराच्या ६० टक्के वर्गणी घेतली जाते. विनापरतावा २० वर्षानंतर मागणी अर्ज केल्यानंतर हा फंड दिला जातो. शासन नियमाप्रमाणे हिशोब ठेवले जातात. वार्षिक हिशोबाच्या पावत्या देणे. ३ वर्षानंतर कर्ज प्रकरण मंजूर केले जातात. फायनल पेमेंट सेवा निवृत्ती किंवा मयत झाल्यानंतर दिले जाते.

**३)राहण्यासाठी जागा–**

सातारा नगरपरिषदेमार्फत कर्मचाऱ्यांना सातारा शहरात राहण्याची सोय दोन ठिकाणी केली आहे. सदर बाजार येथे चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी व दुसरी सोय मंगळवार पेठेत मेहत्तर कॉलनी याठिकाणी साफसफाई कामगारांसाठी राहण्याची व्यवस्था केलेली आहे.

**३) गणवेश–**

सातारा नगरपरिषदेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा गणवेश हा त्या त्या विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचासाठी वेगवेगळा असतो. यामध्ये पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्याचा पोषाख हा खाकी शर्ट व खाकी पँट त्याचप्रमाणे आरोग्य विभागातील पुरूषाचाही असाच पोषाख असतो. मोटार ड्रायव्हर, सर्व खात्यातील शिपाई व भंगी कामगार यांचाही पोषाख खाकी शर्ट व खाकी पँट असा असतो. मात्र आरोग्य विभागात व भंगी काम करणाऱ्या स्त्रीयांचा पोषाख निळी साडी व निळा ब्लाऊज असा असतो.

**२.६.९.२२ महिला व बालकल्याण समिती**

महिला व मुलांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२/१९९२ दि.२८.१२.१९९२ अन्वये महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकांनी महिला व बालकल्याण समिती स्थापन करण्याचे आदेश दिले. या समितीच्या कार्यासाठी नगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या वार्षिक महसूल उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कमेच्या ५ टक्के रक्कम राखून ठेवावी व सदर समितीच्या मागणीनुसार वेळोवेळी उपलब्ध करून द्यावी असे सुचविण्यात आले.

**२.६.९.२३ मागासवर्गीय व विशेष कल्याण समिती**

मागासवर्गीय कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासन क्रमांक बीबीसी–१०७६/५०५/एमयुएन–२,दि.१७–२–१९७६ या जी.आर नुसार समाजातील दुर्बल घटक(मागासवर्गीय) यांच्या कल्याणासाठी नगरपालिकेने आपल्या उत्पन्नातील बांधील निधी(कमिटेड एक्सपेंडीचर) वजा जाता राहिलेल्या महसूलाचा ५ टक्के भाग राखीव म्हणून काढून तो दुर्बल घटकांच्या म्हणजे अनुसूचीत जाती–जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणकारी योजनासाठी खर्च करण्याचे नगरपालिकांवर बंधन टाकले आहे.[११९]

### २.६.१० सातारा नगरपालिकेच्या नोकर लोकांची एकविचार को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी

नगरपालिकेचा नोकरवर्ग गरीब व त्यांचे वेतनही अल्प त्यामुळे कितीही काटकसर केली, तरी त्यांचा दैनंदिन कौटुंबिक खर्च भागणे अवघड होते. त्याचबरोबर लग्नकार्य, घरदार, औषधपाणी हा खर्च भागविण्यासाठी पैशांची आवश्यकता असते. त्यामुळे नगरपालिकेने 'उद्धरेत आत्मनात्मान' ही गीतेतील शिकवण प्रत्यक्षात उतरविण्याचा चंग बांधून त्याने आपले सहकारी मंडळ, सन १९१० साली एकविचार–को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या नामाभिधाखाली स्थापन केले. त्यासाठी या कामात श्री वासुदेव गणेश उर्फ आण्णासाहेब चिरमुले यांचे मार्गदर्शन मंडळास लाभले. प्रथमतः रू.१०००/– भांडवल लोकांच्याकडून ठेवीच्या रूपाने घेतले व अवघ्या १६ सभासदांवर कामास सुरूवात झाली. त्याचे शंभर सभासद आहेत. शेअर भांडवल जरी अवघे रू.२६४०/– चे असले तरी नोकर लोकांच्याच ठेवी १३,४००/– रूपयांच्यावर आहेत. व रिझर्व्ह फंड रू.१,७५०/– आहे. हल्ली एकूण देवघेवीचा वार्षिक व्यवहार रू.२०,०००/– पर्यत होतो. सोसायटयांच्या कायद्याप्रमाणे व नियमांप्रमाणे सर्व व्यवहार अत्यंत सुरळीतपणे चालले आहेत. नगरपारिषदेच्या नोकर लोकांमधूनच मॅनेजिंग कमिटी निवडली जाते. रजिस्टर्ड ऑडिटर यांच्याकडून दरवर्षी ऑडिट केले जाते. सोसायटीचे अध्यक्ष श्री.न.रा.फडके चीफ ऑफिसर अँड इंजिनियर हे काम पाहात असतात.व श्री.वा.त्र्यं.तळवळकर हे गेली २० वर्षे चेअरमन म्हणून काम पाहत. या सोसायटीमुळे नोकर लोकांच्या पुष्कळच अडचणी भागल्या जातात व त्यांना पैशाच्या अडचणीच्यावेळी इतरांच्याकडे जावे लागत नाही. नोकर लोकांपैकी एकजण सेक्रेटरी म्हणून दरवर्षी नेमण्यात येतो. त्यास अल्प वेतन दिले जाते.[१२०]

### २.६.११ सातारा शहर नगरपरिषद आरोग्य विभाग कर्मचारी यांची उद्धार को–ऑप–क्रेडीट सोसायटी लि.सातारा.

ही पतसंस्था सातारा शहरात परळे संकुल, बुधवार पेठ, सातारा येथे २९ जून १९४० रोजी स्थापन केली. या संस्थेची सदस्य संख्या २२४ आहे. या संस्थेचे कार्यक्षेत्र सातारा नगरपालिकेतील सॅनेटरी विभागातील कायम नोकरापुरती मर्यादित आहे. या संस्थेचा उद्देश भांडवल उभारणे हा होय. या संस्थेचे कर्ज वितरण नियम सहकारी संस्थेप्रमाणे आहेत.

सर्वासाठी एक व्याज दर असून तो १४ टक्के इतका आहे. या पतसंस्थेतील कर्जमर्यादा १ लाख रूपयापर्यंत झालेली आहे.

सन २०००–२००१ या आर्थिक वर्षातील निव्वळ नफा रू.२८५०४६.५०/– एवढा होता. सन २००१–०२ या आर्थिक वर्षातील संस्थेचे वार्षिक उत्पन्न ४४६६५०.५० रूपये इतके होते. खर्च रूपये १३६४७८.५०/–रूपये तर निव्वळ नफा रूपये ३१०१७२/– झालेला आहे.

| तपशिल | २०००–२००१ | २००१–०२ |
|---|---|---|
| भाग भांडवल | १७२४४५०/– | १७३४५५०/– |
| निधी | १०३१४३०/– | ११२३१९०/– |
| सभासद ठेव | ९७६९८०/– | १०५११६०० |
| इतर देणी | ९३०८८१२ | ८४७४२[१२१] |

**सन २००२ मधील कार्यालयीन सेवक**

सेक्रेटरी–अच्युतराव शंकरराव बोधे,

लिपीक–रविंद्र अच्युतराव बोधे

लिपीक– सौ.विजया धनंजय काटे

शिपाई–नारायण जगन्नाथ कांबळे

**संचालक मंडळ–सन २००२**

चेअरमन–प्रकाश रामचंद्र सुकटे

व्हा.चेअरमन–राजेंद्र विनायक कायगुडे

सभासद–अशोक किसन कांबळे, लक्ष्मण श्रीरंग कांबळे, नंदू निवृत्ती कांबळे, इब्राहिम चाँद शेख, राजू जगन्नाथ कांबळे, सौ.सुनंदा जगन कांबळे, सौ. लक्ष्मी राजाराम गायकवाड इत्यादी.[१२२]

## २.७ समारोप

प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थाची कार्यपद्धती सुरू होती. मध्ययुगीन काळ हा स्थानिक स्वराज्य संस्थांना पोषक नव्हता. राज्याचा कारभार सुरळीत चालावा म्हणून नियुक्त केलेले अधिकारी हे राजसत्ता बलिष्ठ व्हावी म्हणून आपले सर्वस्व पणाला लावत असत. ब्रिटिश कालखंडात भारतातील पारंपरिक स्थानिक शासन व्यवस्थेचा ऱ्हास होऊन ब्रिटिशांना

अनुकूल अशा व्यवस्थेचा अंगीकार करण्यात आला. विशेषतः ब्रिटिशकालीन प्रयत्न हे प्रशासकीय सुविधेच्या दृष्टिकोनातून असले, तरी आधुनिक भारतीय स्थानिक स्वशासनाची मुहूर्तमेढ या कालखंडात रोवली गेली.

सातारा नगरपालिका ही महाराष्ट्रातील सर्वात पहिली व जुनी नगरपालिका म्हणून ओळखली जाते. या नगरपालिकेने केलेला विकास हा खऱ्या अर्थाने इतर नगरपालिकेस प्रेरणादायक ठरलेला आहे. नगरपालिकेच्या स्थापनेमुळे सातारा शहराचा सर्वांगीण विकास झाला. तसेच सातारा शहरातील सर्व विकास कामास चालना मिळाली. त्यामुळे लोकांना जीवन जगण्यास स्थिरता आली. नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर सन १८५३ ते २००३ या कालखंडात एकूण तीस निवडणूका झाल्या. यामध्ये १ जुलै १८६८ पासून एक वर्षासाठी मॅनेजिंग कमेटीवर सदस्य नेमण्यात आले होते. २७ ऑक्टोबर १८८४ रोजी जनरल बोर्डाची मिटींग झाली त्यात सातारा शहरात एकूण ९ वार्ड पाडण्यात आले आणि त्यातून १२ सभासद निवडण्यास मान्यता देण्यात आली. सन १८८४ च्या म्युनिसिपालीटीच्या कायद्यानुसार एकूण सभासदांच्या निम्मे सभासद नागरिकांमधून निवडून देण्याचा अधिकार जनतेस मिळाला. त्यानुसार २४ सप्टेबर १८८५ रोजी सातारा नगरपालिकेची पहिली निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने झाली.

सन १८८५–८६ मध्ये सातारा जिल्हयाचा कलेक्टर जे किंग हा नगरपालिकेचा पदसिद्ध अध्यक्ष होता. ४ जून १८८६ रोजी झालेल्या जनरल बोर्डाच्या सभेत प्रथमच भारतीय लोकांतून उपाध्यक्ष म्हणून गणेश पांडुरंग आगटे व मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन म्हणून काशिनाथ महादेव थत्ते यांची निवड करण्यात आली. दुसरी त्रैवार्षिक निवडणूक १३ मार्च १८८९ रोजी झाली. त्यात १२ सभासद थेट जनतेतून निवडले गेले व १२ सभासद सरकारने नियुक्त केले. ए.केसर साहेब कलेक्टर यांची अध्यक्ष म्हणून सरकारने नेमणूक केली. उपाध्यक्ष या पदावर गणेश पांडुरंग आगटे यांची निवड झाली. अठरावी निवडणूक १६ ऑक्टोबर १९३८ रोजी झाली. यावेळच्या निवडणुकी सर्वच्या सर्व उमेदवार लोकनियुक्त पद्धतीने निवडून आलेले होते. या निवडणूकीचे वैशिष्टय म्हणजे प्रथमच स्त्रियांसाठी १ व हजिनासाठी ३ जागा राखीव ठेवण्यात आल्या.महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ अन्वये नगरपालिकेच्या कारभारात आमुलाग्र बदल करण्यात आला. विषय समित्यांची संख्या ८ ऐवजी ११ सभासद निवडण्यास

सुरूवात झाली. उपाध्यक्ष हा शिक्षण समितीचा पदसिद्ध सभापती करण्यात आला. स्विकृत सदस्य घेण्याची पद्धत सुरू करण्यात आली. अशाप्रकारे निवडणूका होऊन सातारा नगरपालिकेचा विकास साधण्याचा प्रयत्न निवडून येणाऱ्या सभासदांनी केला. पुढे नगरपालिकेचा कारभार योग्य रितीने चालावा यासाठी विविध समित्यांची स्थापना केली गेली. सातारा नगरपालिकेचे प्रशासन हे शहरातील विविध कामे पार पाडण्यासाठी नियोजनपूर्वक काम करीत असल्याचे दिसून येते. सातारा नगरपालिका ही १५० वर्षाची झाली असली, तरी ही नगरपालिका कार्यक्षम आहे. या नगरपालिकेतील सदस्यांची संख्या ३९ असून नामनिर्देशित सदस्य संख्या ४ आहे. विकेंद्रीकरणाच्या दृष्टीकोनातून टाकलेले पहिले पाऊल म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींच्या हस्ते लोकशाही मार्गाने सत्ता सोपवून स्थानिक पातळीवरील प्रश्न लोकप्रतिनिधीच्यामार्फत सोडविण्याकरिता नगरपालिकेची स्थापना झालेली असली, तरी या नगरपालिकेतील प्रशासनाने केलेली कामगिरी ही अतिशय चांगली आहे. कारण नगरपालिका स्थापनेवेळी तिचे वार्षिक उत्पन्न हे ११००० रूपये इतके होते तर सन २००२–०३ या वर्षातील तिचे वार्षिक उत्पन्न १७ कोटी ५७ लाखापर्यंत वाढलेले आहे. यावरून सातारा नगरपालिकेची झालेली प्रगती दिसून येते. वास्तविक हे उत्पन्न खर्चापेक्षा जास्त आहे. यावरून सातारा नगरपालिका ही आर्थिकदृष्टया सक्षम असली तरी पायाभूत क्षेत्राचा विचार करता रस्ते, पाणी, सांडपाणी, घनकचरा आणि वीज या सर्व सेवा लोकसंख्या प्रमाणात अपुऱ्या वाटतात. त्यावर जास्त खर्च होणे अपेक्षित आहे. त्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा कराव्यात, तसेच या नगरपालिझेचा कारभार पारदर्शक व्हावा. तरच महाराष्ट्रात या नगरपरिषदेचा नावलौकीक होईल.

## संदर्भ


१) Sharma N.P., Local self Government in India, Hind Publication Ltd. Bombay, 1974, P.8

२) डॉ.पाटील वा.भा., स्थानिक स्वराज्य संस्था, जळगाव, २००९, पृ.४

३) कित्ता, पृ.५

४) बंग के.आर, भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य, नागपूर २००५, पृ.६१

५) कित्ता, पृ.६२

६) डॉ.नान्देडकर व्ही.जी., पंचायतीराज एक विश्लेषणात्मक परामर्श, पुणे २०१०, पृ.२७

७) डॉ शिरसाठ व बैनाडे भगवानसिंग, भारतीय स्थानिक स्वशासन, औरंगाबाद, जून २०१०,पृ.२३, २४

८) कित्ता, पृ.२५

९) डॉ.पाटील वा.भा., उपरोक्त, पृ.२२

१०) कित्ता, पृ.२२

११) Bombay Governnment, Gazeette No.28, 14th Jully 1853, P.1108

१२) कोल्हापूर नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव ग्रंथ, कोल्हापूर, १९५४, पृ.८

१३) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 20.06.1868

१४) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 15.03.1876

१५) Satara Municipality, General Proceeding Book, Date- 18.06.1883, P.1

१६) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 27.10.1884, P.83

१७) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 25.09.1885, P.150

१८) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date-25.09.1885, P.153

१९) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 04.12.1885, P.155

२०) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्स्वी अंक, १९५४, पृ.३४

२१) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 04.12.1885, P.155

२२) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date-.04.12.1885, P.157

२३) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 04.06.1886, P.184

२४) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 24.04.1889, P. 20

२५) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.2, Date-.04.04.1892, P.158

२६) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.2, Date- 12.04.1895, P.312

२७) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.3, Date- 17.10.1898, P.158

२८) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.11, Date- 31.10.1900, P.97

२९) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 17.03.1902, P.7

३०) सातारा नगरपालिका शतसावंत्सरीक महोत्सवी अंक, १९५४, पृ.४०

३१) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.4, Date- 05.04.1902, P.2

३२) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.2, Date- 12.04.1905, P.2
३३) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.2, Date- 20.04.1908, P.2
३४) सातारा नगरपालिका शतसावंत्सरीक महोत्सवी अंक, १९५४, पृ.४०
३५) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.4, Date- 02.05.1911, P.123
३६) सातारा नगरपालिका शतसावंत्सरीक महोत्सवी अंक, १९५४, पृ.४०
३७) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 23.03.1914, P.237
३८) Satara Municipality, General Board meeting, Date- 18.04.1914, P.1
३९) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.4, Date- 18.04.1914, P.3
४०) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.2, Date- 2.04.1917, P.179
४१) सातारा नगरपालिका शतसावंत्सरीक महोत्सवी अंक, १९५४, पृ.४०
४२) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.1, Date- 26.02.1923, P.5
४३) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.5, Date- 25.04.1923, P.7
४४) Satara Municipality, General Proceeding Book, Resolution No.2, Date- 15.05.1926, P.3
४५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.२ दि.२५.०२.१९२९, पृ.२
४६) सातारा नगरपालिका शतसावंत्सरीक महोत्सवी अंक, १९५४, पृ.४०
४७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१ दि.१२.०६.१९२९, पृ.८
४८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.३ दि.०४.०३.१९३०, पृ.१०
४९) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१२ दि.३१.०३.१९३२, पृ.७

५०) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१० दि.१८.०९.१९३५, पृ.३९
५१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१ दि.१७.१०.१९३८, पृ.७४
५२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.३(४) दि.०२.१२.१९३८, पृ.९७
५३) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.२ दि.२१.०४.१९४२, पृ.११० ते ११४
५४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.२ विषय नं.२, दि.०६.०४. १९४५, पृ.८४
५५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१ दि.२५.०४.१९४९, पृ.२०६
५६) सातारा नगरपालिका शतसावंत्सरीक महोत्सवी अंक, १९५४, पृ.४०
५७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, स्पेशल जनरल सभा, ठराव नं.४ दि.०४.१२.१९५७, पृ.७
५८) पाठक अरूणचंद्र(संपा.), महाराष्ट्र शासन सातारा जिल्हा गॅझिटियर, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.६३१
५९) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१, विषय नं.१, दि.२५.११. १९६२, पृ.४
६०) सातारा नगरपालिका जनरल बोर्डाचे हजेरी पत्रक, १९६३–६४
६१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.३, विषय नं.३, दि.१५.१. १९६४, पृ.१३
६२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.५, विषय नं.५, दि.०५.०७. १९६६, पृ.७
६३) सातारा नगरपालिका जनरल बोर्डाचे हजेरी पत्रक, १९६७–६८
६४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१, दि.०२.०७. १९६७, पृ.१ ते ४
६५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विसेष सभा, गुरूवार दि.०६.०७. १९७२, पृ.१०१
६६) सातारा नगरपालिका जनरल बोर्डाचे हजेरी पत्रक, १९७४–७५

६७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१, विषय नं.१, दि.१७.१२. १९७४, पृ.९६
६८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.३७७, विषय नं.२२, दि.२६.०४. १९७६, पृ.३७२
६९) सातारा नगरपालिका, प्रशासकीय अहवाल, ठराव नं.१, विषय नं.१, दि.१३.०२. १९८१, पृ.३, ४
७०) सातारा नगरपालिका, प्रशासकीय अहवाल, १९८१ ते १९८५
७१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विशेष सभा, दि.१५.५.१९८५, पृ.२
७२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१, विषय नं.१, दि.१२.०७. १९८५, पृ.३३
७३) सातारा नगरपालिका जनरल बोर्डाचे हजेरी पत्रक, १९९१–९२
७४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विशेष सभा, दि.१७.१२.१९९१, पृ.१६९
७५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.६, विषय नं.३, दि.२९.१२. १९९२, पृ.३
७६) सातारा नगरपालिका जनरल बोर्डाचे हजेरी पत्रक, १९९६–९७
७७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.३, विषय नं.२, दि.२३.०१. १९९७, पृ.१०१
७८) सातारा नगरपालिका जनरल बोर्डाचे हजेरी पत्रक, २००१–०२
७९) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विशेष सभा, दि.१७.१२.२००१, पृ.१४३
८०) पाठक अरूणचंद्र(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा, मुंबई,१९९९, पृ.६३१
८१) कित्ता, पृ.६३२
८२) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.४८
८३) सातारा नगरपालिका रेकॉर्ड
८४) सातारा नगरपालिकेतील मुख्याधिकाऱ्याच्या बोर्डावरील माहीतीनुसार
८५) कित्ता

८६) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा,  ६ मार्च १९९४, पृ.१४६

८७) सातारा नगरपालिका रेकॉर्ड डयुटी लिस्ट फाईल, पृ. ३

८८) कित्ता, पृ. ४

८९) पाटील राजश्री शामराव, कराड नगरपालिकेचा इतिहास, एम.फिल. अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, २०००, पृ.६४

९०) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४,  उपरोक्त, पृ.६३

९१) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल, सन १९९०–९१, पृ.३०

९२) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६३

९३) सातारा शहर नगरपालिका स्मरणिका, १९८३, पृ.५६

९४) कित्ता, पृ.५७

९५) संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान २००४–०५, पृ.८,९

९६) सातारा नगरपालिका रेकॉर्ड,

९७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विषय नं.२, ठराव नं.१0९२, दि.२९.0५.२000, पृ.३२

९८) दै.सकाळ, १ जून २००७, मुखपृष्ठ

९९) संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान २००४–०५, पृ.८,९

१००) सातारा नगरपालिका वार्षिक अंदाजपत्रक, सन १९६६–६७, पृ.२३

१०१) Satara District Gazetteer, 1885, P.416

१०२) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६३

१०३) सातारा नगरपालिका वार्षिक अंदाजपत्रक, सन १९६६–६७, पृ.३४

१०४) सातारा नगरपालिका वार्षिक अंदाजपत्रक, सन १९७७–७८, पृ.२२

१०५) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.५९

१०६) कित्ता, पृ.५९

१०७) सातारा नगरपालिका रेकॉर्ड–जनरल प्रो.बुक १९५८–५९

१०८) कित्ता, पृ.२१

१०९) सातारा नगरपालिका रेकॉर्ड–वेतन नोंद फाईल

११०) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६१

१११) सातारा नगरपालिका रेकॉर्ड–वेतन नोंद फाईल

११२) सातारा नगरपालिका रेकॉर्ड–वेतन नोंद फाईल

११३) सातारा नगरपालिका रेकॉर्ड

११४) सातारा नगरपालिका रेकॉर्ड

११५) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६२

११६) संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान, महाराष्ट्र शासन, २००४–०५, पृ.११

११७) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६२

११८) सातारा नगरपालिका सातारा, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००२–०३, पृ.११२ ते ११४

११९) जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांचे दि.२०.१.२००१ चे वेतनश्रेणी बाबतचे पत्र.

१२०) सातारा नगरपालिका सातारा, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक,२००२–०३, पृ.१४७ ते १४९

१२१) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.८७

१२२) उद्धार को–ऑप–क्रेडीट सोसायटी लि.सातारा रेकॉर्ड, पृ.५

## प्रकरण तिसरे

# नगरपालिकेच्या शाळा व शैक्षणिक सुविधा

### ३.१ प्रास्ताविक

शिक्षणाने मानवाच्या जीवनाचा सर्वांगिण विकास होतो. शिक्षण हा घटक मानवी जीवनाचे प्रमुख अंग बनून राहिले आहे. शिक्षण हे एक साधन असून अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा प्रमुख मार्ग आहे. शिक्षणामुळे मनुष्य चारित्र्यवान बनतो. मनुष्याच्या जीवनाचे पालनपोषण, संवर्धन व विकास शिक्षणामुळेच होतो. महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षणाला तिसरा डोळा असे म्हटले आहे. शिक्षण माणसाच्या जीवनाचा कणा आहे असे त्यांचे मत होते. शरीराला ज्याप्रमाणे पाठीच्या कण्याची आवश्यकता ताठ उभे राहण्यासाठी आहे त्याप्रमाणे जीवनात सन्मानाने जगण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे, म्हणूनच महात्मा फुले यांनी समाजाला शिक्षण देऊन समाजाचे सर्व बाजूंनी परिवर्तन केले.

मानवाच्या प्रगतीला शिक्षण कारणीभूत ठरते. माणूस घडविणारे शिक्षण असा शब्द प्रयोग स्वामी विवेकानंद यांनी केला आहे. स्वामी विवेकानंदानी शिक्षणाची व्याख्या करताना म्हटले आहे. 'शिक्षण म्हणजे आत्मज्ञान.' शिक्षणविषयक विचार मांडताना महात्मा गांधी यांनी म्हटले आहे, "सर्वांग सुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण होय." तसेच स्वामी विवेकानंदानी भारतातील गरिबीचे मूळ कारण शिक्षणाचा अभाव आहे. म्हणून सर्वसामान्यांचा मागासलेपणा नाहीसा करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार व प्रचार होणे आवश्यक आहे, तेंव्हा देशाची प्रगती होईल.' असे विचार मांडले. महात्मा फुले,राजर्षी छत्रपती शाहू महाराज न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे व कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या शिक्षण सुधारकांनी आपल्या कार्यातून शिक्षणाचा प्रसार घडवून आणला. त्यातून सातारा नगरपरिषदेने शिक्षणाची गरज लक्षात घेऊन त्या क्षेत्रात महत्त्वाची पावले उचलली व शिक्षणाचा विकास घडवून आणला. याची माहिती नगरपालिका शिक्षण क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेताना मिळते.

## ३.२ महाराष्ट्रातील शिक्षणाची पार्श्वभूमी

### ३.२.१ प्राचीन काळातील शिक्षणपद्धती

प्राचीन काळात शिक्षणाला महत्त्व होते. वैदिक काळात भारतीय समाजात शिक्षणाचे स्थान महत्त्वाचे असून गुरू हा सर्वश्रेष्ठ मानला जात होता. उपनिषदे याचा अर्थ असा होतो की, गहन प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्याने गुरूजवळ बसून घेतलेले शिक्षण होय. रामायण व महाभारतातील अनेक उदाहरणावरून असे लक्षात येते की, राजापेक्षा गुरूचे स्थान श्रेष्ठ समजले जात होते. या कालखंडात गुरूकुल किंवा आश्रम पद्धतीचा वापर समाजातील शिक्षण क्षेत्रात केला जात होता. या पद्धतीत गुरूचा उद्देश हा विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकास साधणे हा होता. प्राचीन काळात भारताने शिक्षणाच्या जोरावर ज्ञानविज्ञानात फार मोठी प्रगती साधली होती. नालंदा, तक्षशिलासारखी मोठी विद्यापीठे अस्तित्वात होती. या विद्यापीठातून भारतीयांच्या बरोबर परकीय विद्यार्थी उच्च शिक्षण घेत होते.[१]

### ३.२.२ मध्ययुगीन काळातील शिक्षणपद्धती

मध्ययुगात साहित्य, इतिहास, शिल्प यासारख्या क्षेत्रात शिक्षणामुळे भरीव कामगिरी झाली. पण ही प्रगती केवळ वरिष्ठ वर्गापुरती मर्यादित होती. सामान्य लोकांना त्यामध्ये समाविष्ट केले नव्हते. १८ व्या शतकात त्यात बदल झाला शिक्षणाच्या क्षेत्रात बुद्धिनिष्ठा बाजूला जाऊन पोथीनिष्ठा आली. पाठांतराला महत्त्व प्राप्त झाले. या काळात खऱ्या अर्थाने शिक्षण दिले जात नव्हते. समाजालाही शिक्षणाच्या सामर्थ्याची कल्पना नव्हती. वरच्या वर्गाची वस्ती जेथे असे तेथे शास्त्री पाठशाळा उघडत असत. शिक्षण घेण्यात ब्राह्मण मुलांचा भरणा असल्यामुळे धार्मिक शिक्षणावर भर दिला जात असे. मोठी खेडी व शहरातून मुलांना शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळा असत. त्यांना पंतोजीची शाळा असे म्हटले जाई. तेथे व्यापाऱ्यांच्या व श्रीमंत मुलांना शिक्षण दिले जात होते. शाळाकरिता मंदिर किंवा चावडी यासारखे सार्वजनिक मालकीचे ठिकाण शोधले जात होते. हस्तलिखित पोथ्यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना शिकविण्यात येई. शिक्षणात पाठातंरावर मोठया प्रमाणात भर दिला जात होता. या शिक्षणाचा उद्देश कारकुनी, कुलकर्ण्य व सावकारी चालविण्यासाठी असे. हे शिक्षण इतर व्यवसाय करणाऱ्या जातींना उपयोगाचे नव्हते. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात प्रगती झाल्याचे दिसत नाही.[२]

### ३.२.३ ब्रिटीश काळातील शिक्षणपद्धती

ब्रिटीश राजवटीत महाराष्ट्रात सार्वत्रिक शिक्षणप्रसाराला सुरूवात झाली. त्यांनी पारंपारिक शिक्षणपद्धतीत आमुलाग्र बदल घडवून आणले. शिक्षण प्रसाराची जबाबदारी सरकारने पूर्वी नाकारली होती. पण ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण आखले. त्यासाठी कंपनीने काही ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारतात पाठवून प्राथमिक शाळा स्थापन केल्या. एल्फिन्स्टन, कँडी, मोल्सवर्थ, लॉर्ड मॅकॉले, विल्यम बेटिंग व चार्लस वूड या सरकारी अधिकाऱ्यांनी भारतीय जनतेला शिक्षणाच्या नव्या सोयी उपलब्ध करून दिल्या. सर्व जाती धर्माच्या लोकांना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शिक्षणाची द्वारे खुली करून मानवतेच्या भूमिकेतून शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांनी अनेक अडचणीवर मात करून शाळा सुरू केल्या. मुंबई इलाख्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी इ.स.१८१५ मध्ये मुंबई येथे 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. तिचा उद्देश गरीबांमध्ये शिक्षणप्रसार करणे हा होता. या संस्थेला माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनचा पाठिंबा होता.

देशी भाषेतून ग्रंथनिर्मिती करण्यासाठी एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने इ.स.१८२० मध्ये 'दि नेटिव्ह स्कूल अॅण्ड स्कूल बुक कमिटी' नावाची संस्था स्थापन झाली. या शाळेला पुढे ' एल्फिन्स्टन हायस्कूल' असे नाव देण्यात आले. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीने मुंबई इलाख्यात अनेक शहरात आपल्या शाळा सुरू केल्या. यातून एल्फिन्स्टनने इ.स.१८२१ मध्ये पुण्यात 'संस्कृत कॉलेज' काढले. सन १८३५ पासून महाराष्ट्रात इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली. महाराष्ट्रातील शिक्षणाला निश्चित दिशा देण्यासाठी ब्रिटिश शासनाने इ.स.१८४० मध्ये मुंबई येथे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' या संस्थेची स्थापना केली. सर चार्लस वूडच्या खलित्यात नमूद केल्याप्रमाणे इ.स.१८५७ मध्ये मुंबई, कलकत्ता व मद्रास विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.[३]

## ३.३ सातारा शहरातील शिक्षणाची पार्श्वभूमी

सातारा शहराची शैक्षणिक विकासाची परंपरा फार जुनी आहे. मध्ययुगात या ठिकाणी शिक्षणाची पद्धत ही पारंपारिक पद्धतीची होती. संस्कृत पाठशाळांमध्ये संस्कृत भाषा, व्याकरण व काव्यशास्त्र हे विषय शिकवले जात असत. हे शिक्षण पंतोजीच्या हातात असे. राजघराण्यातील पुरूषांना युद्ध विषयक शिक्षणाची माहिती देत. मराठा अमंलात शिक्षणाकडे

विशेष लक्ष होते असे वाटत नाही. कारण त्यावेळी शिक्षण ही सरकारची जबाबदारी नव्हती.

१८१८ मध्ये मराठी राज्याचा शेवट झाला. व इंग्रजांच्या सातारा प्रवेशाबरोबर पाश्चिमात्य शिक्षणाची पद्धत सुरू झाली. सन १८८७ मध्ये साताऱ्यात तीन इंग्रजी शाळा होत्या. या शाळांमधून मॅट्रीकपर्यंत शिक्षण दिले जात असे. इंग्रज धोरणानुसार इंग्रज अधिकाऱ्यांना मराठी शिकता यावे व मराठयांना इंग्रजी शिकता यावे या उद्देशाने इंग्रजांनी प्रयत्न केले. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात शिक्षण सर्वासाठी खुले केले. त्यामुळे साताऱ्यातही शिक्षणाची सुरुवात झाली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी शिक्षणास उत्तेजन दिले.

महात्मा जोतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील व बापुजी सांळुखे इत्यादी समाज सुधारकांनी केलेल्या शिक्षणप्रसारामुळे सातारा शहरास शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे. बंगालचे समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या सामाजिक कार्याची प्रेरणा सातारचे श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी घेतली. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे पहिली मराठी पाठशाळा ‘रंगमहाल’ या वाडयात सन १८२९ मध्ये काढली. या शाळेत संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाचे शिक्षण देण्याची सोय केली. त्यामुळे सनातनी लोकांनी त्याना विरोध करण्यास सुरूवात केली. यावर उपाय म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी मुंबईचे डॉ.मिल्न यांच्या सहकार्याने तीन मिशनरी शिक्षक या पाठशाळेसाठी उपलब्ध करून दिले. आबा पारसनीस या ब्राह्मण शिक्षकाने ही पाठशाळा उत्तम रितीने चालविली. या शाळेत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांची कन्या गोजराबाईला दाखल केले. महाराजांच्या या कार्याची प्रेरणा मुंबईचे नाना शंकरशेठ यांनी घेऊन स्वतःच्या घरात मुलींची शाळा सुरू केली.[४]

### ३.३.१ पूर्व प्राथमिक शिक्षण

सातारा शहरात पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुरूवात स्वातंत्र्योत्तर काळात झाली. रयत शिक्षण संस्थेने सन १९५४ मध्ये सातारा शहरात एक पूर्व प्राथमिक शाळा काढली. त्यासाठी वसतिगृह सुरू केले. त्यानंतर नगरपालिकेने १ सप्टेंबर १९८५ पासून शहरातील विविध भागात पूर्व प्राथमिक शाळा सुरू करून मुलांच्या शिक्षणास प्रारंभ केला. सन १९८५ च्या पूर्वी सातारा शहरात असणाऱ्या मान्यताप्राप्त बालवाडयांमध्ये प्रवेश घेणे आर्थिकदृष्टया मागासवर्गीय व दुर्बल घटकांतील नागरिकांना अशक्य होते. ही गोष्ट नगरपालिकेच्या लक्षात आल्यावर तळागाळातील

मुलांच्या शिक्षणाची कुचंबना होऊ नये तसेच ही मुले शिक्षणापासून वंचित राहू नये. तसेच अन्य मुलांप्रमाणेच त्यांना शिक्षणाचा फायदा व्हावा या हेतूने नगरपालिकेने बालवाडया सुरू केल्या. या बालवाडयांचा सर्व खर्च नगरपालिका करत आहे.

सन २००३–०४ या वर्षात नगरपालिकेने एकूण ४१ बालवाडया चालविल्या आहेत. त्यासाठी ४१ शिक्षिका व ४२ अंगणवाडी सेविका हंगामी तत्त्वावर नेमल्या होत्या. शिक्षिकांना ८०० रूपये व सेविकांना ६०० रूपये मानधन दिले जात होते. बालवाडीत प्रवेश घेण्यासाठी ५ रूपये व मासिक २ रूपये नाममात्र फी घेतली जात होती.[५]

### ३.३.२ प्राथमिक शाळा

इ.स.१८२९ मध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी साताऱ्यात पहिली मराठी शाळा सुरू केली. अमेरिकन मिशनच्या श्रीमती ग्रेव्हज यांनी अमेरिकन मराठी शाळा सन १८३४ मध्ये सातारा शहरात सुरू केली. सन १८५० पासून सातारा शहरात सरकारी पातळीवर प्राथमिक शाळांची सुरूवात झाली. त्यानंतर मात्र शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होऊ लागली. ब्रिटिश काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या सन १८५३ च्या चार्टर ॲक्टनुसार सन १८५५ मध्ये डायरेक्टर ऑफ इन्स्ट्रक्शन हे पद निर्माण केले व त्यामार्फत मुंबई इलाख्यासाठी शिक्षणावर देखरेख करण्यासाठी खास यंत्रणा उभारली. पहिला डायरेक्टर एर्क्सिन पेरी याने शिक्षण प्रसारासाठी लोकजागृती करून संघटना उभारली. त्यानुसार सर्व शाळांच्या कारभारावर देखरेखीसाठी प्रत्येक जिल्हयासाठी शिक्षण उपनिरीक्षकाची नेमणूक करण्यात आली. पुढे शहरातील शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकावर सोपवून शैक्षणिक बाबीवर उपनिरीक्षक देखरेखीचे काम करत असे.[६]

### ३.३.२.१ प्राथमिक शिक्षण

भारतात राज्यकारभाराचे विकेंद्रीकरण होऊ लागले तसा त्याचा परिणाम नगरपालिकेच्या कारभारावर होऊन त्याचेही विकेंद्रीकरण होऊ लागले. त्यामुळे वेगवेगळया कार्यकारिणीची निवड होऊ लागली. सन १८८५ मध्ये प्राथमिक शिक्षण नगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आले. तेव्हापासून शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी स्कूल कमिटीची स्थापना करण्यात आली. सन १८८५ पर्यत शहरातील काही शाळा सरकारी व काही खासगी होत्या. १ एप्रिल १८८५ रोजी नगरपालिकेने प्राथमिक शिक्षण ताब्यात घेतले. त्यामध्ये ७ मराठी

शाळा, १ रात्रशाळा व १ मुलींची शाळा इत्यादीचा समावेश होता.[७]

सन १८८५ मध्ये सातारा शहरात एक सरकारी हायस्कूल व आठ खासगी मराठी शाळा चालू होत्या. त्या शाळांची व्यवस्था ठेवण्यासाठी एक स्कूल कमिटी अस्तित्त्वात आली होती. पुढे सन १९०० पर्यत दुसरी एक शाळा नगरपालिकेने काढली. शाळा नं.३, ४ व ११ मध्ये मुर्लींसाठी एक जादा वर्ग सुरू केला. त्यावेळी नगरपालिकेस एकूण खर्च ७१०० रूपये आला. त्यापैकी सरकारी मदत २०२४ रूपये मिळत असे. लोकल बोर्डाकडून ७४२ रूपयेची मदत मिळत होती. तर फी १३५० रूपये जमा होत असे. बाकी रक्कम ३००० रूपये नगरपालिकेला खर्च करावी लागत होती. सातारा नगरपालिकेने केवळ मुलांची शिक्षणाची सोय केली त्याच बरोबर प्रथमपासून मुलींच्या शिक्षणाची ही सोय केली. रात्रीची शाळा काढून प्रौढ मजूर लोकांना शिक्षण देण्याचीही व्यवस्था नगरपालिकेने केली. सन १८८९–९० साली नगरपालिकेने सरकारकडून फरासखान्याची इमारत दोन हजार रूपयास शाळेसाठी विकत घेतली.[८]

### ३.३.२.२ मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण

सन १९१३ साली नगरपालिकेचा शिक्षण कारभार पाहण्यासाठी एक सरकारी अमंलदार एक्झिक्युटीव्ह ऑफिसर याची नेमणूक केली. सातारा नगरपालिकेने सन १९१९ पासून नवीन योजना राबविण्यास सुरूवात केली. सन १९२३ साली मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा सरकारने प्रथम केला. यापूर्वी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कोणत्याही शहरात सुरू झाले नव्हते परंतु सातारा शहरात ते प्रथम सुरू केले. या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी सरकारकडून सार्वजनिक भंगीपट्टी जादा वसूल करण्याची परवानगी घेतली. १ जुलै १९२१ पासून मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. पहिल्या वर्षी ६ ते ११ वयाच्या शिक्षण न घेणारी २,९२३ सर्व मुले शाळेत दाखल झाली. हे एक सातारा नगरपालिकेला मिळालेले फार मोठे यश होय.

सन १९२१ मध्ये नगरपालिकेच्या एकूण नऊ शाळा होत्या. या शाळेत सर्व मुले दाखल करून त्यांना शिक्षण देणे कठीण पडू लागले. खालच्या वर्गात दुबार शिक्षण पद्धती सुरू केली. करंजे येथील शाळा नं ५ मध्ये बहुतेक शेतकरी वर्गाची मुले होती, व शाळा नं ७ मध्ये हरिजनांची मुले शिकत होती. शाळा नं ६ मध्ये उर्दू शिक्षणासाठी स्वतंत्र वर्ग काढला होता.

त्यात मुलींसाठी एक स्वतंत्र वर्ग चालू केला होता.[९]

### ३.३.२.३ स्कूल बोर्डाची स्थापना

सरकारने सन १९२३ मध्ये सक्तिच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला. या कायदयानुसार सातारा नगरपालिकेने १ एप्रिल १९२५ रोजी स्वतंत्र स्कूल बोर्ड स्थापन केले. हे स्कूल बोर्ड आजही चालू आहे.[१०]

सन २००२–०३ मध्ये नगरपालिकेच्या शाळांची संख्या २१ असून विद्यार्थी संख्या ४४८१ आहे. शिक्षक १२३ आहेत. खाजगी शाळा २७ असून विद्यार्थी संख्या ६०३३ आहे. त्या शाळेमध्ये १२६ शिक्षक होते.[११]

नगरपालिका प्राथमिक शाळेत इ.१ ली ते ७ वी पर्यत शिक्षण दिले जात. या सर्व शाळा मराठी व उर्दू माध्यमाच्या आहेत. सन १९०३–०४ ते सन २००२–२००३ पर्यत नगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या यांचा तक्ता खालीलप्रमाणे दिला आहे.

| अ.क्र. | वर्ष | शाळेची संख्या | विद्यार्थी संख्या | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९०३–०४ | १० | १००५ | ३० |
| २. | १९२५–२६ | ०९ | १९७४ | ६९ |
| ३. | १९३०–३१ | १० | २४४५ | ७० |
| ४. | १९३५–३६ | ११ | २२०२ | ८१ |
| ५. | १९४०–४१ | १६ | २५८९ | १०१ |
| ६. | १९४५–४६ | १६ | ३८१० | ११० |
| ७. | १९४७–४८ | १६ | ३८१० | ११० |
| ८. | १९५०–५१ | १७ | ४७१५ | १२० |
| ९. | १९५३–५४ | १७ | ४९२६ | १२४ |
| १०. | १९६०–६१ | १८ | ५१२३ | १३० |
| ११. | १९६४–६५ | २० | ५२१७ | १३२ |
| १२. | १९७०–७१ | २२ | ५८६४ | १५९ |
| १३. | १९७८–७९ | २६ | ६१९० | २०४ |
| १४. | १९८०–८१ | २९ | ६१५७ | २०० |
| १५. | १९८५–८६ | २७ | ६४३६ | २११ |
| १६ | १९८८–८९ | २५ | ६८८४ | १८१ |
| १७ | १९९०–९१ | २५ | ६५४२ | १८९ |
| १८. | १९९४–९५ | २५ | ६५७१ | १८२ |
| १९. | २०००–०१ | २१ | ४८५७ | १७० |
| २०. | २००२–०३ | २१ | ४४८१ | १२३[१२] |

वरील तक्त्यावरून आपणास असे दिसते की, नगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रारंभी मोठया प्रमाणावर आहे. परंतु सन १९९४ पासून ही विद्यार्थी संख्या कमी झालेली आहे. याचे प्रमुख कारण शहरामध्ये वाढणारी इंग्रजी माध्यमांच्या शाळा व त्यामुळे शहरातील पालकांचा कल हा मोठया प्रमाणावर मराठी माध्यमाच्या शाळांपेक्षा इंग्रजी माध्यमातील शाळांकडे आहे. नगरपालिकेच्या शाळेत प्रामुख्याने कष्टकरी व मध्यमवर्ग झोपडपट्टीतील विद्यार्थी शिक्षण घेताना दिसून येतात.

## ३.४ नगरपालिकेच्या प्राथमिक शाळा

### ३.४.१ मराठी शाळा नं. १

या शाळेची स्थापना सन १८५३ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देते. या शाळेतील विद्यार्थी संख्या २१५ असून यामध्ये मुलांची संख्या १२६ तर मुलींची संख्या ८९ आहे. या शाळेत ६ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार इत्यादीचा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ११ आहे. या शाळेतील उपक्रमामध्ये शैक्षणिक सहल, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, लेझीम पथक, झांजपथक संचलन इत्यादींचा समावेश होतो.[१३]

### ३.४.२ मराठी शाळा नं. २

या शाळेची स्थापना सन १९७२ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे वर्ग आहेत. या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या १३७ असून यामध्ये मुलांची संख्या ८१ व मुलींची संख्या ५६ आहे. या शाळेत ४ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. ही शाळा विद्यार्थ्यांना पुढील सुविधा पुरविते यामध्ये गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार इत्यादींचा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ११ आहे. या शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सौ.कामिनी चंद्रकांत बागल या मुख्याध्यापिका म्हणून काम करीत आहेत.

या शाळेतील उपक्रमांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, निंबध व वक्तृत्त्व स्पर्धा, पाढे पाठांतर उपक्रम, रद्दीतून वाचनालय, वाक्यांश, गीत मंच इत्यादी .[१४]

### ३.४.३ मराठी शाळा नं. ३

या शाळेची स्थापना सन १८६२ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण दिले जात होते. या शाळेतील १९९६–९७ मधील एकूण विद्यार्थी संख्या १४५ असून यामध्ये मुलांची संख्या ७४ तर मुलींची संख्या ७१ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते. या शाळेचे वर्ग ०७ आहेत. या शाळेत विद्यार्थी संख्या कमी झाल्याने तसेच शाळेची इमारत भाडयाची असल्याने शाळा सन १९९७–९८ मध्ये बंद करण्यात आली.[१५]

### ३.४.४ मराठी शाळा नं. ४

या शाळेची स्थापना सन १९७५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण देत होती. या शाळेतील १९९३–९४ मधील विद्यार्थी संख्या १३६ असून यामध्ये मुलांची संख्या ७१ तर मुलींची संख्या ६५ आहे. या शाळेत ०६ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते. या शाळेची इमारत भाडयाची होती. तसेच विद्यार्थी संख्या कमी असल्याने ही शाळा सन १९९४–९५ मध्ये बंद पडली आहे.[१६]

### ३.४.५ मराठी शाळा नं. ५

या शाळेची स्थापना सन १९६५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण देते. या शाळेतील विद्यार्थी संख्या १५४ असून यामध्ये मुलांची संख्या ८८ व मुलींची संख्या ६६ होती. या शाळेत ४ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते. या शाळेतील वर्ग खोल्या संख्या ०७ आहे. या शाळेत विद्यार्थी संख्या चांगली असल्याने तसेच शाळेची इमारत स्वतःच्या मालकीची असल्याने शाळा व्यवस्थितपणे चालू आहे.[१७]

### ३.४.६ मराठी शाळा नं. ६

या शाळेची स्थापना सन १९६२ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या २११ असून यामध्ये मुलांची संख्या १०२ व मुलींची संख्या १०९ आहे. या शाळेत ७ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये सर्व शिक्षा अभियानामार्फत गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, स्वाध्याय पुस्तिका, आरोग्य तपासणी व शालेय पोषण आहार इत्यादीचा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या ११ आहे. या शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार

प्राप्त सौ.कविता मुंकुद सावंत या मुख्याध्यापिका म्हणून काम करीत आहेत.

या शाळेतील उपक्रमामध्ये वृक्षारोपण, ५ सप्टेंबर शिक्षक दिन, कराटे प्रशिक्षण, विद्यार्थी माता–पालक, हळदी कुंकू कार्यक्रम व रांगोळी स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविले जातात.[१८]

### ३.४.७ मराठी शाळा नं. ७

या शाळेची स्थापना सन १८५३ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण दिले जाते. या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या १३३ असून यामध्ये मुलांची संख्या ५९ तर मुलींची संख्या ७४ आहे. या शाळेत ४ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी व शालेय पोषण आहार इत्यादीचा समावेश होतो.

या शाळेतील उपक्रमामध्ये थोर नेत्यांची पुण्यतिथी व जयंती, स्काऊट, बुलबुल सहभाग, प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती, सांस्कृतिक कार्य व क्रीडा, स्पर्धा सहभाग, हळदी–कुंकू कार्यक्रम, श्रीमंत छत्रपती दादा महाराज स्पर्धा सहभाग, शिक्षक पालक संघ, फुलबाग, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व दैनिक सकाळ आयोजित चित्रकला स्पर्धा इ.[१९]

### ३.४.८ मराठी शाळा नं. ८

या शाळेची स्थापना सन १८६४ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण दिले जाते. या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या ८५ असून यामध्ये मुलांची संख्या ४८ तर मुलींची संख्या ३७ आहे. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालय आहे एवढेच नव्हे तर अपंगासाठी ही स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना पुढील सुविधा पुरविते गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार, अल्पसंख्याक विद्यार्थी शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थिनी शिष्यवृत्ती (इ.५ वी ते ७ वी मुली) व अस्वच्छ कामगार शिष्यवृत्ती इत्यादीचा समावेश होतो. या शाळेतील वर्ग खोल्या संख्या १२ आहे. या शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार श्री प्रविण गुलाबराव पवार व सौ. नंदिनी भारत बिडकर यांना मिळाले आहेत.

या शाळेतील उपक्रमामध्ये १०० टक्के उपस्थिती असते. घंटागाडी, आजचा राजकुमार व राजकुमारी हे उपक्रम राबविले जातात.[२०]

### ३.४.९ मुलींची मराठी शाळा नं. ९

या शाळेची स्थापना सन १९८२ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण मिळते. या शाळेतील विद्यार्थीनींची संख्या ४२ असून या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहे. या शाळेतील वर्ग खोल्या संख्या ०४ आहे. या शाळेत विद्यार्थी संख्या चांगली असल्याने तसेच शाळेची इमारत स्वतःच्या मालकीची असल्याने शाळा व्यवस्थितपणे चालू आहे.[२१]

### ३.४.१० उर्दू शाळा नं. १०

ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या २२ असून यामध्ये मुलांची संख्या ०४ व मुलींची संख्या १८ आहे. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलीसाठी स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना पुढील सुविधा पुरविते. गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार इत्यादीचा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०२ आहे. या शाळेतील उपक्रमामध्ये शुद्धलेखन स्पर्धा, रंगभरण व चित्रकला स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा हे उपक्रम राबविले जातात.[२२]

### ३.४.११ मराठी शाळा नं. ११

या शाळेची स्थापना ६ जून १९३७ रोजी झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या ८५ असून यामध्ये मुलांची संख्या ३८ व मुलींची संख्या ४७ आहे. या शाळेत ४ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलीसाठी स्वतंत्र शौचालय आहत. अपंगासाठी ही स्वतंत्र शौचालय आहे. या शाळेत विद्यार्थ्यांना पुढील सुविधा आहेत. युनिफॉर्म, क्रमिक पुस्तके, वहया दप्तर, कंपासपेटी, पेन, अल्पसंख्याक विद्यार्थी शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थिनी शिष्यवृत्ती व अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती इत्यादीचा समावेश होतो. या शाळेतील वर्ग खोल्या संख्या ०८ आहे. या शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार श्री.अरूण पंढरीनाथ जाधव यांना मिळाला आहे.

या शाळेतील उपक्रमामध्ये नेत्यांच्या जयंत्या, उत्सव, विविध स्पर्धा–वक्तृत्त्व, निबंध, रांगोळी, श्लोक पाठांतर, नाटयछटा, वर्ग सजावट, हस्तकला, चित्रकला स्पर्धा. क्रीडास्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, रंगभरण, स्नेहसंमेलन, योगासने, प्रात्यक्षिक, शालेय गीतमंच व कवायत प्रकार हे उपक्रम राबविले जातात.[२३]

### ३.४.१२ उर्दू शाळा नं. १२

या शाळेची स्थापना सन १९९५ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण दिले जाते. या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या ६० असून यामध्ये मुलांची संख्या १४ व मुलींची संख्या ४६ आहे. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. ही शाळा विद्यार्थ्यांना पुढील सुविधा पुरविते. गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार, अल्पसंख्याक योजने अंतर्गत शैक्षणिक साहित्य वाटप इत्यादीचा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०१ आहे. या शाळेतील उपक्रमामध्ये बँड पथक, ग्रंथालय व बेस्ट स्टुडण्ट ऑफ दिस मंथ हे उपक्रम राबविले जातात.[२४]

### ३.४.१३ उर्दू शाळा नं. १३

या शाळेची स्थापना सन १९३५ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण दिले जाते. या शाळेतील विद्यार्थी संख्या १२० असून यामध्ये मुलांची संख्या ४५ व मुलींची संख्या ७५ आहे. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलीसाठी स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये मोफत गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार इत्यादीचा समावेश होतो. या शाळेतील वर्ग खोल्या संख्या ०४ आहे. या शाळेतील उपक्रमामध्ये शाळा स्तरावर विविध स्पर्धाचे आयोजन केले जाते.[२५]

### ३.४.१४ मराठी शाळा नं. १४

या शाळेची स्थापना सन १९४५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या १०१ असून यामध्ये मुलांची संख्या ५५ व मुलींची संख्या ४६ आहे. या शाळेत ३ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार अल्पसंख्याक विद्यार्थी शिष्यवृत्ती व अस्वच्छ कामगार

शिष्यवृत्ती इ.चा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ३ आहे. या शाळेतील उपक्रम यामध्ये सर्व प्रकारच्या स्पर्धा, सण उत्सव साजरे करणे, बौद्धिक स्पर्धा, शैक्षणिक सहल– स्थानिक, परगावी हे उपक्रम राबविले जातात.[२६]

### ३.४.१५ मराठी शाळा नं. १५

या शाळेची स्थापना सन १९६२ मध्ये रविवार पेठेत झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या ११८ असून यामध्ये मुलांची संख्या ६१ व मुलींची संख्या ५७ आहे. या शाळेत ३ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलीसाठी स्वतंत्र शौचालय आहे. अंपगासाठी ही स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये नगरपालिकेकडून गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, दादा महाराज शिष्यवृत्ती कराटे प्रशिक्षण(मुलींना) इ.चा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०६ आहे.

या शाळेतील उपक्रमामध्ये सर्व राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या करणे, वाद्यवृंदासह परिपाठ घेणे, क्रीडा स्पर्धा सहभाग, सांस्कृतिक कार्यक्रम, विज्ञान प्रदर्शन, शिवजयंती रथ तयार करणे, दहीहंडी, वाढदिवस साजरा करणे, सहल, व्यक्तिमत्व विकासासाठी योग, कवायत बाहेरील तज्ञ व्यक्तींचे परिसंवाद व लैंगिक शिक्षण इत्यादी उपक्रम राबविले जातात.[२७]

### ३.४.१६ मराठी शाळा नं. १६

या शाळेची स्थापना सन १९३५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या २६२ असून यामध्ये मुलांची संख्या १२३ तर मुलींची संख्या १३९ आहे. या शाळेत ७ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलीसाठी स्वतंत्र शौचालय आहे. अपंगासाठी ही स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार अल्पसंख्याक विद्यार्थी शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थिनी, शिष्यवृत्ती, अस्वच्छ कामगार शिष्यवृत्ती इत्यादीचा समावेश होतो. या शाळेतील वर्ग खोल्या संख्या ११ आहे.

या शाळेतील उपक्रमामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध व वक्तृत्त्व स्पर्धा, पाढे पाठांतर उपक्रम, सर्व राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या करणे, क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, दहीहंडी, वाढदिवस साजरा करणे, सहल, व्यक्तिमत्व विकासासाठी योग इत्यादी होत. [२८]

### ३.४.१७ मराठी शाळा नं. १७

या शाळेची स्थापना सन १८८२ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या ११८ असून यामध्ये मुलांची संख्या ६७ व मुलींची संख्या ५१ आहे. या शाळेत ४ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलीसाठी स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये मोफत गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार इ.चा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०६ आहे. या शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार सौ.डुबल वत्सला बबनराव यांना मिळाला व गुणवंत कर्मचारी पुरस्कार श्री अशोक भिकू भुजबख यांना मिळाला.

या शाळेमध्ये प्रश्नमंजूषा, राजकुमार–राजकुमारी, पाढे पाठांतर, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना हे उपक्रम राबविले जातात. [२९]

### ३.४.१८ मराठी शाळा नं. १८

या शाळेची स्थापना सन १९६२ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या १०९ असून यामध्ये मुलांची संख्या ६८ व मुलींची संख्या ४१ आहे. या शाळेत ३ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये मोफत गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार, अल्पसंख्याक शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले दत्तक–पालक योजना, अभयसिंहराजे भोसले शिष्यवृत्ती, शिष्यवृत्ती मार्गदर्शन इत्यादी चा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०४ आहे.

या शाळेतील उपक्रमामध्ये स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, इंग्रजी शब्द संपत्ती वाढविणे, पाढे पाठांतर, वैयक्तिक आरोग्य तपासणी, वक्तृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा. हस्ताक्षर, रंगभरण, मनोरंजनात्मक खेळ इत्यादी उपक्रम राबविले जातात. या शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार

सौ.रसिका अमितकुमार शेलार यांना मिळाला आहे.[३०]

### ३.४.१९ मराठी शाळा नं. १९

प्रारंभी ही शाळा रिमांड होमच्या ताब्यात असून नंतर तिचे हस्तांतर झाले आहे. या शाळेची स्थापना सन १९७७ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण दिले जाते. या शाळेतील विद्यार्थी संख्या २०७ असून यामध्ये मुलांची संख्या ११२ व मुलींची संख्या ९५ आहे. या शाळेत ६ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये मोफत गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार इ.चा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०७ आहे. या शाळेतील उपक्रमामध्ये शाळा स्तरावर विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन, शालेय बाग, गीतमंच सांस्कृतिक कार्यक्रम, योगाभ्यास, आरोग्य शिबीर, माता-पालक संघ, वार्ड शिक्षण समिती, सावित्रीबाई फुले दत्तक-पालक योजना व सहल इत्यादी. हे उपक्रम राबविले जातात.[३१]

### ३.४.२० मराठी शाळा नं. २०

या शाळेची स्थापना सन १८८५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या १२३ असून यामध्ये मुलांची संख्या ५१ व मुलींची संख्या ७२ आहे. या शाळेत ५ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये मोफत गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, कै.अभयसिंहराजे भोसले शिष्यवृत्ती योजना इत्यादीचा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ११ आहे.

या शाळेतील उपक्रमामध्ये वृक्षारोपण, बालवाचनालय, बालआनंद मेळावा, वृक्षदिंडी, शिक्षक-पालक मेळावा, वक्तृत्त्व, रांगोळी, चित्रकला स्पर्धा, नृत्य स्पर्धा, पारंपारिक वेशभूषा, सहल, विविध कलेतील पारंगत व्यक्तीचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, गणपती महोत्सव हे उपक्रम राबविले जातात. या शाळेत श्री. पूनाजी रामचंद्र गवारी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे.[३२]

### ३.४.२१ मराठी शाळा नं. २१

या शाळेची स्थापना सन १९८८ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण दिले जात होते. या शाळेतील विद्यार्थी संख्या ७२ असून यामध्ये मुलांची संख्या २९ व मुलींची संख्या ४३ आहे. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०४ आहे. या शाळेत विद्यार्थी संख्या चांगली असल्याने तसेच शाळेची इमारत स्वतःच्या मालकीची असल्याने शाळा व्यवस्थितपणे चालू आहे.[३३]

### ३.४.२२ मराठी शाळा नं. २२

या शाळेची स्थापना सन १९८४ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण दिले जात होते. या शाळेतील विद्यार्थी संख्या ६८ असून यामध्ये मुलांची संख्या ३६ व मुलींची संख्या ३२ होती. या शाळेत ३ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या ०४ आहे. या शाळेत विद्यार्थी संख्या कमी झाल्याने तसेच शाळेची इमारत भाडयाची असल्याने शाळा सन १९९५–९६ मध्ये बंद पडली.[३४]

### ३.४.२३ मराठी शाळा नं. २३

या शाळेची स्थापना सन १९७२ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या २६४ असून यामध्ये मुलांची संख्या १९३ तर मुलींची संख्या १४१ आहे. या शाळेत ११ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेत मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालय आहे. ही शाळा विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविते यामध्ये मोफत गणवेश, वहया, पुस्तके, लेखन साहित्य, आरोग्य तपासणी, शालेय पोषण आहार, आसन पट्टया इत्यादीचा समावेश होतो. या शाळेचे वर्ग खोल्या संख्या १४ आहे.

या शाळेमध्ये वर्धापन दिन, शिवजयंती, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, वैद्यकिय मुले/मुली मोफत तपासणी शिबीर व श्री. छ. प्रतापसिंह दादामहाराज विविध स्पर्धा सहभाग/बक्षीस हे उपक्रम राबविले जातात.[३५]

### ३.४.२४ मराठी शाळा नं. २४

या शाळेची स्थापना सन १९३१ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण दिले जाते. या शाळेतील विद्यार्थी संख्या १३८ असून यामध्ये मुलांची संख्या ६८ व मुलींची संख्या ७० आहे. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. या शाळेचे वर्ग

खोल्या संख्या ५ आहे. या शाळेत विद्यार्थी संख्या चांगली असल्याने तसेच शाळेची इमारत स्वतःच्या मालकीची असल्याने शाळा व्यवस्थितपणे चालू आहे.[३६]

सातारा शहरात माध्यमिक शिक्षण देण्यासाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूल, प्रतापसिंह महाराज हायस्कूल, आण्णासाहेब कल्याणी विद्यालय, महाराजा सयाजीराव हायस्कूल, भिमाबाई आंबेडकर कन्या विद्यालय, श्रीपतराव हायस्कूल करंजे याशिवाय अनेक मराठी व इंग्लिश माध्यमाची हायस्कूल सातारा शहरात आहेत. तर उच्च शिक्षणासाठी छ.शिवाजी कॉलेज सातारा, धनजंय गाडगीळ कॉलेज, यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, कला, वाणिज्य महाविद्यालय, लालबहाद्दूरशास्त्री महाविद्यालय व कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा इत्यादी आहेत. याशिवाय दोन डी.एड. विद्यालये, आझाद बी.एड. महाविद्यालय सातारा ही शिक्षक प्रशिक्षण कॉलेज सुरू आहेत. याशिवाय एक आय. टी. आय सुरू आहे.[३७]

## ३.५ शिक्षण मंडळाची रचना

शिक्षण मंडळाची रचना अधिकारी व पदाधिकारी यांच्या सदस्यत्वाने होते. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ६२ (२) (अ) खाली उपाध्यक्ष हे शिक्षण समितीचे पदसिध्द सभापती राहतील.[३८]

शिक्षण मंडळाचा कारभार सुरळीत चालविण्यासाठी खालील प्रशासन यंत्रणा आहे.[३९]

शिक्षण संचालक
|
उपशिक्षण संचालक
|
शिक्षणाधिकारी (प्राथमिक जि.प.सातारा)
|
गटशिक्षणाधिकारी (पं.समिती)
|
शिक्षण विस्तार अधिकारी
|
प्रशासन अधिकारी व त्याचा कर्मचारी वर्ग

अशा प्रकारे शिक्षण मंडळाचा कारभार सुरळीत चालविण्यासाठी प्रशासन रचना तयार करण्यात आली होती.

## ३.६ नगरपरिषद शिक्षण मंडळ, सातारा आदर्श शिक्षक पुरस्कार

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | शाळेचे नाव | साल |
|---|---|---|---|
| १. | श्री.इब्राहिम याकूब शेख | न.पा.शाळा क्र.८ (राज्यपुरस्कार) | १९९६ |
| २. | सौ.सुलोचना सिताराम भुजबळ | न.पा.शाळा क्र.२४ | १९९७ |
| ३. | सौ.अंजली वामन थोरात | अण्णासाहेब राजेभोसले | १९९८ |
| ४. | श्री.नरेंद्र जनार्दन धायगुडे | अण्णासाहेब राजेभोसले | १९९८ |
| ५. | सौ.माधवी माणिकलाल तिवारी | न.पा.शाळा क्र.६ | १९९८ |
| ६. | श्री सुरेश शंकर करंदीकर | न.पा.शाळा क्र.२ | १९९८ |
| ७. | सौ. मंदा सुधीर अष्टेकर | नवीन मराठी शाळा | १९९८ |
| ८. | श्री.नंदकुमार फकिरा अष्टेकर | शिक्षण मंडळ कार्यालय | १९९८ |
| ९. | श्रीमती मंगला आनंदराव यादव | न.पा.शाळा क्र.५ | २००० |
| १०. | सौ.विमल नामदेव तरडे | न.पा.शाळा क्र.१५ | २००० |
| ११. | सौ.शुभदा शरद वाघ | अण्णासाहेब राजेभोसले | २००० |
| १२. | सौ.जयश्री तानाजी उबाळे | अण्णासाहेब राजेभोसले | २००० |
| १३. | सौ.अंजली जयंत डोंगरे | नवीन मराठी शाळा | २००० |
| १४. | सौ.माधवी विजय बोकील | जानकीबाई प्रेमसुख झंवर | २००० |
| १५. | श्री.नारायण सावळाराम शिंदे | शिक्षण मंडळ कार्यालय (शिपाई) | २००० |
| १६. | श्री.विजयकुमार लक्ष्मण लाड | न.पा.शाळा क्र.११ | २००१ |
| १७. | सौ.सुप्रिया सुरेंद्र माजगावकर | नवीन मराठी शाळा | २००१ |
| १८. | श्री.सुरेश बाळकृष्ण चोरगे | न.पा.शाळा क्र.२ | २००१ |
| १९. | सौ.स्मिता रविंद्र अवचट | अण्णासाहेब राजेभोसले | २००१ |
| २०. | सौ.कांचन तुकाराम तोडकरी | अण्णासाहेब राजेभोसले | २००१ |
| २१. | सौ.प्रिया प्रभाकर कुलकर्णी | केशवराव पूर्व प्राथमिक शाळा | २००१ |
| २२. | सौ.ताई बाबुराव बोले | न.पा.शाळा क्र.२ (कामाठी) | २००१ |
| २३. | श्रीमती अनुसया जयसिंग भिंगारदेवे | न.पा.शाळा क्र.२० | २००२ |
| २४. | सौ. हेमलता उद्धव जंगम | न.पा.शाळा क्र.२ | २००२ |
| २५. | सौ.अंजली त्र्यंबकेश्वर पेंडसे | नवीन मराठी शाळा | २००२ |
| २६. | सौ.जुलेखा शब्बीर शेख | न.पा.शाळा क्र.१३ (उर्दू) | २००२ |
| २७. | श्री.चंद्रकांत नारायण बागल | न.पा.शाळा क्र.२३ | २००२ |
| २८. | सौ.विनया सदाशिव पटवर्धन | अण्णासाहेब राजेभोसले | २००२ |
| २९. | सौ.सिंधु लक्ष्मण चव्हाण | न.पा.शाळा क्र.१ (शिपाई) | २००२ |
| ३०. | सौ.शकुंतला आनंदराव माने | सरस्वती विद्या मंदिर शाळा क्र.१ | २००३ |
| ३१. | श्री.अशोक नारायण भोज | न.पा.शाळा क्र.१६ | २००३ |
| ३२. | श्री.अरूण पंढरीनाथ जाधव | न.पा.शाळा क्र.११ | २००३ |
| ३३. | श्री.विजय सिताराम निकम | न.पा.शाळा क्र.८ | २००३ |
| ३४. | सौ.जानकी मोहन तावरे | अण्णासाहेब राजेभोसले | २००३ |
| ३५. | सौ.अलका अशोक माहुले | बापूसाो चिपळूणकर मराठी शाळा | २००३ |

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | शाळेचे नाव | साल |
|---|---|---|---|
| ३६. | सौ.अंजली वामनराव थोरात | अण्णासाहेब राजेभोसले | २००३ |
| ३७. | सौ.मालन आत्माराम निकम | यशदायिनी विद्यामंदिर, न.पा.शा.११ | २००३ |
| ३८. | श्री.आनंदराव गोविंदराव नवाळे | अकौंट, न.पा.शि.मंडळ | २००३[४०] |

## ३.७ खाजगी अनुदानित मराठी माध्यम प्राथमिक शाळा सातारा

| अ.नं. | शाळेचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| १. | अण्णासाहेब राजेभोसले प्राथ. शाळा | हत्तीखाना सातारा |
| २. | नवीन मराठी शाळा | सोमवार पेठ सातारा |
| ३. | बापूसाो चिपळूणकर मराठी शाळा | मंगळवार पेठ सातारा |
| ४. | बापूसाो चिपळूणकर मराठी शाळा | देशमुख कॉलनी सातारा |
| ५. | जानकीबाई प्रेमसुख झंवर | यादोगोपाळ पेठ सातारा |
| ६. | चर्च ऑफ गॉड स्कूल | न.पा.शॉपिंग सेंटर सातारा |
| ७. | मराठी मिशन युनियन स्कूल | पोवई नाका, हेम एजन्सी सातारा |
| ८. | आण्णासाहेब कल्याणी प्राथ.शाळा | जिल्हा परिषद समोर सातारा |
| ९. | नवीन मराठी शाळा खडकेश्वर | यादोगोपाळ पेठ सातारा |
| १०. | नूतन मराठी शाळा महिला मंडळ | राजवाडा सातारा |
| ११. | नूतन मराठी शाळा | मल्हार पेठ सातारा |
| १२. | आबासाहेब चिरमुले विदयामंदिर | व्यंकटपुरा पेठ सातारा |
| १३. | आदर्श विदयामंदिर प्राथ.शाळा | करंजे सातारा |
| १४. | रा.ब.काळे प्राथ.शाळा | व्यंकटपुरा पेठ सातारा |
| १५. | जिजामाता प्रॅक्टिसिंग स्कूल | रयत शिक्षण संस्थेशेजारी सातारा |
| १६. | जय जवान प्राथ.शाळा | जरंडेश्वर नाका सातारा[४१] |

## ३.८ नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा प्रशासन अधिकारी यादी(सन १९२५ ते २००३)

| अ.नं | प्रशासन अधिकारी | कालावधी |
|---|---|---|
| १. | पी.एस. बडवे | १९२५ ते १९४१ |
| २. | वाय.बी शिंदे | १९४२ ते --- |
| ३. | एस.जी.देशपांडे | १९५० ते --- |
| ४. | अे.अे.परकार | १९५४ ते १९५५ |
| ५. | व्ही.डी.कोटणीस | १९५५ ते १९५८ |
| ६. | एस.व्ही.गायकवाड | १९५८ ते १९५९ |
| ७. | व्ही.एच.जाधव | १९५९ ते १९६० |
| ८. | जी.अे.दप्तरदार | १९६० ते --- |
| ९. | बी.एन.गुरव | १९६० ते १९६३ |
| १०. | एस.बी.डोंबे | १९६३ ते १९६४ |
| ११. | जी.के शिनगारे | १९६४ ते --- |
| १२. | एम.एल.कुलकर्णी | १९६४ ते १९६६ |

| अ.नं | प्रशासन अधिकारी | कालावधी |
|---|---|---|
| १३. | एम.एल.सुढाळ | १९६६ ते १९६७ |
| १४. | श्रीमती के.आर.राणे | १९६७ ते --- |
| १५ | एस.अे.कुलकर्णी | १९६७ ते १९६८ |
| १६. | आर.के.गिरे | १९६८ ते १९६९ |
| १७. | एम.एल.सावंत | १९६९ ते १९७४ |
| १८. | एम.के डोईजड | १९७४ ते १९७६ |
| १९. | एम.जी.कुलकर्णी | २८.०५.१९७६ ते २८.११.१९७६ |
| २०. | पी.व्ही.जोग | २९.११.१९७६ ते ३१.०८.१९७८ |
| २१. | पी.डी.आंबोळे | ०१.०९.१९७८ ते २६.०९.१९७९ |
| २२. | एस.के.दरेकर | २६.०९.१९७९ ते ०१.०७.१९८१ |
| २३. | एल.एस.जाधव | ०१.०७.१९८१ ते ३१.१०.१९८१ |
| २४. | एच.एल.भुजबळ | ३१.१०.१९८१ ते २८.०५.१९८४ |
| २५. | बी.इ.बल्लाळ | २८.०५.१९८४ ते १२.०६.१९८४ |
| २६. | अे.एन.पवार | १३.०६.१९८४ ते ०३.०६.१९८६ |
| २७. | अे.एस.माने | ०४.०६.१९८६ ते १८.०५.१९८७ |
| २८. | यु.बी.घाटे | १९.०५.१९८७ ते ०४.११.१९८८ |
| २९. | एन.बी.जाधव | ०५.११.१९८८ ते २९.११.१९८८ |
| ३०. | व्ही.एस.फडतरे | ३०.११.१९८८ ते ०१.११.१९९२ |
| ३१. | पी.बी.दुर्गुळे | ०२.११.१९९२ ते २६.०५.१९९५ |
| ३२. | एस.एस.कुंभार | २६.०५.१९९५ ते १२.०६.१९८५ |
| ३३. | व्ही.बी.भस्मे | १२.०६.१९९५ ते ०१.०६.१९९९ |
| ३४. | एन.बी.जाधव | ०१.०६.१९९९ ते ०७.०७.२००३ |
| ३५. | व्ही.एस.फडतरे | ०८.०७.२००३ ते १५.०७.२००३ |
| ३६. | टी.एच.सुर्यवंशी | १६.०७.२००३ ते २३.०८.२००४[४२] |

## ३.९ शिक्षण मंडळ सभापती यादी(सन १९०३ ते १९८५)

| अ.नं | सभापती | कालावधी |
|---|---|---|
| १. | आर.आर.काळे | १९०३ ते १९१० |
| २. | टी.बी.आढाव | १९१० ते १९१२ |
| ३. | आर.आर.काळे | १९१२ ते १९१३ |
| ४. | एल.एम.आपटे | १९१३ ते १९१४ |
| ५. | के.एन. कडसकर | १९१४ ते १९१७ |
| ६. | एस.व्ही. जोशी | १९१७ ते १९१८ |
| ७. | व्ही.जी.चिरमुले | १९१८ ते १९१९ |
| ८. | अबेदीन शेटजी | १९१९ ते १९१९ |
| ९. | जी.व्ही.गुजर | १९१९ ते १९२१ |
| १०. | व्ही.एन.आगटे | १९२१ ते १९२२ |
| ११. | अबेदिन आसदअली | १९२२ ते १९२३ |
| १२. | एम.पी.किराणे | १९२३ ते १९२४ |
| १३. | बी.बी.भद्रे | १९२४ ते १९२५ |
| १४ | एस.एस. बाजारे | १९२५ ते १९२९ |
| १५. | एम.बी.मुथा | १९२९ ते १९३१ |

| अ.नं | सभापती | कालावधी |
| --- | --- | --- |
| १६. | एस.एस. बाजारे | १९३१ ते १९३२ |
| १७. | टी.एम.शहा | १९३२ ते १९३९ |
| १८. | आर.के.पेंढारकर | १९३९ ते १९३९ |
| १९. | जी.व्ही.जोशी | १९३९ ते १९४२ |
| २०. | एल.ए.जाजू | १९४२ ते १९४५ |
| २१. | डी.डी.तपासे | १९४५ ते १९४६ |
| २२. | के.डी माजगावकर | १९४६ ते १९४९ |
| २३. | आय.ए.मिर्झा | १९४९ ते १९५२[४३] |
| २४. | पी.जी.जाधव | १९५२ ते १९५६ |
| २५. | बी.आर.पाटील | १९५६ ते १९५८ |
| २६. | आर.डी.माजगावकर | १९५८ ते १९६३ |
| २७. | श्रीमती उषाताई देशपांडे(ॲक्टीव्ह) | १९६० ते १९६० |
| २८. | जी.डी.गुजर | १९६३ ते १९६४ |
| २९. | एम.डी.गाडेकर | १९६४ ते १९६५ |
| ३०. | सौ.लिलाताई क्षिरसागर | १९६५ ते १९६७ |
| ३१. | व्ही.बी.वाळींबे | १९६७ ते १९६८ |
| ३२. | एच.एल.एकबोटे | १९६८ ते १९६९ |
| ३४. | एस.ए.पाटील | १९६९ ते १९७१ |
| ३५. | डी.एस.तळेकर | १९७१ ते १९७२ |
| ३६. | डी.के.माजगावकर | १९७२ ते १९७३ |
| ३७. | एम.पी.दाबके | १९७३ ते १९७५ |
| ३८. | एम.जी.पाटुकले | १९७५ ते १९७५ |
| ३९. | एस.एल.बागल | १९७५ ते १९८५[४४] |

## ३.१० शिक्षण मंडळ सभापती व उपसभापती

| अ.नं | सभापती | कालावधी |
| --- | --- | --- |
| १. | एन.एल.जाधव | १७.१०.८५ ते ३०.१०.८६ |
| २. | डी.व्ही.कदम | ०१.११.८६ ते १६.११.८७ |
| ३. | बी.एस.दळवी | १७.११.८७ ते ०४.१२.८८ |
| ४. | डी.आर.उर्फ बापूसाहेब जाधव | ०५.१२.८८ ते २२.०१.९० |
| ५. | डी.के.माजगावकर | २३.०१.९० ते २२.०६.९२ |
| ६. | डॉ.पी.बी.खुटाळे | २३.०६.९२ ते १४.०७.९३ |
| ७. | ॲड.सतीश कुलकर्णी | १५.०७.९३ ते ११.०८.९४ |
| ८. | एम.आर.सांळुखे | १२.०८.९४ ते १९.०४.९७ |
| ९. | सुधाकर शं.शेटे | १९.०४.९७ ते ३०.०६.९७ |
| १०. | ॲड.सतीश कुलकर्णी | १७.०७.९७ ते ३०.०९.९८ |
| ११. | नंदकुमार ए. कवाटे | ३०.०९.९८ ते ०१.०३.२००२ |
| १२. | रमेश शा. शानभाग | ०८.०३.०२ ते ०२.०३.०३ |
| १३. | मोहन उर्फ आबा गं. इंगळे | ०३.०३.०३ ते ०५.११.०३ |
| १४. | एम.एन.दरेकर | ०६.११.०३ ते १५.०५.०४[४५] |

## ३.११ उपसभापती

| अ.नं | उपसभापती | कालावधी |
|---|---|---|
| १. | एस.एस.बाबर | १७.१०.८५ ते ३०.१०.८६ |
| २. | पी.पी.तपासे | ०१.११.८६ ते १६.११.८७ |
| ३. | व्ही.बी.परदेशी | १७.११.८७ ते ०४.१२.८८ |
| ४. | गणीभाई इ.बागवान | ०५.१२.८८ ते २२.०१.९० |
| ५. | एस.एस.बाबर | २३.०१.९० ते २२.०६.९२ |
| ६. | बी.आर.भोसले | २३.०६.९२ ते १४.०७.९३ |
| ७. | इ.आर.बागवान | १५.०७.९३ ते ११.०८.९४ |
| ८. | एस.डी.कांबळे | १२.०८.९४ ते १९.०४.९७ |
| ९. | अविनाश ना.कदम | १९.०४.९७ ते ०७.०३.२००२ |
| १०. | मोहन गं इंगळे | ०८.०३.०२ ते ०२.०३.०३ |
| ११. | जयवंतराव शं.ढाणे | ०३.०३.०३ ते ०५.११.०३[४६] |

## ३.१२ शालेय गुणवत्ता

शालेय गुणवत्ता ही शाळेत शिक्षणमंडळाने घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेवरून समजते. या शिष्यवृत्ती परीक्षेत सातारा शहरातील नगरपालिका शाळेत इ.४थी व इ.७वी च्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश यावरून गुणवत्ता समजण्यास मदत होते. सर्व शाळातील विद्यार्थ्यांनी घेतलेल्या सहभागी विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. यावरून शालेय गुणवत्ता समजण्यास मदत होते.[४७]

## ३.१३. शालेय विविध उपक्रम

सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाने शिक्षणात सुधारणा व्हाव्यात. शिक्षणाचा दर्जा टिकावा यासाठी फार मोठे प्रयत्न केले आहेत. त्यासाठी विविध उपक्रम राबवून पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांना सातारचे श्रीमंत उदयनराजे भोसले व श्रीमंत छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सतत मदत केली आहे. नगरपालिका शाळांचा दर्जा टिकून शाळा नावारूपास याव्यात यासाठी त्यांचे मार्गदर्शन चालू आहे. सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाने जे विविध उपक्रम राबविले आहेत.

### ३.१३.१ या चिमण्यांनो परत फिरा रे

दरवर्षी जून महिन्यात नगरपालिका शिक्षण मंडळ समाजातील पालक व मुलांना नगरपालिका शाळांचे वास्तव्य लक्षात यावे या करिता या चिमण्यांनो परत फिरा रे असे तळमळीचे आवाहन करीत असते. या करिता प्रत्येक शाळेमध्ये बालसंस्काराचे आयोजन उन्हाळी सुट्टीमध्ये करण्यात येते. आनंददायी उपक्रम, गुणवत्ता, शैक्षणिक सर्वेक्षण या माध्यमातून शिक्षकांच्या बरोबरीने पदाधिकारी व अधिकारी हे घरोघरी जावून पटनोंदणी करण्यासाठी अथक प्रयत्न करीत असतात.त्यामुळे शाळेतील पट टिकविण्यात मदत झाली आहे.

### ३.१३.२ शिक्षण मंडळ सदस्यांनी नगरपालिका शाळांचे पालकत्व स्वीकारले

शिक्षण मंडळाच्या सभापतीपासून ते सर्व सदस्यांपर्यत सर्व पदाधिकारी यांनी आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून शाळेचा भौतिक, सामाजिक, शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. प्रत्येक सदस्याने ठराविक शाळा वाटयाला घेऊन त्या सर्व शाळांचे सर्व प्रकारचे उत्तरदायित्व स्वीकारले. या कामगिरीतून शाळांना विविध प्रकारची शैक्षणिक मदत, विविध उपक्रम व स्पर्धा या माध्यमातून शाळांचा विकास करण्यात आला.[४८]

### ३.१३.३ हरित सातारा अभियान

वृक्षतोड थांबविण्यासाठी कायद्याच्या कडक अमंलबजावणी बरोबर लोकांची मानसिकता बदलणे खूप गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन नगरपालिका शिक्षण मंडळाने हरित सातारा अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले जात आहे. या शाळेतील तीन ते साडे तीन हजार विद्यार्थी व विद्यार्थीनी या अभियानाशी जोडले गेले असून हे अभियान फक्त विद्यार्थ्यापुरते मर्यादित न राहता यात पालकांचा व शिक्षकांचा सहभाग घेऊन विविध ठिकाणी वृक्षारोपण व वृक्षदिंडीसारखे कार्यक्रम घेऊन जनजागृती केली जात आहे.[४९]

### ३.१३.४ मोफत गणवेश वाटप

कॅप्टन रामचंद्र क्षीरसागर यांनी १ लाख रूपयाचे गणवेश वाटप नगरपालिका शाळातील सर्व होतकरू विद्यार्थ्याना दिले. कुपर परिवारातर्फे सतत पाच वर्षे गणवेश वाटप चालू आहे. त्यांनी नगरपालिका शाळा क्रं.२० सदरबझार येथील शाळेला हे गणवेश वाटपाचे काम केले.

मा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त नगरपालिका शाळा क्रमांक ११ मधील सर्व विद्याार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करण्यात आले. तसेच कर्तव्य सोशल ग्रुप व मा. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे मित्र समुहातर्फे नगरपालिकेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले होते.[५०]

### ३.१३.५ आरोग्य शिबीर

नगरपालिका शाळांमध्ये दरवर्षी दंतचिकित्सा शिबीर आयोजित करण्यात येते. ज्या विद्यार्थ्यामध्ये दाताचे दोष आहेत त्यांना पुढची तपासणी व औषध खर्च मोफत केला जातो. किशोरवयीन मुलींना होणाऱ्या शारीरिक बदल व घ्यावयाच्या काळजीबद्दल स्त्रीरोग तज्ञाच्या मार्फत सविस्तर मार्गदर्शन तक्षशिला विद्यामंदिर नगरपालिका शाळा क्र.२० सदर बझार या ठिकाणी आयोजित केले होते.बदलते वय व त्यानुसार होणारे शारीरिक बदल व या बदला सोबत घ्यावयाची स्वच्छता, काळजी, आवश्यक आहार याबाबत उपस्थित असणाऱ्या शाळा क्र.१९, २० व २३ मधील इ.पाचवी ते सातवीच्या वर्गातील विद्यार्थीनींनी मोठया प्रमाणावर सहभाग घेतला होता.

नगरपालिका शाळातील फक्त विद्यार्थीनीसाठी लायन्स नॅब व स्नेहांकित महिला मंडळाच्या अध्यक्षा व विद्यमान नगरसेविका सौ. अलकताई लोखंडे यांचे मार्फत सर्व मुलींची मोफत नेत्र तपासणी केली. यामध्ये शाळा क्र.१, २० मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. नेत्रदोष असणाऱ्या विद्यार्थीनीना मोफत चष्मे वाटप केले गेले.[५१]

### ३.१३.६ विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन हे मूल्य जोपासले जावे त्यांच्यामध्ये संगणक, आरोग्य, विज्ञान, उर्जा, कृषी, शैक्षणिक, तंत्रज्ञान, वाहतूक आणि दळणवळण या विषयीचे कुतूहल सादर करण्याचे माध्यम निर्माण व्हावे या करिता सातारा शहरातील सर्व नगरपालिका शाळा व इतर शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी विज्ञान प्रदर्शन भरविण्यात येते.

### ३.१३.७ श्री.छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती

शैक्षणिक प्रगतीस हातभार लावण्यासाठी श्री.छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांच्या स्मरणार्थ बालदिनापासून प्रतिवर्षी १६३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. याचा लाभ नगरपालिकेतील शाळामधील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना होत आहे.[५२]

### ३.१३.८ क्रीडास्पर्धांचे आयोजन

खेळ व व्यायाम यांचे महत्त्व ओळखून पाच वर्षापासून नगरपालिकेच्या शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना एकत्रित करून छत्रपती शाहू क्रिडा संकूल सातारा येथे क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये लहान गटांमध्ये डॉजबॉल, लंगडी, २५ मी.धावणे, १०० मीटर धावणे, ५० मीटर शटलरने तसेच मोठया गटात कबड्डी, खोखो, रस्सीखेच, १०० मीटर व २०० मीटर धावणे, लांब उडी, गोळाफेक इत्यादी खेळांचा समावेश केला जातो. याशिवाय नगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने कॅरम स्पर्धा, जलतरण स्पर्धा, कुस्ती याचे आयोजन केले जाते.

सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ आयोजित प्रतापसिंह महाराज स्मृतीस्पर्धा घेण्यात येतात. या मध्ये विद्यार्थ्यासाठी तसेच शिक्षकांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यासाठी रंगभरण स्पर्धा, श्लोक पाठांतर, तसेच उर्दू माध्यमातील मुलासाठी वेगळया स्पर्धा घेतल्या जातात. शिक्षकांसाठी विविध स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा यांचे आयोजन केले जाते.[५३]

सिद्धी विद्या मंदिर नगरपालिका शाळा क्रं.१९ रिमांड होम सातारा येथे व नगरपालिका शाळांमध्ये दोरीवरील मल्लखांब हा उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक क्रीडा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या १४ वर्षाखालील मुलांच्या किक बॉक्सिंग स्पर्धेत राज्य स्तरावर सरस्वती विद्यामंदिर नगरपालिका शाळा क्रं.१ चा विद्यार्थी सुनिल रामदास पवार याची निवड ३० ते ३२ किलो वजन गटात गडचिरोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली. यात या विद्यार्थ्याने भरघोस यश संपादन केले.[५४]

### ३.१३.९ शिक्षक मार्गदर्शिका डायरी

या डायरीमध्ये शिक्षकाची व्यक्तिगत माहिती, सर्व शिक्षा अभियान अनुदाने, शैक्षणिक संकेतस्थळे, फोन डायरी, शिक्षक व पदाधिकारी यांचे भ्रमणध्वनी सातारा शहराची माहिती, सातारा शहराची लोकसंख्या, साक्षर, निरक्षर, क्षेत्रफळ दुरध्वनी संकेतांक टपाल संकेतांक, वाहन संकेतांक संकेतस्थळे जगाच्या नकाशावरचे स्थान, समुद्रसपाटीपासूनची उंची व सातारा शहराचे स्थान इत्यादी अद्यावत माहिती संकलित केलेली आहे.

सातारा कसा निर्माण झाला. पेठेचे नाव कसे पडले. यांची ऐतिहासिक माहिती. ऐतिहासिक ठिकाणे, जुने वाडे, प्राचीन मंदिरे, धार्मिक सातारा व पर्यटन याची माहिती दिलेली

आहे. याशिवाय राष्ट्रीय प्रमुख दिन, आंतरराष्ट्रीय दिवस, सातारा शहर शासकीय विभाग–फोन नंबर, सातारा रेडिओ दुरदर्शन, भारत एल.पी.गॅस, एम.एस.ई.बी., दैनिक वृत्तपत्रे कार्यालये, बँका, सर्पमित्र ॲब्युलन्स सेवा याची अद्ययावत माहिती या डायरीमध्ये दिलेली आहे हाते.[५५]

### ३.१३.१० शिक्षक ग्रंथालय

सातारा नगपालिकेच्या शिक्षणमंडळातील शिक्षकासाठीच्या वाचनालयाचा संकल्प मा. नगराध्यक्षा सौ. स्मिता घोडके व शिक्षण मंडळ सभापती श्री. धनंजय जगताप यांनी केला आहे. नगराध्यक्षांच्या व सर्व शिक्षकांच्या योगदानातून नगरपालिका शाळा क्र.१ राजवाडा येथे शिक्षक वाचनालयाचे उद्घाटन मा.शिक्षण उपसंचालक श्री. दिनकर पाटील यांचे हस्ते व मा. डॉ. यशवंतराव पाटणे यांच्या उपस्थितीत पार पडले. या उपक्रमासाठी नगराध्यक्षा सौ.स्मिता घोडके यांनी रू.१०००० ची ग्रंथसंपदा भेट दिली. तसेच सर्व शिक्षण मंडळ सदस्यांनी सुद्धा २००० रूपयांची पुस्तके दिली. याचा फायदा शिक्षकांना आपल्या ज्ञानाची कक्षा रूंदावण्यासाठी झाला आहे.[५६]

### ३.१३.११ सांस्कृतिक उपक्रम

नगरपालिकेच्या सर्व शाळांतून महापुरूष, समाजसुधारक यांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात. महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस, पं.नेहरू, डॉ.राधाकृष्णन, यशवंतराव चव्हाण इत्यादी नेत्यांच्या थोर कार्याची ओळख करून देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा मुलांच्या मनावर या विविध कार्याद्वारे उमटविला जातो.

नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा व कुमारी वैशाली राजेघाटगे निर्मित कलाधाम ग्रुप सातारा यांचे संयुक्त विद्यमाने नागपंचमी सणानिमित्त 'मंगळागौरीचे खेळ' हा कार्यक्रम नगरपालिका मंगल कार्यालय या ठिकाणी नगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित केला होता. याशिवाय गुरूपौर्णिमेनिमित्त निवृत्त शिक्षकांचा मेळावा आयोजित केला जातो.

सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शिक्षण मंडळाच्या सदस्या सौ.सिमा जाधव यांच्या नियोजनांतर्गत सक्रांत या सणानिमित्त स्त्रियांसाठी हळदी–कुंकू कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमानिमित्त नगरपालिका शाळा क्र. २ येथे शिक्षिकांच्या घेतलेल्या रांगोळी स्पर्धांचे प्रदर्शन ठेवण्यात येते.[५८]

### ३.१३.१२ नगरपालिका शाळांचे शैक्षणिक कामकाजासाठी विविध समित्या

शिक्षकांनी शिक्षकासाठी संघटितरित्या काम केल्यास कामाचा उरक झटपट होतो. म्हणूनच दरवर्षी नगरपालिका शिक्षण मंडळ व नगरपालिका शाळांच्या विविध शैक्षणिक उपक्रम व झालेल्या मुख्याध्यापक सहविचार सभेमध्ये विविध समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या.

**विविध समित्या**

| अ.नं. | समिती | प्रमुख |
|---|---|---|
| १. | नियोजन | सर्व मुख्याध्यापक |
| २. | परीक्षा | श्री.गवारी, मुख्याध्यापक शाळा क्र.१६ |
| ३. | क्रीडा | श्री.शिंदे, मुख्याध्यापक शाळा क्र.२३ |
| ४. | सांस्कृतिक | सौ.सावंत, मुख्याध्यापक शाळा क्र.७ |
| ५. | स्नेहसंमेलन | सौ.बिडकर, मुख्याध्यापक शाळा क्र.८ |
| ६. | विज्ञान प्रदर्शन | श्री.वाघमारे, मुख्याध्यापक शाळा क्र.१५ |
| ७. | गुणवत्ता विकास | सौ.माने, मुख्याध्यापक शाळा क्र.६ |
| ८. | सहल | श्री.वायोळकर, मुख्याध्यापक शाळा क्र.१४ |
| ९. | स्पर्धा परीक्षा | सौ.बागल, मुख्याध्यापक शाळा क्र.२[५८] |

### ३.१३.१३ इतर उपक्रम

सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाच्यावतीने आणखी काही उपक्रम राबविले जातात त्यामध्ये शिक्षण मंडळाचे सदस्य विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारून शाळांचा भौतिक, सामाजिक, शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी भरघोस प्रयत्न करतात. विद्यार्थ्याचे उद्‌बोधन होण्यासाठी अनौपचारिक शिक्षण हा उपक्रम सुरू केला आहे. मा.शिक्षण उपसंचालक यांनी नगरपालिका शिक्षण मंडळातील शिक्षकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले होते.

भारतीय महिला मंडळ व शिवशक्ती महिला मंडळाच्या अध्यक्षा मा.श्रीमंत छत्रपती. चंद्रलेखाराजे भोसले यांच्या माध्यमातून आनंददायी शिक्षणासाठी मुलांना खेळणे, बागडण्यासाठी एक छोटे गार्डन उभे केले आहे. या महिला मंडळातर्फे दरवर्षी बालवाडीपासून खाऊ व शैक्षणिक साहित्य वाटप केले जाते. खेळासाठी या मंडळाने डॉजबॉल, हॉकी, बास्केट बॉल यासारखे साहित्य मुलांना दिले आहे. तसेच दरवर्षी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केला जातो.[५९]

याशिवाय या सर्व शाळेत पालकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. अशा प्रकारे या शाळांमध्ये एक अनोखे उपक्रम राबवून शाळा नाविण्यपूर्ण होण्यासाठी फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केले गेले आहेत.

**सातारा नगरपालिकेच्या शिक्षण क्षेत्राचा संक्षिप्त आढावा**

| | | |
|---|---|---|
| १. | नगरपालिकेच्या बालवाडया/अंगणवाडया | ५४ |
| २. | नगरपालिकेच्या शाळा | २१ |
| ३. | शिक्षक | १२३ |
| ४. | वर्गसंख्या(खोल्या) | १२५ |
| ५. | शौचालय सुविधा | सर्व शाळात |
| ६. | पाण्याची सुविधा | सर्व शाळात |
| ७. | क्रिडांगणाची सुविधा | ४ |
| ८. | शिक्षणावरील एकूण वार्षिक खर्च | रू.२,५४,१५,४०७[६०] |

या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, नगरपालिका शाळांमधून क्रिडांगण वगळता पुरेशा सुविधा दिलेल्या आहेत. वर्गखोल्या, पाणीव्यवस्था, शौचालय या महत्त्वाच्या गरजा पूर्ण केल्या गेल्या आहेत. मात्र क्रिडांगणाची सुविधा अपुर्ण आहे. एकूण २१ शाळांपैकी फक्त ४ शाळांमध्ये मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण उपलब्ध आहे. याशिवाय सातारा नगरपालिका आपल्या शाळेतील मुलांसाठी रोजच्या दुपारच्या जेवणाची व्यवस्था आहे. तसेच मोफत पुस्तके व शालेय गणवेश पुरवला जातो. मात्र या शाळांमधून व्यवसाय शिक्षण देणेच्या दृष्टीने पावले उचलली नाहीत. तसेच कोणत्याच शाळेत संगणक उपलब्ध नाही.

## ३.१४ शिक्षण मंडळ जमाखर्चाचे अंदाजपत्रक

सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाच्या अखत्यारीत शहरातील एकूण २१ प्राथमिक शाळा व खेळाची मैदाने आहेत. तसेच या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून महिन्यातून एकदा करून मुलांच्या शारीरिक स्थितीबाबत सल्ला वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत पालकांना दिला जातो. तसेच या आजाराचे बाबतीत ताबडतोब मोफत औषधोपचार केला जातो. त्याचबरोबर शासकीय उपक्रम राबवले जातात. गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके वाटप केले जातात. सातारा नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात सादर केले जाते. यापैकी सन २००१–०२ व २००२–०३ या पाच

वर्षातील अंदाजपत्रकांचा आढावा पुढीलप्रमाणे दिला आहे. सातारा नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक मांडत असताना जमेची बाजू प्रथम दिलेली आहे. या जमा बाजूस साधारणतः पुढील बाबींचा समावेश होतो.

१) नगरपालिका सातारा यांची जमा

२) शासकीय अनुदाने

३) ॲडव्हान्स डिपॉझिट

४) फी, व्याज वगैरेतून जमलेली किरकोळ जमा

**सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाला मिळालेली मंजुरी (रूपयामध्ये)**

| अ.नं. | वर्ष | अंदाजपत्रक मंजुरी | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | २००१–०२ | २८/११/२००० | २,७२,९७,९०० रू.[६१] |
| २. | २००२–०३ | २२/११/२००१ | ३,३५,०८,००० रू.[६२] |

सातारा नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या सन २००१–०२ व २००२–०३ मिळालेल्या मंजुरी रक्कमेचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे दिसून येते की मंजुरी रक्कम वाढलेली आहे. शिक्षण मंडळाचे खर्च भागविण्यासाठी प्रत्यक्षात निधी किती मिळाला व खर्च किती झाला याची सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे.

**नगरपालिका शिक्षण मंडळ जमा रक्कम(रूपयांमध्ये)**

| अ.नं. | तपशील | २००१–०२ | २००२–०३ |
|---|---|---|---|
| १. | न.पा.सातारा | ८९,०१,७३९ | ३३,५५,७२१ |
| २. | शासकीय अनुदान | १,८१,८०,००० | २,४०,९०,२०० |
| ३. | ॲडव्हान्स डिपॉझिट | ७,९८,३२० | २,३८,८२० |
| ४. | किरकोळ जमा | | |
| | अ)इतर किरकोळ | ३,०३२ | १४,३०९ |
| | ब)व्याज उत्पन्न | – | – |
| | क)जादा रक्कम वसुली | ३९० | १,०११ |
| | ड)फी उत्पन्न | ५७५ | २०० |
| | इ)शालेय पोषण कर | – | – |
| | (अ ब क ड इ एकूण) | ३,९९७ | १५,५३० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | सर्व शिक्षा अभियान | | |
| | एकूण | २,७८,८४,०५६[६३] | २,७७,७०,२६१[६४] |

वरील तक्त्यातून असे स्पष्ट होते की, २००१–०२ व २००२–०३ या चार वर्षी महाराष्ट्र शासनाचे अनुदान शिक्षणासाठी जास्त मिळालेले आहे. त्या खालोखाल सातारा नगरपालिकेतून मिळालेली रक्कम सुद्धा जास्त प्रमाणात आहे.

**नगरपालिका शिक्षण मंडळाच्या खर्चाचा तपशील (रूपयांमध्ये)**

| अ.नं. | तपशील | २००१–०२ | २००२–०३ |
|---|---|---|---|
| १. | अ विभाग– अनुदानास पात्र खर्च | २,८४,१२,७७१ | २,७७,८२,९७१ |
| २. | ब विभाग– ॲडव्हान्स डिपॉझिट खर्चाचे सदर | १,८१,००,५०० | २,१०,७२० |
| ३. | क विभाग– कार्यालयीन नित्याचा मात्र अनुदानास अपात्र खर्च | १८० | १००० |
| ४. | ड विभाग–शालेय नित्याचा मात्र अनुदानास अपात्र खर्च | ८९,३२६ | ६९,६९३ |
| | एकूण | २,८६,७६,७७७[६५] | २,८०,६४,३८४[६६] |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की शिक्षक कर्मचारी वर्गाचा पगार आणि त्याला संलग्न असणाऱ्या बाबीवर जास्त खर्च झालेला आहे. त्याखालोखाल खर्च ॲडव्हान्स डिपॉझीटवर झालेला आहे. यानंतर सातारा नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या सन २००१–०२ व २००२–०३ या पाच वर्षाच्या अंदाजपत्रकाचा आढावा पुढीलप्रमाणे दिलेला आहे.

**सातारा नगरपालिका शिक्षणमंडळाचे प्रत्यक्ष जमा आणि खर्च (रूपयामध्ये)**

| अ.नं. | वर्ष | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| १. | २००१–०२ | २,७८,८४,०५६ | २,८६,७६,७७७ रू.[६७] |
| २. | २००२–०३ | २,७७,७०,२६१ | २,८०,६४,३८४ रू.[६८] |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००१–०२ आणि २००२–०३ या दोन वर्षात प्रत्यक्ष खर्च हा प्रत्यक्ष जमा रक्कमेपेक्षा जास्त आहे. सातारा नगरपालिकेच्या शिक्षणमंडळाच्या २००१–०२ व २००२–०३ या पाच वर्षाच्या अंदाजपत्रकांचा आढावा घेतलेला आहे, दुसरे अंदाजपत्र हे सातारा नगरपालिकेच्या प्रशासनाचे सर्वसाधारण अंदाजपत्रक असते.

## ३.१६ सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित सातारा

या पतसंस्थेची स्थापना १९३२ मध्ये झाली. ही पतसंस्था ३३ भवानी पेठ हत्तीखाना सातारा येथे आहे. या पतसंस्थेची सभासद संख्या ९४ आहे. या संस्थेचा उद्देश सभासदांची आर्थिक गरज भागवणे ही असून कार्यक्षेत्र सातारा शहरापुरते मर्यादित आहे. या संस्थेचे भांडवल हे सभासदांनी ठेवलेल्या कायम ठेव, वर्गणी, सेव्हिंग्ज व कर्जे इत्यादी स्वरूपात गोळा केले जाते.

**पतसंस्थेची वैशिष्टये**

१) पतसंस्थेस गेली दहा वर्षे ऑडिट तपासणीस ‘अ’वर्ग मिळत आहे.

२) गंगाजळी(रि.फंडाची) स्वतंत्रपणे गुंतवणूक

३) पतसंस्थेस कोणत्याही प्रकारचे थकीत कर्ज नाही

४) सभासदांचे कायम ठेवीवर कर्ज देण्याची योजना सुरू

५) पतसंस्थेने स्वतःचे मालकीची वास्तू सन १९९७–९८ साली खरेदी केली आहे.

या पतसंस्थेत ठेवीवर व्याजदर हा ८.०० टक्के दिला जातो. कायम ठेवी व्याजावर ६.०० टक्के व्याज दिले जाते. सर्व सभासदासाठी १०० रूपये वर्गणी व कायम ठेव १५० रूपये आणि सेव्हिंग्ज ठेव कमीतकमी १०० रूपये ठेवली जाते.[६९] या संस्थेकडून कर्जपुरवठा हा या संस्थेच्या सभासदांना केला जातो. व्याजदर हा १० टक्के आहे. या संस्थेकडून एक लाख रूपयापर्यंत कर्ज मिळते.

सातारा नगरपरिषद शिक्षण मंडळ सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित सातारा,

प्रगतीचा आढावा (सन १९८५ ते २००३)

| अ.नं. | वर्ष | सभासद संख्या | भाग भांडवल | कर्ज | नफा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९८५ | १४० | ३,४६,१५० | ४,७७,०९४ | २५,५४३.४५ |
| २. | १९८६ | १३८ | ४,००,८९० | ५,५१,२३५ | २७,५८२.०९ |
| ३. | १९८७ | १२६ | ४,३१,०१० | ५,७४,०३० | ३१,९४७.७४ |
| ४. | १९८८ | ११५ | ४,४७,५२० | ६,१९,१५० | ४२,५७५.७५ |
| ५. | १९८९ | १०३ | ४.४१,५६० | ६,१८,४०० | ४३,४४४.८१ |
| ६. | १९९० | १०७ | ५,०१,५४० | ६,६७,५०० | ४९,०५१.७० |
| ७. | १९९१ | १०९ | ५,५४,४२० | ७,४४,८५० | ३९,७९२.१५ |
| ८. | १९९२ | १०९ | ६,०९,४३० | ८,८७,७०० | ७१,५१८.२० |
| ९. | १९९३ | १११ | ६,४३,७१० | ९,०७,६५० | ६९,४६४.९० |
| १०. | १९९४ | ११२ | ६,६९,७३० | ९,५७,९३५ | ७९,६६६.५० |
| ११. | १९९५ | ११० | ७,१७,३८० | ९,५९,९६० | ७३,१३६.०० |
| १२. | १९९६ | १०६ | ७,७०,६०० | ११,८६,८१० | ८८,४८३.५० |
| १३. | १९९७ | १०० | ५२,२६० | ११,२१,०६० | १,०३,३८८.५० |
| १४. | १९९८ | ९६ | ७,८४,८६० | १२,४३,०१० | १,०३,५६५.०० |
| १५. | १९९९ | १०३ | ८,१७,३४० | १३,७७,४०० | ८७,०१४.५० |
| १६. | २००० | १०३ | ८,०९,३२० | १४,५८,५०० | १,२०,०००.०० |
| १७. | २००१ | ९२ | ७,८४,८०७ | १३,८०,३५० | ८७,६८३.०० |
| १८. | २००२ | ९७ | ७,४२,४६० | १४,०२,९३० | ९५,२४३.०० |
| १९. | २००३ | ९४ | ७,६२,२६० | १६,२८,४३० | १,०८,४१०.६५[७०] |

पतसंस्थेच्या सभापतींची यादी पुढीलप्रमाणे

| अ.नं. | सभापतीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १. | गो.ज. फणसळकर | १९३२–३४ |
| २. | स.वि.करंदीकर | १९३४–३५ |
| ३. | सी.न.नवाथे | १९३५–३६ |
| ४. | ता.वि.ढवळे | १९३६–३७ |
| ५. | सी.न.नवाथे | १९३७–३८ |
| ६. | ल.वि.तारळेकर | १९३८–३९ |
| ७. | सी.न.नवाथे | १९३९–४० |

| अ.नं. | सभापतीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| ८. | ना.म.माजगावकर | १९४०-४२ |
| ९. | आ.कुं.माळी | १९४२-४३ |
| १०. | ह.ना. कुलकर्णी | १९४३-४४ |
| ११. | गु.ह.राजपूत | १९४४-४५ |
| १२. | ल.म.दुडे | १९४५-४६ |
| १३. | ना.मा. मोहिते | १९४६-४७ |
| १४. | ता.वि.ढवळे | १९४७-४८ |
| १५. | म.पां. साबळे | १९४८-४९ |
| १६. | अ.बा. बागवान | १९४९-५१ |
| १७. | म.पा.साबळे | १९५१-५८ |
| १८. | रा.दा.बोधे | १९५८-५९ |
| १९. | अ.सि. तारळेकर | १९५९-६२ |
| २०. | मा.तु.हंकारे | १९६२-६४ |
| २१. | बा.पा.मोहिते | १९६४-६६ |
| २२. | ब.भु. भुतकर | १९६६-६७ |
| २३. | म.हा. बागवान | १९६७-६८ |
| २४. | श्रीमती ढो.ग. नायकुडे | १९६८-७० |
| २५. | सौ.इ.वि. जाधव | १९७०-७२ |
| २६. | कृ.गो.फरांदे | १९७२-७३ |
| २७. | म.ञ्य.डोईफोडे | १९७३-७४ |
| २८. | म.वि. देशपांडे | १९७४-७५ |
| २९. | श्रीमती वि.बे. पिल्ले | १९७५-७६ |
| ३०. | गो.रा. क्षिरसागर | १९७६-७७ |
| ३१. | शि.चि. शेंडगे | १९७७-७८ |
| ३२. | सौ.पा.आ.तारळेकर | १९७८-७९ |
| ३३. | ज.वि. साळुंखे | १९७९-८० |
| ३४. | सौ.य.मा.तपासे | १९८०-८१ |
| ३५. | शु.भा.चोरगे | १९८१-८२ |
| ३६. | नि.बा.आगवणे | १९८२-८३ |
| ३७. | सौ.हि.ह.यादव | १९८३-८४ |
| ३८. | श्री.मा.पवार | १९८४-८५ |
| ३९. | शु.दी.बोचरे | १९८५-८६ |
| ४०. | सु.शं.करंदीकर | १९८६-८७ |
| ४१. | शा.भि.नावडकर | १९८७-८८ |
| ४२. | सौ.मा.मा.तिवारी | १९८८-८९ |
| ४३. | सौ.मि.क.ढेकणे | १९८९-९० |
| ४४. | कु.शी.बागल | १९९०-९१ |

| अ.नं. | सभापतीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| ४५. | वी.सी.निकम | १९९१–९२ |
| ४६. | गो.नि.धर्माधिकारी | १९९२–९३ |
| ४७. | ना.सा.शिंदे | १९९३–९४ |
| ४८. | अ.शं.किर्दत | १९९४–९५ |
| ४९. | श्रीमती मी.ध. तपासे | १९९५–९६ |
| ५०. | ल.प.काळे | १९९६–९७ |
| ५१. | बा.बु.नलावडे | १९९७–९८ |
| ५२. | सु.ग.मोहिते | १९९८–९९ |
| ५३. | बा.रा.भामरे | १९९९–२००० |
| ५४. | आ.गो.नवाळे | २०००–२००१ |
| ५५. | न.ब.हकिम | २००१–२००२ |
| ५६. | श्रीमती शै.अ.चव्हाण | २००२–२००३[७१] |

## ३.१७ समारोप

सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाने सातारा शहरात शैक्षणिक प्रगती करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. शाळांचा शैक्षणिक अन् भौतिक दर्जामध्ये वाढ होत असतानाच सर्व शिक्षकांच्या व शिक्षणमंडळाच्या सकारात्मक प्रतिसादातून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपाययोजना व उपक्रम या मंडळाने सातत्याने केले आहेत. मुलांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी आणि गुणवान पिढी निर्माण होण्यासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा शैक्षणिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यामध्ये सर्वजण अग्रेसर आहेत. नगरपालिका शिक्षण मंडळाचे पदाधिकारी यांचा भक्कम पाठिंबा असून त्यांनी राबविलेले उपक्रम, कार्य, शैक्षणिक धोरणे या माध्यमातून भावी पिढया घडविण्याचे कार्य यशस्वीपणे झाले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या दुःखावर फुंकर घालून त्यांना आनंदी बनविण्याचा या मंडळाने यशस्वी प्रयत्न केला आहे. म्हणून भविष्यातही प्रदीर्घ काळापर्यत विद्यार्थ्यांची प्रगती होईल, असे यावरून स्पष्ट होते.

## संदर्भ


१) Thakur B.K., Indian Administration to The Down of The Responsibal Government, P.339

२) गरूड आप्पासाहेब व सावंत बी.बी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, १९९३, पृ.६३

३) जोशी अरूण व इतर, ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत, यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००१, पृ.११६

४) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९८७ पृ.४

५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक २००३–०४ पृ.७६,७८

६) शिक्षणावर दृष्टिक्षेप, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, १९९५–९६, पृ.२०

७) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.३९

८) कित्ता, पृ.३९

९) कित्ता, पृ.११७,११८

१०) कित्ता, पृ.४३

११) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, २००४–२००५, पृ.७७

१२) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल, १९०३–०४ ते २००४–०५ संबंधित वर्ष

१३) नगरपालिका मराठी शाळा नं.१ च्या रेकॉर्डवरून, पृ.७

१४) नगरपालिका मराठी शाळा नं.२ च्या रेकॉर्डवरून, पृ.९

१५) नगरपालिका मराठी शाळा नं.३ च्या रेकॉर्डवरून, पृ.२

१६) नगरपालिका मराठी शाळा नं.४ च्या रेकॉर्डवरून, पृ.३

१७) नगरपालिका मराठी शाळा नं. ५ च्या रेकॉर्डवरून, पृ. ४

१८) नगरपालिका मराठी शाळा नं. ६ च्या रेकॉर्डवरून, पृ.७

१९) नगरपालिका मराठी शाळा नं. ७ च्या रेकॉर्डवरून, पृ.६

२०) नगरपालिका मराठी शाळा नं. ८ च्या रेकॉर्डवरून, पृ.७

२१) नगरपालिका मराठी शाळा नं. ९ च्या रेकॉर्डवरून, पृ.९

२२) नगरपालिका उर्दू शाळा नं. १०, च्या रेकॉर्डवरून, पृ.१०

२३) नगरपालिका मराठी शाळा नं. ११ च्या रेकॉर्डवरून, पृ.५

२४) नगरपालिका उर्दू शाळा नं. १२ च्या रेकॉर्डवरून, पृ.४

२५) नगरपालिका उर्दू शाळा नं. १३ च्या रेकॉर्डवरून, पृ.४

२६) नगरपालिका मराठी शाळा नं. १४ च्या रेकॉर्डवरून, पृ.७

२७) नगरपालिका मराठी शाळा नं. १५ च्या रेकॉर्डवरून, पृ.९

२८) नगरपालिका मराठी शाळा नं. १६ च्या रेकॉर्डवरून, पृ.११

२९) नगरपालिका मराठी शाळा नं. १७ च्या रेकॉर्डवरून, पृ.१५

३०) नगरपालिका मराठी शाळा नं. १८ च्या रेकॉर्डवरून, पृ.१७

३१) मुख्याध्यापक, सिद्धी विद्यामंदिर नगरपालिका मराठी शाळा नं. १९, रिमांड होम, सातारा मुलाखत– दि. २३.१०.२०१२, वेळ– ११.०० वा.

३२) नगरपालिका मराठी शाळा नं. २० च्या रेकॉर्डवरून, पृ.१२

३३) नगरपालिका मराठी शाळा नं. २१ च्या रेकॉर्डवरून, पृ.८

३४) नगरपालिका मराठी शाळा नं. २२ च्या रेकॉर्डवरून, पृ.९

३५) नगरपालिका मराठी शाळा नं. २३ च्या रेकॉर्डवरून, पृ.३

३६) नगरपालिका मराठी शाळा नं. २४ च्या रेकॉर्डवरून, पृ.५

३७) पाठक अरूण(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.१६७

३८) ढवळे ना.वा., दैनिक सकाळ लेख, दि. १९.११.१९९२

३९) District Municipal Act., 1884.

४०) स्मरणिका, गौरव गुणीजनांचा, शिक्षक दिन २००४, नगरपालिका शिक्षण मंडळ, सातारा, पृ.२५

४१) पंचायत समिती, शिक्षण विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, १९९५, पृ.७

४२) शिक्षणमंडळाच्या बोर्डावरून मिळालेल्या माहितीनुसार, १९९६, पृ.९

४३) सातारा नगरपालिका रेकॉर्ड, जनरल प्रोसिडिंग बुक, १९७२, पृ.२३

४४) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड–लेखा परीक्षण अहवाल.

४५) शिक्षणमंडळाच्या बोर्डावरून मिळालेल्या माहितीनुसार

४६) कित्ता

४७) मुलाखत, पवार प्रविण, उपशिक्षक दि.१२.१०.२०१२, वेळ ३.३० वाजता

४८) संवाद, पंचवार्षिक विशेषांक २००८ ते २०१२, सातारा नगर परिषद शिक्षण मंडळ, सातारा २०१२, पृ.१

४९) सातारा नगर परिषद शिक्षण मंडळ, सातारा यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१२.१०.२०१२, वेळ ३.३० वाजता

५०) सातारा नगर परिषद मराठी शाळा क्र.११, दि. १९.१०.२०१२, १०.०० वाजता व २० मधील दि. २५.१०.२०१२, १०.०० वाजता मुख्याध्यापकाकडून मिळालेल्या माहितीनुसार,

५१) सातारा नगर परिषद मराठी शाळा क्र.१९, दि. २३.१०.२०१२, ११.०० वाजता, २० मधील दि. २५.१०.२०१२, १०.०० वाजता व २३ मधील दि. २७.१०.२०१२, ११.०० वाजता मुख्याध्यापकाकडून मिळालेल्या माहितीनुसार

५२) संवाद, पंचवार्षिक विशेषांक २००८–२०१२, उपरोक्त, पृ.३

५३) कित्ता, पृ.५ ते ८

५४) सातारा नगर परिषद मराठी शाळा क्र.१ व १९ मधील मुख्याध्यापकाकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २८.१०.२०१२, ११.०० वाजता

५५) संवाद, पंचवार्षिक विशेषांक २००८–२०१२, उपरोक्त, पृ.३

५६) सातारा नगर परिषद शिक्षण मंडळ, सातारा यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार

५७) सातारा नगर परिषद मराठी शाळा क्र.२ मधील मुख्याध्यापकाकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १५.१०.२०१२, ११.०० वाजता

५८) सातारा नगर परिषद शिक्षण मंडळ, सातारा यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ११.१०.२०१२, ११.०० वाजता

५९) संवाद, पंचवार्षिक विशेषांक २००८–२०१२, उपरोक्त, पृ.५ ते १५

६०) सातारा नगरपरिषद शिक्षण मंडळ यांचेकडून मिळालेली माहिती दि.२४/०१/२००८

६१) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००१–०२, पृ.३२

६२) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००२–०३, पृ.८७

६३) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००१–०२, पृ.५६

६४) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००२–०३, पृ.५४

६५) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००१–०२, पृ.५७ ते ५८

६६) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००२–०३, पृ.५१ ते ५३

६७) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००१–०२, पृ.५६, ५७,५८

६८) सातारा नगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, २००२–०३, पृ.५१ ते ५४

६९) सातारा नगरपरिषद शिक्षण मंडळ सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित, सातारा ७५ वा वार्षिक अहवाल २००७–०८ पृ.१

७०) कित्ता, पृ.७

७१) सातारा नगरपरिषद शिक्षण मंडळ सेवक सहकारी पतसंस्था सभापती फलक

# प्रकरण चौथे
# सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता

## ४.१ प्रस्तावना–

सातारा नगरपालिकेने शहरातील लोकांच्या आरोग्याकडे चांगल्याप्रकारे लक्ष दिलेले आहे. शहरातील लोकांना चांगल्या पद्धतीचे जीवन जगता यावे, या दृष्टीने आरोग्यासाठी ज्या ज्या मूलभूत सुविधांची आवश्यकता असते अशा सुविधा पुरविण्याची जबाबदारी नगरपालिकेने घेतलेली होती. यामध्ये शहर स्वछता मोहिम राबवून लोकांना आरोग्याच्या दृष्टीने सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. नगरपालिकेने आरोग्य व शहर स्वच्छतेसाठी मोठया प्रमाणावर खर्च केलेला आहे. याशिवाय प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भरती करून त्यांच्यामार्फत सर्व कामे पूर्ण केलेली आहेत.

सातारा शहरास नैसर्गिकदृष्टया चांगले वातावरण लाभलेले आहे. सातारा नगरपालिकेने आरोग्याच्या बाबतीत प्रामुख्याने साथीच्या रोगांचा प्रसार होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाय करणे, शहरातील सांडपाणी गटारे यांची स्वच्छता व सोय करणे. गरीब लोकांना मोफत औषधोपचार करणे. केरकचरा गोळा करणे व त्याचा विनियोग करणे. कचरा व घाणीचे स्थलांतर करणे. मांस व मासे बाजाराची व्यवस्था करणे. स्मशानभूमी व प्रेत पुरण्याच्या जागेची व्यवस्था करणे. यावर मुख्यतः भर दिलेला आहे. तेव्हा या प्रकरणात सातारा नगरपालिकेने आरोग्य व शहर स्वच्छता याबाबतीत जे काही उपक्रम राबविले होते, त्याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

## ४.२ आरोग्य सुविधा–

### ४.२.१ साथीचे रोग

सातारा शहरात आधुनिक औषधे व उपचार पद्धतीच्या संशोधनापूर्वी कॉलरा, देवी, गोवर, घटसर्प, क्षय, धनुर्वात, पोटाचे व आतडयाचे विकार, हिवताप व श्वसनविषयक रोग इत्यादीमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण जास्त होते. साथीच्या रोगांविरूद्ध प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सातारा शहरात सन १८८३–८४ मध्ये एक फिरते पथक कार्य करत होते. लसीकरणाचे प्रमाण हे दरहजारी २६.६१ टक्के होते.[१] सन १९६२ मध्ये विविध रोगांमुळे सातारा जिल्हयात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या १९,३८३ व सन १९८० मध्ये ही संख्या १२,२६८ होती. पुढे मृत्यू प्रमाण कमी होण्याची कारणे म्हणजे प्रगत वैद्यकीय शास्त्रानुसार उपचार व प्रतिबंधक

उपाय ही केले जात. देवी या रोगाचे संपूर्ण निर्मूलन सातारा शहरात झाले आहे.[२]

### अ) प्लेगची साथ

सन १८९७–९८ मध्ये सातारा शहरात प्लेगची साथ आली होती. या रोगाची लोकांना पूर्वी कधी माहिती नव्हती. त्यामुळे लोक हवालदिल झाले होते. अनेक लोक शहराबाहेर निघून गेले होते. त्याशिवाय संध्याकाळी शहरातील सर्वच लोक शहराबाहेर निघून गेल्याने सर्वत्र शुकशुकाट होत असे. त्यावेळी सातारा नगरपालिकेने सरकारकडून पाच वर्षे मुदतीसाठी चार टक्के व्याजाने कर्ज काढले होते. या रोगाच्या साथीवर आळा घातला. सन १९४४ ते १९५३ पर्यत प्लेगच्या रोगामुळे मरण पावलेल्यांची संख्या २०१ होती.[३]

### ब) एन्फ्लुएंझाची साथ

सातारा शहरात सन १९१८ मध्ये एन्फ्लुएंझाची साथ पसरली. यामध्ये सुमारे ७१० लोक मरण पावले. त्यावेळीही नगरपालिकेने खूप खर्च केला व परिश्रम घेतले. लोकांना धीर दिला. ही साथ आटोक्यात आणण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केला होता. त्यामध्ये यश मिळविले. सातारा शहरात सन १९४८–४९ मध्ये १९ व सन १९५१–५२ व सन १९५२–५३ मध्ये अनुक्रमे एक व एक व्यक्ती या आजाराने मरण पावली होती.[४]

### क) हिवतापाची साथ

सातारा शहरात हिवतापाची साथ येवू नये यासाठी आरोग्य विभागामार्फत खबरदारी घेण्यात आली आहे. हिवताप निर्मूलन योजना सन १९५३ पासून सुरू झालेली होती. त्यासाठी सन १९५३ ते १९५८ या काळात सातारा शहरातील प्रत्येक घरात वर्षातून किमान दोनदा वेळा डी.डी.टी. चा फवारा मारला जात असे. सन १९५९ मध्ये एक विशेष हिवताप नियंत्रण पथक स्थापन करण्यात आले होते. सन १९४४ ते १९५३ पर्यत हिवतापाच्या साथीमुळे मरण पावलेल्यांची संख्या १३७७ इतकी झालेली होती.[५]

ड) देवीची साथ

**देवी रोगामुळे मरण पावलेल्या व्यक्तींची संख्या पुढीलप्रमाणे–**

| सन | मरण पावलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|
| १९४३–४४ | ७ |
| १९४४–४५ | १० |
| १९४५–४६ | ३ |
| १९४६–४७ | ५० |
| १९४७–४८ | २५ |
| १९४९ ते १९५२ पर्यत | ७ [६] |

सन १९५४ व १९६० मध्ये अनुक्रमे १.९लाख व ४.२ लाख व्यक्तींना देवीची लस टोचण्यात आली आहे. सन १९६२ पासून राष्ट्रीय देवी निर्मूलन कार्यक्रम महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात येऊन त्याद्वारे सन १९७७ मध्ये या रोगाचे जिल्हयातून समूळ उच्चाटन करण्यात आले होते. या काळात 'देवीचा रोगी दाखवा, एक हजार रूपये मिळवा' ही शासकीय घोषणा प्रसिद्ध झाली होती.[७]

**इ) क्षयरोग नियंत्रण**

क्षयरोग निवारणासाठी सन १९५४ मध्ये बी.सी.जी.लस टोचणी योजना सुरू झाली. सन १९४४ ते १९५३ पर्यत क्षयरोगाच्या आजारामुळे मरण पावलेल्यांची संख्या ५८३ इतकी होती.त्यामुळे १९७३ पासून शहरात क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू झाला.[८] या कार्यक्रमातंर्गत शहरातील लोकांना बी.सी.जी.लस टोचण्यात आली. सन १९९३ ते १९९५ या दरम्यान सातारा शहरात क्षयरोगाने मरण पावलेल्यांची नव्हती.

**ई) कॉलरा नियंत्रण**

या रोगाचा १९ व्या शतकात सातारा शहरात मोठया प्रमाणावर प्रसार झाला. कॉलरा रोगामुळे मरण पावलेल्या व्यक्तींची संख्या पुढीलप्रमाणे–

| सन | संख्या |
|---|---|
| १९४३–४४ | ७ |
| १९४४–४५ | १० |
| १९४५–४६ | ३ |
| १९४६–४७ | ५० |
| १९४७–४८ | २५ |
| १९४८–४९ | ३ |

| सन | संख्या |
|---|---|
| १९४९–१९५० | ० |
| १९५०–१९५१ | ३ |
| १९५१–१९५२ | १ |
| १९५२–१९५३ | ०[९] |

कॉलऱ्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शासनाने सन १९७१ पासून सर्वत्र कॉलरा नियंत्रण कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली. त्यामुळे सातारा शहरातही नगरपालिकेमार्फत तीन केंद्रे सुरू करण्यात आली. त्यातून अनेक व्यक्तींना लस टोचण्यात आली.[१०]

**साथीच्या आजाराबाबत सातारा नगरपालिकेने केलेला खर्च**

| अ.नं | वर्ष | साथीच्या आजारावरील खर्च |
|---|---|---|
| १. | १९७७–७८ | ११,७५८ |
| २. | १९७८–७९ | १३,५४१ |
| ३. | १९७९–८० | ३१,१०० |
| ४. | १९८०–८१ | २८,२६० |
| ५. | १९८१–८२ | २७,९७३ |
| ६. | १९८२–८३ | १३,३९५ |
| ७. | १९८३–८४ | २९,०८० |
| ८. | १९८४–८५ | २३,६६२ |
| ९. | १९८५–८६ | ३४,६४३ |
| १०. | १९८६–८७ | ३९,१०० |
| ११. | १९८७–८८ | २०,८०० |
| १२. | १९८८–८९ | ५८१९२ |
| १३. | १९८९–९० | ६४,२९७ |
| १४. | १९९०–९१ | ६८,१२२ |
| १५. | १९९१–९२ | ८९,६०० |
| १६. | १९९२–९३ | ७५,५८७ |
| १७. | १९९३–९४ | ६२,४२० |
| १८. | १९९४–९५ | ४,१८,८७० |
| १९. | १९९५–९६ | १,९५,३५८ |
| २०. | १९९६–९७ | १,४७,७९५ |
| २१. | १९९७–९८ | १,८३,५९२ |
| २२. | १९९८–९९ | ३,८१,४३५ |
| २४. | १९९९–२००० | ८,४४,८६१ |
| २५. | २०००–२००१ | १,१३,६३३ |
| २६. | २००१–२००२ | ३,९६,००० |
| २७. | २००२–२००३ | ३,४७,३४७[११] |

सातारा शहरात प्लेग, कॉलरा, पटकी, आमांश, कावीळ अशासारखे अनेक साथीचे रोग होत होते. यामध्ये सातारा नगरपालिकेने या साथीच्या रोगांना आळा बसण्यासाठी सन १९७७–७८ पासून उपाययोजना सुरू केली होती. या साथीच्या आजारावर दरवर्षी होणारा खर्च वरील तक्त्यात दिलेला आहे. या तक्त्यानुसार इ.स.१९७७–७८ मध्ये हा खर्च ११,७५८ असून ही खर्चाची सुरूवात होती. पुढे या खर्चात इ.स.१९८०–८१ पर्यत सातत्याने वाढ होत गेली आहे. परंतु सन १९८१–८२ मध्ये यात एकदमच कपात झालेली दिसून येते. पुढे १९८३–८४ मध्ये वाढ झालेली आहे तर १९८४–८५ मध्ये त्यात घट झालेली दिसून येते. इ.स.१९८५–८६ मध्ये यात वाढ होत गेलेली आहे मात्र इ.स.१९८७–८८ मध्ये यात एकदमच घट झालेली दिसून येते. अशाच प्रकारचा चढ–उतार होऊन हा खर्च सन २००२–०३ मध्ये ३,४७,३४७ एवढा झालेला आहे..

### उ) इतर रोग

सातारा शहरात दमा(श्वास), निमोनिया, अपघात, टायफाडाईड, मलेरिया, हगवण व इतर काही कारणामुळे अनेक व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. मलेरिया रोखण्यासाठी नगरपालिकेकडून नियमित घरभेटी, ताप रूग्णांचा शोध घेणे, गृहित उपचार घेणे, दुषित रक्त असल्यास समूळ उपचार देणे, गप्पी मासे सोडणे, धूर फवारणी करणे, गोळ्या वाटप केंद्रे सुरु करणे. इत्यादी उपाययोजना मोठया प्रमाणात राबविल्या आहेत. सातारा नगरपालिकेने या रोगाचे उच्चाटन व्हावे या हेतूने औषधोपचार व ठिकठिकाणी केंद्र स्थापन करून रोग निर्मूलनासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले आहेत. तरीही आणखी काही नवे आजार शहरात दाखल होऊन लोकांच्यामध्ये आजारात भर पडली आहे.

### ४.२.२ साथीचे रोग टाळण्यासाठी उपाययोजना

१) पावसाळयाच्या सुरूवातीस पाणी उकळून व गाळून प्यावे याबाबत नागरिकांना वेळोवेळी वर्तमान पत्रात निवेदन देवून सूचना करण्यात येतात.

२) नगरपालिकेतर्फे पाण्यामध्ये ब्लिचिंग पावडर व जंतूनाशके टाकण्यात येतात. हे पाण्याचे नमुने शासकिय प्रयोग शाळेत तपासणीस पाठविले जातात.

३) कावीळ व इतर लसीकरण करून घेण्यास लोकांना प्रवृत्त करणे.

४) केबलद्वारे व सिनेमा थिएटरमध्ये स्लाईड दाखविल्या जातात.

५) फॉगिंग मशीनने फवारणे, बी.एस.सी. जंतूनाशक पावडर गटारामध्ये टाकली जात असत.[१२]

**रोगांमुळे मृत्यु (सन १९४३ते १९५३)**

| वर्ष | उप जत | प्लेग | देवी | कॉलरा | श्वास | निमो निया | क्षय | ताप | अपघा त | इन्फ्ल्यु. | टायफा | मले रिया | हग वण | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४३–४४ | ११ | –– | ०७ | १२ | ३२ | १६ | ४० | १८० | ११ | –– | –– | –– | – | ४८४ |
| १९४४–४५ | २२ | ५१ | १० | ०२ | ३० | ३४ | ७३ | २१४ | २४ | –– | ०१ | ०३ | ५१ | ४४७ |
| १९४५–४६ | २१ | ८३ | ०३ | १९ | ३६ | ३५ | ९६ | १९१ | १६ | –– | –– | –– | – | ५३५ |
| १९४६–४७ | २० | १४ | ५० | –– | ४७ | ४१ | ८६ | १७१ | २९ | –– | –– | –– | – | ५१० |
| १९४७–४८ | २७ | ५३ | २५ | ०२ | ४४ | २६ | ८२ | १३६ | ३० | –– | –– | –– | – | ५५५ |
| १९४८–४९ | २७ | –– | ०३ | –– | ३४ | २३ | ६६ | ०२६ | १० | १९ | १३ | ०५ | २८ | ५०१ |
| १९४९–५० | ३० | –– | –– | ०१ | १५ | ०२ | २५ | १२५ | २९ | –– | –– | –– | – | ५६२ |
| १९५०–५१ | १५ | –– | ०३ | ०६ | १० | –– | ३४ | १३९ | १८ | –– | ०८ | ०१ | २५ | ५०१ |
| १९५१–५२ | ५६ | –– | ०१ | –– | १८ | ४५ | ४० | १०३ | १३ | ०१ | ०१ | ०५ | ३१ | ५३२ |
| १९५२–५३ | १०८ | –– | –– | ०६ | २१ | ०६ | ४१ | ०९२ | १८ | ०१ | ०५ | ०८ | ४१ | ४८६[१३] |

सातारा शहराचा जन्म व मृत्यूदर(सन १९०१–०२ ते २००२–०३)

| साल | जन्म | मृत्यू |
|---|---|---|
| १९०१–०२ | ४८८ | १३८४ |
| १९०२–०३ | ५८४ | १७२५ |
| १९०३–०४ | ५६४ | ३९९ |
| १९०४–०५ | ४९२ | १२२९ |
| १९०५–०६ | ४२४ | ६७१ |
| १९०६–०७ | ४९७ | १०९८ |
| १९०७–०८ | ५३६ | १०७७ |
| १९०८–०९ | ४२४ | ५५५ |
| १९०९–१० | ३३८ | ८२८ |
| १९१०–११ | ५३५ | ६१८ |
| १९११–१२ | ५०७ | ७६२ |
| १९१२–१३ | ३५६ | ७५३ |
| १९१३–१४ | ३५३ | १०५४ |
| १९१४–१५ | ३८६ | ६२६ |
| १९१५–१६ | ३३२ | ५२२ |
| १९१६–१७ | ४९९ | ५२४ |
| १९१७–१८ | ३९० | ७७८ |
| १९१८–१९ | ३६७ | १३२८ |
| १९१९–२० | ३०१ | ६३९ |
| १९२०–२१ | ३६४ | ६३६ |
| १९२१–२२ | ३२१ | ६४१ |
| १९२२–२३ | ३४९ | ५२४ |
| १९२३–२४ | १४१ | १२४१ |
| १९२४–२५ | ३१५ | ५६५ |
| १९२५–२६ | ३३५ | ४८८ |
| १९२६–२७ | ४४२ | ६१९ |

| | | |
|---|---|---|
| १९२७–२८ | ४४३ | ६५४ |
| १९२८–२९ | ३६९ | ८४४ |
| १९२९–३० | ३८८ | ५९१ |
| १९३०–३१ | ४१५ | ७२१ |
| १९३१–३२ | ४४६ | ६४७ |
| १९३२–३३ | ४७१ | ५९९ |
| १९३३–३४ | ४९० | ३७१ |
| १९३४–३५ | ४१२ | ६४९ |
| १९३५–३६ | ५५५ | ६९७ |
| १९३६–३७ | ६०६ | ७५१ |
| १९३७–३८ | ५८४ | ७३८ |
| १९३८–३९ | ६९३ | ७१३ |
| १९३९–४० | ७७५ | ६८० |
| १९४०–४१ | ८०८ | ८२० |
| १९४१–४२ | ८५७ | ८४१ |
| १९४२–४३ | १००९ | ८५७ |
| १९४३–४४ | ९३४ | ७९३ |
| १९४४–४५ | १०४८ | ९६२ |
| १९४५–४६ | ९५५ | १०३५ |
| १९४६–४७ | ११२८ | ९६८ |
| १९४७–४८ | १०७४ | ९८० |
| १९४८–४९ | ११५३ | ८३१ |
| १९४९–५० | १३१४ | ७८९ |
| १९५०–५१ | १३५२ | ७६० |
| १९५१–५२ | १३६६ | ७९१ |
| १९५२–५३ | १२६८ | ७२५ |
| १९५३–५४ | १४४२ | ७७२ |
| १९५४–५५ | १७८६ | ८०९ |
| १९५५–५६ | १६६६ | ७६४ |
| १९५६–५७ | १७८८ | ९१८ |
| १९५८–५९ | १७३० | ९०३ |
| १९५९–६० | १८६६ | ८२२ |
| १९६०–६१ | २०७२ | ९१८ |
| १९६१–६२ | २०४७ | ९४४ |
| १९६२–६३ | १७४५ | ६७० |
| १९६३–६४ | ३८८३ | १३०८ |
| १९६४–६५ | २२३४ | ६२७ |
| १९६५–६६ | २१७० | ५४३ |
| १९६६–६७ | २२४८ | ८४२ |
| १९६७–६८ | २८७१ | ९९८ |

| | | |
|---|---|---|
| १९६८–६९ | ३१०८ | ११७० |
| १९६९–७० | ३०३३ | ११२९ |
| १९७०–७१ | २९९३ | १०८५ |
| १९७१–७२ | ३१८० | १०५८ |
| १९७२–७३ | ३१०४ | १०७६ |
| १९७३–७४ | ३१६८ | १०४६ |
| १९७४–७५ | ३२१३ | १०६८ |
| १९७५–७६ | ३४११ | ११६८ |
| १९७६–७७ | ३१८० | १२२७ |
| १९७७–७८ | ३३१३ | १२१३ |
| १९७८–७९ | ३७४४ | १३३३ |
| १९७९–८० | ४०३३ | १२३३ |
| १९८०–८१ | ६०७० | १४५६ |
| १९८१–८२ | ५४२४ | १२२१ |
| १९८२–८३ | ४७३९ | १२७८ |
| १९८३–८४ | ४७९९ | १३३८ |
| १९८४–८५ | ५०२५ | १३०५ |
| १९८५–८६ | ५५७५ | १३६८ |
| १९८६–८७ | ५६७१ | १३५३ |
| १९८७–८८ | ५९९२ | १४४६ |
| १९८८–८९ | ६१८५ | १४४१ |
| १९८९–९० | ६०९७ | १५४१ |
| १९९०–९१ | ६०६५ | १७२८ |
| १९९१–९२ | ६२६२ | १६६२ |
| १९९२–९३ | ६३८३ | १५६९ |
| १९९३–९४ | ६४४३ | १६०० |
| १९९४–९५ | ६४७३ | १५९४ |
| १९९६–९७ | ६९२२ | १७४४ |
| १९९७–९८ | ६६४१ | १९३६ |
| १९९८–९९ | ७१७४ | १९४४ |
| १९९९–२००० | ७६३३ | १९६२ |
| २०००–०१ | ६७०१ | १७५८ |
| २००१–०२ | ७०६६ | १८४१ |
| २००२–०३ | ७१२९ | १७२८[१४] |

## वयवार मृत्यु(सन १९४३–४४ ते १९५२–५३)

| साल | उपजत मृत्यू | १ वर्षाचे आतील | १ते५ | ५ते२० | २० ते २५ | २५ते ३० | ३० ते ३५ | ३५ते ४० | ४०ते५० | ५०ते६५ | ६५ते ८० | ८०चे वर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४३–४४ | ११ | १९१ | १२६ | ५४ | ४४ | ३३ | ३५ | २१ | ५६ | ९७ | ५७ | ३९ |
| १९४४–४५ | २२ | १७४ | १९२ | ९६ | ४४ | ४५ | २७ | ३७ | ५७ | १०२ | १०७ | ५९ |
| १९४५–४६ | २१ | २०५ | १८३ | १२७ | ५४ | ४६ | ३९ | ५० | ७० | १११ | ९८ | ५३ |
| १९४६–४७ | १२० | १८८ | २०९ | ११५ | ३१ | ३९ | २८ | २९ | ६८ | ११० | -- | ९४ |
| १९४७–४८ | १२७ | ९७ | १५२ | १३९ | ५८ | ४३ | ३२ | ४२ | ७० | १०० | १०१ | ४६ |
| १९४८–४९ | १२७ | १९९ | १२८ | ७५ | ४८ | ४१ | २८ | २१ | ५३ | १०० | १०० | ३८ |
| १९४९–५० | १३० | २२७ | ११४ | ६३ | ४५ | ३८ | २१ | २६ | ४५ | १०२ | ७० | ३८ |
| १९५०–५१ | ११५ | २१९ | ११३ | ३१ | २२ | ४७ | २९ | ४८ | ५३ | ४९ | १४९ | –– |
| १९५१–५२ | १५६ | २०२ | ११५ | ४५ | ४५ | ४० | ३४ | ३१ | ३९ | ४० | ११४ | ८६ |
| १९५२–५३ | १०८ | २२६ | १८ | ६२ | ४२ | २९ | ३१ | २९ | ५८ | ९३ | ८९ | ४८[१५] |

### ४.२.३ दवाखाने

सातारा नागरी रूग्णालयाची स्थापना सन १८४० मध्ये साताऱ्याचे छत्रपती अप्पासाहेब महाराज यांनी केली.[१६] सुरूवातीच्या काळात या रूग्णालयात सातारा शहरातील लोकांसाठी औषधोपचारासाठी स्वतंत्र विभाग, जिल्हा पोलीस कर्मचारी, स्त्री रूग्ण व बाहय रूग्ण यासाठी स्वतंत्र विभाग केले होते. सन १८७४ मध्ये सातारा नगरपालिकेने लस टोचणीचे काम सुरू केल्याने येथील लस टोचणी विभाग बंद करण्यात आलेली आहे. सन १८८२ मध्ये या रूग्णालयात ६,८१८ बाहय व ३१७ आंतररूग्णांवर उपचार करण्यात आले. जिल्हा रूग्णालयाचा दर्जा असलेल्या या रूग्णालयाला शासनाने सन १९६४ पासून स्वतंत्र इमारत उपलब्ध करून दिली आहे. या इमारतीत क्ष–किरण, भौतिकोपचार, कुष्ठरोग, क्षयरोग, शस्त्रक्रिया व प्रसुतिविभाग सुरू करणेत आलेला होता. सन १९७८ मध्ये येथे रक्तपेढी स्थापन करण्यात आलेली आहे. इ.स.१९९०–९१ मध्ये एकूण जमा केलेल्या विविध रक्तघटकांची युनिट संख्या १,५९० होती. खाटांची संख्या २३५ होती, व या रूग्णालयात ९०,७३९ बाहय व ८८,२५४ आंतररूग्णांवर उपचार करण्यात आले होते.[१७]

नागरी रूग्णालय सातारा नगरपालिकेच्या हद्दीत आहे. या रूग्णालयाच्या पूर्वेस नगरपालिकेने संसर्गजन्य रोगांसाठी स्वतंत्र दवाखान्याची सोय केलेली आहे. या दवाखान्यात सहा बेडस्ची व्यवस्था केलेली आहे. या दवाखान्यात दाखल होणाऱ्या रोग्यांना नागरी

रूग्णालयामधील डॉक्टर औषधोपचार देतात. या मेहनतीबद्दल त्याना नगरपालिकेकडून मोबदला दिला जातो. या दवाखान्यासाठी जो खर्च येतो त्यापैकी लोकसंख्येच्या प्रमाणात येणारा खर्च सातारा म्युनिसिपालिटी भरत असे. या दवाखान्यात लोकलबोर्डाचे हद्दीतील जे रोगी येतात त्यांच्याबद्दल सरासरी खर्च नगरपालिकेस द्यावा लागतो.तसेच नागरी रूग्णालयाच्या वार्षिक दुरूस्तीसाठी म्हणून नगरपालिकेकडून दरवर्षी रूपये ३५० मदत म्हणून दिली जाते. याशिवाय नगरपालिकेच्या हद्दीतील आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयास नगरपालिकेकडून दरवर्षी एक हजार रूपये ग्रँट देण्यात येते.[१८]

### ४.२.४ प्रसुतिगृह

सातारा शहरात प्रारंभी प्रसुतीगृह नव्हते. त्यामुळे फार मोठी अडचण निर्माण होत असे. सन १९२४ मध्ये किंग एडवर्ड मेमोरियल फंड, लेडी डफरीन फंड व रेड क्रॉस फंड यांच्याकडून आलेल्या रकमेतून स्थानिक लोकांनी एक समिती स्थापन करून एक प्रसूतिगृह येथे सुरू केले. ते पंचपाळा हौदानजीकच्या नगरपालिकेच्या इमारतीत सुरू केले. ते पुढे लोकप्रिय झाले. याप्रमाणे सुमारे ७ वर्षे चालविल्यानंतर ते सन १९३१ मध्ये नगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आले. प्रसुतिगृहासाठी नगरपालिकेने सन १९३२ मध्ये आठ हजार रूपये खर्च करून नवीन इमारत बांधली. पुढे सन १९४० मध्ये आणखी पाच हजार  रूपये खर्च करून जुन्या इमारतीस जोडून वाढ केली. याच काळात प्रसुतिगृहातील उपकरणे व नोकरसंख्या यांच्यात मोठी वाढ केली. या इमारतीची जागा नगरपालिकेने सन १९३९ मध्ये तीन हजार रूपयास विकत घेतली होती. आज जी नवीन इमारत आहे तिला एकूण रूपये बावीस हजार खर्च झाला आहे. याशिवाय नवीन उपकरणे खरेदी करुन आणली आहेत. श्री परशराम बाळाराम मिणीयार यांनी त्यांच्या स्वर्गीय पत्नी सौ. रूक्मिणीदेवी यांच्या स्मरणार्थ दहा हजार रूपयाचे देणगी दिलेली आहे. या प्रसुतिगृहात सर्व प्रकारची सोय उत्तम आहे. तेथे २५ बेडस्ची सोय झालेली आहे. या प्रसुतिगृहाची नगरपालिकेच्या मालकीची एक रूग्णवाहक मोटार विकत घेतलेली आहे. या प्रसुतिगृहात अल्प फी घेतली जाते त्यामुळे सर्वसामान्य जनतेला परवडेल असेच आहे. या प्रसुतिगृहास सरकारकडून दरवर्षी ११८० रूपयांची मदत मिळते.[१९]

### ४.२.५ देवी काढणे

सातारा शहरात देवी काढणेसाठी एक स्वतंत्र व्हॅक्सिनॅटर व त्याच्या हाताखाली एक शिपाई आहे. नगरपालिकेने शहरात निरनिराळ्या दिवशी देवी काढण्यासाठी सात ठिकाणे ठरविलेली आहेत. देवी काढणाऱ्या डॉक्टरच्या पगारासाठी दरवर्षी ४०८ रूपये नगरपालिकेकडून खर्च केले जात होते. शिपायाच्या पगारासाठी व महागाई भत्त्याच्या खर्चासाठी मासिक ४९ रूपये प्रमाणे रक्कम सरकारकडे भरण्यात येत होती.[२०]

**सातारा नगरपालिका दवाखाना उत्पन्न व खर्च**

| अ.नं | वर्ष | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|---|
| १. | १९७७-७८ | १७,६२४ | १,४३,२१६ |
| २. | १९७८-७९ | १६,२३६ | १,३६,९११ |
| ३. | १९७९-८० | १७,००० | १,५२,१९३ |
| ४. | १९८०-८१ | १५,००० | १,८९,०७० |
| ५. | १९८१-८२ | १८,३५० | २,६७,१९७ |
| ६. | १९८२-८३ | २७,६२६ | ४,३४,५८० |
| ७. | १९८३-८४ | २४,५११ | ७,५३,१६५ |
| ८. | १९८४-८५ | २३,६७१ | ४,९२,४८२ |
| ९. | १९८५-८६ | २५,६९९ | ७,२९,३८७ |
| १०. | १९८६-८७ | २७,००० | ७,१६,०८४ |
| ११. | १९८७-८८ | -- | ७,३२,२०० |
| १२. | १९८८-८९ | २०,४१५ | १०,४८,१८६ |
| १३. | १९८९-९० | १८,८३९ | ६,८६,९९१ |
| १४. | १९९०-९१ | १६,५०४ | ७,३५,६५० |
| १५. | १९९१-९२ | २५,००० | ९,००,००० |
| १६. | १९९२-९३ | १६,०११ | १०,०६,०५१ |
| १७. | १९९३-९४ | १६,०३९ | ९,७३,१३२ |
| १८. | १९९४-९५ | ५३,८९६ | १०,०६,०८३ |
| १९. | १९९५-९६ | ४६,२२६ | १३,९३,५५२ |
| २०. | १९९६-९७ | ४७,९७९ | २२,३७,५४२ |
| २१. | १९९७-९८ | ४६,७७९ | १८,३८,२८३ |
| २२. | १९९८-९९ | ४८,३२१ | २२,६९,२५७ |
| २४. | १९९९-२००० | ५९,०९२ | २२,१६,४८३ |
| २५. | २०००-२००१ | ६०,४४७ | २२,३२,६०३ |
| २६. | २००१-२००२ | १,०४,५५१ | २७,४६,३६४ |
| २७. | २००२-२००३ | १,०२,६१३ | २५,६१,१११[२१] |

सातारा नगरपालिकेचा दवाखान्यावरील उत्पन्न व खर्च याची माहिती पाहिल्यास आपणास असे दिसून येते की, सन १९७७–७८ मध्ये सातारा नगरपालिका दवाखान्याचे उत्पन्न हे रू.१७,६२४ इतके होते तर खर्च रू.१,४३,२१६ इतका होता. याचप्रमाणे दरवर्षी उत्पन्न कमी मात्र खर्च जास्त असेच प्रमाण दिसून येत होते. त्यामुळे सातारा नगरपालिकेने दवाखान्याच्या उत्पन्नाबाबत वाढ व्हावी यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले मात्र यश आलेले दिसून येत नाही. तेव्हा सन २००२–०३ या वर्षातील उत्पन्न पाहिले तर रू.१,०२,६१३ एवढे होते तर खर्च रू. २५,६१,१११ एवढा होता. हा खर्च दरवर्षी वाढत गेलेला दिसून येतो. याचाच अर्थ उत्पन्नापेक्षा खर्च कितीतरी पट अधिक झालेला दिसून येतो.

### ४.२.६ सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण (सन २००३–०४)

| अ.क्र. | विषय | तपशील | संख्या |
|---|---|---|---|
| १. | सातारा शहरातील एकूण लोकसंख्या | | १,०८,०४८ |
| | एकूण दवाखाने | | ५०० |
| | रूग्णालये | | २४० |
| | खाजगी दवाखाने | | ७४० |
| | शासकीय दवाखाने | हिवताप, कुष्ठरोग, पोलिस दवाखाने, इ.एस.आय.दवाखाना, बेगर्स व जि.प.दवाखाना | ०७ |
| २. | डॉक्टरांची संख्या व लोकसंख्येशी प्रमाण | १)खाजगी दवाखान्यातील डॉक्टर संख्या | ५०० |
| | | २)शासकिय दवाखान्यांतील डॉक्टर संख्या | ३४ |
| | | ३) नागरी संस्थेचे दवाखान्यांतील संख्या | ०२ |
| ३. | स्पेशालिस्ट | १) आय.सी.यू. | ०८ |
| | | २)सिटी स्कॅन सेंटर | ०२ |
| | | ३)सोनोग्राफी सेंटर | ५० |
| | | ४)प्रसुतीगृहे | २५ |
| | स्पेशालिस्ट हॉस्पिटल संख्या | १) अस्थिरोग तज्ञ | १२ |
| | | २) बालरोग तज्ञ | ११ |
| | | ३) कान, नाक, घसा | ०४ |
| | | ४) न्यूआनेटल सेंटर आय.सी.यू. | ०२ |
| | स्पेशालिस्ट डॉक्टरांची संख्या | १) सर्जन | २८ |
| | | २)गॅस्ट्रोस्कोपी | ०६ |
| | | ३)त्वचा रोग तज्ञ | ०६ |
| | | ४)दंतरोग तज्ञ | ३६ |
| | | ५) नाक, कान, घसा तज्ञ | ०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ६) नेत्र रोग तज्ञ | १२ |
| | | ७)मनोरूग्ण तज्ञ | ०६ |
| | | ८)पॅथॉलॉजिस्ट | १५ |
| | | ९)विशेष सेवा पुरविणारे | १६८ |
| | | १०)फिजिओथेरपिस्ट | ०१ |
| | | ११)आयुर्वेद स्पेशालिस्ट | १० |
| | | १२)होमिओपॅथिक तज्ञ | ०१ |
| | | १३)भूलरोग तज्ञ | ३०[२२] |

### ४.२.७ सार्वजनिक आरोग्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी नवजात बालकासाठी व्यवस्था– सन २००३–०४ या वर्षात जे लसीकरण

| अ.क्र. | लसीचे नाव | उद्दिष्ट | झालेले काम | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | डी.पी.टी. | १२६४ | ३०१५ | २३८ |
| २. | पोलिओ ३ | १२६४ | ३०१५ | २३८ |
| ३. | गोवर | १२६४ | २७३७ | २१६ |
| ४. | बी.सीजी. | १२६४ | ३२१९ | २५४ |
| ५. | टी.टी. | १४६४ | १४७४ | १०४ |
| ६. | डी.टी. | १२२६ | ११५४ | ९४ |
| ७. | टी.टी. १० वर्षे | १३११ | १५०८ | ११५ |
| ८. | टी.टी. १६ वर्षे | १२६७ | १८६४ | १०४ |
| ९. | पल्स पोलिओ | ११२९९ | ४०[२३] | |

## ४.३ एड्स नियंत्रण

सातारा नगरपालिका, शासकीय रूग्णालये व सामाजिक संस्था यांनी एड्स नियंत्रणासाठी पुढील प्रयत्न केले जातात.

### १) डिसेंबर जागतिक एड्स दिन

१ डिसेंबर रोजी सकाळी ८वा. सिव्हील हॉस्पिटलमधून प्रभात फेरी काढली जाते. त्यामध्ये ७००० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. शिवाय नगरपालिका व शासकिय रूग्णालयातील वैद्यकिय अधिकारी, मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, नगरसेवक व वैद्यकीय कर्मचारी हे असून त्यावेळी बॅनर्स, पोस्टर्स, पुस्तिका वाटल्या जातात. (१ ते ७ डिसेंबरपर्यंत) एस. टी.स्टॅण्डवर टी.व्ही. संचाद्वारे एड्स(एच.आय.व्ही.)संबंधित ध्वनिफिती दाखविल्या जातात. मार्गदर्शनपर माहिती दिली जाते. सातारा नगरपरिषद व शासकीय रूग्णालय यांचे संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम राबविला जातो.

२) ढाब्यावर ट्रक ड्रायव्हरसाठी भेटी व निरोध व मार्गदर्शन केले जाते. व्ही.सी. टी.सी. समुपदेशक जावून एड्स(एच.आय.व्ही.)संबंधित माहिती सांगितली जाते.

३) वेश्या व्यावसायिक स्त्रियांसाठी भगिनी मेळावा घेऊन वैद्यकीय सुविधा व प्रबोधन केले जाते. तसेच निरोध वाटप केले जाते.

४) पोलिस खात्यामधील पोलीस व त्यांच्या कुटुंबियांसाठी सोशल वेलफेअर कार्यक्रमांतर्गत एड्स/एच.आय.व्ही.विषयी प्रबोधन केले जाते.

५) सर्व विद्यालयीन/महाविद्यालयीन व आय.टी.आय.मधील विद्यार्थ्यांना एड्स (एच. आय.व्ही.) प्रबोधन केले जाते.

६) कलेक्टर ऑफिसमध्ये–नियोजन भवन–जागतिक ग्राहक दिन एड्स(एच.आय.व्ही.) प्रदर्शन माहिती दिली जात असे.

७) नगरपालिकेतर्फे गोपनीय ऐच्छिक सल्ला व तपासणी केंद्रात समुपदेशन व एच.आय. व्ही. तपासणी केली जाते.

८) पालकाकडून अपत्यास होणारा संसर्ग प्रतिबंधक कार्यक्रमांतर्गत सर्व गरोदर स्त्रियांसाठी एच.आय.व्ही. तपासणी मोफत केली जाते.

९) गरोदर स्त्रियांसाठी सेंटीनल सर्व्हेलन्स कार्यक्रम राबविला जातो.

१०) सातारा नगरपालिकेच्या प्रसुतिगृहामध्ये एड्सबाबत कौन्सिलिंग सेंटर चालू करण्यात आले असून ते सेंटर एन्.जी.ओ.मार्फत चालविले जाते प्रसुतिगृहात येणाऱ्या रूग्णांना मार्गदर्शनासाठी त्यांचेकडे पाठविले जाते.

११) निरोध वाटपाचे डेपो केले आहेत. नगरपालिका बारनिशी विभाग, नगरपालिका दवाखाने येथे निरोध वाटपासाठी टेबले आहेत.[२४]

## ४.४ सातारा नगरपालिकेचा राष्ट्रीय कार्यक्रम

### १) पल्स पोलिओ

सातारा शहरामध्ये एकूण ५४ बुथ निर्माण केले आहेत. सातारा नगरपालिकेचे कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी व शासकिय वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी तसेच सातारा नगरपालिकेचे मा. अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.मुख्याधिकारी, सर्व नगरसेवक व सेवाभावी संस्था, रोटरी क्लब, लायन्स क्लब, इनरव्हील क्लब, झाशीची राणी प्रतिष्ठान, तसेच सर्व इतर

कॉलेजस् या सर्वाचा पल्स पोलिओ राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभाग असतो. नगरपालिकेतर्फे केंद्राची यादी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली जाते.

पल्स पोलिओ बुथवरील सर्व कर्मचाऱ्यांचे अगोदर दोन दिवस ट्रेनिंग घेतले जाते. यामध्ये नगरपालिकेच्या अंगणवाडी शिक्षिका, पूज्य कस्तुरबा कर्मचारी, मलेरिया वर्कर्स, एम.पी.डब्ल्यू, सिव्हील हॉस्पिटल नर्सेस या सर्वांचा सहभाग असतो. त्यांचे सर्वांचे ट्रेनिंग नगरपालिकाचे वैद्यकीय अधिकारी घेतात.

सर्व सातारा शहरामध्ये नगरपालिकामार्फत प्रसार माध्यमासाठी व केबल रिक्षा फिरविणे, चौका–चौकात बोर्ड लावले जातात. पल्स पोलिओचे लसीकरणा दिवशी केंद्रावरील सर्व कर्मचारी यांना नगरपालिकतर्फे चहा व नाष्टा पुरविला जातो. तसेच सेवाभावी संस्थाचाही सहभाग असतो.

उद्घाटनाचे वेळी नगरपालिकचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.मुख्याधिकरी, मा.सहा मुख्याधिकारी व नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित असतात. यावेळी अध्यक्ष उपाध्यक्ष व नगरसेवक हे आपापले केंद्रास भेट देवून त्रुटीची पूर्तता करतात व वॉर्डातील लाभार्थींना डोस घेणेस प्रवृत्त व बुथवर आणतात.

दुसऱ्या दिवसापासून आय.पी.पी.आय.चे नियोजन केले जाते. नगरपालिकेचे कर्मचारी प्रत्येक घरोघरी जाऊन राहिलेल्या लाभार्थींना डोस देण्याचे काम करतात. पर्यवेक्षक व वैद्यकीय अधिकारी यांचे व सुपरव्हिजन करतात. शहरातील एक ही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये म्हणून काटेकोर दक्षता घेतात. यावेळी सर्व झोपडपट्ट्या, स्लम एरिया व उच्चशिक्षित वर्ग यावर लक्ष दिले जाते.[२५]

## २) क्षयरोग निर्मूलन

सातारा शहरातील शासकिय रूग्णालयामध्ये स्त्री व पुरूष यासाठी एकूण २० बेड्स आहेत. दरमहा ७८ रूग्ण ॲडमिट असतात. शहरात एकूण वेगवेगळया वॉर्डात एकूण डॉट सेंटर १६ आहेत. डॉट प्रोव्हायडर ३० आहेत. रूग्णांची तपासणी प्रथम सिव्हील हॉस्पिटलमध्ये करतात व त्यानंतर रूग्ण डॉट सेंटरवर जावून औषधोपचार घेतात. नगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये फक्त कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन एवढेच कार्यक्रम राबविले जातात.

### ३) कुष्ठरोग

सातारा शहरासाठी कुष्ठरोगाचे काम करण्यासाठी एकूण ४ कर्मचारी आहेत. वैद्यकीय सहाय्यक ३ यांचेमार्फत आरोग्य शिक्षण जनजागृती, गट सभा, आरोग्य, शिक्षण केले जाते तसेच शाळांची तपासणी व स्वच्छता कार्यक्रम जुलै, सप्टेंबरमध्ये घेण्यात येतो. यामध्ये ३३ रूग्ण तपासले होते. त्यामध्ये ३ रूग्ण पॉझीटिव्ह सापडले गेले. वर्षाअखेरीस एकूण २५ रूग्ण, त्यात ऑक्टोबर अखेर क्रियाशील रूग्ण एकूण ३२ नवीन रूग्णामध्ये २५ ते ३० रूग्ण यांचे उपचार चालू आहेत.[२६]

## ४.५ कुटुंब नियोजन

### १) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सातारा नगरपालिकेने कुटुंब नियोजनाच्या बाबतीत मोठया प्रमाणावर सहभाग घेऊन शासनाच्या सर्व योजना चांगल्याप्रकारे राबविण्यास मदत केली होती. सन २००३–०४ या काळात सातारा शहरातील कुटुंब नियोजन केलेल्याची माहिती पुढीलप्रमाणे.

१)कुटुंब नियोजन पात्र जोडप्यांची संख्या : १८१७

२)मागील वर्षामध्ये झालेल्या एकूण शस्त्रक्रिया व लक्षाशी त्यांची टक्केवारीः १०१ टक्के

यामध्ये दोन मुलांवर झालेल्या शस्त्रक्रिया ११०२ तर १ मुलांवर शस्त्रक्रिया ४५ महिलांनी केली होती. दोन मुलावर शस्त्रक्रिया केलेल्या महिला ७१५ आहेत व १ मुलींवर शस्त्रक्रिया करणाऱ्या महिला २३ आहेत.

कुटुंब नियोजन कार्यक्रमांतर्गत सुधारणा करण्यासाठी नगरपालिकेने केलेले प्रयत्न फार मोठया प्रमाणावर केले आहेत. मुलांमध्ये अंतर ठेवण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी ज्या उपाययोजना केल्या होत्या त्यामध्ये निरोधचे वाटप, कॉपर टी बसविणे, सहा महिन्यानंतर किंवा एम.सी.चालू झाल्यानंतर ओरल पल्स गोळयांची पाकिटे दिली जात.[२७]

कुटुंब नियोजन (शासकीय अनुदान व खर्च)

| अ.नं | वर्ष | शासकीय अनुदान | खर्च |
|---|---|---|---|
| १. | १९७७–७८ | ३०,५८६ | ९,८५४ |
| २. | १९७८–७९ | --- | १,३३७ |
| ३. | १९७९–८० | १०,००० | --- |
| ४. | १९८०–८१ | --- | --- |
| ५. | १९८१–८२ | ७,९६८ | २२,५०० |
| ६. | १९८२–८३ | २६,१४१ | ९०,८२८ |
| ७. | १९८३–८४ | १,४२,५०४ | ४,३९,१७३ |
| ८. | १९८४–८५ | १,०३,२४४ | १,२५,१११ |
| ९. | १९८५–८६ | १,१७,६५१ | २,४६,८९७ |
| १०. | १९८६–८७ | ९५,००० | २,२०,००० |
| ११. | १९८७–८८ | ७०,००० | २,००,००० |
| १२. | १९८८–८९ | ५०,२५७ | ५९,६२६ |
| १३. | १९८९–९० | ७४,८७५ | ४५,५४३ |
| १४. | १९९०–९१ | ८६,६९१ | ५०,७३५ |
| १५. | १९९१–९२ | ७५,००० | ५५,००० |
| १६. | १९९२–९३ | ४४,१०२ | ४३,००० |
| १७. | १९९३–९४ | ६८,६७१ | ४०,५९६ |
| १८. | १९९४–९५ | ३८,८८८ | ३६,०१८ |
| १९. | १९९५–९६ | ४१,७८३ | ३३,९५९ |
| २०. | १९९६–९७ | ७१,९५० | ४१,६५२ |
| २१. | १९९७–९८ | २३,३७८ | ३१,६३१ |
| २२. | १९९८–९९ | ५३,५५२ | ३३,७८६ |
| २४. | १९९९–२००० | ३३,८०० | १९७२८ |
| २५. | २०००–२००१ | ५२,५०७ | ३१,३०५ |
| २६. | २००१–२००२ | ४६,४४० | २४,०१५ |
| २७. | २००२–२००३ | ५६,६१० | ३७,७४४[२८] |

सातारा नगरपालिकेचा कुटुंब नियोजनावरील खर्च व शासकीय अनुदान याची माहिती पाहिल्यास आपणास असे दिसून येते की, सन १९७७–७८ मध्ये सातारा नगरपालिकेस जे शासकीय अनुदान मिळाले होते ते रू.३०,५८६ इतके होते तर रू. ९,८५४ एवढा खर्च होता. हा खर्च दरवर्षी वाढत गेलेला दिसून येते. मात्र शासकीय अनुदानात कधी वाढ तर कधी घट व एखाद्या वर्षी हे अनुदाच मिळाले नाही. त्यामुळे सातारा नगरपालिकेस हा होणारा सगळा खर्च ज्या ज्यावेळी पैसे कमी पडत त्या त्यावेळी इतर उत्पन्नातून करावा लागत होता.

## ४.६ शहर स्वच्छता

सातारा नगरपालिकेने शहराच्या स्वच्छतेसाठी अतिशय चांगल्या पद्धतीने काळजी घेतली होती.तेव्हा नगरपालिकेने शहर स्वच्छतेसाठी पुढील योजना राबविल्या होत्या.

### १) शौचकूपाची व्यवस्था

सातारा शहरात खाजगी शौचकुप १,७६५ आहेत. लोकसंख्येच्या मानाने ही खाजगी शौचकूपांची संख्या अपुरी आहे. सार्वजनिक शौचकुप निरनिराळया भागात नगरपालिकेने बांधलेले आहेत. त्यांची एकूण संख्या ३४ असून त्यामध्ये एकूण २१४ सीटस् आहेत. सार्वजनिक शौचकुपांची ही संख्याही अपुरी आहे शौचकुपांची सफाई मेहेतर लोकाकडून केली जाते. प्रत्येक मेहेतराकडे सरासरी ५० शौचकूपांच्या सफाईचे काम दिलेले असते. तसेच एका मेहेतराकडे ८ सार्वजनिक शौचकुपांच्या सफाईचे काम असते. असे एकूण ६२ मेहेतर आहेत. त्यापैकी ३९ पुरूष असून २३ स्त्रिया आहेत. हे लोक आपापले काम सकाळी साडेसात वाजल्यापासून ते बारा वाजेपर्यत पूर्ण करतात. खाजगी शौचकूपांतील मैला ठिकठिकाणी केलेल्या डेपोमध्ये जमा केला जातो. तेथून तो मोटारीने गेंडामाळावरील खडयांत टाकला जातो. मैला व मुत्र वाहतुकीसाठी दोन मोटारी ठेवलेल्या आहेत. प्रत्येक मोटारीवर सात मेहेतर काम करतात. प्रत्येक मोटार रोज चार खेपा करते. यापैकी दोन खेपा डपोवरील मैला नेण्यासाठी व दोन खेपा खाजगी कुंडयांतील पाणी नेण्यासाठी केल्या जातात. कुंडयांतील पाणी उपासण्यासाठी ही सोय अपुरी आहे. मेहेतर लोकांचे कामावर देखरेख ठेवण्यासाठी दोन भागासाठी दोन मुकादम आहेत. शहरात एकूण अकरा सार्वजनिक मुताऱ्या आहेत. त्या शहराचे मानाने कमी आहेत. या मुताऱ्या स्वच्छ ठेवण्यासाठी एक भिस्ती कामावर असून तो त्यामध्ये पाणी टाकून त्या साफ सफाई करतो.

सातारा शहरातील बारीक–सारीक बोळ सोडून बाकीचे रस्ते सुमारे १५ मैल लांबीचे आहेत. ते झाडण्यासाठी एकूण ३० स्त्री कामगार आहेत. रोज गोळा केलेला कचरा ठिकठिकाणी ठेवलेल्या एकूण १८० कचऱ्याच्या कोंदाळयात साठविला जातो. तेथून तो रोजच्या रोज मोटारीने गेंडामाळावर नेऊन टाकण्यात येतो. जे लहान लहान बोळ आहेत. त्यांची साफसफाई ८ ते १५ दिवसांनी केली जाते. कचरा मोटारीवर एकूण चार मजूर असून ती मोटार दर दिवशी चार खेपा करते.

शहरातील सर्व मैला, मुत्र व कचरा रोज गेंडामाळावर नेला जातो. तिथे त्याचे खत तयार केले जाते. त्यासाठी ३० फूट लांब, १० फूट रूंद व ३ फूट खोल असे ११० खड्डे व २० फूट लांब, १०फूट रूंद व ३ फूट खोल असे ४५ खड्डे मिळून एकूण १५५ खड्डे आहेत. यापासून दरवर्षी सुमारे ६४,००० घनफूट खत तयार होते. ते शेतीसाठी विकण्यात येते. त्याचा दर, दर १०० घनफुटास सुमारे ११ ते १३ रूपये असा आहे. यापासून नगरपालिकेला दरवर्षी सुमारे सहा हजार रूपयांचे उत्पन्न मिळते.[२९]

**शौचालय व्यवस्थापन**

| अ.क्र. | विषय | संख्या |
|---|---|---|
| १. | सार्वजनिक ठिकाणे बाजार, बसस्थानक वगैरे ठिकाणी असलेली शौचालय | ५२ |
| २. | झोपडपट्टीतील शौचालयांची संख्या | १३५ |
| ३. | इतर रहिवाशी क्षेत्रातील शौचालय– १)घरांची संख्या<br>२)वैयक्तिक शौचालये असलेल्या घरांची संख्या<br>३) शौचालय नसलेल्या घरांसाठी सार्वजनिक सीटस्ची संख्या व प्रमाण | २२२२०<br>९०टक्के<br>११६ व<br>६८० |
| अ.क्र. | विषय | संख्या |
| ४. | महिलांसाठी असणाऱ्या शौचालयांची संख्या<br>१) सार्वजनिक स्थळे, बाजार व बसस्थानके इ. ठिकाणी<br>२)झोपडपट्टीतील<br>३)इतर निवासी क्षेत्रातील | <br>५०टक्के<br>५० टक्के<br>३४०सीटस् |
| ५. | शालेय शौचालये<br>नगरपालिका व इतर शाळेतील शौचालयाची संख्या | <br>८१[३०] |

सातारा शहरातील लोकांना नगरपालिकेमार्फत शौचालयाचे महत्त्व पटविण्यात आले आहे. उघडयावर शौचालयास बसण्यास नगरपालिकेने विशेष सभा घेऊन कार्यवाही सुरू केली आहे. त्यासाठी दंडात्मक कार्यवाही केली आहे. त्यामुळे उघडयावर शौचास बसण्याची पद्धत पूर्णपणे बंद झालेली आहे. त्यामुळे आरोग्य राखण्यास मदत झालेली आहे.

शौचालय व्यवस्थापन व बांधणीसाठी नगरपालिकेस येत असलेला खर्च यामध्ये शौचालयांच्या दैनंदिन देखभालीसाठी वार्षिक खर्च ११,२४,००० रूपये, कर्मचाऱ्यांचे वेतन ६,२४,००० रूपये कन्झ्युमेबलसवरील खर्च व इतर २,८४,००० रूपये असा एकूण २०,३२,००० रूपये खर्च येत आहे.[३१]

## २) सांडपाणी व्यवस्थापन

सातारा शहरात सांडपाणी व मैला आसपासच्या ओढयांमध्ये सोडून दिला जातो. हे ओढे वेण्णा नदीस जाऊन मिळतात. नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत सातारा नगरपालिकेने भुयारी गटार योजनेसाठी रू.६५ कोटीचा प्रस्ताव दाखल केला आहे. युआयडीएसएसएमटी अंतर्गत या कार्यक्रमाला पुर्वीच तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर शहरात सांडपाण्याची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

### १) गटारांचा अभाव

सातारा शहरात अधिकृत झोपडीस मान्यता नसली तरी सरकारी जमिनीवरील अनधिकृत झोपडपट्टयांची संख्या मात्र लक्षणीय आहे. लक्ष्मी टेकडी, पोळ वस्ती, देवदासी वस्ती यासारख्या झोपडपट्टयांमध्ये वीस ते तीस वर्षापासून राहणाऱ्या कुटुंबासाठी गटारे आणि शौचालयांची काहीही व्यवस्था उपलब्ध नाही त्यामुळे घरासमोर वा बाजूने सांडपाणी सोडणे, अशा मार्गाचा अवलंब ही कुटुंब करतात. गटाराच्या अभावी पाणी साचणे, दुर्गंधी, डास यांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. पावसाळ्यात हा त्रास अधिक वाढतो. त्यावर नगरपालिकेने उपाययोजना सुरू केल्या आहेत.

### २) उघडी गटारे–

सातारा शहरातील बाजारपेठ, शुक्रवारपेठ, राजवाडा परिसर, विश्वविनायक मंदिर व एस.टी कॉलनी हा भाग वगळला व इतर सर्व भागामध्ये उघडया गटारींचा प्रादुर्भाव आढळतो. गटारे उघडी असल्याने त्यात वेळोवेळी कचरा साठून ती तुंबणे, पावसाळ्यात गटारांमधील पाणी व कचरा रस्त्यावर वहाणे असे दृश्य सार्वत्रिक आहे. मात्र त्यातही अल्प उत्पन्न गटांच्या वस्त्या तसेच अल्पसंख्यांकांच्या वस्त्यांमध्ये हा प्रश्न जास्त उग्र आहे, असे दिसून येते. या भागामध्ये अनेकवेळा नागरिक स्वतःच तुंबलेली गटारे स्वच्छ करण्याचे काम करतात. गटारे तुंबण्याची समस्या मोठया प्रमाणावर असल्याचे सांगितले जाते. गटारे तुंबल्याने तसेच ती उघडी असल्याने साहजिकच दुर्गंधी, डास यांचा उपद्रव अनेक भागांमधील नागरिकांना सहन करावा लागतो.[३२] थोडी गटारे बांधलेली आहेत. व बाकीची सर्व गटारे नुसती कच्ची खोदलेली आहेत. ती वरचेवर उपसणेस मोठा खर्च येतो. दरवर्षी काही रक्कम गटारे बांधणेसाठी ठेवण्यात येते पण ती रक्कम अल्प असल्यामुळे या बाबतीत फारशी प्रगती होऊ शकत नाही. सांडपाणी

व्यवस्थेच्या अभावाचा त्रास साधारणतः सर्वांना होत असला तरी आर्थिक व सामाजिक गटांमधील कुटुंबाना त्यांची सर्वाधिक झळ पोहचते.[३३]

सन १९१६–१७ साली ढोरवाडयातील गरीब व कष्टाळू लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी नगरपालिकेने तेथे गटारे बांधून बरीच सुधारणा केली व त्यासाठी सुमारे ८ हजार रूपये खर्च केले. तसेच १९१८–१९ साली सदाशिव, प्रतापगंज व बुधवार या पेठात पक्की गटारे बांधण्यासाठी १० हजार रूपये खर्च केले.[३४]

सांडपाणी व्यवस्था ही शहरातील एकूण ८० टक्के भागासाठी चांगल्या पद्धतीने तयार केलेली आहे. सातारा शहरात सांडपाणी प्रक्रिया केंद्राची निर्मिती केली आहे. शहरात तयार होणारे एकूण सांडपाणी ४ एम.एल.डी. इतके आहे. सांडपाणी व्यवस्थापनात ज्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सिवरेज व्यवस्था,  सेलेज व्यवस्था, ड्रेनेज व्यवस्था, शोषखड्डे, सांडपाणी जोडणीचा वैयक्तिक लाभधारकांनी फायदा घ्यावा म्हणून केलेले विशेष प्रयत्न इत्यादींचा समावेश होतो.

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १. | शहरातील एकूण घरे | २२,२२० |
| २. | सिवरेजला जोडलेली घरे | १७,८०० |
| ३. | शहराला होणार एकूण पाणीपुरवठा | ११एमएलडी |
| ४. | शहरात तयार होणारे एकूण सांडपाणी | ४.००एमएलडी |
| ५. | सांडपाण्याची अंतिम विल्हेवाट | नेचर[३५] |

सांडपाणी व्यवस्थापनात सुधारणा व्हावी, या उद्देश्याने काही नाविन्यपूर्ण पद्धती, जागरूकता, लोकसहभाग, देखभाल याबाबत विशेष कृती करण्यास नगरपालिकेकडून सुरूवात केली आहे. याशिवाय भुयारी गटार योजना व सिव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्ट बाबत कृती आराखडा केंद्र शासनास नगपालिकेकडून सादर करणेत आला आहे.[३६]

### ३) घनकचरा व्यवस्थापन

सातारा नगरपालिकेने सातारा शहरातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता पुढील व्यवस्थापन केले आहे. शहरातील कचरा वाहतुकीसाठी प्रारंभी बैलगाडयांचा उपयोग केला जात

होता. पुढे मोटारीची योजना नगरपालिकेने सुरू केली. पुढे या मोटारीमध्ये बिघाड होऊ लागल्याने पुन्हा बैलगाडीची योजना सुरू केली गेली. यासाठी भाडयाने बैल न घेता स्वतःच्या मालकीचे बैल खरेदी केले. परंतु बैलगाडीने कामाचा उरक होत नसल्याने, पुन्हा सन १९५२ पासून मोटारीची व्यवस्था केली. त्यासाठी एक मोटार जादा ठेवण्यात आली आहे.[३७]

**सातारा शहरात कचरा व्यवस्थापन**

**१) कचरा वर्गीकरणः–**

शहरात कोणत्याही ठिकाणी कचरा निर्मितीवर कुठल्याही प्रकारचे निर्बंध नाहीत. शहरात काही ठिकाणी उघडया नाल्यांमध्ये, मोकळया ठिकाणी कचरा पडल्याचे दिसून येते.

**२) कचऱ्याचे संकलनः–**

कचरा गोळा करण्यासाठी घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी सातारा नगरपालिकेने घंटागाडीची सोय केली आहे. परंतु ज्या ठिकाणी गाडी जाण्याची सोय आहे. तेथे ही गाडी जाते.

**३) गोळा केलेल्या कचऱ्याची प्रक्रिया करण्याच्या ठिकाणी वाहतूकः–**

सातारा शहरातील घरामधून गोळा झालेला कचरा परस्पर 'घंटागाडी'द्वारा सोनगाव येथील एका उघडयावरील मोठया उकिरडयावर वाहून नेला जातो.

**४) घरगुती कचऱ्यावर प्रक्रिया व पुनर्वापरः–**

सोनगाव येथे गोळा होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी किंवा त्याचे रिसायक्लिंग करण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही. परिणामी, सर्व कचरा सोनगाव येथे ढिगा–ढिगाने पडून असतो, आणि कचरा वेचक असल्याचे दिसते. कोणत्याही संरक्षणाशिवाय पुनर्वापराला उपयुक्त कचरा वेचणे अतिशय कष्टाचे असते. शहरातील गरीब वस्त्यामधील आणि प्रामुख्याने दलित समाजातील स्त्रिया, पुरूष व मुलेच हे काम करत असतात, हे देखील लक्षात घेण्याजोगे आहे. याशिवाय ढिगावरील कचरा मोठया प्रमाणात जळत असल्याने जळणाऱ्या कचऱ्याच्या धुरामुळे जवळ जाणाऱ्या रस्त्यावर विशेषतः थंडीच्या दिवसात अपघात होत असल्याची तक्रार अनेक नागरिकांनी नोंदवली.

या परिस्थितीचा परिपाक म्हणून शहरात अनेक ठिकाणी, विशेषतः गरीब वस्त्यांमध्ये नागरिकांना डास व दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. डास निवारणासाठी नगरपालिकेला महिन्याला मोठा रूपये खर्च करावा लागतो.[३८]

**खाजगी सहभागाने कचरा व्यवस्थापन**

सातारा नगरपालिकेच्या स्तरावर नगरपालिकेतील एका पत्रानुसार घनकचरा व्यवस्थापनाचे काम आरोग्य विभागाकडून नगर अभियंत्याकडे सुपूर्त करण्यात आले आहे. त्याचबरोबर एका खाजगी कंत्राटदाराने सातारा शहराच्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी कचरा जाळून त्यापासून विद्युत निर्मिती करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या प्रकल्पासाठी महाउर्जा व तसेच पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन इत्यादी संस्थांकडून अनुदान मिळविण्याचे प्रस्तावित आहे. या संस्थांना प्रकल्पास आर्थिक सहाय्य करण्यासाठी प्रकल्पाचा विस्तृत अहवाल हवा असल्यामुळे नगरपालिकेकडे या प्रकल्पाचा डीपीआर नाही. तसेच घरगुती कचऱ्यापैकी काही कचरा हा ओला असतो. ओल्या वस्तू जाळल्याने त्याचा परिणाम उर्जा निर्मितीवर होतो. असे असतानाही केवळ निविदेच्या किमतीच्या आधारावर शहराचा संपूर्ण कचरा जाळून त्यापासून उर्जा करण्याच्या प्रकल्पाला अनुमती कशी दिली गेली. याचाही विचार होणे गरजेचे होते. तसेच या प्रकल्पाच्या उभारणीसाठी खाजगी कत्रांटदाराने सातारा नगरपालिकेकडून ४ कोटी रूपयांची बँक गॅरंटी मागितली असल्याचे समजले जाते. या प्रकल्पात महाउर्जा, पीएफसी व सातारा नगरपालिका इत्यादी संस्थाचा सहभाग असल्यामुळे विविध कंत्राटांच्या व कागदपत्रांच्या प्रक्रियेसाठी वेळ लागत असल्याचे समजले जाते.[३९]

अशाप्रकारे नागरी सेवांच्या पुरवठयाच्या बाबतीत, घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत, शहरातील नागरी संघटना व संस्था, शहरातील शिक्षण संस्था यांनी सहकार्य केल्यास घनकचरा व्यवस्थापन चांगल्याप्रकारे होऊ शकते.

**शहरात घनकचरा व्यवस्थापन**

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १. | सर्वसाधारण स्वच्छता–<br>१) सातारा शहरातील रस्त्यांची लांबी<br>२) रस्ते स्वच्छ करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांची संख्या | <br>१२८ कि.मी.<br>८८ |
| २. | घर स्तरावर कचरा गोळा करण्याची प्रभावी पद्धत<br>१)कचरा गोळा करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या घंटागाडया<br>२) एकूण किती घरातून कचरा गोळा केला जातो.<br>३) घंटागाडीची नियमितता | <br>०९<br>१५४१६<br>दैनदिन |
| ३. | कचरा पेटयांची व्यवस्था व वापरातील प्रभावीपणा<br>१) रस्त्यावर पुरविलेल्या सार्वजनिक कचराकुंडया<br>अ) पाईप कुंडया<br>आ) बांधीव<br>इ) डंपर प्लेसर<br>२) सार्वजनिक कचराकुंडयाची एकूण क्षमता<br>अ)पाईप<br>आ) बांधीव<br>इ) डंपर प्लेसर<br>ई) टिपर क्षमता<br>उ) घंटागाडी | <br><br>९४<br>७१<br>९९<br>३२ टन<br>०.५टन<br>१ टन<br>१.५ टन<br>१.५ टन<br>५ खेपा–१ टन |
| ४. | कचरा उचलण्याची नियमितता<br>१) किती सार्वजनिक कचरा कुंडया दिवसातून एकदा खाली करण्यात येतात–<br>अ)पाईप<br>आ) बांधीव<br>इ) डंपर प्लेसर | <br><br><br>३२<br>२८<br>०८ |
| ५. | दररोज एकूण वाहतूक केला जाणारा कचरा | २६ मे.टन |
| ६. | प्रतिटन वाहतूक खर्च | ६३ रूपये |
| ७. | प्रतिटन एकूण खर्च | ८४ रूपये |
| ८. | घरातून कचरा उचलण्यासाठी प्रतिटन खर्च | ५०० रूपये[४०] |

अशा प्रकारे सातारा नगरपालिकेने घनकचऱ्याचे व्यवस्थापन करत असताना सर्वसाधारण स्वच्छतेमध्ये शहरातील रस्ते सफाई, घर स्तरावर कचरा गोळा करण्याची प्रभावी पद्धतीमध्ये कचरा गोळा करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या घंटागाडया, एकूण किती घरातून कचरा गोळा केला जातो व घंटागाडीची नियमितता यांचा समावेश केला गेला जातो. याशिवाय कचरा पेटयांची व्यवस्था व वापरातील प्रभावीपणा यामध्ये रस्त्यावर पुरविलेल्या सार्वजनिक कचराकुंडया, पाईप कुंडया, बांधीव, डंपर प्लेसर, सार्वजनिक कचराकुंडयाची एकूण क्षमता यामध्ये ही पाईप, बांधीव, डंपर प्लेसर, टिपर क्षमता व घंटागाडी यांचा समावेश केला होता.

कचरा उचलण्याची नियमितता यामध्ये किती सार्वजनिक कचरा कुंडया यामध्ये पाईप, बांधीव व डंपर प्लेसर दिवसातून एकदा खाली करण्यात येतात याचीही माहिती वरील तक्त्यावरून मिळते. याशिवाय सातारा शहरातून दररोज एकूण वाहतूक केला जाणारा कचरा, प्रतिटन वाहतूक खर्च, प्रतिटन एकूण खर्च व घरातून कचरा उचलण्यासाठी खर्च इत्यादींची माहिती मिळण्यास मदत होते.

## ४.७ समारोप

सातारा शहरात आरोग्य व स्वच्छता याबाबतीत नगरपालिकेने आपले लक्ष पुरविले होते. आरोग्य सुधारण्यासाठी नगरपालिकेने प्लेग, हिवताप, एन्फ्लुएंझा, देवी, क्षयरोग कॉलरा, दमा, निमोनिया, टायफाडाईड, मलेरिया व हगवण हे आजार रोखण्यासाठी महत्त्वाचे प्रयत्न केले होते. हे साथीचे आजार येऊ नयेत यासाठी अगोदर काळजी घेतली जात होती. यासाठी नगरपालिकेने दवाखान्यांची सोय केली होती. या दवाखान्यात प्रशिक्षित डॉक्टर उपलब्ध केले होते. तसेच इतर कर्मचारी ही मोठया प्रमाणावर भरले होते.

सातारा नगरपालिकेने राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग घेऊन पल्स पोलिओ निर्मूलनासाठी प्रयत्न करून त्यात यश मिळविले होते. तसेच देवी काढण्यात यश मिळविले होते. नगरपालिकेने स्वतःचे प्रसुतिगृह काढून महिलांची चांगली सोय केली आहे. क्षयरोग व कुष्ठरोग निर्मूलनासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. सातारा नगरपालिकेने कुटुंब नियोजनाच्या बाबतीत मोठया प्रमाणावर सहभाग घेऊन शासनाच्या सर्व योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यास मदत केली आहे.

सातारा शहरातील लोकांना नगरपालिकेमार्फत शौचालयाचे महत्त्व सांगण्यात आले आहे. शहरातील लोकांसाठी शौचकुपांची व्यवस्था केली आहे. शहर स्वच्छतेसाठी नगरपालिकेने सांडपाण्याची व्यवस्था केली होती. घनकचरा व्यवस्था ही केली होती. हा घनकचरा एकत्र करून त्यावर प्रकिया केली जात होती. हा कचरा घरोघरी जाऊन गोळा करण्यासाठी घंटागाडीची सोय केली होती. नगरपालिकेने शहर स्वच्छतेसाठी फार मोठया प्रमाणावर खर्च केला होता. हे शहर भविष्यकाळात संप्पन्न व समृध्द होण्यास वरील उपाय योजनांचा मोठा लाभ होणार आहे.

## संदर्भ


१) Satara Suplimentry, 1904, P.38, P.54

२) जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा यांनी दिलेल्या माहितीवरून, दि २.१२.२०१४.

३) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.३९

४) कित्ता, पृ.५९

५) कित्ता, पृ.५९

६) कित्ता, पृ.५९

७) Gazzeteer of Satara District, 1885, p.416

८) कार्यक्रम अंदाजपत्रक, सार्वजनिक आरोग्य, १९९१-९२, पृ.४९

९) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.५९

१०) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटिअर, १९९९, पृ.६६६

११) सातारा नगरपालिका, जमाखर्च अंदाजपत्रक १९७७-७८ ते २००२-२००३

१२) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, सातारा नगपालिका सातारा, २००४-०५, पृ.६७

१३) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.५९

१४) सातारा नगरपालिका जनन व मृत्यू रजिस्टर नोंदीनुसार, पृ. १९९४

१५) कित्ता, पृ.५८

१६) Gazzeteer of Satara District, 1885, p.416

१७) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.५९

१८) कित्ता, पृ.५९

१९) कित्ता, ६०

२०) कित्ता, पृ.६०

२१) सातारा नगरपालिका, जमाखर्च अंदाजपत्रक १९७७-७८ ते २००२-२००३

२२) संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, उपरोक्त, पृ.५५ ते ५७

२३) कित्ता, पृ.६५

२४) कित्ता, पृ.६८,६९

२५) कित्ता, पृ.७०,७१

२६) कित्ता, पृ.७२

२७) कित्ता, पृ.७३, ७४

२८) सातारा नगरपालिका, जमाखर्च अंदाजपत्रक–१९७७–७८ ते २००२–२००३

२९) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६०

३०) संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, उपरोक्त, पृ.२७ ते ३१

३१) कित्ता, पृ.३३

३२) सातारा विकास– प्रश्न अनेक उत्तरे– प्रयास–टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबई– ऑगस्ट २०११, पृ.१२,१३

३३) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६०

३४) कित्ता, पृ.४३

३५) सातारा नगरपालिका सार्वजनिक बांधकाम समिती यांचेकडून मिळालेली माहिती दि. ५.२.२००८

३६) संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, उपरोक्त, पृ.४६ ते ४९

३७) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.४३

३८) सातारा विकास– प्रश्न अनेक उत्तरे– प्रयास–टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबई– ऑगस्ट २०११, पृ.१५,१६

३९) कित्ता, पृ.१७

४०) स्वच्छता व वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य समिती सातारा नगरपालिका यांचेकडून मिळालेली माहिती दि. ०५/०२/२००८

# प्रकरण पाचवे
# नगरपालिका उत्पन्न व खर्च

## ५.१ प्रास्ताविक

कोणत्याही देशाचा, राज्याचा अगर शहराचा विकास हा त्याच्या आर्थिक उत्पन्नावर अवलंबून असतो. आर्थिक बाजू असेल तर प्रगती होण्यास मदत होते. अशाच प्रकारे नगरपालिका शहराचा विकास करीत असताना आपले उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत असते. नगरपालिकेस मिळणाऱ्या उत्पन्नावर शहरातील सोयी व सुविधा अवलंबून असतात. याशिवाय नगरपालिकेचे कार्यक्षम प्रशासन, राबविलेले उपक्रम, यांचे यश या उत्पन्नावर अवलंबून असते. नगरपालिकेस जे उत्पन्न मिळते त्याची अनेक साधने आहेत. त्या सर्व साधनाद्वारे नगरपालिका आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करते. या आर्थिक उत्पन्नाचा अभ्यास नगरपालिकेने दरवर्षी लिहून ठेवलेल्या रेकॉर्डवरून करता येतो. त्यावरून त्यांनी कोणकोणत्या सुविधा राबविल्या होत्या याची माहिती मिळते. कोणत्याही नगरपालिकेचे यशापयश हे तिच्या उत्पन्न व खर्चावर अवलंबून असते. मिळालेल्या आर्थिक उत्पन्नाचा विनियोग योग्य प्रकारे केल्यास नगरपालिकेस यश मिळते. या आर्थिक खर्चामध्ये भ्रष्टाचार व अनागोंदीपणा आल्यास उपक्रम राबविण्यास अपयश येते.

या प्रकरणात सातारा नगरपालिकेची अर्थिक परिस्थिती अभ्यासताना उत्पन्न व खर्च या दोन्ही बाजूंचा अभ्यास केलेला आहे. त्या दृष्टीने प्रथमतः उत्पन्न या गोष्टींचा अभ्यास केलेला आहे.

## ५.२ सातारा नगरपालिकेचे उत्पन्न

सन १८५३ मध्ये सातारा नगरपालिकेची स्थापना झाली. तेव्हापासून सन २००३ पर्यंत नगरपालिकेचा विकास झालेला दिसून येतो. सन २००१ च्या जनगणनेनुसार सातारा शहराची लोकसंख्या १,०८,०४८ एवढी होती.[१]

या सर्व लोकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी सातारा नगरपालिकेने आपला वसूल निरनिराळ्या मार्गाने वाढविला होता. सन १८५३ ते २००३ या काळातील नगरपालिकेच्या उत्पन्नाचा अभ्यास केला तर याचे प्रमाण वाढतच गेलेले दिसते.

## सातारा नगरपालिकेचे सन १८५३ ते २००३ पर्यतचे एकूण उत्पन्न

| अ.नं. | वर्ष | उत्पन्न |
|---|---|---|
| १. | १८५३ | ११,०००/- |
| २. | १८६२-६३ | १९,३१०/- |
| ३. | १८७२-७३ | ३२,७२५/- |
| ४. | १८८२-८३ | ५१,२७०/- |
| ५. | १८९२-९३ | ५०,०००/- |
| ६. | १९०२-०३ | ७५,८४८/- |
| ७. | १९१२-१३ | २,३४,०८७/- |
| ८. | १९२२-२३ | ७,५३,९६३/- |
| ९. | १९३२-३३ | १,२७,०६९/- |
| १०. | १९४२-४३ | ३,१४,५०७/- |
| ११. | १९५२-५३ | ५,३५,६००/- |
| १२. | १९६२-६३ | ११,२४,६८४/- |
| १३. | १९७२-७३ | ५८,०५,५५८/- |
| १४. | १९८२-८३ | २,८७,२५,८१२/- |
| १५. | १९९२-९३ | ५,९१,०७२५३/- |
| १६. | २००२-०३ | १७,५७,९२,६२२/-[२] |

सातारा नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) नगरपालिका कर व दर यापासून मिळणारे उत्पन्न.

यामध्ये १) जकात व घरपट्टी, २) पथकर(गाडीकर), ३)एकत्रित कर, ४) हॉटेल कर, ५) जाहिरात कर, ६) कुत्र्यांवरील कर, ७) वृक्षकर, ८) करमणूक कर, ९) पाणीपट्टी, १०) भंगीपट्टी, ११) प्राथमिक शिक्षण अनुदान, १२) शिक्षण कर इत्यादीचा समावेश केला होता.

२) विशेष अधिनियमाखाली वसुलीचे मिळणारे उत्पन्न

३) कराव्यतिरिक्त नगरपालिकेच्या मालमत्ता व उपयोगितापासूनचे उत्पन्न.

४) अनुदाने व अंशदाने.

५) इतर उत्पन्न यामध्ये पुढील बाबींचा समावेश केला जात होता.

सातारा नगरपालिकेच्या उत्पन्नातील सन १९५२–५३ ते २००२–०३ या वर्षातील कर व दर

| अ.नं. | वर्ष | नगरपालिका कर व दर |
|---|---|---|
१६) सातारा नगरपालिका, जमाखर्च अंदाजपत्रक, १९७७–७८ ते १९८८–८९, पृ.२०

१७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.९, दि.१४ सप्टेंबर १९४८, पृ.११८

१८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.२५

१९) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.६२१, विषय नं.५, दि.१४ ऑगस्ट १९८८, पृ.२८६

२०) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–१९९०, पृ.१३

२१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. १२४, विषय नं.३, दि.१४ सप्टेबर १९७०, पृ.६५

२२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.३३

२३) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. ४, विषय नं.४, दि.३० सप्टेबर १९२७, पृ.२

२४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–९३, जमाखर्च अंदाज पत्रक, १९७२–१९९३, पृ.१०

२५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. ६२०, विषय नं.४, दि.२९ ऑगस्ट १९८८, पृ.२८६

२६) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.१२

२७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. ६, विषय नं.६, दि.२५ ऑगस्ट १९४४, पृ.२५

२८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८० – २००३, पृ.३०

२९) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.३५

३०) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं.३, दि.१२ फेब्रुवारी १९३४, पृ.७२

३१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.२

३२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं.४, दि.११ जुलै १९४२, पृ.१३६

३३) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.१३

३४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–१९९३, पृ.७

३५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.८

३६) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसेंडींग बुक, १९५२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.८

३७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९५२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८० ते २००३, पृ.३

३८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९५२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८० – २००३, पृ.४

३९) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९५२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.५

४०) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९५२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.६

४१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७२–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८० –८८, पृ.९

४२) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, जनरल प्रोसिडिंग बुक १९५४–१९८०, जमाखर्च अंदाजपत्रक १९८०–२००३, पृ.७

४३) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९७७–२००३, जमाखर्च अंदाज पत्रक, १९७७–२००३, पृ.८

४४) कित्ता, पृ.८

४५) कित्ता, पृ.६

४६) कित्ता, पृ.५

४७) कित्ता,, पृ.४

४८) कित्ता, पृ.२

४९) कित्ता, पृ.३

५०) कित्ता, पृ.२

५१) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १८५३–१९८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.७

# प्रकरण सहावे

# नगरपालिकेचे सातारा शहराच्या विकासातील योगदान

## ६.१ प्रास्ताविक

सातारा शहरास महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. मध्ययुगीन कालखंडात सातारा व परिसरात अनेक महत्त्वाच्या घटना घडलेल्या आहेत. सातारा शहरास जवळ असलेला अंजिक्यतारा किल्ला हा मराठयांच्या काळात मध्यवर्ती ठिकाण म्हणून प्रसिद्ध होते. छत्रपती शाहू महाराजांच्या राज्याभिषेकानंतर (१२ जानेवारी १७०८) 'सातारा' ही स्वराज्याची राजधानी म्हणून नावारूपास आली. साताऱ्यातूनच पेशव्यांना पेशवाईची वस्त्रे दिली जात होती. सातारा शहराचा विकास छत्रपती शाहू महाराजांच्या काळापासून सुरू झाला. छत्रपती शाहू महाराजांनी अदालत वाडा, रंगमहाल, तख्ताचा वाडा या इमारतीचे बांधकाम केले. तसेच शहरात पेठांची निर्मिती केली. त्यामुळे शहराचा विकास झपाटयाने झाला. व शहराच्या आकारातही वाढ होऊ लागली. तसेच ते सुंदर शहर झाले. याबरोबर शहरातील लोकांची जीवनावश्यक वस्तुंची सोय व्हावी यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी फार मोठे प्रयत्न केले. शहरातील पाणी, रस्ते, पुल अशासारख्या सोयीसुविधांची निर्मिती सातारा शहरात केली गेल्याने सातारा शहराचा विकास झपाटयाने झाला.

छत्रपती शाहू महाराजांच्या नंतर सातारा शहराचा विकास करणारे छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा उल्लेख केला जातो. त्यांनी सन १८०८ मध्ये सत्तेवर आल्यानंतर सन १८३९ पर्यंत सातारा शहराचा कायापालट केला. त्यामध्ये वाडयांची निर्मिती, शाळा, दवाखाने, रस्ते, पूल इत्यादी बांधकामे केली. विशेषतः व्यापारास उत्तेजन व सवलती देऊन व्यापारी पेठांची निर्मितीही केली. त्यामुळे व्यापाराची भरभराट झाली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्यानंतर ब्रिटिशांनी सन १८४८ मध्ये सातारा राज्य खालसा केले. तेव्हा सातारा शहरातील नागरी कारभार पाहण्यासाठी एका कमिशनरची नियुक्ती केली. या कमिशनरने शहरातील लोकांच्या गरजा भागविण्यासाठी लोकांकडून कर गोळा करण्यास सुरूवात केली. ही करवसुली वेळेत व्हावी तसेच त्यास लोकांचा विरोध होऊ नये यासाठी १ ऑगस्ट १८५३ रोजी 'सातारा नगरपालिका' स्थापन करण्यात आली. तेव्हापासून सातारा शहराचा नागरी कारभार या नगरपालिकेकडे देण्यात आला. या नगरपालिकेने हा कारभार करीत असताना ज्या सुधारणा

केल्या होत्या. त्यातूनच सातारा शहराचा विकास होण्यास मदत झाली आहे. तेव्हा या प्रकरणात सातारा शहराच्या विकासात नगरपालिकेने केलेल्या सुधारणांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

## ६.२ प्रशासकीय इमारती

सातारा नगरपालिकेची स्थापना सन १८५३ मध्ये झाली. त्यावेळी पुर्वी शनिवार पेठेतील शिपायांची चौकी होती. तेथे नगरपालिकेचे पहिले ऑफिस होते. सन १८७६ मध्ये भवानी पेठेतील जलमंदिर किंवा गोल बंगला म्हणून ओळखले जाणारे ठिकाण इंग्रजांच्या ताब्यात आले. तेव्हा नगरपालिकेचे ऑफिस या इमारतीत आणण्यात आले. ही इमारत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी १८२४ मध्ये बांधली होती. सन १९४० नंतर सदर इमारत नगरपालिकेच्या ऑफिससाठी अपुरी पडू लागल्यामुळे ३०,००० रू.खर्च करून एक नवीन इमारत बांधण्यात आली.

सन १९४७ मध्ये नगरपालिकेने बांधलेल्या इमारतीवर दुसरा मजला बांधण्यासाठी १७७९७–८–० रूपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते. सन १९४९ मध्ये वसुली ऑफिस इमारत बांधण्यासाठी ३००० रूपये पर्यंतच्या खर्चास जनरल बोर्डाने मान्यता दिली.

नगरपालिकेचे कामकाज प्रारंभी तीन वेगवेगळ्या ठिकाणी चालत होते. त्यामुळे नागरिकांना एका कामासाठी तीन ठिकाणी जावे लागत होते. याचा परिणाम असा होत होता की, नगरपालिकेच्या कामात शिथिलता येऊन नागरिकांची गैरसोय होत असे. त्यामुळे नगरपालिकेसाठी नवीन भव्य व सुसज्ज एका ठिकाणी सर्व कार्यालये असणारी इमारत बांधण्याचा ठराव २९ मार्च १९७४ रोजी मंजूर करण्यात आला. हे कार्यालय केसरकर पेठ सिसनं. १ व २ या जागेवर बांधण्याचे ठरले. त्यासाठी ५३,७४,६२९ रूपये खर्च मंजूर करण्यात आला.[१]

## ६.३ शॉपिंग सेंटर

सातारा शहरातील व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी नगरपलिकेने वेगवेगळ्या ठिकाणी शॉपिंग सेंटर बांधून एका ठिकाणी सर्व वस्तू मिळण्याची व्यवस्था केली व नगरपलिकेच्या मोकळ्या जागेवर शॉपिंग सेंटर बांधून गाळे निर्माण केल्यामुळे उत्पन्नात भर पडली. शहरात नगरपालिकेने जवळ–जवळ १० शॉपिंग सेंटर बांधले आहेत.

नगरपालिकेने बांधलेल्या शॉपिंग सेंटरपैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

१) केसरकर पेठ शॉपिंग सेंटर – ३० गाळे

२) सदर बजार शॉपिंग सेंटर – ८० गाळे

३) गुरूवार परज शॉपिंग सेंटर – २४ गाळे

४) श्री. छ.सुमित्राराजे भोसले व्यापारी संकुल

५) भवानी पेठ ३५ अ ब क शॉपिंग सेंटर

६) भवानी पेठ २७१, २७२ शॉपिंग सेंटर

७) सदाशिव – बुधवार पेठ शॉपिंग सेंटर – ४० गाळे

अशा सर्व शॉपिंग सेंटर मधील गाळयांची संख्या ४०५ एवढी आहे. वरील पैकी गुरूवार परज येथील शॉपिंग सेंटरसाठी १२,५३,३३५ रू. १९७८–७९ साली मंजूर करण्यात आले होते. तर सदाशिव पेठ येथील सिसनं.१०६ व १३८ मधील शॉपिंग सेंटर बांधण्यासाठी ७,१४,९६५ रू.चे अंदाजपत्रक सन १९००–२००० साली. मंजूर करण्यात आले होते.[२]

## ६.४ समाज मंदिरे

सातारा शहरातील वेगवेगळया वार्डात नगरपलिकेने समाजमंदिरे बांधून सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. पूर्वी शहरांमध्ये धर्मशाळा होत्या. पुढे आधुनिक समाजाची गरज म्हणून मागासवर्गीय लोकांच्या वस्तीत समाज मंदिरे बांधण्याचे धोरण आखून जवळपास २० समाजमंदिरे नगरपलिकेने बांधलेली आहेत. हरिजन वस्ती सुधारणे अंतर्गत खालील ठिकाणी समाजमंदिरासाठी नगरपलिकेने अंदाजपत्रके मंजूर केली.

| अ.क्रं. | ठिकाण | वर्ष | खर्च |
|---|---|---|---|
| १. | दुर्गा पेठ | १९८३ | १६,४००/- |
| २. | मल्हार पेठ | १९८३ | ५१,०००/- |
| ३. | गुरूवार पेठ | १९८४ | ६७,११५/- |
| ४. | गोडोली | १९८८ | १,०१,२१७/- |
| ५. | बुधवार पेठ | १९९० | १,२४,०२५/- |
| ६. | मंगळवार पेठ | १९९२ | १,४४,६५९/- |
| ७. | शनिवार पेठ | १९९३ | १,९७,२७०/- |
| ८. | रविवार पेठ | १९९७ | ५,००,००० |
| ९. | प्रतापगंज पेठ | २००० | २,२१,७७० |
| १०. | सदर बाजार | २००० | २,२१,७७०[३] |

## ६.५ मंडई

सातारा नगरपालिकेने शहरातील वेगवेगळया ठिकाणी ३ मंडई सुरू केल्या आहेत. त्यात भवानी पेठ, बुधवार पेठ व रविवार पेठ इ.चा समावेश होतो. भवानी पेठेतील भाजी मंडईची नवीन इमारत बांधण्यासाठी सन १९८२ मध्ये प्रशासकीय कारकिर्दीत ३,३९,६८२ रूपये खर्च मंजूर करण्यात आला.

रविवार पेठेतील भाजी मंडईचे आरसीसी बंदिस्त बांधकामासाठी ३५०५२० रू. व दुसरा मजला बांधण्यासाठी ७५३००८ रू मंजूर करण्यात आले. बुधवार पेठ सिसनं.१७६ मध्ये नवीन बांधलेल्या भाजी मंडईस 'महात्मा फुले भाजी मंडई' असे नाव देण्यात आले.[४] याशिवाय शहरामध्ये मटण मार्केट, मासे मार्केट व फळविक्री मार्केट आहेत.

## ६.६ घरकुल योजना

सातारा नगरपालिकेत काम करणारे चतुर्थ श्रेणीतील कामगारांना नगरपालिकेच्या माध्यमातून घरे बांधण्यासाठी सन १९५१-५२ साठी १३९१८-१५-० रू मंजूर करण्यात आले होते त्यातून मंगळवार पेठेत १० घरकुल बांधण्यात आली. व १९८२-८३ साली सदर बजार येथे नवीन २० घरकुल बांधली. सदर बजार सि.स.नं.४०९/२ अ साईट नं१५५ मध्ये नगरपलिकेच्या मेहतर कर्मचाऱ्यांसाठी ३२ घरे बांधण्याचे ११,९७,७२३ रूपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले.[५]

## ६.७ झोपडपट्टी पुनर्वसन

सातारा नगरपालिका हद्दीतील झोपडपट्ट्यांचा प्रश्न गंभीर झाला होता. तेव्हा सातारा नगरपालिकेने शहरातील खालील अकरा झोपडपट्ट्यांना मान्यता दिली.

१) सदरबाजार सिसनं. ४०९/१०

२) सदरबाजार सिसनं. ४४०

३) सदरबाजार लक्ष्मी टेकडी

४) गेंडामाळ झोपडपट्टी (माजगावकर माळ)

५) केसरकर पेठ ८६ व ४२ लगत (कोल्हाटी वस्ती चार भिंती)

६) प्रभात टॉकीज पिछाडी

७) शनिवार पेठ राजलक्ष्मी टॉकीज पिछाडी सिसनं.२८६

८) गोडोली वैदू वसाहत व कोल्हाटी वस्ती

९) दैनिक ऐक्य कार्यालयाची पिछाडी

१०) मंगळवार पेठ मातंग वस्ती, डवरी, गोसावी

११) गोडोली साईबाबा मंदिर, पिछाडी.[६]

## ६.८ रस्ते

सातारा शहरात मुख्य रस्ते तीन आहेत. वरचा रस्ता, खालचा रस्ता व राधिका रोड या तीन रस्त्यानेच शहरातील सर्व वाहतूक होते. सातारा नगरपालिकेने आपल्या बांधकाम विभागाच्या माध्यमातून १२० कि.मी.लांबीचे रस्ते तयार केले आहेत. यात काँक्रिट रस्ते १० कि.मी., डांबरी रस्ते, ९५ कि.मी., खडीचे रस्ते ५ कि.मी. व कच्चे रस्ते १० कि.मी. बांधकाम केले आहे. यामध्ये शाहू चौक ते पोवई नाका या रस्त्याचे डांबरीकरण करणे, या रस्त्यात दुभाजक टाकणे, मथ्यभागी विद्युत खांब उभे करून त्यावर मर्क्युरी बासविणे. याशिवाय बसस्थानक ते राधिका चित्रपटगृह या रस्त्याचे डांबरीकरण केले. रविवार पेठतील कासट मार्केटच्या पाठीमागील रस्त्यावरील डांबरीकरण केले आहे.

सन १९५४ मध्ये सातारा नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व लहान मोठया रस्त्याची लांबी २८ मैल होती. त्यापैकी ७ ते ८ मैल लांबीचे रस्ते फर्स्ट क्लास खडीचे, ५ ते ६ मैल लांबीचे सेंकड क्लास खडीचे व ४ ते ५ मैल लांबीचे रस्ते मुरूमाचे होते. बाकीचे रस्ते लहान बोळाचे व

गल्लीतील आहेत. मागील तीन वर्षापासून सातारा नगरपालिकेने जवाहर बाग ते सदाशिव पेठ ते पोवई नाका हा रस्ता अस्फाल्टचा केला आहे. रस्ते दुरूस्तीसाठी दरवर्षी खर्च ३० हजार रूपये केला जातो.[७]

राज्य सरकारचे कायद्याप्रमाणे नगरपालिकेने सन १९५८ मध्ये नगरविकास योजना तयार करून त्याची अमंलबजावणी सुरू केली. या योजनेनुसार शहरातील मुख्य रस्ते रूंद करण्यात आले. राजपथावरील वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टिने कमानी हौद ते न्यू इंग्लिश स्कूल व न्यू इंग्लिश स्कूल तेथून यादोगोपाळ मारूती ते लक्ष्मी नारायण मंदिर हा रस्ता रूंद करण्यात आला. बस वाहतुकीसाठी हा रस्ता उपयुक्त बनविला. मोती चौक ते पोवई नाका हा सदाशिवपेठ रस्ता नेहमीच वर्दळीचा असल्याने त्यावरील वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी व नवीन वस्ती वाढण्यास उपयुक्त होण्याकरिता कोटेश्वर रस्ता वाढवून प्रतापगंज, बुधवार व बसाप्पा या पेठांतून मार्केट यार्डमधून एस.टी स्थानकापर्यत हा नवीन रस्ता तयार करण्यात आला आहे.[८]

गाडीवरील कर व टोल करांचे एकूण दरवर्षीचे उत्पन्न रू.१७,५००/- आहे. या उत्पन्नाच्या मानाने रस्त्यासाठी बरीच मोठी रक्कम खर्च केली जाते.[९]

**नगरपालिकेने रस्त्यावर केलेला खर्च**

| अ.नं. | वर्ष | खर्च |
|---|---|---|
| १. | १९४९-५० | २५,१७२ |
| २. | १९५०-५१ | ३४,६०० |
| ३. | १९५६-५७ | ३२,६१० |
| ४. | १९५७-५८ | ६२,१२० |
| ५. | १९५८-५९ | ५३,४१३ |
| ६. | १९५९-६० | ५९,८२० |
| ७. | १९६४-६५ | ६४,३६२ |
| ८. | १९७८-७९ | ५,२४,३९६ |
| ९. | १९८०-८१ | ९,११,७२५ |
| १०. | १९८५-८६ | १३,२३,३७४ |
| ११. | १९९०-९१ | २८,११,८२५ |
| १२. | १९९५-९६ | ४२,५४,९६० |
| १३. | २००२-०३ | ९५,५१,५८१[१०] |

## ६.९ पूल

सातारा शहर अंजिक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी उतारावर वसले आहे. त्यामुळे पावसाळ्यात ओढयाचे पाणी रस्त्यावर आल्यामुळे रस्ते खराब होत असत. तसेच पुर्वीचे पुल अरूंद असल्यामळे दळणवळणाच्या दृष्टीने त्रासदायक होते. अशा सर्व जुन्या पुलांचे रूंदीकरण करणे व काही नवीन पुलांचे बांधकाम करणे गरजेचे होते. म्हणून सातारा नगरपालिकेने शहरवासियांच्या सोयीसाठी पुलांचे बांधकाम केलेले दिसते.

| अ.क्र. | पुलाचे नांव | बांधकाम वर्ष | खर्च रूपये |
|---|---|---|---|
| १. | भवानी पेठ सिटी पोस्ट ऑफिसच्या पुर्वेकडील पुल | १९६१ | १०८९/ |
| २. | मंगळवार पेठ रोडे घर ते भटजी महाराज मठाकडे जाणारा पूल | १९७० | ९०००/ |
| ३. | रविवार पेठ रेशमाचे गिरणी मागील पुल रूंद करणे | १९७६ | ३४००/ |
| ४. | अदालतवाडयाजवळील मालशे पूल | १९७६ | २१८१/ |
| ५. | बुधवार नाका ते मोळयाचा ओढा रस्त्यावरील कब्रस्तान जवळील पूल | १९८५ | १२६४३/ |
| ६. | मंगळवार तळे ते कारंडबी नाका रस्त्यावरील क्रॉसरोड ओढयावरील पूल | १९८५ | १२४०४/ |
| ७. | राधिका रोडवरील बसाप्पा पूल | १९८५ | १,९८,३५७/ |
| ८. | सदरबजार आरटीओ ऑफिसजवळील पूल | १९८९ | १,२३,५५०/ |
| ९. | प्रतापगंज पेठ ६९ लगत ओढयावरील पूल | १९९९ | १,०३,९५०/ |
| १०. | सदर बजार कुपर कॉलनी येथील पूल | १९९९ | ३,५५,३१६/ |
| ११. | गुरूवार पेठ बीफमार्केट पूल | २००० | ४,९३,६१२/ |
| १२. | राजवाडयाजवळील प्रतापगंज पेठ ओढयावरील पूल | २००२ | २४,८४,९७०/ |
| १३. | सदरबजार कांगा कॉलनी ओढयावरील पूल | २००३ | ७,५०,०००/[११] |

## ६.१० फुटपाथ

सातारा नगरपालिकेने राजपथाच्या दोन्ही बाजूने चालत जाणाऱ्या लोकांसाठी फुटपाथ बांधण्याचा ठराव १९८२ मध्ये मंजूर केला. जवाहर बाग ते देवी चौक या रस्त्यावरील फुटपाथसाठी गटर्स बांधणे १,६१,००० फुटपाथ व पाईप टाकणे २,०६,००० आईलपेंट करने ५५०० असे एकूण ३७२५०० रूपयाच्या कामास मंजुरी देण्यात आली.[१२]

## ६.११ स्ट्रीट लाईट

सातारा नगरपालिकेने पूर्वीपासून शहरातील मुख्य रस्त्यावर रॉकेलचे कंदिल लावलेले होते. पुढे त्यात सुधारणा करून गॅसबत्त्या लावण्यास सुरूवात केली. सन १९२६ मध्ये १०८०

रू.खर्च करून ३६ गॅसबत्त्या खरेदी करण्याचा ठराव नगरपालिकेने केला. नगरपालिका व दि सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी यांच्यात वीजनिर्मिती संदर्भात सन १९३२ मध्ये करार करण्यात आला. त्यामार्फत तयार होणारी वीज शहरातील दिव्यांसाठी ५ आणे प्रति युनिटप्रमाणे आकार घेण्याचे मान्य करण्यात आले. त्यानुसार सन १९३५ पासून गॅसबत्ती व कंदीलाऐवजी शहरातील रस्त्यावर वीजेचे दिवे लावण्यात आले होते.

सातारा शहरातील निरनिराळया ठिकाणी स्ट्रीट लाईट टयूब फिक्चर्स बसविण्यासाठी ५०,००० रू.युडी ५ योजनेतंर्गत मंजूर झाले होते. त्यातील ३०,००० रू. खर्चास मान्यता देण्यात आली. २०,००० टयुब फिक्चर्स खरेदीसाठी व १०,००० रू. टयूब फिटिंगसाठी वापरावयाचे ठरले.

सन १९५३–५४ मध्ये शहरातील रस्त्यावर २०० कॅन्डल पॉवरच्या एकूण ९६ बत्त्या व ३७ कंदील होते. मुख्य चौकांतून ९० विजेचे मोठे मर्क्युरी व्हेपर लॅम्पस लावलेले होते. याशिवाय ठिकठिकाणी १५ वॅटसचे ३३, २५ वॅटसचे १५७, ४० वॅटसचे ९४, ६० वॅटसचे १९ व १०० वॅटसचा १ असे एकूण ३१४ इलेक्ट्रीक दिवे सातारा शहरात लावलेले होते. त्यांचा १७ हजार रूपये खर्च वर्षाला येत असे.[१३]

## ६.१२ ट्राफीक सिग्नल

सातारा शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची गर्दी व अपघात होऊ नये यासाठी नगरपालिकेने सिग्नल बसविण्याचा ठराव १९९१ मध्ये केला. त्यानुसार मोती चौक येथे सिग्नल बसविण्यासाठी २,१६,१४७ रूपये व पोवई नाका सिग्नल बसविण्यासाठी ३,६५,१८६ रूपये असा एकूण ५,८१,३३३ रूपये खर्चास मान्यता दिली.[१४]

## ६.१३ दवाखाने

सातारा शहरातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सोयीसाठी पूर्वीपासून सिव्हील हॉस्पिटल होते. त्यामुळे नगरपालिकेने आपला दवाखाना सुरू केला नव्हता. मात्र पूर्वी नागरिकांनी फंड जमा करून 'दि किंग एडवर्ड मेमोरियल मॅटर्निटी हॉस्पिटल' सन १९२४ मध्ये सुरु केले होते. ते १९३१ मध्ये १५,५२५ रूपये रोख रक्कम व साहित्यासह नगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आले. सदर दवाखान्यासाठी ८००० रूपये खर्च करून सन १९३२ मध्ये इमारत बांधण्यात आली. पुढे सन १९४० मध्ये ५००० रुपये खर्च करून आणखी एक इमारत

बांधून प्रसुतिगृहाची इमारत सुसज्ज करण्यात आली. सन १९४९ मध्ये सदर प्रसुतिगृहाचे नाव ‘पुज्य कस्तुरबा प्रसुतिगृह’ ठेवण्यात आले. सन १९५४ मध्ये २२,००० रूपये खर्च करून नवीन इमारत बांधून २५ बेडसची सोय करण्यात आली. याचवर्षी नवीन इमारतीचे उद्घाटन २३ जानेवारी १९५४ मध्ये केल्या गेले व एक रूग्णवाहिका गाडीही याचवेळी घेण्यात आली. १ जानेवारी १९५३ पासून या प्रसुतिगृहात लेडी डॉक्टर म्हणून प्रथम शांताबाई खडके काम करत होत्या.[१५]

याशिवाय सदर बजारमध्ये नगरपालिकेने एक आयुर्वेदिक दवाखाना चालविला होता. गोडोली येथेही एक दवाखाना सुरू केला होता. या तिन्ही दवाखान्यातून शहरातील नागरिकांना अल्प दरात आरोग्य सुविधा पुरविली जात आहेत.

## ६.१४ आरोग्य सोयी

सातारा शहरातील नागरिकांचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी सातारा नगरपालिकेने नेहमी प्रयत्न केलेले दिसतात. सन १९५४ सालापर्यंत नगरपालिकेने आरोग्याच्या दृष्टीने ३४ सार्वजनिक शौचकुपे बांधली होती. त्यामध्ये एकूण २१४ सिटस होती. त्याची साफसफाई करण्यासाठी ६२ मेहेत्तर होते. त्यापैकी ३९ पुरूष व २३ स्त्रिया होत्या. तसेच शहरात खाजगी शौचकुपांची संख्या १७६५ होती.शौचकुपातील मैला वाहतूक करण्यासाठी २ गाडया होत्या. हा सर्व मैला मोटारीच्या माध्यमातून गेंडामाळ येथे तयार केलेल्या खड्डयात टाकूण त्यापासून खत तयार केले जात असे. तसेच शहरामध्ये नगरपालिकेने बांधलेल्या सार्वजनिक मुताऱ्यांची संख्या ११ होती. त्याची साफसफाई करण्यासाठी एका भिस्ती कामगाराची सोय करण्यात आली होती. शहरातील सर्व रस्त्यांची झाडलोट करण्यासाठी ३० स्त्री कामगार होत्या. हा सर्व कचरा १८० कोंडाळयांमधून जमा करून गेंडामाळ कचरा डेपोवर नेऊन खत करण्याची व्यवस्था नगरपालिकेने केलेली होती.

नगरपालिकेने शहर स्वच्छतेच्या माध्यमातून सर्व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. सध्या नगरपालिकेने बांधलेल्या सार्वजनिक शौचकुपांची संख्या ८५६ सिटस इतकी आहे. त्याचबरोबर सार्वजनिक मुताऱ्या ८७ बांधण्यात आल्या आहे. तसेच शहरातील ठिकठिकाणी १०७ कि.मी. लांबीची पक्की गटारे व २२

कि.मी.लांबीची कच्ची गटारे बांधण्यात आली आहेत. प्रत्येक वर्षी आरोग्य व शहर स्वच्छतेसाठी मोठया प्रमाणात रक्कम खर्च केली जाते.[१६]

## ६.१५ भुयारी गटार योजना

सातारा शहरातील नागरिकांना आरोग्यदायी जीवन जगता यावे म्हणून नगरपालिकेने सन १९६० मध्ये १५,६४,९००/ रूपये खर्चाची भुयारी गटार योजना शासनास सादर केली होती व नगरपालिका ११,७८,७०० रूपये कर्ज काढण्यास तयार आहे. हे शासनास ठराव मंजूर करून कळविले होते.[१७]

## ६.१६ शिक्षण

सातारा नगरपलिकेने शहरातील मुलांच्या शिक्षणासाठी सन १८८५ पासून शहरातील शिक्षण ताब्यात घेतले. तत्पुर्वी सर्व शाळा सरकारी व खाजगी होत्या. यावेळी नगरपालिकेने ७ मराठी शाळा, १ रात्रीची शाळा व १ मुलींची शाळा अशा एकूण ९ शाळा चालविल्या होत्या. सन १९०० साली नवीन एक शाळा नगरपालिकेने सुरू केली. यावेळी शिक्षणावर ७१०० रूपये खर्च होत होता. त्यापैकी सरकारी मदत २०२४ रूपये मिळत असे. व लोकल बोर्डाकडून ७४२ रूपयाचे मानधन मिळाले. फीचे उत्पन्न १३५० रूपये जमा होत असे आणि राहिलेले ३०००/रूपये नगरपालिका स्वतः खर्च करत असे. १ जुलै १९२१ पासून नगरपालिकेने शहरातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. यावेळी खानेसुमारी करून ६ ते११ वर्ष वयोगटातील २९३३/ मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे आढळून आलेल्या सर्वांना नगरपालिकेने शिक्षणाच्या प्रवाहात आणले. सन १९२५ मध्ये स्कूल बोर्डाची स्थापना करण्यात आली. व त्यांच्याकडून प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था सुरू राहिली. सन १९५४ साली नगरपालिकेच्या शाळांची संख्या १७ झाली. त्यात २८३८ मुले व २०८८ मुली शिक्षण घेत होती. या मुलांना शिकविण्यासाठी ८६ पुरूष शिक्षक व ३८ स्त्रि शिक्षिका नेमल्या होत्या.[१८]

## ६.१७ पाणीपुरवठा योजना

छत्रपती शाहू महाराजांनी अजिंक्यतारा किल्ल्यांवरून आपली राजधानी सातारा शहरात आणली. तेव्हा यवतेश्वर डोंगराच्या पूर्व व उत्तर उतरणीवरील पाणी खापरी नळाने सातारा शहरासाठी आणले. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी आपल्या कारकिर्दीत महादरे तलाव बांधून शहराला पाणीपुरवठा केला.

**१) अंजिक्यतारा योजना–**

अजिंक्यतारा किल्ल्यावर दुधबवी, साग्री सुलतानपीर, मंगळाई, शिवसागर, सप्तर्षि, कोटी व भवानी तलाव अशी सात तळी आहेत. या सर्व तळयांची तुलनात्मक पाहणी करून त्यापैकी पहिल्या चार तलावाचे पाणी एकमेकास जोडून ते यवतेश्वरच्या नळास जोडता येईल असे वाटले. तर उरलेले पाणी किल्ल्यावरील लोकांना वापरता येईल. या चार तलावातून वर्षास सुमारे १,८५,५७६ घनफूट पाणी मिळेल अशी व्यवस्था केली आहे. पण हे चार तलाव एकमेकांस जोडण्यास जो खंदक खणावा लागेल तो अगदी खडकातून खोदावा लागेल. व त्याचा खर्च बराच येईल. शिवाय हा किल्ला नगरपालिकेच्या हद्दीतील नसल्याने हद्द वाढवावी लागेल व या तलावाची मालकीही मिळवावी लागेल. ही गोष्ट नगरपालिकेच्या निदर्शनास आल्याने नगरपालिकेने ही योजना शेवटी सोडून दिली.

**२) वेण्णा व महादरे योजना –**

वेण्णा नदीवरील कन्हेर या गावाजवळ बांध घालावा व ते पाणी शहरास न्यावे महारदऱ्याच्या दरीत एक मोठा तलाव बांधावा अशी तिसरी योजना पुढे आली. वेण्णा नदीचा तलाव पोवई नाक्याजवळील पोस्ट ऑफिसपेक्षा १७० फूट खोलवर व रंगमहालापेक्षा ३४७ फूट खोल होता. शिवाय शहरापासून त्याचे अंतर सुमारे आठ मैलांचे होते. तेव्हा इतक्या उंचीवर पाणी चढविणे व इतक्या अंतरावर नळ घालून ते आणणे आवाक्याबाहेरचे होते. शिवाय त्यासाठी चालवाव्या लागणाऱ्या पंपाचा नित्याचा खर्चही बराच होणार होता. म्हणून नगरपालिकेने ही योजना रद्द केली.

महादरे योजनेच्या बाबतीतही हीच अवस्था झालेली दिसून येते. महारदरे दरीत मोठा तलाव बांधण्यासाठी सपाटी मिळाली नाही. तलावाच्या बंधाऱ्याची भिंत ७५ फूट उंचीची बांधावी लागणार असल्यामुळे त्यासाठी पाण्याची चाचणी घेतली. तेव्हा १३० फूट खोलीपर्यंतही समाधानकारक पाया मिळेना. या योजनेस सुमारे दोन लाख रूपये इतका खर्च केला तरी त्या तलावाचे पाणी शहराच्या फक्त सखल भागासच मिळणार होते. त्यामुळे ही योजना मागे पडली. अशा प्रकारे दोन्ही योजना सातारा शहरात राबविण्यात आल्या परंतु त्या दोन्हीही अयशस्वी झालेल्या दिसून येतात. त्यामुळे नगरपालिकेने या दोन्ही योजनाकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते.[१९]

### ३) गोडोली योजना–

गोडोली तलावाची खोली वाढवून त्यातील पाणी कँप व शहराचा सखल भाग यांना पुरवावे असे नियोजन केले. त्याच्या खर्चाचे दीड लाख रूपयाचे अंदाज पत्रक तयार केल होते, व ते काम हाती घ्यावे व त्याखेरीज आता दुसरा इलाज नाही असे ठरले.सन १८७७ मध्ये सातारा शहरात पाण्याची टंचाई तीव्र झाली. लोक पाण्यासाठी इतके हवाल दिल झाले की, शेवटी वेण्णा नदीचे पाणी पखालवाल्याकडून शहरात पुरविण्यात आले. त्यामुळे नगरपालिकेचे सर्व लोक सारखे चिंतेत पडले. ते सर्व सभासद सरकार नियुक्त होते तरी लोकांच्या सोईसाठी ते सारखे तळमळ करीत होते.[२०]

### ४) कास तलाव

कासच्या तलावाचे बांधकाम नगरपालिकेने सन १८८१ मध्ये सुरू केले व ते बांधकाम सन १८८६ साली पूर्ण झाले. या तलावाचा बांधकाम खर्च रूपये ३,६९,१६४ इतका झाला होता. या तलावात ७,३७,३७,०६० घनफूट पाणी साठवण क्षमता होती. सध्या कास धरणाची पाणी साठवण्याची क्षमता ३.०३ . मीटर इतकी आहे. या धरणातून सातारा शहरास अंखडपणे पाणीपुरवठा चालू केला आहे. प्रारंभी या धरणातील पाणी २७ कि.मी. उघडया पाटाद्वारे उताराने पाणी शुद्वीकरणासाठी सांबरवाडी जलशुद्धीकरणात आणले जाते. सांबरवाडी जलशुद्धीकरण केंद्र १० द.ल.लिटर्स क्षमतेचे आहे. सांबरवाडीहून हे पाणी डोंगराच्या नैसर्गिक उतारावरून जलशुद्धीकेंद्रातील शुद्ध पाणी लोखंडी नळाने जुन्या पॉवर हाऊस जवळील साठवण टाकीत आणण्यात येते. ही पाणी साठवण्याची टाकी १३.६२ लाख लिटर क्षमतेची आहे. तेथून नळाने शहरात पाणी पुरविण्यात येते. या योजनेतून सातारा शहरास दररोज ५० लाख लिटर पाणी पुरविले जाते. ही कास पाट बंदिस्त पाईप लाईन योजना पूर्ण झाली असून तिची देखभाल नगरपालिका स्वतः करत आहे.[२१]

### ५) कृष्णा माहुली पाणीपुरवठा योजना (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण)

या योजनेतून सातारा शहरास दररोज ४० लाख लिटर पाणीपुरवठा केला जातो. कृष्णा नदी ते सातारा शहर हे अंतर ५ कि.मी. आहे. कृष्णा नदीच्या पात्रात ४ मीटर व्यासाची विहीर बांधली आहे. या विहिरीतून विद्युत पंपाच्या साहाय्याने हे पाणी लोखंडी पाईपचा वापर करून सातारा शहरातील विसावा कॅम्प येथे आणले जाते. तेथून पाणी कँप वॉटर टँकमध्ये आणले

जाते. तेथे ते पाणी फिल्टर करून त्याचा शहरात पाणी पुरवठा केला जातो.[२२]

**६)शहापूर–उरमोडी पाणीपुरवठा योजना(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना)**

या योजनेतून ४० लाख लिटर पाणी सातारा शहरास पुरविले जात आहे. उरमोडी नदीतून लोखंडी पाईपद्वारे हे पाणी बोगद्यातून सातारा शहरात आणले आहे. बोगदयापासून शाहू चौकापर्यतचा पाईपचा खर्च नगरपालिकेने केलेला आहे.[२३]

**७) महादरे तलाव पाणीपुरवठा योजना**

हा तलाव छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी घडीव दगडांनी बांधला आहे. तो यवतेश्वराच्या पायथ्याशी आहे. या तलावात यवतेश्वर डोंगरातून येणारे सर्व पाणी अडविले गेले आहे. या तलावातून सातारा शहरात पाईपद्वारे पाणी आणले जाते. हे पाणी शुद्ध करून टाकीमध्ये सोडले आहे. अशाप्रकारे या तलावातून सातारा शहरास दररोज ३ लाख लिटर पाणी पुरवठा केला जातो.[२४]

अशाप्रकारे सातारा शहरास वरील योजनेतून दररोज पाणीपुरवठा केला जातो. यासाठी नगरपालिकेने चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केल्याचे दिसून येते. नगरपालिका हद्दीत या पाण्याचे साठवण करण्यासाठी नगरपालिकेने एकूण ११ पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत. पाण्याचे समान व्यवस्थापन करण्याची व्यवस्था ही नगरपालिकेने केलेली आहे.

## ६.१८ शाहू स्टेडियम

महाराष्ट्र शासनाने ठराव नं.एलसीक्युपीएचई १०६८/९८६४८ सी. २८ जून १९६९ ठराव नं.पीएलजी १०७१/६९९९६ सी. ६ डिसेंबर १९७१ व ठराव नं पीएलजी १०७२/१८०४२ सी. २२ मार्च १९७२ अन्वये जाहीर केलेल्या धोरणानुसार प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी स्टेडियम बांधण्याचे जाहिर केले. त्यासाठी शासन दोन लाख रूपये अनुदान देणार व नगरपालिकांनी दोन लाख रूपये जमा करुन देणे. सदर कामासाठी शासनाने पहिला हप्ता पन्नास हजार रूपये ग्रँट म्हणून सातारा नगरपालिकेस मंजूर केले. सदरचे स्टेडियम बांधण्यासाठी हजेरीमाळ रविवार पेठ सिसनं.१७८(क) पैकी १२ एकर जागेची मागणी नगरपालिकेने शासनाकडे केली.

स्टेडियम बांधकामासाठी नगरपालिकेने ठराव करून ६८८२८५ = ०१ एवढया खर्चास मंजुरी दिली. बांधकामासाठी स्टेडियम कमेटी स्थापन करण्यात आली होती. या कमिटीने

आणखी जास्तीचे काम करण्यासाठी २,९८,००० रूपये ची मागणी केली. त्यास नगरपालिकेने ठराव करून मंजुरी दिली.[२५]

नगरपलिकेने बांधलेल्या स्टेडियमला 'छत्रपती शाहू स्टेडियम' असे नाव देण्यात आले आहे. पुढे स्टेडियमच्या भोवती प्रेक्षागृह गॅलरी व व्यावसायिक गाळे बांधण्यासाठी १,४०,७९,८५१ रूपयाचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे.[२६]

सातारा शहरातील खेळाडूना एका जागेवर सर्व क्रीडाप्रकारांचा सराव करता यावा. त्याला उत्तम मार्गदर्शकाचे मार्गदर्शन लाभावे म्हणून क्रीडा संकुलाचा उपयोग मोठया प्रमाणावर झालेला आहे. हे स्टेडियम सातारा शहरातील मुख्य बस स्थानकाजवळ असून तेथे विविध प्रकारच्या खेळांचे सामने भरविले जातात. या क्रीडा संकुलात ४०० मीटर लांबीचा रनिंग ट्रॅक, क्रिकेट, व्हॉलीबॉल, हॉकी, कबड्डी, बास्केट बॉल, ओपन व इनडोअर टेबल टेनिस कोर्ट, बॅडमिंटन, बुद्धीबळ व कॅरम अशा विविध क्रीडा प्रकारांकरिता हे क्रिडा संकुल वापरात येते. या क्रीडा संकुलाची पुन:उभारणी व्हावी या उद्देश्याने सातारा नगरपालिकेने एक आराखडा तयार केला. त्यानुसार सर्व खेळांचे मैदान, पोहण्याचा तलाव अशा स्वरूपाच्या मूलभूत सुविधांच्यासह १५० खेळाडूंच्या वास्तव्यासाठी वसतिगृह तसेच क्रीडा संकुलामध्ये प्रेक्षकांकरिता बसावयास गॅलरी व या गॅलरीखाली व्यापारी संकुल निर्माण केले.

## ६.१९ शाहू कला मंदीर

सातारा शहरातील कलाकारांसाठी खुले नाटयगृह होते. तेव्हा बंदिस्त नाटयगृह असावे यासाठी नगरपालिकेमार्फत मोठया प्रमाणावर प्रयत्न सुरू झाला. या नाटयकलेस सातारचे छत्रपती घराणे आश्रय देत होते तसेच आर्थिक मदतही करीत असे. तेव्हा बंदिस्त नाटयगृह व्हावे ही नागरिकांची मागणी पाहून सातारा नगरपालिकेने त्याची उभारणी करण्याचे ठरविले. त्या नाटयगृहाचे बांधकाम करण्यासाठी तीस हजार रूपयाचे अंदाजपत्रक सन १९५५ मध्ये मंजूर करण्यात आले होते. सन १९८२ मध्ये हे नाटयगृह बंदिस्त करण्यासाठी नगरपालिकेने ठराव केला. त्यासाठी तत्कालीन प्रशासकाने ६२५८५५=०७ रूपये मंजूर केले होते. मात्र संपूर्ण नाटयगृहाचे बांधकाम करण्यासाठी एकूण ६३९५५३=३० रूपये खर्च आला.[२७]

पुढे या नाटयगृहास ‘श्री.शाहू कला मंदिर’ असे नाव देण्यात आले. त्या मंदिरात बसण्यासाठी ९७२ खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या कला मंदिराच्या उभारणीसाठी नगरपालिकेचे प्रशासक डी. एन. वैद्य व त्यांचे सहकारी राजोपाध्ये, ढेकणे, महाडीक व बोराडे यांनी नगरपालिकेस सदैव मदत केली. त्यातूनच हे मंदिर उभे राहिले. ते नाटयगृह जुन्या राजवाडयाच्या पाठीमागील बाजूस आहे. तेथे कार्यक्रम मोठया प्रमाणावर साजरे केले जातात.

## ६.२० स्मृती स्थळे

सातारा शहरास मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. सातारा शहरातील विविध स्मृतीस्थळे ही शहराची भूषणे आहेत. या स्थळांचे जतन करणे व शुशोभिकरण करणे हे नगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. या स्मृतीस्थळांमध्ये चारभिंती, फाशीचा वड, हुतात्मा स्मारक, छत्रीचा हौद, आर्थर बाग, आर्थर सभागृह व फ्रेअर अन्नछत्र इत्यादीचा समावेश होतो.

### १) चारभिंती–

चार भिंतीचे ठिकाण छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी बांधले असून ते अजिंक्यतारा किल्ल्याच्या पूर्वेकडील टेकडीवर आहे. प्रारंभी या इमारतीचा वापर टेहळणीसाठी केला जात असे. पुढे या भिंतीचा वापर राजघराण्यातील स्त्रिया दसऱ्याची मिरवणूक पाहण्यासाठी करीत असत.[२८] इ.स.१८५७ च्या उठावात ब्रिटिशांनी तोफा डागून ही इमारत नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी या इमारतीचे छप्पर उडविले त्यामुळे या चारभिंती उरल्या आहेत. इ.स.१८५७ च्या इंग्रजाविरूद्ध झालेल्या उठावाच्या शताब्दिनिमित्त सन १९५७ मध्ये या ठिकाणी स्मारकस्तंभ उभारण्यात आला आहे. स्तंभाच्या डाव्या बाजूवर सन १८५७ च्या उठावातील हिंदुस्थानचा नकाशा व भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील ठळक घटना दिल्या आहेत.[२९]

या स्मारकाच्यांमध्ये चौकोनी स्तंभ असून त्याच्या दक्षिणेकडील बाजूवर झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा भिंतींत अर्धपुतळा बसविलेला असून त्याखाली त्यांचे चरित्र लिहिलेले आहे. भिंतीच्या उत्तरेकडील बाजूवर प्रतापसिंह महाराजांचे वकील रंगो बापूजी गुप्ते यांचा अर्ध पुतळा असून त्याखाली त्यांच्या कामगिरीचे वर्णन केले आहे. [३०] सन १८५७ च्या लढयात सातारा परिसरात ज्यांनी मोठे योगदान दिले होते. त्यांची कोरीव चित्रे असणारा स्मृतीस्तंभ उभारण्यात आलेला होता. काळाच्या ओघात ही ऐतिहासिक वास्तू व ऐतिहासिक महापुरूषांची

चित्रे असणारा स्मृतीस्तंभ दुर्लक्षित अवस्थेत गेला. या चारभिंती येथील स्मृतीस्तंभांचे जतन व्हावे म्हणून सातारा नगरपालिकेने या स्थळांचा विकास केला आहे. या स्तंभाभोवती मजबूत पायऱ्या व आकर्षक स्तंभ व ऐतिहासिक वास्तुचे नुतनीकरण व विद्युतीकरण करण्यासाठी १० लाख रूपये खर्च केले आहेत.[३१]

**२) फाशीचा वड–**

सातारा शहरात शाहुपुरी रस्त्यावर गेंडामाळावर स्वातंत्र्य लढयातील घटनांचा साक्षीदार म्हणून एक स्तंभ उभारला आहे. तो फाशीचा वड म्हणून ओळखला जातो. ब्रिटिशांनी ८ सप्टेंबर १८५७ रोजी झालेल्या उठावात सातारा येथील १७ शूरवीरांना वडाच्या झाडाला दोर लावून त्यांना फासावर चढविले. त्यातील काही जणांना तोफेच्या तोंडी, तर काहींना गोळया घालून ठार मारण्यात आले. त्यावेळी पाच जणांना फाशी देण्यात आले. त्यात सीताराम गुप्ते, विठ्ठल वाकनीस, केशव चित्रे, नारायण पावसकर आणि शिवराम कुलकर्णी यांचा समावेश होता. या लोकांना फाशी दिलेला जुना वड कोसळल्यानंतर तेथे नवीन वड लावण्यात आला. तसेच तेथे एक स्तंभ उभारण्यात आला आहे.हा स्तंभ उभारण्यासाठी नगरपालिकेने योगदान दिलेले दिसून येते. एवढेच नव्हे तर त्याची देखभाल ही नगरपालिकेमार्फत केली जाते.[३२]

**३)छत्रीचा हौद**

सन १८६५ च्या काळात जे.आर.ऑर्थर हे साताऱ्याचे कलेक्टर होते. त्यांनी लोकोपयोगी कामे केल्यामुळे साताऱ्यातील लोकांनी त्याची वास्तु मोती चौकात उभारली होती. त्या वास्तुची दुरूस्ती व रंगरांगोटीसाठी नगरपालिकेने सन १९८४ मध्ये २५०० रू. मंजूर केले होते.[३३]

**४) हुतात्मा स्मारक**

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत ज्या लोकांनी भाग घेऊन आपले प्राण गमाविले त्यांचे स्मारक रविवार पेठेत उभारण्यात आले होते. ते स्मारक महाराष्ट्र शासनाने ३ एकर ३६ गुंठे जागेसह पत्र क्र. हुतात्मा स्मारक १०८२/१२३ २० जून १९८३ नुसार १८ मार्च १९८४ रोजी सातारा नगरपालिकेच्या ताब्यात दिले.[३४]

याशिवाय ऑर्थर यांच्या स्मरणार्थ लोकांनी आर्थर हॉल हा सार्वजनिक समारंभासाठी बांधला. त्याला आज पाठक हॉल असे म्हणतात. तसेच राजवाडयासमोर ऑर्थरचे स्मारक

म्हणून ऑर्थर बाग सन १९०८ साली निर्माण करण्यात आली होती. त्या बागेस सन १९४६ मध्ये जवाहर बाग असे नाव देण्यात आले होते. फ्रेअर हे साताऱ्याचे सन १९४८–४९ च्या काळात रेसिडेंट होते. त्यांनी साताऱ्याचा कारभार चांगला करून लोकांची मने जिंकली होती. त्यामुळे सातारा शहरातील लोकांनी स्मारक म्हणून त्यांचे नावे अन्नछत्र सुरू केले होते. रविवार पेठेतील या अन्नछत्रातून भिकाऱ्यांना आठवडयातून दोन वेळा मोफत धान्य वाटप केले जात असे.[३५]

## ६.२१ उद्याने

सातारा शहरात एकूण १२ उद्याने आहेत. ही सर्व उद्याने शहरातील लोकांना आरोग्य, मनोरंजन व विरंगुळयासाठी बांधण्यात आलेली आहेत. दिवसभर श्रम करणारे कामगार, नोकरदार वर्ग, व्यापारी व शाळेतील लहान व मोठी मुले यांना नवचैतन्य उत्पन्न व्हावे यादृष्टीने उद्यानाचा वापर होत असे. या उद्यानांमुळे वातावरणातील हवा प्रदूषण मुक्त होत असे. अशा या उद्यानाची देखभाल व निगा राखण्याचे महत्त्वाचे कार्य सातारा नगरपालिकेने केले आहे. त्या सर्व उद्यानाची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १) श्रीमंत छत्रपती शाहू उद्यान

सातारा शहराची स्थापना करणारे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज पहिले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे उद्यान निर्माण केले आहे. या उद्यानात लहान मुलांना खेळण्यासाठी वेगवेगळया प्रकारची २४ खेळणी बसविली गेली आहेत. तसेच रंगीबेरंगी कारंजाची निर्मिती केली गेलेली आहे. या उद्यानात कंपाऊंडच्या कडेने ५०० मीटर लांबीचा एक रस्ता तयार करण्यात आलेला आहे. त्याचा उपयोग लोकांना खास फिरण्यासाठी केला जातो. या उद्यानात विविध प्रकारची फुलझाडे व इतर वृक्ष लावलेले आहेत. या उद्यानाच्या नुतनीकरणासाठी नगरपालिकेने ५४ लक्ष रूपये खर्च केले आहेत. या उद्यानाच्या देखभालीसाठी नोकरवर्ग ठेवलेला आहे.[३६]

### २) श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह उद्यान

सातारा शहरात जुन्या राजवाडयाजवळ व नव्या राजवाडयासमोर छत्रपती प्रतापसिंह महाराज(थोरले) यांच्या नावाने उद्यान उभारलेले आहे. या उद्यानात लहान मुलांच्याकरिता खेळणी व मिनी रेल्वे बनविलेली आहे. त्यामुळे उद्यानाची शोभा वाढलेली आहे. याशिवाय या उद्यानात वेगवेगळया प्रकारची फुलझाडे व निरनिराळया जातीची झाडे लावलेली आहेत. हे

उद्यान विकसित करण्यासाठी नगरपालिकेने ३ लक्ष ५० हजार रूपये खर्च केले आहेत.[३७]

### ३) यशवंत उद्यान

या उद्यानाची निर्मिती सातारा नगरपालिकेच्या समोर करण्यात आलेली आहे. या उद्यानात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आलेला आहे. याशिवाय या उद्यानात लहान वाचनालय उभारण्यात आलेले आहे. येथेही वृक्ष, फुलझाडे लावण्यात आलेली असून लहान मुलांची खेळणीही ठेवलेली आहे. हे उद्यान बांधण्यासाठी ३ लाख ५४ हजार रूपये खर्च झालेला आहे.[३८]

### ४) जवाहर बाग

ही बाग सातारा शहराच्या मध्यभागी बनविण्यात आलेले आहे. या बागेत एक शिलालेख कोरलेला असून त्यावर सन १८५७च्या उठावात हुतात्मा झालेल्या वीरांची नावे कोरलेली आहेत. याशिवाय श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज(थोरले) यांचा पुर्णाकृती पुतळा बसविलेला आहे. या उद्यानात ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी व बसण्यासाठी कट्टे बनविलेले आहेत. त्यामुळे या उद्यानास नाना–नानी पार्क असे संबोधले जाते. या उद्यानाच्या नुतनीकरणासाठी नगरपालिकेने १ लक्ष रूपये खर्च केले होते.[३९]

### ५) हुतात्मा उद्यान

इ.स.१८५७ च्या उठावात सहभाग घेतलेल्या क्रांतिकारकांना ब्रिटिशांनी पकडून सातारा शहरातील गेंडामाळ येथे ८ सप्टेंबर १८५७ रोजी काहींना फाशी दिले व काहींना तोफेच्या साहाय्याने ठार केले. या क्रांतिकारकांची आठवण सतत तेवत राहावी यासाठी सातारा नगरपालिकेमार्फत याठिकाणी ८ एकर जागेवर हे उद्यान उभारण्यात आलेले आहे. या उद्यानात फुलझाडे व वेगवेगळया जातीची वृक्ष आहेत. तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी साधने ठेवण्यात आलेली आहेत. येथे वॉटर पार्कही उभारण्यात आलेला आहे. या उद्यानासाठी ३ लक्ष ५० हजार रूपये खर्च करण्यात आलेला आहे.[४०]

### ६) श्री शिवसमर्थ उद्यान

सातारा शहरातील मंगळवार पेठेत हे उद्यान विकसित केले आहे. या उद्यानामध्ये लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व नागरिक यांच्या विरंगुळयासाठी चांगली सोय करण्यात आलेली

आहे. या उद्यानास चांगल्या पद्धतीचे संरक्षक कुंपण व दिवाबत्तीची सोय केलेली आहे. या उद्यानासाठी २ लाख ५९ हजार रूपये खर्च झालेला आहे.

**७) राजमाता सुमित्राराजे उद्यान**

सातारा शहरात सदर बजार या ठिकाणी हे उद्यान बनविण्यात आलेले आहे. या उद्यानात लहान मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारची खेळणी ठेवलेली आहेत. विविध फुलझाडे व विविध वृक्ष लावून हे उद्यान सुशोभित केले आहे. या उद्यानाच्या शेजारी मारूतीचे मंदीर आहे. या उद्यानासाठी नगरपालिकेने मोठया प्रमाणावर आर्थिक खर्च करून देखभाल व सुशोभित केले आहे. [४१]

अशा प्रकारे सातारा शहरात नगरपालिकेने जिथे जिथे मोकळी जागा मिळेल त्या ठिकाणी उद्यानाची निर्मिती केली आहे आणि त्याचे चांगल्या पद्धतीने सुशोभित करून शहाराचे आकर्षण वाढविले आहे. तसेच या उद्यानाच्या देखभालीसाठी कर्मचारी नेमून दिले आहेत. त्यामुळे या उद्यानाचे संरक्षण होतेच. परंतु लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांचा वापर होतो.

## ६.२२ शहरातील तळयांची स्वच्छता

सातारा शहरातील तळी ही छत्रपती शाहू महाराजांच्या काळापासून निर्माण केलेली आहेत. तेव्हा या तळयाद्वारे शहरातील लोकांना नित्य वापरासाठी पाण्याचा वापर केला जात असे. तेव्हा ही तळी गाळ काढून स्वच्छ करण्याचे महत्त्वाचे कार्य सातारा नगरपालिकेने केलेले दिसून येते.

**तलाव व तळी**

**१) महादरे तलाव, मंगळवार तळे व हत्ती तलाव**

श्री.छत्रपती शाहू महाराज यांनी अंजिक्यतारा किल्ल्यावरून लोकांची वस्ती पायथ्याला केली. त्यातून सातारा शहराची निर्मिती झाली. या सातारा शहराचा विकास छत्रपती शाहू महाराजांच्या काळात मोठया प्रमाणावर होत गेला. स्वतः छत्रपती .शाहू महाराजांनी विविध पेठांची निर्मिती केली. या वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा व्हावा या हेतुने तळयांची निर्मिती केली. या तळयामध्ये महादरे तलाव, मंगळवार तळे व हत्ती तलाव यांचा समावेश होतो. यवतेश्वराच्या डोंगरावरील दऱ्याचे पाणी एकत्रित येऊन ते साठविण्यासाठी महादरे तलावाची निर्मिती केली होती. महादरे तलावातून पाणी मंगळवार तळयात सोडले आहे. ही तळी सातारा

शहरात आपले अस्तित्त्व टिकवून आहेत. एवढेच नव्हे तर महादरे तलावातून शहरास पाणीपुरवठा केला जातो. तेव्हा या तळ्याची स्वच्छता राखण्यासाठी सातारा नगरपालिकेमार्फत साफसफाई केली जाते. यात महादरे तलाव व मंगळवार तळे या दोन्हीवर जलशुद्धीकरणाचा प्रकल्प राबविला गेला आहे. व हत्ती तलावातून पाईपलाईन करून पाणीपुरवठा केला आहे. अशा प्रकारे सातारा शहरातील सर्व तळयाची स्वच्छता व निगा राखण्याचे महत्त्वाचे कार्य सातारा नगरपालिकेने केले आहे.[४२]

### २) मोती तळे

हे तळे सातारा शहरातील शुक्रवार पेठेत आहे. या तळयात परंपरेने गणपती विसर्जन केले जाते. त्यामुळे या तळयात दरवर्षी प्रदूषण होऊन तेथे माती, प्लॅस्टर ऑफ पॅरिस, व विविध रसायने यांचे प्रमाण वाढले आहे. एवढेच नव्हेतर त्या तळयातील पाण्यास दुर्गंधी सुटलेली आहे. तेव्हा सातारा नगरपालिकेने या तळयाचे संरक्षण व्हावे, गाळ काढणे, तळयाच्या भोवताली कुंपण घालणे यासाठी ४ लाख रूपये खर्च केले आहेत.[४३]

## ६.२३ वाचनालयाची सोय

सातारा शहरात प्रतापसिंह महाराजांनी स्वत:चे ग्रंथालय सुरू केले होते. पुढे सन १८४९ मध्ये श्रीमंत आप्पासाहेबांच्या पत्नी राणी सगुणाबाई यांनी ते जनतेच्या स्वाधीन केले. सन १८५२ मध्ये सातारा शहरात 'सातारा सिटी लायब्ररी' व 'सातारा स्टेशन लायब्ररी' अशी दोन ग्रंथालये होती. ती वरील संस्थेत सन १८५३ मध्ये विलीन करण्यात आली. सन १९०५ मध्ये वाचनालयाची नवीन इनारत झाल्यावर त्याचे नाव 'व्हिक्टोरिया लायब्ररी' ठेवण्यात आले. सन १९३८ च्या डिसेंबर मध्ये या वाचनालयात मराठी, हिंदी व इंग्रजी भाषंची मिळून एकूण १८ दैनिके, २९ साप्ताहिके, नऊ पाक्षिके, ७८ मासिके व एक संस्कृत त्रैमासिक वाचकांसाठी ठेवण्यात येई. या ग्रंथालयात त्या वर्षी विविध विषयातील ३९,६९६ ग्रंथ होते. वाचनालयाच्या साखळी योजनेमार्फत जिल्हयातील तालुका व इतर ग्रामीण ग्रंथालयांना ग्रंथ वाचनासाठी दिले जातात. सध्या या योजनेचा लाभ एकूण १६ ग्रंथालये घेत आहेत. या ग्रंथालयाची सदस्य संख्या १,२३३ आहे. हे ग्रंथालय जिल्हयातील सर्वात जुने ग्रंथालय आहे. त्यास जिल्हा ग्रंथालयाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. अशा या ग्रंथालयास सातारा नगरपालिकेने आर्थिक सहकार्य दिले आहे. सातारा नगरपालिकेने आपले स्वतःचे कोणतेही वाचनालय निर्माण केले

नाही परंतु सातारा शहरात सुरू असलेली नगरवाचनालयास बरेच वर्षापासून नगरपालिकेकडून सालिना शंभर रूपये मदत दिली जाते.

## ६.२४ जनावरांच्या दवाखान्याची सोय

सातारा नगरपालिकेचा स्वतःचा दवाखाना नाही. येथे जिल्हा लोकल बोर्डाकडून एक दवाखाना चालविला जात आहे. तेथे शहरातील व बाहेरील जनावरांना औषधोपचार केला जातो. या दवाखान्यासाठी शहरातील जनावरांना केल्या जाणाऱ्या औषधोपचारांची नगरपालिकेकडून जिल्हा लोकल बोर्डाला मदत दिली जाते.

## ६.२५ अंत्यसंस्कार

शहरातील सर्व हिंदू जमातीतील मृतकांना अंत्य संस्कारासाठी, कृष्णा नदीचे काठी माहुली येथे नेण्यात येते. सातारा शहरापासून हे अंतर ५ कि.मी. आहे. इतक्या लांब अंतरावर मृतकांना वाहून नेणे फारच त्रासाचे होऊ लागले. म्हणून स्थानिक मंडळींनी अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ स्थापन करून त्यामार्फत एक मोटार यासाठी ठेवली आहे. त्यामुळे लोकांची या बाबतची फार मोठी गैरसोय दूर झाली आहे. यासाठी त्यांनी ठेवलेला दर माफक आहे. गोरगरिबांना ती मोफत दिली जाते. या संस्थेस सातारा नगरपालिकेकडून वर्षाला ७५० रूपये मदत म्हणून त्या काळात दिले जात होते.[४४]

## ६.२६ झाडे लावणे–

सातारा शहरात नगरपालिकेने झाडे लावून त्याचे संवर्धन केले आहे. झाडे लावण्याची मोहीम सरकारने सुरु केल्यापासून ही नगरपालिका त्यामध्ये सहभागी झालेली आहे. पूर्वीपासून नगरपालिकेने बरीच झाडे रस्त्याच्या कडेने लावलेली आहेत. या झाडांची अडचण इलेक्ट्रिक तारांना होऊ लागल्याने काही झाडे तोडली आहेत. तरीही नवीन झाडे लावण्याचा उपक्रम नगरपालिकेने हाती घेऊन एक कौतुकास्पद कार्य हाती घेतले आहे.

## ६.२७ आग विझवणे व रस्त्यावर पाणी शिंपडणे–

आग विझविण्यासाठी प्रारंभी नगरपालिकेने ४ ते ५ हातबंब ठेवले होते. परंतु सन १९४० मध्ये नगरपालिकेने यासाठी एक मोटार विकत घेतली आहे. यावर ५०० गॅलन पाण्याची टाकी सदैव भरून ठेवलेली असते. ही मोटार वाटेल त्यावेळी मिळावी म्हणून तिच्यावरील ड्रायव्हरला राहणेसाठी नगरपालिकेने जागा दिली आहे. निव्वळ आग विझविण्याचे काम सदैव

नसते. म्हणून या मोटारीवरच रस्त्यावर पाणी शिंपडण्याचे साधनाची सोय केली आहे. त्यामुळे दररोज मुख्य रस्त्यावर पाणी शिंपडण्याचे काम सकाळ– संध्याकाळ करण्यात येते. रस्त्यावर पाणी शिंपडल्यामुळे धुळीचा उपसर्ग कमी होतो व रस्तेही चांगले स्वच्छ राहतात.[४५]

## ६.२८ महिला व बालकल्याण समितीमार्फत नियोजित कामे

सातारा नगरपालिकेने महिला व बालकल्याणासाठी पुढील कार्यक्रम राबविले आहेत.

१) नेहरू रोजगार योजनेअंतर्गत महिलासाठी रोजगार उपलब्ध करून देणे.

२) सातारा नगरपालिकेमार्फत पुज्य कस्तुरबा प्रसुतिगृह चालविले जाते.

३) लहान मुलांसाठी सकस अन्नपुरवठा केला जातो.

४) समितीमार्फत बालवाडया(शिशुवर्ग) चालविले जातात.

५) माता व बाल संगोपनाबाबत लोकजागृती व लोकशिक्षण केले जाते.

६) बालकांच्या लसीकरणाबाबत शिबिरे व चर्चासत्रे घेतली जातात.

७) प्रौढ शिक्षण साक्षरता मोहिम राबविली जाते.

८) गलिच्छ वस्ती व झोपडपट्टीमध्ये आरोग्य व स्वच्छतेबाबत जागृती केली जाते.

## ६.२९ मागासवर्गीय व विशेष कल्याण समितीमार्फत नियोजित कामे

सातारा नगरपालिका सातारा यांनी मागासवर्गीय व विशेष कल्याण समितीची स्थापना करून खालील प्रमाणे दुर्बल घटकांसाठी कार्यक्रम राबविले आहेत.

१) मागासवर्गीय वसाहतीमध्ये उद्याने, बगीचे, धर्मशाळा, सार्वजनिक हॉल व समाज मंदीर इत्यादी ची सोय केली जाते.

२) मागासवर्गीय वसाहतीमध्ये शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालोद्यान, क्रीडांगण, ग्रंथालये इत्यादी सोयी केल्या.

३) मागासवर्गीयांसाठी वैद्यकीय सोयी उपलब्ध करून दिल्या.

४) मागासवर्गीय घटकातील प्राथमिक शाळेतील हुशार मुलांना शिष्यवृत्ती, मोफत पुस्तके, लेखन साहित्य, गणवेश इत्यादी साहित्य पुरविले जाते.

५) मागासवर्गीय सफाई कामगारांसाठी घरे बांधून ती नाममात्र भाडयाने दिली.

६) मागासवर्गीय वसाहतीमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या.

७) डोक्यावरून मैला नेण्याची पद्धत बंद करून त्यासाठी गाडयांची व्यवस्था केली.[४६]

या विभागातील कामकाज अधिक कार्यक्षमतेने केले जाते. यातूनच नगरपालिकेचा विकास झालेला दिसून येतो.

## ६.३० नगरपालिकेची विविध खात्यामार्फत शहर सुधारणेसाठी दिलेले योगदान

नगरपालिकेत अध्यक्ष, उपाध्यक्ष व समित्या आणि त्यांचे सभापती यांची निवड केली जाते. या समित्यांमध्ये खालील समित्यांचा समावेश होतो. आस्थापना विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, आरोग्य समिती, जलनि:स्सारण समिती, जकात विभाग, नगदी खाते, विद्युत विभाग, दप्तरखाना, कर विभाग, अन्न भेसळ प्रतिबंधक विभाग, वृक्ष व संवर्धन विभाग, आग प्रतिबंधक विभाग, नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, दुकान विभाग, भांडार विभाग, नियोजन व विकास समिती, महिला व बालकल्याण समिती, मागासवर्गीय व विशेष कल्याण समिती या सर्व समितींच्यामार्फत नगरपालिकेचा प्रशासकीय कारभार चालविला जातो.[४७]

## ६.३१ समारोप–

सातारा नगरपालिकेच्या स्थापनेवेळी सातारा शहर सदर बाजार व गडकरी आळी यांचा समावेश होता. सन १८७७ मध्ये त्यात करंजे व गोडोली या गावांचा समावेश केला गेला. व पाच चौरस मैलाचे क्षेत्र तयार केले गेले. सातारा शहराचे कमिशनर अध्यक्ष व इतर पाच सरकार नियुक्त सभासद यांचे एक बोर्ड तयार केले. व नागरिकांच्या सुखसोयीसाठी अनेक कामे नगरपालिकेने हाती घेतली व ती पुर्णत्वास नेली. सातारा नगरपालिकेचा ही पहिली पन्नास वर्षे जरी सरकारी अमलाखाली कारभार चाललेला होता तरी जनतेच्या हिताच्या दृष्टीने फार मोठी कामगिरी त्या काळात झाली आहे. या काळात उत्पन्न मर्यादित असल्याने लोकोपयोगी कामेही संथ गतीनेच चाललेली होती. सातारा नगरपालिकेच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यामध्ये असामान्य कर्तृत्त्वशक्ती होती व त्यांच्या ठिकाणी स्वावलंबन व लोकहिताची तळमळ मोठया प्रमाणावर होती. जरी उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी असले तरी कार्य मात्र अलौकिक होते. विपुल पाणीपुरवठा, सार्वजनिक हौद, सार्वजनिक पाण्याच्या नळया, आग विझविण्याचे बंब, सार्वजनिक दिवे, रात्री संरक्षणासाठी ठिकठिकाणी बांधलेल्या पोलिस चौक्या व त्यातील दिवाबत्तीची सोय, रस्ते दुरुस्ती, सफाई, रस्त्यावरील पूल, उद्याने याबाबत नगरपालिकेने चांगले लक्ष घातलेले दिसून येते.

सातारा नगरपालिकेने स्वच्छतेसाठी सार्वजनिक शौचकूप, खाजगी शौचकूप, या शौचकुपांच्या स्वच्छतेसाठी भंगी, मैला वाहून नेण्यासाठी गाडया, कचरा व मैला यांचे खत तयार करण्याची व्यवस्था केली होती. आरोग्यविषयक सोयी–सुविधांमध्ये नगरपालिकेने देवी काढण्याची व्यवस्था, सिव्हील हॉस्पिटलमध्ये गोरगरिबांना औषधाची मोफत सोय केली होती. म्हणून या इमारतीच्या दुरूस्तीचा खर्च नगरपालिकेने करावयाचा होता. मंडईतील दुकानाची सोय, मटन मार्केट, मच्छी बाजार व कत्तलखान्याची सोय, जन्म व मृत्यूची व्यवस्था याचीही चांगल्या प्रकारे सोयी सुविधा केलेली होती. मराठी शाळा, रात्रीची शाळा, मुलामुलींची एकत्र शाळा, मुलींची शाळा, उर्दू शाळा अशा प्रकारे सर्वच क्षेत्रात सातारा नगरपालिकेने फार मोठे योगदान दिलेले होते.

प्रशासकीय इमारती, शॉपिंग सेंटर, समाज मंदिरे, मंडई, घरकुल योजना, झोपडपट्टी पुनर्वसन, रस्ते, पूल, फुटपाथ, स्ट्रीट लाईट, ट्राफीक सिग्नल, दवाखाने, आरोग्य सोयी, भुयारी गटार योजना, शिक्षण, पाणीपुरवठा योजना, शाहू स्टेडियम, शाहू कला मंदिर, स्मृती स्थळे, चारभिंती, फाशीचा वड, छत्रीचा हौद, हुतात्मा स्मारक उद्याने, श्रीमंत छत्रपती शाहू उद्यान, श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह उद्यान, यशवंत उद्यान, जवाहर बाग, हुतात्मा उद्यान, श्री. शिवसमर्थ उद्यान, राजमाता सुमित्राराजे उद्यान, वाचनालयाची सोय, जनावरांच्या दवाखान्याची सोय, अंत्यसंस्कार, झाडे लावणे, आग विझवणे व रस्त्यावर पाणी शिंपडणे इत्यादी कामे केली जात असत.

## संदर्भ


१) सातारा नगरपालिका प्रशासकीय ठराव नं.१३५, दि.१६ जुलै १९८१

२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विषय नं.२५, ठराव नं.५९८, दि.५ फेब्रुवारी १९९९, पृ.७७

३) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, १९८३ ते २०००, पृ.१७

४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विषय नं.४, ठराव नं.६१३, २० मार्च १९९९ पृ.१०३

५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.१०३३, २२ मार्च १९९१, पृ.२३

६) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विषय नं.३४, ठराव नं.३८६, १५ एप्रिल १९९८ पृ.५३

७) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.६२

८) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, ६ मार्च १९९४, पृ.१४८

९) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.६२

१०) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल जमाखर्च संबंधी वर्ष १९४९–५० ते २००३–०४

११) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, १९६० ते २००३

१२) सातारा नगरपालिका, प्रशासकीय ठराव नं.४५, दि.२३.०५.१९८२

१३) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.६१

१४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विषय नं.२६, ठराव नं.२६, दि.१८.०५. १९९१ पृ.५०

१५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.२६, ३ जानेवारी१९५३ पृ.३७६

१६) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.६०

१७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विषय नं.१, ठराव नं.२७, ५ जून १९६०, पृ.७५

१८) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.६४

१९) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.३७

२०) कित्ता, पृ.३८,३९

२१) संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान २००४–०५, पृ.९

२२) कित्ता, पृ.१०

२३) कित्ता, पृ.१०

२४) दै.सकाळ, १ जून २००७, मुखपृष्ठ

२५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, विषय नं.२२, ठराव नं.३५१, ३० मार्च १९७६, पृ.३६०

२६) कित्ता, पृ.३६१

२७) सातारा नगरपालिका प्रशासकीय ठराव नं.८३०, ३० मार्च १९८५

२८) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, २०११, पृ.१९

२९) लांजेकर रू.ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, १९९३ पृ.१५

३०) गायकवाड, हणमाने व सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, २०००, पृ.१३२

३१) सचिव(संपा.), नगर विकास आघाडी, सातारा 'आपला सातारा विकास आणि संकल्प', पृ.१५

३२) लांजेकर रू.ज., उपरोक्त, पृ.१५

३३) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.३००, ३०१

३४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.४२८, ३१ मार्च १९८४, पृ.३०

३५) कित्ता,पृ.३१

३६) सचिव(संपा.), उपरोक्त, पृ.११

३७) कित्ता, पृ.१२

३८) कित्ता, पृ.११

३९) कित्ता, पृ.१२

४०) कित्ता, पृ.१३

४१) कित्ता, पृ.१३

४२) सचिव(संपा.), उपरोक्त, पृ.२५

४३) मोने अशोक, लेख दै.ऐक्य, ८ एप्रिल २००४, पृ.११

४४) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.६०–६१

४५) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.६२–६३

४६) जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांचे २० जानेवारी २००१ चे वेतनश्रेणी बाबतचे पत्र.

४७) सातारा नगरपालिका, शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.६०–६६

## प्रकरण सातवे

# उपसंहार

साताऱ्याला प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास आहे. सातारा जिल्हयात विविध ठिकाणी सापडलेल्या अवशेषावरुन प्रागैतिहासिक मानवाचे अस्तित्व आढळते. सातारा परिसरावर प्राचीन काळात राष्ट्रकुट, बदामीचे चालुक्य व सातवाहन घराण्याची सत्ता होती. पुढे शिलाहार वंशीय राजा भोज द्वितीयने सातारा जिल्हयात अनेक किल्ल्यांचे बांधकाम केल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. यादव सत्तेच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतातील लहान–मोठी हिंदू राज्ये मुस्लिम आक्रमणास बळी पडली. तेव्हांपासून साताऱ्यावर बहामनीची सत्ता सुरु झाली. बहामनी राजवटीनंतर आदिलशाही सत्ता स्थापन झाली होती.

१७ व्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय झाला होता. छत्रपती शिवाजी महारांजानी सहिष्णुता आणि लोकोपयोगी, लोककल्याणाची कामे करुन स्वराज्याचा पाया रचला. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६५६ साली जावळी जिंकली. छत्रपती शिवाजी महाराज व अफजलखान यांची भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी झाली. या प्रसंगी १ नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखानास ठार केले. असे अनेक विजय छत्रपती शिवाजी महाराजांनी मिळविले.

छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजीराजे झाले. त्यांनीही औरंगजेब बादशहाच्या विरूद्ध लढा दिला. शेवटी कोल्हापूर प्रांतावर नेमणुकीस असणाऱ्या मुकर्रबखानास संभाजी राजांना संगमेश्वर येथे पकडण्यात यश मिळाले. सन १६८९ मध्ये छत्रपती संभाजी राजांना ठार करण्यात आले. छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर राजाराम महाराज गादीवर आले व त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी जिंजीस पाठविण्यात आले. छत्रपती राजाराम महाराजांचा सन १७०० साली मृत्यू झाला. त्यानंतर त्यांची पत्नी महाराणी ताराबाई हिने मराठा राज्याची सुत्रे हाती घेतली. तेव्हा औरंगजेब बादशहाचा सातारच्या किल्ल्याचा वेढा चालू होता. २२ एप्रिल १७०० रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला व छत्रसाल राठोड याची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली. पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ लढयानंतरही औरंगजेब मराठयांच्या राज्यावर ताबा मिळवू शकला नाही. शेवटी २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी तो मरण पावला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहुची सुटका झाली. त्यावेळी मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र सातारा हे होते. साताऱ्यातून राणी ताराबाई कारभार पहात होती. शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात यादवी युद्ध झाले. त्यात शाहूचा विजय झाला. छत्रपती शाहुची राजधानी प्रथम किल्ल्यावर होती. पुढे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर शाहूनगर नावाचे शहर त्याने इ. स. १७२०–२१ मध्ये वसविले. हेच आजचे सातारा होय. शाहूनगर येथे छत्रपती शाहू महाराजांनी राजधानीस शोभेल अशा वास्तुंचे बांधकाम केले. तसेच अनेक लोकोपयेगी कामे केली. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १७५० रोजी रामराजास समारंभपूर्वक राज्यारोहण करण्यात आले.

दुसऱ्या शाहुचा राज्याभिषेक ११ डिसेंबर १७७८ रोजी झाला. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी झाले. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. २५ सप्टेबर १८१९ च्या तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह राजांना मराठा गादी प्राप्त झाली. ब्रिटिशांनी प्रतापसिंहाना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज रेसिडेंट नियुक्त केला होता. व त्याच्या सहमतीने या राजांना या सातारा राज्यांचा राज्यकारभार पाहणे गरजेचे ठरवले होते. या योजनेनुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ साताऱ्याचा पहिला रेसिडेंट म्हणून कार्यरत झाला. त्याला सहाय्यक म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. छत्रपती प्रतापसिहांना ब्रिटिशांनी पदच्युत केले. त्यांच्या जागी त्यांचे बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना १८३९ मध्ये करार करून गादीवर बसविले.

श्रीमंत आप्पासाहेब यांना औरस संतती नसल्यामुळे दत्तक वारस नामंजूर करून १६ मे १८४९ रोजी सातारा येथे जाहीरनामा काढून त्यानुसार सातारा संस्थान खालसा केले. आपली राजवट स्थिर करण्याच्या धोरणानुसार इंग्रजांनी १८५० साली नगरपालिका अधिनियम (क्रमांक २६) अमलात आणला त्यानुसार १ ऑगस्ट १८५३ रोजी सातारा येथे टाऊन म्युनिसीपालिटी स्थापन झाली.

सातारा नगरपालिकेची स्थापना ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. कारण महाराष्ट्रातील जुनी नगरपालिका म्हणून सातारा नगरपालिकेस ओळखले जाते. या नगरपालिकेच्या स्थापनेमुळे सातारा शहरातील सर्व विकास कामास चालना मिळाली. नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर तिचा विकास होण्यासाठी निवडून आलेल्या लोकांनी चांगल्या पद्धतीने कार्य केले. त्यामुळे

अल्पकाळात सातारा नगरपालिकेचा विकास होण्यास मदत झाली. सातारा नगरपालिकेतील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कार्यामुळे नगरपालिकेचा विकास होण्यास मदत झाली. ही नगरपालिका केवळ प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामुळे नावारूपास आलेली आहे.

सातारा शहराच्या विकासासाठी सातारा नगरपालिकेचे प्रशासन कार्यक्षम होते. हे त्या नगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यावरून दिसून येते. सातारा शहराचा विकास हा नगरपालिकेच्या कार्यक्षम व निर्दोष प्रशासन यंत्रणेमुळे झालेला दिसून येतो. नगरपालिकेने सातारा शहरात केलेली लोकोपयोगी कामे त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य, शहर स्वच्छता, रस्ते, बांधकाम, पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा व  दिवाबत्ती सोय इत्यादी प्रशासन यंत्रणेकडून चांगल्या पद्धतीने केली आहेत. तसेच दुय्यम दर्जाची कामे ही प्रामुख्याने लोक प्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतात.

प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थाची कार्यपद्धती सुरू होती. मध्ययुगीन काळ हा स्थानिक स्वराज्य संस्थांना पोषक नव्हता. राज्याचा कारभार सुरळीत चालावा म्हणून नियुक्त केलेले अधिकारी हे राजसत्ता मोठी व्हावी म्हणून आपले सर्वस्व पणाला लावत असत. ब्रिटिश काळात भारतातील पारंपरिक स्थानिक शासन व्यवस्थेचा ऱ्हास होऊन ब्रिटिशांना अनुकूल अशा व्यवस्थेचा अंगीकार करण्यात आला. विशेषतः ब्रिटिशकालीन प्रयत्न हे प्रशासकीय सुविधेच्या दृष्टिकोनातून असले, तरी आधुनिक भारतीय स्थानिक स्वशासनाची मुहूर्तमेढ याच कालखंडात रोवली गेली.

महाराष्ट्रातील सर्वात जुनी नगरपालिका म्हणून सातारा नगरपालिकेस ओळखले जाते. या नगरपालिकेने केलेला विकास हा खऱ्या अर्थाने इतर नगरपालिकेस प्रेरणादायक ठरलेला आहे. नगरपालिकेच्या स्थापनेमुळे सातारा शहराचा सर्वांगीण विकास झाला. तसेच सातारा शहरातील सर्व विकास कामास चालना मिळाली. त्यामुळे जीवनमान सुधारले. नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर सन १८५३ ते २००३ या कालखंडात एकूण तीस निवडणुका झाल्या. १ जुलै १८६८ पासून मॅनेजिंग कमेटी नेमण्यास सुरुवात झाली. २७ ऑक्टोबर १८८४ रोजी जनरल बोर्डाची मिटिंग झाली त्यात सातारा शहरात एकूण ९ वार्ड पाडण्यात आले आणि त्यातून १२ सभासद निवडण्यास मान्यता देण्यात आली. सन १८८४ च्या म्युनिसिपालिटीच्या

कायद्यानुसार एकूण सभासदांच्या निम्मे सभासद नागरिकांमधून निवडून देण्याचा अधिकार जनतेस मिळाला. त्यानुसार २४ सप्टेबर १८८५ रोजी सातारा नगरपालिकेची पहिली निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने झाली.

सन १८८५–८६ मध्ये सातारा जिल्हयाचा कलेक्टर जे किंग हा नगरपालिकेचा पदसिद्ध अध्यक्ष होता. ४ जून १८८६ रोजी झालेल्या जनरल बोर्डाच्या सभेत प्रथमच भारतीय लोकांतून उपाध्यक्ष म्हणून गणेश पांडुरंग आगटे व मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन म्हणून काशिनाथ महादेव थत्ते यांची निवड करण्यात आली.दुसरी त्रैवार्षिक निवडणूक १३ मार्च १८८९ रोजी झाली. त्यात १२ सभासद थेट जनतेतून निवडले गेले व १२ सभासद सरकारने नियुक्त केले. ए.केसर साहेब कलेक्टर यांची अध्यक्ष म्हणून सरकारने नेमणूक केली. तर उपाध्यक्ष या पदावर गणेश पांडुरंग आगटे यांची निवड झाली. १८ वी निवडणूक १६ ऑक्टोबर १९३८ रोजी झाली. यावेळच्या निवडणुकींचे वैशिष्टय म्हणजे सर्वच्या सर्व उमेदवार लोकनियुक्त पद्धतीने निवडून आलेले होते. या निवडणूकीचे वैशिष्टय म्हणजे प्रथमच स्त्रियांसाठी १ व हजिनासाठी ३ जागा राखीव ठेवण्यात आल्या.महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ अन्वये नगरपालिकेच्या कारभारात आमुलाग्र बदल करण्यात आला. विषय समित्यांची संख्या ८ ऐवजी ११ सभासद निवडण्यास सुरूवात झाली. उपाध्यक्ष हा शिक्षण समितीचा पदसिद्ध सभापती करण्यात आला. स्वीकृत सदस्य घेण्याची पद्धत सुरू करण्यात आली. अशाप्रकारे निवडणुका होऊन सातारा नगरपालिकेचा विकास साधण्याचा प्रयत्न निवडून येणाऱ्या सभासदांनी केला. पुढे नगरपालिकेचा कारभार योग्य रितीने चालावा यासाठी विविध समित्यांची स्थापना केली गेली.

सातारा नगरपालिकेने प्रशासन यंत्रणा सुरळीत व सुनियंत्रित चालविण्यासाठी वेगवेगळया विभागांची निर्मिती केली. या विभागांमार्फत प्रशासकीय कामे चोखपणे पार पाडली जातात. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आरोग्यावर परिणाम करणाऱ्या गोष्टीचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न केले जातात. साथीच्या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी प्रयत्न केले जातात. एवढेच नव्हे तर साथीचे आजार होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते. शहरातील केरकचरा गोळा करून शहर स्वच्छतेविषयी दक्षता घेतली जाते. बांधकाम विभागामार्फत इमारतीचे बांधकाम केले जाते. रस्त्यावर दिवाबत्तीची सोय केली जाते. सांडपाण्याची व्यवस्था व स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जातो.

लोकांना अन्नधान्याची सोय व्हावी, यासाठी स्वस्त धान्य दुकानाची सोय केली आहे. सांस्कृतिक विकासामध्ये लोकांच्या मनोरंजनासाठी बागा, प्राणी संग्रहालय, पोहण्यासाठी तलाव, वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय इत्यादी गोष्टीचा समावेश केला आहे. ही सर्व कामे प्रशासकीय विभागामार्फत केली जातात.

नगरपालिकेची प्रशासकीय कामे ही कोणत्या पद्धतीने केली जातात त्यावर त्याचा विकास अवलंबून असते. नगरपालिकेकडील लोकनियुक्त प्रतिनिधींनी एखादा कायदा पास केला, एखादे नवीन धोरण ठरविले, नंतर त्या कायद्याची किंवा धोरणाची अंमलबजावणी करणेचा महत्त्वाचा प्रश्न नगरपालिका प्रशासनाचे कर्तव्य असते. नगरपालिकेत सर्वसाधारण सभेत अध्यक्ष, उपाध्यक्ष व समित्या आणि त्यांचे सभापती यांची निवड केली जाते. या समित्यामध्ये आस्थापना विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, आरोग्य समिती, जल:निस्सारण समिती, जकात विभाग, नगदी खाते, विद्युत विभाग,दप्तरखाना, कर विभाग, अन्न भेसळ प्रतिबंधक विभाग, वृक्ष व संवर्धन विभाग, आग प्रतिबंधक विभाग, नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, दुकान विभाग, भांडार विभाग, नियोजन व विकास समिती, महिला व बालकल्याण समिती, मागासवर्गीय व विशेष कल्याण समिती इत्यादी समितीचा समावेश होतो. वरील सर्व समितीच्यांमार्फत नगरपालिकेचा प्रशासकीय कारभार चालविला जातो. शहरातील विविध कामाची वर्गवारी करून खातेवार मंजुरीसाठी ती ती कामे त्या त्या समित्यांकडे जातात

सातारा नगरपालिकेची स्थापना १ ऑगस्ट १८५३ रोजी झाली. त्यावेळी नगरपालिकेचा कारभार पाहण्यासाठी कमिशनर, अध्यक्ष व शासन नियुक्त इतर पाच सदस्य अशा नेमणुका होऊन पहिले स्थानिक स्वराज्य बोर्ड अस्तित्त्वात आले. म्युनिसिपल कायद्याची अंमलबजावणी १ ऑगस्ट १८५३ पासून सुरू झाली. प्रथमतः कमिशनर व त्यानंतर कलेक्टर हे तिचे अध्यक्ष असत. त्याशिवाय डेप्युटी कलेक्टर, एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, सिव्हिल सर्जन, मामलेदार व फौजदार असे अधिकारी नगरपालिकेवर शासन नियुक्त सभासद होते. ही नगरपालिका १८७३ च्या म्युनिसिपल ॲक्ट ६ नुसार १८७५ मध्ये टाऊन मुनिसिपालिटी व मार्च १८८४ मध्ये सिटी म्युनिसिपालिटी झाली. स्थानिक स्वराज्य कायद्यात बदल झाल्यामुळे सन १८८५ पासून निवडणूका घेण्यात येऊ लागल्या. तथापि कलेक्टर अध्यक्ष व त्यांचे मदतीस बारा शासननियुक्त व बारा लोकनियुक्त असे २५ सभासदांचे बोर्ड अस्तित्त्वात आले. सन १८९०

पासून सदरबाजार भागातील लोकांना नागरी सुविधा देण्यासाठी सातारा सबर्बन म्युनिसिपालिटीची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये १२ सदस्य होते. १ नोव्हेंबर १९६१ रोजी सातारा सबर्बन नगरपालिकेचे सातारा नगरपालिकेत विलिनीकरण होऊन सभासदांची संख्या ४५ झाली.

नगरपालिका सभासदांसाठी सातारा नगरपालिकेची पहिली निवडणूक सन १८८५ साली झाली. त्या निवडणुकीत पदवीधर, उच्च दर्जाचे शासकीय अधिकारी व चार रूपयापेक्षा जास्त कर भरणारे नागरिक यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. सन १९०९ सालापासून नगरपालिकेस अध्यक्ष निवडण्याचा हक्क मिळाला होता. दुरूस्ती अधिनियम, सन १९९४ नुसार सातारा नगरपरिषदेत निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या ३४ असून लोकसंख्येच्या वाढीव निर्बंधामुळे सातारा नगरपालिका 'ब' वर्गात गणली जाते.

सातारा नगरपालिकेचे प्रशासन हे शहरातील विविध कामे पार पाडण्यासाठी नियोजनपूर्वक काम करीत असल्याचे दिसून येते. सातारा नगरपालिका ही १५० वर्षाची झाली पुढे ही नगरपालिका कार्यक्षम झाला. या नगरपालिकेतील सदस्यांची संख्या ३९ असून नामनिर्देशित सदस्य संख्या ४ आहे. विकेंद्रीकरणाच्या दृष्टीकोनातून टाकलेले पहिले पाऊल म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींच्या हस्ते लोकशाही मार्गाने सत्ता सोपवून स्थानिक पातळीवरील प्रश्न लोकप्रतिनिधीच्यांमार्फत सोडविण्याकरिता नगरपालिकेची स्थापना झालेली असली, तरी या नगरपालिकेतील प्रशासनाने केलेली कामगिरी ही अतिशय चांगली आहे. कारण नगरपालिका स्थापनेवेळी तिचे वार्षिक उत्पन्न हे ११००० रूपये इतके होते तर सन २००२-०३ या वर्षातील तिचे वार्षिक उत्पन्न १७ कोटी ५७ लाखांपर्यंत वाढलेले आहे. यावरून सातारा नगरपालिकेची झालेली प्रगती दिसून येते. वास्तविक हे उत्पन्न खर्चापेक्षा जास्त आहे. यावरून सातारा नगरपालिका ही आर्थिकदृष्टया सक्षम असली तरी पायाभूत क्षेत्राचा विचार करता रस्ते, पाणी, सांडपाणी, घनकचरा आणि वीज या सर्व सेवा लोकसंख्या प्रमाणात अपुऱ्या वाटतात. त्यावर जास्त खर्च होणे अपेक्षित आहे.

शिक्षणाने मानवाच्या जीवनाचा सर्वांगिण विकास होतो. मानवी जीवन परिपूर्ण व्हावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे शिक्षण हा घटक मानवी जीवनाचे प्रमुख अंग

बनून राहिले होते. शिक्षण हे एक साधन असून अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा प्रमुख मार्ग आहे. शिक्षणामुळे मनुष्य चारिज्यवान बनतो. मनुष्याच्या जीवनाचे पालनपोषण, संवर्धन व विकास शिक्षणामुळे होतो. महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षणाला तिसरा डोळा असे म्हटले आहे. शिक्षण माणसाच्या जीवनाचा कणा आहे असे त्यांचे मत होते. शरीराला ज्याप्रमाणे पाठीच्या कण्याची आवश्यकता ताठ उभे राहण्यासाठी आहे त्याप्रमाणे जीवनात सन्मानाने जगण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे, म्हणूनच फुले यांनी समाजाला शिक्षण देऊन समाजाचे सर्व बाजूंनी परिवर्तन केले. महात्मा फुले, न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे व कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या शिक्षण सुधारकांनी आपल्या कार्यातून शिक्षणाचा प्रसार घडवून आणला. त्यातूनच सातारा नगरपरिषदेने शिक्षणाची गरज लक्षात घेऊन त्या क्षेत्रात महत्त्वाची पावले उचलली व शिक्षणाचा विकास घडवून आणला.

सातारा शहराची शैक्षणिक विकासाची परंपरा फार जुनी आहे. मध्ययुगात या ठिकाणी शिक्षणाची पद्धत ही जुन्या पद्धतीची होती. संस्कृत पाठशाळांमध्ये संस्कृत भाषा, व्याकरण व काव्यशास्त्र हे विषय शिकवले जात असत. हे शिक्षण पंतोजीच्या हातात असे. राजघराण्यातील पुरूषांना युद्धविषयक शिक्षणाची माहिती देत. मराठा अमंलात शिक्षणाकडे विशेष लक्ष होते असे वाटत नाही. कारण त्यावेळी शिक्षण ही सरकारची जबाबदारी नव्हती.

१८१८ मध्ये मराठी राज्याचा शेवट झाला आणि इंग्रजांच्या सातारा प्रवेशाबरोबरच पाश्चिमात्य शिक्षणाची पद्धत सुरू झाली. सन १८८७ मध्ये साताऱ्यात तीन इंग्रजी शाळा होत्या. या शाळांमधून मॅट्रिकपर्यत शिक्षण दिले जात असे. इंग्रज धोरणानुसार इंग्रज अधिकाऱ्यांना मराठी शिकता यावे व मराठयांना इंग्रजी शिकता यावे या उद्देश्याने इंग्रजांनी प्रयत्न केले. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात शिक्षण सर्वासाठी खुले केले. त्यामुळे साताऱ्यातही शिक्षणाची नवप्रभात उजाडली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी शिक्षणास उत्तेजन दिले.

महात्मा जोतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील व बापुजी सांळुखे इत्यादी समाजसुधारकांनी केलेल्या शिक्षणप्रसारामुळे सातारा शहरास शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे. बंगालचे समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या सामाजिक कार्याची प्रेरणा सातारचे श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी घेतली. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी बहुजन

समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे पहिली मराठी पाठशाळा 'रंगमहाल' या वाडयात सन १८२९ मध्ये काढली. या शाळेत संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाचे शिक्षण देण्याची सोय केली. त्यामुळे सनातनी लोकांनी त्याना विरोध करण्यास सुरूवात केली. यावर उपाय म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी मुंबईचे डॉ.मिल्न यांच्या सहकार्याने तीन मिशनरी शिक्षक या पाठशाळेसाठी उपलब्ध करून दिले. आबा पारसनीस या ब्राह्मण शिक्षकाने ही पाठशाळा उत्तमरितीने चालविली. या शाळेत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांची कन्या गोजराबाईला दाखल केले. महाराजांच्या या कार्याची प्रेरणा मुंबईचे नाना शंकरशेठ यांनी घेऊन स्वतःच्या घरात मुलींची शाळा सुरू केली. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील यांनाही स्त्री–शिक्षणाच्या कामी छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे कार्य प्रेरक ठरले.

सातारा नगरपालिकेने ही सन १९२५ पासून प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्विकारलेली आहे. कायद्यातील तरतुदीप्रमाणे सातारा शहरात नगरपालिका शिक्षण मंडळ आहे. या शिक्षण मंडळाकडून प्राथमिक शिक्षणाचा कारभार चालविला जातो. हे मंडळ १५.५.१९८५ पासून अस्तित्त्वात आले. यामध्ये १० सदस्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये सरकारनियुक्त दोन सदस्य असतात. असे एकूण १२ सदस्य आहेत.

सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाने सातारा शहरात शैक्षणिक प्रगती करण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. शाळांचा शैक्षणिक व भौतिक दर्जामध्ये वाढ होत असतानाच सर्व शिक्षकांच्या व शिक्षणमंडळाच्या सकारात्मक प्रतिसादातून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपाययोजना व उपक्रम या मंडळाने सातत्याने केले आहेत. मुलांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी आणि गुणवान पिढी निर्माण होण्यासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा शैक्षणिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यामध्ये सर्वजण अग्रेसर आहेत. नगरपालिका शिक्षण मंडळाचे पदाधिकारी यांचा भक्कम पाठिंबा असून त्यांनी राबविलेले उपक्रम, कार्य, शैक्षणिक धोरणे या माध्यमातून भावी पिढया घडविण्याचे कार्य यशस्वीपणे झाले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या दुःखावर फुंकर घालून त्यांना आनंदी बनविण्याचा या मंडळाने यशस्वी प्रयत्न केला आहे. म्हणून भविष्यातही प्रदीर्घ काळापर्यत विद्यार्थ्याची प्रगती होईल, असे यावरून स्पष्ट होते.

सातारा नगरपालिकेने शहरातील लोकांच्या आरोग्याकडे चांगल्याप्रकारे लक्ष दिलेले आहे. शहरातील लोकांना चांगल्या पद्धतीचे जीवन जगता यावे, या दृष्टीने आरोग्यासाठी ज्या ज्या मूलभूत सुविधांची आवश्यकता असते अशा सुविधा पुरविण्याची जबाबदारी नगरपालिकेने घेतलेली आहे. यामध्ये शहर स्वछता मोहिम राबवून लोकांना आरोग्याच्या दृष्टीने सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. नगरपालिकेने आरोग्य व शहर स्वच्छतेसाठी मोठया प्रमाणावर आर्थिक खर्च केलेला आहे. याशिवाय प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भरती करून त्यांच्यामार्फत सर्व कामे वेळेत पूर्ण केलेली आहेत.

सातारा नगरपालिकेने आरोग्याच्या बाबतीत प्रामुख्याने साथीच्या रोगाचा प्रसार होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाय करणे, शहरातील सांडपाणी गटारे यांची स्वच्छता व सोय करणे. गरीब लोकांना मोफत औषधोपचार करणे. केरकचरा गोळा करणे व त्याचा विनियोग करणे. कचरा व घाणीचे स्थलांतर करणे. मांस व मासे बाजाराची व्यवस्था करणे. स्मशानभूमी व प्रेत पुरण्याच्या जागेची व्यवस्था करणे. या गोष्टीवर मुख्यतः भर दिलेला आहे.

सातारा शहरात आरोग्य व स्वच्छता याबाबतीत नगरपालिकेने आपले लक्ष पुरविले होते. आरोग्य सुधारण्यासाठी नगरपालिकेने प्लेग, हिवताप, एन्फ्लुएंझा, देवी, क्षयरोग, कॉलरा, दमा, न्यूमोनिया, टायफाडाईड, मलेरिया व हगवण हे आजार रोखण्यासाठी महत्त्वाचे प्रयत्न केले होते. हे साथीचे आजार येऊ नयेत यासाठी अगोदरच काळजी घेतली जात होती. यासाठी नगरपालिकेने दवाखान्याची सोय केली होती. या दवाखान्यात प्रशिक्षित डॉक्टर उपलब्ध केले होते. तसेच इतर कर्मचारी ही मोठया प्रमाणावर भरले होते.

सातारा नगरपालिकेने राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग घेऊन पल्स पोलिओ निर्मूलनासाठी प्रयत्न करून त्यात यश मिळविले होते. तसेच देवी काढण्यात यश मिळविले होते. नगरपालिकेने स्वतःचे प्रसुतिगृह काढून महिलांची चांगली सोय केली आहे. क्षयरोग व कुष्ठरोग निर्मूलनासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. सातारा नगरपालिकेने कुटुंब नियोजनाच्या बाबतीत मोठया प्रमाणावर सहभाग घेऊन शासनाच्या सर्व योजना चांगल्याप्रकारे राबविण्यास मदत केली होती.

सातारा शहरातील लोकांना नगरपालिकेमार्फत शौचालयाचे महत्त्व पटविण्यात आले आहे. शहरातील लोकांसाठी शौचकुपांची व्यवस्था केली होती. शहर स्वच्छतेसाठी नगरपालिकेने

सांडपाण्याची व्यवस्था केली होती. घनकचरा व्यवस्था ही केली होती. हा घनकचरा एकत्र करून त्यावर प्रकिया केली जात होती. हा कचरा घरोघरी जाऊन गोळा करण्यासाठी घंटागाडीची सोय केली होती. नगरपालिकेने शहर स्वच्छतेस फार मोठया प्रमाणावर खर्च केला होता.

कोणत्याही देशाचा व राज्याचा अथवा शहराचा विकास हा त्याच्या आर्थिक उत्पन्नावर अवलंबून असतो. आर्थिक बाजू भक्कम असेल तर प्रगती होण्यास मदत होते. अशा प्रकारे नगरपालिकाही शहराचा विकास करीत असताना आपले उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत असते. नगरपालिकेस मिळणाऱ्या उत्पन्नावर शहरातील सोयी व सुविधा अवलंबून असतात. याशिवाय नगरपालिकेचे कार्यक्षम प्रशासन, राबविलेले उपक्रम, यांचे यशही या उत्पन्नावर अवलंबून असते. नगरपालिकेस जे उत्पन्न मिळते त्याची अनेक साधने आहेत. त्या सर्व साधनाद्वारे नगरपालिका आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करते. या आर्थिक उत्पन्नाचा अभ्यास नगरपालिकेने दरवर्षी लिहून ठेवलेल्या रेकॉर्डवरून करता येतो. त्यावरून त्यांनी कोणकोणत्या सुविधा राबविल्या होत्या याचीही माहिती मिळते. कोणत्याही नगरपालिकेचे यशापयश हे तिच्या उत्पन्न व खर्चावर अवलंबून असते. मिळालेल्या आर्थिक उत्पन्नाचा विनियोग योग्य प्रकारे केल्यास नगरपालिकेस यश मिळते. या आर्थिक खर्चामध्ये भ्रष्टाचार व अनागोंदीपणा आल्यास उपक्रम राबविण्यास अपयश येते.

सातारा नगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये नगरपालिका कर व दर यापासून मिळणारे उत्पन्न, यामध्ये जकात व घरपट्टी यांच्या कराच्या उत्पन्नाचा समावेश केला जात होता. विशेष अधिनियमाखाली वसुलीचे मिळणारे उत्पन्न, कराव्यतिरिक्त नगरपालिकेच्या मालमत्ता व उपयोगितापासूनचे उत्पन्न, अनुदाने व अंशदाने, इतर उत्पन्नामध्ये असाधारण जमा, पथकर, एकत्रित कर, हॉटेल कर, जाहिरात कर, कुत्र्यांवरील कर, वृक्षकर, करमणूक कर, पाणीपट्टी, भंगीपट्टी, प्राथमिक शिक्षण अनुदान व शिक्षण कर इत्यादीचा समावेश केला होता.

सातारा नगरपालिकेने वेगवेगळया बाबींपासून मिळणारे उत्पन्न, जकात कर व शासकीय अनुदान हे सातारा शहरातील लोकांच्या शैक्षणिक व आरोग्य या नागरी सुविधा पुरविणेसाठी पैसा खर्च केला आहे. शहरातील रस्ते साफसफाई, बालवाडया, पिण्याचे पाणी, इत्यादी बाबीवर खर्च करून इतर नगरपालिकांना एक आदर्श घालून दिलेला आहे. विशेष म्हणजे सातारा

नगरपालिकेचे उत्पन्नही जास्त होते. त्यामुळे त्याचा विनियोग सातारा नगरपालिका प्रशासनाने शहरातील लोकांना सर्व प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी केलेला दिसून येतो. त्यामुळे सातारा नगरपालिकेचे हे कार्य कौतुकास्पद आहे.

सातारा नगरपालिकेला अनेक लोकोपयोगी कामे व शहर स्वच्छ ठेवण्यासाठी तसेच लोकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी खर्च करावा लागत होता. तेव्हा त्यामध्ये आरोग्यांविषयी सुविधांमध्ये दवाखाने चालविणे, रस्ते दुरूस्ती व नवीन रस्ते बांधणे, दिवाबत्तीची सोय करणे, मुलांना व प्रौढांना शैक्षणिक सुविधा पुरविणे, शहरातील वाढत्या लोकसंख्ये बरोबर वाढत्या समस्यांचे निराकरण करणे आणि वाढत्या गरजा भागविण्याचे काम करावे लागते. ही सर्व कामे नियोजनबद्ध पार पाडावी लागत होती. त्यासाठी पैसा उपलब्ध होईल तसे कार्यक्रम नगरपालिका पार पाडत असे.

नगरपालिकेच्या खर्चाच्या बाबींमध्ये नगरपालिकेचा सामान्य प्रशासन व वसुली खर्च, नगरपालिकेचा सार्वजनिक सुरक्षितता खर्च, नगरपालिकेचा सार्वजनिक आरोग्य व सोयीवरील खर्च, नगरपालिकेचा अंशदाने खर्च, नगरपालिकेचा इतर खर्च, नगरपालिकेचा असाधारण खर्च, नगरपालिकेचा शिक्षण खर्च, नगरपालिकेचा अग्निशमन खर्च, नगरपालिकेचा दिवाबत्ती खर्च, नगरपालिकेचा पाणीपुरवठा खर्च, नगरपालिकेचा सार्वजनिक तारतखाने व मुताऱ्यावरील खर्च, नगरपालिकेचा साफसफाई व सोयीवरील खर्च, नगरपालिकेचा जलनिःसारण खर्च, नगरपालिकेचा बांधकामावरील खर्च इत्यादी बाबींचा समावेश होता. या खर्चाची माहिती घेतल्यावर असे स्पष्ट होते की, नगरपालिकेचा वरील बाबींचा खर्च हा दरवर्षी उत्पनाच्या प्रमाणात वाढत गेला आहे.

सातारा शहरास महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. मध्ययुगीन कालखंडात सातारा व परिसरात अनेक महत्त्वाच्या घटना घडलेल्या आहेत. सातारा शहरास लागून असलेला अंजिक्यतारा किल्ला हा मराठयांच्या काळात मध्यवर्ती ठिकाण म्हणून प्रसिद्ध होते. एवढेच नव्हे तर छ.शाहू महाराजांच्या राज्याभिषेकानंतर (१२ जानेवारी १७०८) 'सातारा' ही स्वराज्याची राजधानी म्हणून नावारूपास आली. पेशवे देखील छत्रपतीना विचारल्या शिवाय कोणतीही गोष्ट करीत नव्हते. याच सातारा शहराचा विकास छत्रपती शाहू महाराजांच्या काळापासून सुरू झाला. छत्रपती शाहू महाराजांनी अदालत वाडा, रंगमहाल, तख्ताचा वाडा या

इमारतीचे बांधकाम केले. तसेच शहरात पेठांची निर्मिती केली. त्यामुळे शहराचा विकास झपाटयाने झाला.अशाप्रकारे शहराच्या आकारातही वाढ झाली. तसेच ते सुशोभित होऊ लागले. याच बरोबर शहरातील लोकांची जीवनावश्यक वस्तुंची सोय व्हावी यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी फार मोठे प्रयत्न केले. शहरातील पाणी, रस्ते, पुल अशासारख्या सोयीसुविधांची निर्मिती सातारा शहरात केली गेल्याने सातारा शहराचा विकास झपाटयाने झाला.

छत्रपती शाहू महाराजांच्यानंतर सातारा शहराचा विकास करणारे छत्रपती म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा उल्लेख केला जातो. त्यांनी सन १८०८ मध्ये सत्तेवर आल्यानंतर सन १८३९ पर्यंत सातारा शहराचा कायापालट केला. त्यामध्ये वाडयांची निर्मिती, शाळा दवाखाने, रस्ते, पूल इत्यादी बांधकामे केली. विशेषतः व्यापारास उत्तेजन व सवलती देऊन व्यापारी पेठांची निर्मितीही केली. त्यामुळे व्यापाराची भरभराट झाली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्यानंतर ब्रिटिशांनी सन १८४८ मध्ये सातारा राज्य खालसा केले. तेव्हा सातारा शहरातील नागरी कारभार पाहण्यासाठी एका कमिशनरची नियुक्ती केली. या कमिशनरने शहरातील लोकांच्या गरजा भागविण्यासाठी लोकांकडून कर गोळा करण्यास सुरूवात केली. ही करवसुली वेळेत व्हावी तसेच त्यास लोकांचा विरोध होऊ नये यासाठी १ ऑगस्ट १८५३ रोजी 'सातारा नगरपालिका' स्थापन करण्यात आली. तेव्हापासून सातारा शहराचा नागरी कारभार या नगरपालिकेकडे सुपूर्त करण्यात आला. या नगरपालिकेने हा कारभार करीत असताना ज्या सुधारणा केल्या होत्या. त्यातूनच सातारा शहराचा विकास होण्यास मदत झाली आहे. सातारा नगरपालिकेच्या स्थापनेवेळी सातारा शहर सदर बाजार व गडकरी आळी यांचा समावेश होता. सन १८७७ मध्ये त्यात करंजे व गोडोली या गावांचा समावेश केला गेला. व पाच चौरस मैलाचे क्षेत्र तयार केले गेले. सातारा शहराचे कमिशनर अध्यक्ष व इतर पाच सरकार नियुक्त सभासद यांचे एक बोर्ड तयार झाले. व नागरिकांच्या सुखसोयीसाठी अनेक कामे नगरपालिकेने हाती घेतली व ती पुर्णत्वास नेली. सातारा नगरपालिकेचा ही पहिली पन्नास वर्षे जरी सरकारी अमलाखाली कारभार चाललेला होता तरी जनतेच्या हिताच्या दृष्टीने फार मोठी कामगिरी त्या काळात झाली आहे. या काळात उत्पन्न मर्यादित असल्याने लोकोपयोगी कामे ही संथ गतीनेच चाललेली होती. सातारा नगरपालिकेच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यामध्ये असामान्य कर्तृत्त्वशक्ती

होती व त्यांच्या ठिकाणी स्वावलंबन व लोकहिताची तळमळ मोठया प्रमाणावर होती. तसेची उत्पन मर्यादेपेक्षा कमी असले तरी कार्य मात्र अलौकिक होते. विपुल पाणीपुरवठा यामध्ये सार्वजनिक हौद, सार्वजनिक पाण्याच्या नळया, आग विझविण्याचे बंब, सार्वजनिक दिवे, रात्री संरक्षणासाठी ठिकठिकाणी बांधलेल्या पोलीस चौक्या व त्यातील दिवाबत्तीची सोय, रस्ते दुरूस्ती, सफाई, रस्त्यावरील पूल, उद्याने याबाबत नगरपालिकेने चांगले लक्ष घातलेले दिसून येते.

सातारा नगरपालिकेने स्वच्छतेसाठी सार्वजनिक शौचकूप, खाजगी शौचकूप, या शौचकुपांच्या स्वच्छतेसाठी भंगी, मैला वाहून नेण्यासाठी गाडया, कचरा व मैला यांचे खत तयार करण्याची व्यवस्था नगरपालिकेने केली होती. आरोग्यविषयक सोयी सुविधांमध्ये नगरपालिकेने देवी काढण्याची व्यवस्था, सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गोरगरिबांना औषधाची मोफत सोय केली होती. म्हणून या इमारतीच्या दुरूस्तीचा खर्च नगरपालिकेने करावयाचा होता. मंडईतील दुकानाची सोय, मांस बाजार, मच्छि बाजार व कत्तलखान्याची सोय, याचीही चांगल्या प्रकारे सोयी सुविधा केलेली होती. मराठी शाळा, रात्रीची शाळा, मुलामुलींची एकत्र शाळा, मुलींची शाळा, उर्दू शाळा, लष्करी शाळा अशा प्रकारे सर्व क्षेत्रात सातारा नगरपालिकेने फार मोठे योगदान दिलेले होते.

नगरपालिकेत सर्व अध्यक्ष, उपाध्यक्ष व समित्या आणि त्यांचे सभापती यांची निवड केली जाते. त्यात खालील विभागांचा समावेश होतो. आस्थापना विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, आरोग्य समिती, जलनि:स्सारण समिती, जकात विभाग, नगदी खाते, विद्युत विभाग, दप्तरखाना, कर विभाग, अन्न भेसळ प्रतिबंधक विभाग, वृक्ष व संवर्धन विभाग, आग प्रतिबंधक विभाग, नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, दुकान विभाग, भांडार विभाग, नियोजन व विकास समिती, महिला व बालकल्याण समिती, मागासवर्गीय व विशेष कल्याण समिती, या सर्व समितीच्यांमार्फत नगरपालिकेचा प्रशासकीय कारभार चालविला जातो.

प्रशासकीय इमारती, शॉपिंग सेंटर, समाज मंदिरे, मंडई, घरकुल योजना, झोपडपट्टी पुनर्वसन, रस्ते, पूल, फुटपाथ, स्ट्रीट लाईट, ट्राफीक सिग्नल, दवाखाने, आरोग्य सोयी, भुयारी गटार योजना, शिक्षण, पाणीपुरवठा योजना, शाहू स्टेडियम, शाहू कला मंदिर, स्मृती स्थळे, चारभिंती, फाशीचा वड, छत्रीचा हौद, हुतात्मा स्मारकउद्यान, श्रीमंत छत्रपती शाहू उद्यान,

श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह उद्यान, यशवंत उद्यान, जवाहर उद्यान, हुतात्मा उद्यान, श्री शिवसमर्थ उद्यान, राजमाता सुमित्राराजे उद्यान, वाचनालयाची सोय, जनावरांच्या दवाखान्याची सोय, अंत्यसंस्कार, झाडे लावणे, आग विझवणे व रस्त्यावर पाणी शिंपडणे इत्यादी कामे केली जात असत.

अशाप्रकारे सातारा नगरपालिकेची स्थापना ही ज्या हेतुने झाली होती तो हेतू सफल होवून सातारा शहराचा विकास चांगल्या प्रकारे झाला. सातारा नगरपालिकेच्या स्थापनेपासूनच्या ३० निवडणूका, मॅनेजिंग कमेटी, जनरल बोर्डाच्या सभा, स्कूल बोर्ड, स्टॅडिंग कमिटी, लॉ ॲण्ड जनरल रेफरन्स कमिटी, हॉस्पिटल कमिटी, फायनान्स कमिटी, ट्रान्सपोर्ट कमिटी, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, विविध विषय समित्या, सार्वजनिक बांधकाम समिती, शिक्षण समिती, आरोग्य रक्षण, वैद्यकिय व सार्वजनिक आरोग्य समिती, पाणीपुरवठा व जलनिःसारण समिती, नियोजन आणि विकास समिती, वृक्ष समिती, मागासवर्गीय कल्याण विशेष समिती अशाप्रकारच्या समितींची स्थापना करुन सातारा शहराचा विकास घडवून आणला होता.

सातारा नगरपालिकेतील प्रशासकीय संरचनेमध्ये नगरपालिकेतील नोकर वर्ग, नगरपालिकेचा मुख्याधिकारी, इतर प्रशासकीय कर्मचारी इत्यादींचा समावेश केला गेला होता. त्याचबरोबर नगरपालिकेची विविध खात्यात आस्थापना विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, आरोग्य समिती, जलनि:स्सारण समिती, जकात विभाग, नगदी खाते, विद्युत विभाग, दप्तरखाना, कर विभाग, अन्न भेसळ प्रतिबंधक विभाग, वृक्ष व संवर्धन विभाग, आग प्रतिबंधक विभाग, नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, दुकान विभाग, भांडार विभाग, नियोजन व विकास समिती, महिला व बालकल्याण समिती व मागासवर्गीय व विशेष कल्याण समिती इत्यादींमुळे प्रशासनात भक्कमपणा येवून नगरपालिकेचा कारभार सुरळीतपणे चालण्यास मदत झाली होती. सातारा नगरपालिकेने शहरातील केलेल्या शैक्षणिक कार्यात मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. तसेच शहरातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेतलेली आहे. सातारा नगरपालिकेने उत्पन्नाच्या प्रमाणात खर्च केला तर काही वेळेस उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केलेला दिसून येतो.  सातारा नगरपालिकेमुळे सातारा शहराचा विकास झाला हे स्पष्ट होते.

सातारा नगरपालिकेची तुलना महाराष्ट्रातील इतर नगरपालिकेशी केल्यास असे आढळून येते की, सातारा नागरपालिका ही महाराष्ट्रातील सर्वात पहिली नगरपालिका आहे. या नगरपालिकेची स्थापना सन १८५३ मध्ये झाली आहे. या नगरपालिकेचा संबंध सातारच्या भोसले घराण्यातील छत्रपतीशी असल्याने निश्चितच भरघोस स्वरूपाच्या सुधारणा झालेल्या आहेत. फलटण नगरपरिषदेस जसे फलटणचे संस्थानिक श्रीमंत मालोजीराजे व त्यानंतर श्रीमंत मुधोजीराजे यांनी फलटण नगरपरिषदेमार्फत विकासाच्या विविध योजना आलात आणून शहराचा विकास साधला होता. त्याचप्रमाणे सातारा नगरपालिकेचा विकास श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांनी मोठया प्रमाणावर केला होता. फलटण व सातारा नगरपरिषदेच्या कामकाजातील फरक पाहावयाचा झाल्यास फलटणची नगरपरिषदेवर संस्थानिकांचे लक्ष होते. तसेच सातारा नगरपालिकेवर श्रीमंत छत्रपती भोसले घराण्याचे लक्ष असल्याने निश्चितच फलटण नगरपरिषदेपेक्षा सातारा नगरपालिकेचा विकास झपाटयाने मोठया प्रमाणावर झालेला आहे.

सातारा नगरपालिकेची विटा, कराड व कल्याण या नगरपालिकेशी तुलना करावयाची झाल्यास या नगरपालिकेवर ब्रिटिशांचे फारसे लक्ष असलेले दिसत नाही. परंतु सातारा नगरपालिकेवर ब्रिटिशांनी चांगल्याप्रकारे लक्ष दिलेले आहे. कारण सातारा शहरास ऐतिहासिक वारसा असल्याने तेथे ऐतिहासिक स्थळेही मोठया प्रमाणावर आहेत. तेव्हा या स्थळांचे जतन करण्याचे काम नगरपालिका करीत होती. सातारा नगरपालिकेप्रमाणेच सातारा जिल्हयातील सर्व नगरपालिकेचा कारभार सातारा कलेक्टरच्या हुकमतीने चालत असे. या नगरपालिकेत सन १८५४ पासून दरवर्षी तीन पंचांची नेमणूक कलेक्टरकडून होत असे. तालुका मामलेदार हेही या पंचकमेटीवर असत.

सातारा नगरपालिकेस इतर नगरपालिकेप्रमाणे आपला विस्तार करता आलेला नाही. कारण सातारा शहरास तीन्ही बाजूनी डोंगर आहे. तसेच आजूबाजूस जी खेडेगावे आहेत. त्या खेडेगावात ग्रामपंचायती आहेत. त्यामुळे सातारा शहराच्या विस्तारास मर्यादा आलेल्या आहेत. नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्याही फारसी वाढलेली दिसत नाही. हीच या नगरपालिकेची शोकांतिका आहे. तरीही या नगरपालिकेने आपले विकासाचे कार्य महत्त्वाचे आहे.

कारण स्वातंत्र्य युद्धाच्यावेळी व तद्नतंर शहर विकासाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे कार्य सातारा नगरपालिकेने केलेले दिसून येते.

सातारा नगरपालिका ही एक महाराष्ट्रातील पहिली नगरपालिका आहे. ती एक आदर्शवत कार्य करणारी नगरपालिका म्हणून प्रसिद्ध आहे. या नगरपालिकेतील सर्वच कारभार एक उत्कृष्टतेचा आदर्श नमुना आहे. सातारा नगरपालिकेस आजपर्यतं अनेक मान्यवरांनी मानपत्र देऊन गौरविले आहे. त्यामध्ये महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेंद्र पसाद, श्रीमती इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण व पी.डी पाटील इत्यादींचा समावेश होतो.

# संदर्भ ग्रंथसूची


## अ) प्राथमिक साधने

### इंग्रजी(अप्रकाशित)

1) Satara Municipality, General Proceeding Book, 1861 to 2003

2) Satara Municipality, Managing Committee Proceeding Book, 1868 t0 1926

3) Satara Municipality, School Board Committee Proceeding Book, 1885 to 1926

4) Satara Municipality, Sanitary Proceeding Book, 1902 to 1926

5) Satara Municipality, Water Supply Committee Proceeding Book, 1923 to 1926

### मराठी (अप्रकाशित)

१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, १९२६ ते २००३

२) सातारा नगरपालिका प्रशासकीय अहवाल १९८१ ते १९८५

**३) उद्धार को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सातारा रेकॉर्ड.**

**४) जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांचे दि.२०.०१.२००१ चे वेतनश्रेणीबाबतचे पत्र**

**५) नगरपालिका शाळांचे रेकॉर्ड**

१) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.१ चे रेकॉर्ड.

२) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.२ चे रेकॉर्ड.

३) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.३ चे रेकॉर्ड.

४) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.४ चे रेकॉर्ड.

५) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.५ चे रेकॉर्ड.

६) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.६ चे रेकॉर्ड.

७) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.७ चे रेकॉर्ड.

८) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.८ चे रेकॉर्ड.

९) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.९ चे रेकॉर्ड.

१०) सातारा नगरपालिका उर्दू शाळा नं.१० चे रेकॉर्ड.

११) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.११ चे रेकॉर्ड.

१२) सातारा नगरपालिका उर्दू शाळा नं.१२ चे रेकॉर्ड.

१३) सातारा नगरपालिका उर्दू शाळा नं.१३ चे रेकॉर्ड.

१४) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.१४ चे रेकॉर्ड

१५) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.१५ चे रेकॉर्ड.

१६) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.१६ चे रेकॉर्ड.

१७) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.१७ चे रेकॉर्ड.

१८) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.१८ चे रेकॉर्ड.

१९) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.१९ चे रेकॉर्ड.

२०) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.२० चे रेकॉर्ड.

२१) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.२१ चे रेकॉर्ड.

२२) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.२२ चे रेकॉर्ड.

२३) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.२३ चे रेकॉर्ड.

२४) सातारा नगरपालिका मराठी शाळा नं.२४ चे रेकॉर्ड.

**६) शिक्षण मंडळाच्या बोर्डवरून मिळालेली माहिती.**

७) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड– लेखापरीक्षण अहवाल

८) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा यांच्याकडून मिळालेली माहिती.

९) सातारा नगरपालिका शाळा नं १ ते २४ मधील मुख्याध्यापकांकडून मिळालेली माहिती.

१०) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ सेवक सहकारी पतसंस्था सभापती फलक

११) कार्यक्रम अंदाजपत्रक, सार्वजनिक आरोग्य, १९९१–९२

१२) सातारा नगरपालिका, जन्म व मृत्यू रजिस्टर नोंदी १९०१ ते २००३

१३) जिल्हा आरोग्य अधिकारी सातारा यांनी दिलेली माहिती.

१४) सातारा नगरपालिका सार्वजनिक बांधकाम समिती यांचेकडून मिळालेली माहिती

१५) स्वच्छता व वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य समिती,सातारा नगरपालिका यांचेकडून मिळालेली माहिती.

१६) सातारा नगरपालिका रेकॉर्ड डयुटी लिस्ट फाईल.

१७) सातारा नगरपालिका जनरल बोर्ड हजेरीपत्रक

१८) सातारा नगरपालिका जनरल बोर्ड सभा, १८.०४.१९१४

१९) सातारा नगरपालिका रेकॉर्ड

२०) सातारा नगरपालिका मुख्याधिकारी बोर्डावरील माहिती

२१) सातारा नगरपालिका रेकॉर्ड वेतन नोंद फाईल

२२) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाच्या बोर्डवरील माहिती

२३) पंचायत समिती सातारा, शिक्षण विभागाकडून मिळालेली माहिती

२४) स्टँडिंग कमेटी प्रोसिडींग बुक, १९२६ ते १९६६

२५) स्कूल कमेटी प्रोसिडींग बुक, १९२६ ते १९६६

२६) सॅनिटरी कमेटी प्रोसिडींग बुक, १९२६ ते १९६६

२७) हॉस्पिटल कमेटी प्रोसिडींग बुक, १९३५ ते १९६६

२८) वॉटर वर्क्स कमेटी प्रोसिडींग बुक, १९२६ ते १९६६

२९) पब्लिक वर्क्स कमेटी प्रोसिडींग बुक, १९२६ ते १९६६

३०) लॉ ॲण्ड जनरल रेफरन्स कमेटी प्रोसिडींग बुक, १९२९ ते १९६६

३१) फायनान्स कमेटी प्रोसिडींग बुक, १९३८ ते १९६६

३२) सार्वजनिक बांधकाम समिती प्रोसिडींग बुक, १९६६ ते २००३

३३) शिक्षण समिती प्रोसिडींग बुक, १९६६ ते २००३

३४) आरोग्य रक्षण वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती प्रोसिडींग बुक, १९६६ ते २००३

३५) पाणीपुरवठा व जलनिःसारण समिती प्रोसिडींग बुक, १९६६ ते २००३

३६) नियोजन व विकास समिती प्रोसिडींग बुक, १९६६ ते २००३

३७) वृक्ष संवर्धन समिती १९७५ ते २००३

३८) मागासवर्गीय कल्याण विशेष समिती १९८५ ते २००३

**इंग्रजी (प्रकाशित)**

1) Bombay State Gazzet No.28, Date 14.07.1853

2) Census of India - 2001

3) District Municipal Act.1884

4) Gazetteer of Satara District 1885

5) Satara District Supplementary, 1904

6) Satara District Supplementary, 1926

**मराठी (प्रकाशित)**

१) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, १९९९.

२) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४

३) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, २००४–०५

४) सातारा शहर नगरपालिका स्मरणिका, १९८३

५) कोल्हापूर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४

६) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल जमाखर्च १९४९–५० ते २००२–०३

७) सातारा नगरपालिका जमाखर्च अंदाजपत्रक १९७२–७३ ते २००२–०३

८) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल १९०३–०४ ते २००३–०४

९) सातारा नगरपालिका भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू स्वच्छ शहर स्पर्धा, २००८–०९

**मुलाखती**

१) पवार प्रविण, उपशिक्षक दि.१२.१०.२०१२, वेळ ३.३० वाजता

२) मराठी शाळा नं. १ चे मुख्याध्यापक, दि. १५.१०.२०१२.११.०० वाजता

३) मराठी शाळा नं. २ चे मुख्याध्यापक, दि. १७.१०.२०१२, १०.०० वाजता

४) मराठी शाळा नं. ११ चे मुख्याध्यापक, दि. १९.१०.२०१२, १०.०० वाजता

५) मराठी शाळा नं. १९ चे मुख्याध्यापक, दि. २३.१०.२०१२, ११.०० वाजता

६) मराठी शाळा नं. २० चे मुख्याध्यापक, दि. २५.१०.२०१२, १०.०० वाजता

७) मराठी शाळा नं. २३ चे मुख्याध्यापक, दि. २७.१०.२०१२, ११.०० वाजता

**एम.फिल. व पीएच.डी.(अप्रकाशित प्रबंध)**

१) पाटील राजश्री शामराव, कराड नगरपालिकेचा इतिहास, एम.फिल प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०००

२) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील मराठयांचे मराठा स्वातंत्र्ययुद्धातील ऐतिहासिक महत्त्व, (१६८९–१७०७) एम.फिल. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जुलै २००८.

## ब) दुय्यम साधने

### इंग्रजी साधने

1) Deglurkar G.B., Temple Architechar and Culture of Maharashtra, Nagpur University, Nagpur, 1974
2) Kulkarni G.T., The Maratha Mughal Relations Twenty Five Fateful years (1682 to 1707), Poona, 1983.
3) Malik A.C., Stone Age Industries of The Bombay and Satara, Badoda, 1959
4) Ramesh K.V., Chalukya of Watapi, Agamkala Publication Delhi, 1984.
5) Sardesai G.S. New History of the Maratha's, Vol. 1, Dhavl Publication, Mumbai, 1971
6) Sardesai G.S.(Ed.), Selection from the Peshwa Daptar, Vol.42, Government Press, Mumbai, 1934
7) Sharma N.P., Local Self Government in India, Hind kitab Ltd. Mumbai, 1974.
8) Thakur B.K., Indian Administration to the Down of the Responsible Government

### मराठी साधने

१) आपटे द.वि., दिवेकर स.म.(संपा.) शिवचरित्र प्रदिप, शिवापूर दप्तर यादी, पुणे, १९२५

२) आपटे द.वि., दिवेकर स.म.(संपा.), शिवचरित्र प्रदिप जेधे शकावली, पुणे, १९२५

३) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, सातारा, १९९४

४) बंग के.आर., भारतीय स्थानिक स्वशासन : विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५

५) दाते य. रा. (संपा.), मराठी शब्दकोश, विभाग तिसरा, १९३४

६) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, लोकव्रत प्रकाशन, सातारा, ७ ऑगस्ट, २०११

७) देशपांडे अ. ना. प्राचीन महाराष्ट्रातील वाकाटकांचा इतिहास, पुणे, १९९५

८) देव शा. भा. महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दादर मुंबई, १९६८

९) गायकवाड, हनमाने व सरदेसाई, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००

१०) गरूड आप्पासहेब व सावंत बी.बी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, १९९३.

११) गोखले पु.पा., जागृत सातारा, आनंद प्रिंटींग, सातारा, १९७९

१२) जोशी अरूण व इतर, ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २००१

१३) जोशी प्र.न., प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २००२

१४) जोशी पु.म. मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४

१५) कोठेकर शांता व वैद्य सुमन, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, मुंबई, १९९३

१६) लांजेकर रू.ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, सातारा, १९९३

१७) मंत्री रमेश, सुंदर सातारा, अनुभव प्रकाशन, मुंबई, १९८६

१८) माटे गो.रा., असा घडला सातारा जिल्हा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय प्रकाशन सातारा, १९८८.

१९) मेहेंदळे ग.भा., श्री राजा शिवछत्रपती खंड १, रावत ब्रदर्स, सदाशिव पेठ, पुणे, १९९९

२०) मेहंदळे ग.भा., श्री राज छत्रपती, खंड २ भाग २, पुणे, १९९६.

२१) नांदेडकर व्ही.जी. पंचायतीराज एक विश्लेषणात्मक परामर्श, के.सागर पब्लिकेशन पुणे, २०१०

२२) पगडी सेतू माधवराव, शिवचरित्र एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,१९७१,

२३) पगडी सेतूमाधव(संपा.), मोगल आणि मराठे(तारिखे दिल्कुशा), ग.ल.ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३

२४) पाटील वा.भा.,स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २००९

२५) पवार जयसिंग, महाराणी ताराबाई स्वातंत्र्य संग्राम, मराठयांचा इतिहास, खंड१, १९८४

२६) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, विद्या प्रकाशन, पुणे, १९८९

२७) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, मुंबई, १९१४

२८) सरदेसाई बी. एन., आधुनिक महाराष्ट्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९४

२९) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड १ ते १३, १९३०

३०) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड १, पॉप्युलर प्रकाशन, पुणे,१९८८

३१) सरदेसाई गो.स., मराठी रियासत–खंड२ पॉप्युलर प्रकाशन, पुणे,१९२६

३२) सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर खंड ४१, गव्ह.सेंट्रल प्रेस मुंबई, १९३०

३३) सरदेसाई गो.स., मराठी रियसत खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८

३४) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड २, पॉप्युलर प्रकाशन, पुणे,१९८८

३५) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड ८, १९९२

३६) सातारा विकास प्रश्न अनेक उत्तरे, प्रयास टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई, २०११.

३७) शर्मा के. के. (मुख्य संकलक) इंटक्यअलस, संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टिकोन, खंड–५, २००५

३८) शिक्षणावर दृष्टिक्षेप, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, १९९५–९६

३९) शिंदे सरकार अशोकराव, स्वराज्याचा मागोवा, सहयाद्री प्रकाशन संस्था, इस्लामपूर, २००९

४०) शिरसाठ शाम, बैनाडे भगवानसिंग, भारतीय स्थानिक स्वशासन, विद्या बुक्स पब्लिकेशर्स, औरंगाबाद, २०१०

४१) जोशी श. ना., शिवकालीन पत्रसार संग्रह, केळकर व आपटे(प्रका.) पुणे, १९३०

४२) ठाकरे के.सी., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९४८

## स्मरणिका

१) सातारा नगर वाचनालय सातारा, शतकोत्तर रौप्यमहोत्सवी स्मरणिका, १९७८

२) सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी अंक, १९८७

३) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ, स्मरणिका, २००४

४) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ, पंचवार्षिक विशेषांक, २०१२

५) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ, सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित सातारा ७५ वा वार्षिक अहवाल, २००७–०८

६) उद्धार को ऑप क्रेडीट सोसायटी अहवाल, २००३

७) सचिव नगरविकास आघाडी सातारा(संपा.), आपला सातारा विकास आणि संकल्प, सातारा, २००१

८) ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा, १९६३

## मासिके, त्रैमासिके, नियकालिके

### इंग्रजी

1) Archeological Survey of Western India, Vol. 4

2) Journal of the Bombay Branch of Royal Asiatic Society, Vol. 8 Mumbai

4) Indian Antiqueri, Vol.9, Delhi.

5) Caningham, Stope of Bharahut, Lekh

6) Mirashi V.V., Epigraphy India Vol.29, Delhi

7) Mirashi V.V., Studies in Indology Vol. I, Vidharb Sanshodhan Mandal Nagar, 1956

8) Naik J.V., New Indian Antiqueri Vol.9, 1947

### मराठी

१) भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक मुंबई

२) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, पुणे

३) राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, धुळे.

### वर्तमानपत्रे

१) दै.सकाळ, सातारा

२) दै.ऐक्य, सातारा

३) दै.लोकमत, सातारा

४) दै.पुढारी, सातारा

५) दै.पुण्यनगरी, सातारा

६) दै.तरूण भारत, सातारा




**महादरे तलाव येथील शिलालेख**

या लेखाचा अर्थ असा आहे की, सातारा शहरातील या तलावात कपडे धुण्यासाठी बंदी घालण्यात आलेली आहे. तरी कृपया याची नोंद सर्व नागरिकांनी घ्यावी असा मजकूर यात कोरलेला आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, महादरे तलावातील पाणी स्वच्छ रहावे यासाठी नगरपालिकेने दक्षता घेतलेली दिसून येते.



मंगळवार तळे येथील शिलालेख

मंगळवार तळयात महादरे तलावातून पाटाने पाणी आणले होते. हे पाणी पब्लिक खात्याकडून सन १८६९ मध्ये आणण्यास प्रारंभ झाला व ऑक्टोबर १८७१ पाणी आणण्याचे बंद करण्यात आले. या पाटाचे काम भिकाजी विठूजी गायकवाड मिस्त्री यांनी सवल इंजिनियरसाहेब यांच्या नेतृत्त्वाखाली पूर्ण केले.




**रामाचा गोठ सातारा शिलालेख**

हा शिलालेख इ.स.१८६४ मधील असून रामाचा गोठ सातारा (भटजी महाराज मठासमोर)येथील असून सातारा नगरपालिकेस हा हौद बांधण्यासाठी एकूण रूपये १३४७ एवढा खर्च आलेला आहे त्यातील तो खर्च भागविण्यासाठी या पेठेतील लोकांनी रूपये २०० देऊन मदत केली होती. त्याची माहिती या शिलालेखातून उपलब्ध होत आहे.




सातारा नगरपालिकेने चारभिंती या वास्तुंचे नुतनीकरण केले हे दर्शविणारा शिलालेख




चारभिंती येथील वास्तुवैशिष्टये सांगणारा शिलालेख



रंगो बापूजी गुप्ते यांचे चारभिंती वास्तुवरील स्मारक




चारभिंती स्मारकावरील झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या विषयी माहिती देणारा शिलालेख




महाराष्ट्राचा नकाशा

संदर्भ- दास्ताने संतोष, (महाराष्ट्र २०१२) ऑक्टोबर २००९




सातारा जिल्हयाचा नकाशा

सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९




सातारा शहराचा नकाशा

संदर्भ- सातारा नगरपालिका शहर विकास विभाग




सातारा शहर सभोवतालचा १६ कि.मी. परिसराचा नकाशा

संदर्भ- सातारा नगरपालिका शहर विकास विभाग



सातारा शहर व परिसराचा नकाशा

संदर्भ- सातारा नगरपालिका शहर विकास विभाग




सातारा रेल्वे स्थानकाभोवतालचा भाग व आसपासची स्थानके दाखविणारा नकाशा

संदर्भ- सातारा नगरपालिका शहर विकास विभाग



महादरे तलाव(सातारा)



मोती तलाव (सातारा)



मंगळवार तळे(सातारा)




विठोबाचा नळ(सातारा)



शनिवार पेठेतील सातारा नगरपालिकेची स्थापनेच्या वेळची इमारत




सातारा नगरपालिका जुनी इमारत




सातारा नगरपालिकेचे जुने ऑफिस (सबबर्न नगरपालिका)




सातारा नगरपालिका नवी इमारत




सातारा येथील श्री शाहू कलामंदिर



अदालतवाडा



छत्रीचा हौद




श्री. छत्रपती प्रतापसिंह उद्यान(सातारा)




श्री छत्रपती शाहू उद्यान



जवाहर बाग




नगरपालिकेचा दिवा या खांबाला टांगला जात असे. (इ.स.१९२०)




सातारा नगरपालिका शाळा क्र. ५



सातारा नगरपालिकेचा दवाखाना (इ.स.१९३१)



सातारा शहरातून कोल्हापूर व चिपळूण या ठिकाणी जाण्यासाठी इ.स.१८५५ मध्ये ब्रिटिशांनी काढलेला दक्षिणेच्या बाजूस असलेला बोगदा



सातारा शहरास पाणीपुरवठा करणारा कास तलाव



कास तलावातून सातारा शहरास पाणीपुरवठा करताना बांधण्यात आलेला पाटाचा मार्ग



मराठ्यांची राजधानी अजिंक्यतारा(सातारचा किल्ला)



सातारा शहरातील चारभिंती स्मारक



जुना राजवाडा




नवा राजवाडा



श्री. **व्यंकटेश अनंत ढेकणे,** बी. एस्. सी., बी. टी.
हल्ली फर्स्ट असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, उत्तर सातारा. हा चार्ज असतांना कांहीं काळ म्युनिसिपल स्कूल बोर्डाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर.



श्री. **अहमद अजमुद्दीन परकार**
एम्. ए., बी. टी. डी. पी. इ
हल्ली म्युनिसिपल स्कूल बोर्डाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर



श्री. **काशिनाथ विष्णु कुलकर्णी**
बी. ए. एल्.एल्. बी. वकील
बरीच वर्षें नगरपालिकेचे वकील म्हणून काम करीत आहेत. हिंदु महासभेचे कार्यकर्ते, रोटरी क्लबचे सेक्रेटरी.



श्री **गोविंद जयराम फणसळकर**
नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेमध्यें ३५ वर्षें शिक्ष
इतिहासाचा मोठा व्यासंग असलेले साताऱ्चे नागरि
नगरवाचनालयाचे एक माजी कार्यवाह.



श्री. **रामचंद्र गणेश** तथा **भाऊसाहेब सोमण**

सन १९३९ ते ४२ सालीं नगरपालिकेचे अध्यक्ष. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनीचे एक आद्य संस्थापक व तिचे पुष्कळ वर्षें डायरेक्टर व सध्यां डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन. 'प्रकाश' वर्तमानपत्रा संपादक होते. युनिअन क्लबचे अध्यक्ष होते. १९२३ व १९३५ सालीं मुम्बई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत निवडून गेले. १९३७ मध्यें कौन्सील सभासद व १९४७ सालीं कौन्सीलचे स्पीकर होते. कन्याशाळेचे गव्हर्निंग बोर्डावर हल्लीं सभासद आहेत. सातारा जिल्ह्याचे सुप्रसिद्ध पुढारी.



कै. **रघुनाथ पांडुरंग** तथा **दादासाहेब करंदीकर,** ॲडव्होकेट

६ वर्षें नगरपालिकेचे सभासद होते. अनेक कमिटयांत कामें केलीं. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे चेअरमन होते. नामवंत वकील. युनिअन क्लबच्या संस्थापकांपैकीं एक. अनेक संस्थांशी निकट संबंध



कै. रावबहादूर **विठ्ठल नारायण पाठक**, एम्. ए.

१९ वर्षें नगरपालिकेचे सभासद व अनेक कमिटयावर चेअरमन होते. पहिले लोकनियुक्त अध्यक्ष होते. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे ७ वर्षें चेअरमन होते. हायस्कूलचे हेडमास्तर होते. युनिअन क्लबचे संस्थापकांपैकीं एक.



**श्री. श्रीधर विष्णू तथा तात्यासाहेब जोशी**

नगरपालिकेचे सभासद २० वर्षे. स्टँडिंग कमेटी व स्कूल बोर्डाचे चेअरमन. जिल्हा लोकल बोर्डाचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष. पहिल्या वर्गाचे बेंच मॅजिस्ट्रेट. आर्यांग्ल वैद्यक विद्यालयाचे आद्य संस्थापकापैकीं एक. व त्यांत ६ वर्षे आयुर्वेद शिकवीत. अद्वैत वेदांत शास्त्राच्या दोन परिक्षा उत्तीर्ण. इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीच्या संस्थापकापैकी एक व तिचे पहिले मॅनेजिंग डायरेक्टर. कोरेगांव इलेक्ट्रिक कंपनीचे एक संस्थापक श्रीमत् आद्य शंकराचार्य मंदीर व भारती भवन यांचे एक संस्थापक. निसर्गोपचार संस्थेचे चालक.



**श्री. लक्ष्मीनारायण आकाराम जाजू,**
बी. ए., एल्.एल्. बी. वकील

नऊ वर्षे नगरपालिकेचे सभासद व ३ वर्षे स्कूल बोर्डाचे चेअरमन. कार्याध्यक्ष माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ पुणें. अध्यक्ष शहर कॉंग्रेस कमेटी सातारा. मॅनेजिंग एजंट प्लॅस्टिक प्रॉडक्टस् ऑफ इंडिया लि. सातारा. सेक्रेटरी आयुर्वेद प्रसारक मंडळ सातारा.



**श्री. बाळकृष्ण नरहर भट्टे,** बी. ए., एल्.एल्. बी. वकील

तीन वर्षे नगरपालिकेचे सभासद.
एक साल स्कूल बोर्डाचे चेअरमन.
१९३८ सालीं दैवज्ञ परिषदेचे अध्यक्ष.
कराड येथील सातारा जिल्हा को. ऑ. लँड मॉरगेज बँकेचे सल्लागार.



श्री डॉ. **मेघःशाम नारायण जोग,** एम्. बी. बी. एस्.
सन १९५० व १९५१ सालीं नगरपालिकेचे सभासद.
आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचे माजी प्रिन्सीपाल,
आजीव सभासद व सेक्रेटरी' मेडिकल असो-
सिएशनचे अध्यक्ष व वेस्टर्न इंडिया विमा
कंपनीचे माजी डायरेक्टर.



श्री. डॉ. **वामन भिकाजी वाळिंबे**
३ वर्षे नगरपालिकेचें सभासद. कुस्तीत पुणें डेक्कन
जिमखान्याचे हेवी वेट चॅंपियन. कॉंग्रेस कार्यकर्ता.
प्रामुख्यानें ग्रामीण भागांत वैद्यकीय व्यवसाय.



श्री. **वसंत नारायण लांजेकर**
सन १९४८ ते ५१ नगरपालिकेचे सभासद.
मॅटर्निटी हॉस्पिटल कमिटीचे त्या काळचे चेअरमन.
तांबा पितळ भांड्याचे व्यापारी.



श्री. दत्तात्रय तुकाराम यादव

सन १९५२ नगरपालिकेचे सभासद, स्टँडिंग कमिटीचे चेअरमन, मॅटर्निटी हॉस्पिटल, पब्लिक वर्क्स व लॉ कमिटीचे सभासद. श्री शिवाजी उदय मंडळाचे माजी सेक्रेटरी. सध्यां खजिनदार म्हणून आहेत व जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सभासद.



श्री. गोविंददास दामोदरदास गुजर
बी. एस्सी., बी टी.

सन १९४५ सालापासून नगरपालिकेचे सभासद. स्टँडिंग कमिटीचे दोन वेळां चेअरमन व वॉटर वर्क्स कमिटीचे एक वेळ चेअरमन. रयत शिक्षण संस्थेच्या ट्रेनिंग कॉलेजचे प्राध्यापक.



श्री. भिकू शंकर मलकापुरे

सन १९४८ पासून नगरपालिकेचे सभासद. सॅनिटरी कमिटीचे चेअरमन होते.



श्री. रामचंद्र पांडुरंग भुईटे

सन १९५२ पासून नगरपालिकेचे सभासद. हल्ली स्टँडिंग कमिटी, सॅनिटरी कमिटी, पब्लिक वर्क्स कमिटी, वॉटर वर्क्स कमिटी व मॅटर्निटी हॉस्पिटल कमिटीचे सभासद. श्री शिवाजी उदय मंडळाचे सभासद. कॉंग्रेसचे सभासद.



श्री. परबतराव गेनूजी जाधव

सन १९५२ सालीं नगरपालिकेचे सभासद व स्कूल बोर्डाचे चेअरमन आहेत; शिवाय स्टँडिंग कमिटी व लॉ अँड जनरल रेफरन्स कमिटीचे सभासद आहेत. स्टँडिंग कमिटीचे चेअरमन होते. श्रीकृष्ण क्रीडा मंडळाचे गेली तीन वर्षे उपाध्यक्ष आहेत. सातारा होमगार्ड संघटनेचे डिस्ट्रिक्ट क्वॉर्टर मास्टर आहेत.



श्री. मुकुंद प्रभाकर दाबके

डिप्लोमा-इन-इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी

सन १९५२ सालीं नगरपालिकेत सभासद, हल्ली स्टँडिंग कमेटी, वॉटर वर्क्स, पब्लिक वर्क्स, मॅटर्निटी हॉस्पिटल कमेटी व स्कूल बोर्ड यावर सभासद. नगरपालिकेतर्फे डिस्ट्रिक्ट प्रोबेशन अँड आफ्टर केअर असोसिएशनवर प्रतिनिधी. अ. म. शा. शि. परिषद सातारा शाखा सभासद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सातारा जिल्हा कार्यवाह.



श्री. अनंत कृष्ण कुलकर्णी

हल्ली नगरपालिकेच्या स्कूल बोर्डाचे सभासद.
" समर्थ " साप्ताहिकाचे संपादक.
शहर कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी.



कै. बाळकृष्ण सावळाराम पानसरे

नगरपालिकेचे १९०३ सालापासून तीन वर्षे सभासद.
किराणा व भुसार मालाचे व्यापारी.



**कै. गणपतदास हिराचंद देवी**

१२ वर्षे नगरपालिकेचे सभासद. ३ वर्षे उपाध्यक्ष व निर-निराळ्या कमिटीचे चेअरमन होते. सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी व वेस्टर्न इंडिया विमा कंपनी या संस्थांचे एक संस्थापक. जी. एच्. देवी अँड कंपनीच संस्थापक व धूरीण.



**कै. सिताराम शालिग्राम सारडा**

सन १९४५ ते ४८ साली नगरपालिकेचे व स्कूल बोर्डाचे सभासद.



**कै. ज्ञानोबा रामचंद्र पानसरे**

नगरपालिकेचे १९२३ ते २६ सालीं सभासद. किराणा व भुसार मालाचे व्यापारी.



**कै. बाळकृष्ण सावळाराम पानसरे**

नगरपालिकेचे १९०३ सालापासून तीन वर्षे सभासद. किराणा व भुसार मालाचे व्यापारी.



नगरपालिकेच्या सॅनिटरी खात्यांतील स्त्री कामगार



सातारा शहरच्या रस्त्याच्या ॲस्फाल्टिंगची सुरुवात १९५०

## शाहू नगरींतील ऐतिहासिक स्थळें व उद्यानें



आमचें पूर्वींचें न्यायालय–अदालत वाडा

★



जवाहर बाग

★



जलमंदिर

★



प्रतापसिंह उद्यान

★



रंगमहाल



महारदरे तलाव



नगरपालिकेच्या वसुली व जकात खात्याचे अधिकारी व नोकर

▲ ▲ ▲ ▲



नगरपालिकेच्या सॅनिटरी खात्यांतील अधिकारी व नोकर



नगरपालिकेच्या पब्लिक वर्क्स व वॉटर वर्क्सचे अधिकारी व नोकर



नगरपालिकेच्यां मुलांच्या प्राथमिक शाळांचे सर्व मुख्याध्यापक व शाळा नं. १,२,३ व ४ मधील शिक्षक



कै. शेठ बालमुकुंद हजारीमल मुथा

नगरपालिकेचे ६ वर्षे सभासद. सातारा शहरांतील बडे व्यापारी. शिक्षण कार्यास देणग्या दिल्या. अखिल भारतीय जैन श्वेतांबर स्थानकवासी परिषदेचे अध्यक्ष.



कै. विष्णू लक्ष्मण तथा बाबूराव रांगोळे

सहा वर्षे नगरपालिकेचे सभासद होते. सुप्रसिद्ध भांड्याचे व्यापारी. ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. कासार समाजांतील एक प्रमुख व्यक्ति.



कै. नारायण बळवंत रांगणे

नगरपालिकेचे दोन वर्षे सरकारनियुक्त सभासद होते. वकिलीचा व्यवसाय होता.



कै. किसनलाल शिवनाथ लाहोटी

सन १९२३ ते १९२९ व १९३२ ते३९ मध्यें नगरपालिकेचे सभासद. अनेक वेळा स्टॅंडिंग कमिटीचे चेअरमन होते.



नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांचे उपप्रमुख व शाळा नं. ५ ते १७ यांतील शिक्षक



नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील कांहीं शिक्षक



**कै. रावबहादूर रावजी रामचंद्र काळे,** बी. ए , एल्एल्. बी.,
१५ वर्षे नगरपालिकेचे सभासद होते. व त्या काळांत अनेक कमिटयांचे चेअरमन व ४ वर्षे अध्यक्ष म्हणून काम केलें. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे तीन वर्षे चेअरमन होते. सरकारी वकील होते. मुम्बई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद होते.



**श्री. कर्मवीर भाऊराव पाटील**
रयत शिक्षण संस्थेचें आद्य संस्थापक.



**कै. डोसाभाई माणेकजी,** बी. ए., एल्एल्. बी.,
सन १८९३ ते १९०२ व १९११ ते १९२३ पर्यंत नगर-पालिकेचे सभासद होते. सहा वर्षे उपाध्यक्ष व सहा वर्षे नगरपालिकेचे अध्यक्ष होते. सातारच्या महाराजांचे ट्रस्टी होते.